म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. क्र. ७२५२

REFBK-0008342

# बालकवींची समग्र कविता

: संपादक :

प्रि. भा. ल. पाटणकर, एम्. ए.

नाशिक

REFBK-0008342

REFBK-0008342

रामकृष्ण बुक डेपो,

गिरगांव : : मुंबई ४

पहिली आवृत्ति १९४२
दुसरी आवृत्ति १९५०
तिसरी आवृत्ति १९५४

बालकवींच्या सर्व गद्य व पद्य लिखाणाचे सर्व हक्क त्यांच्या पत्नी **श्री. पार्वतीबाई ठोमरे,** यांचेकडे असून त्याचें मुद्रण, पुनर्मुद्रण, भाषांतरें किंवा ध्वनिमुद्रण त्यांच्या परवानगीशिवाय कोणीहि करूं नये.


प्रकाशकः—**वि. र. बाम,** रामकृष्ण बुक डेपो, गिरग
मुद्रकः—**कृष्णाजी नारायण सापळे,** रामकृष्ण प्रिंटिंग प्रे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

# बालकवींची जन्म कुंडली

**जन्मस्थान**—धरणगांव.

**जन्मदिनः**—श्रावण वद्य १३ शके १८१२ [ १३ ऑगस्ट, १८९० ] बुधवार रोजीं रात्रीं ८ वाजण्याचे सुमारास.




अनुक्रम

# बालकवि त्र्यंबक बापूजी ठोमरे यांचें चरित्र

## बालकवीचा जन्म

ष्याच्या आयुष्यांत एखादी गोष्ट अगदीं सहज होऊन जाते. पण कधीं कधीं ांत अर्थपूर्ण ठरते, एवढेंच काय पण त्या व्यक्तीचें सारें व्यक्तिमत्व बीज- ाने त्या गोष्टींत सामावलेलें असतें. बालकवि ठोमरे यांच्या आयुष्यांतील एक नसा प्रसंग असाच महत्त्वपूर्ण आहे. तो प्रसंग आणि त्याच्या काव्याचें स्वरूप ंत्रें एक प्रकारचा निकटचा अन्योन्य संबंध दिसून येतो. सुमारें चाळीस वर्षां- ी ती गोष्ट घडून आली. बालकवीचे वडील त्या वेळीं नवापुरला होते. त्यांच्या ीं लग्नाची गडबड होती. पाहुणे मंडळींची गर्दी जमली होती. त्या पाहुण्यांत ळकवींच्या वयाचा म्हणजे दहा अकरा वर्षांचा एक आप्त मुलगा होता. एके ृशीं हीं दोन्हीं मुलें दुपारच्या वेळेला शेजारच्या बागेंत खेळायला गेलीं. खेळतां ्तां बालकवींना वाटलें कीं बागेवर एक कविता रचावी. ते आपल्या मित्राला ाले, "वासू, बागेवर आपण कटाव करूं या." वासुदेवाला कांहीं कविता पाठ येत ्या तरी कटाव कशाला म्हणतात हें माहित नव्हतें. त्यानें नानाला विचारलें, कटाव म्हणजे रे काय?" नानाला तरी कोठें येत होती कटावाची व्याख्या! तो

म्हणाला, " अरे, ' सुरलोकाहुन गंगा आली ' ही कविता तुला माहित आहे ना ? त्या चालीवरच्या कवितेला कटाव म्हणतात. " झाली रचनेला सुरवात. त्या कटावांत निंब, जांब, जांभूळ आले, जाई जुई मेंदीची गर्दी झाली, इतकेंच काय पण खैराचीं झाडेंही आलीं. आणि इतकें करूनही चार ओळीनंतर घोडें अडकलें. पुढें काय वर्णावें हेंच कळेना. इतक्यांत नानाला मुकुंदाच्या गोड मुरलीची आठवण झाली. कवितेला चालना मिळाली. त्या मुरलीच्या गोड नादानें कृष्णाबरोबर गोप तेथें आले. त्या सर्वांनीं विटी–दांडू, आट्यापाट्या खेळण्यास सुरुवात केली. अशा रीतीनें देव भक्ताधीन झाला आणि बालकवीची पहिली कविता पूर्ण झाली. या कवितेच्या रचनेंत वासू म्हणजे सुमनकर्ते श्री. वासुदेव कृष्ण भावे यांचा भाग किती आणि बालकवि यांचा भाग किती याबद्दल जरी एकदां वाद माजला तरी लोक तो आतां विसरून गेले आहेत. "श्री. वासुदेवराव व ठोमरे यांनीं दोघांनीं मिळून ती कविता रचली" असें ठोमरे यांच्या भगिनी सांगतात, तर बालकवींचे धाकटे बंधु श्री. बाबुराव आग्रहानें म्हणत कीं, " श्री. वासुदेवराव भावे त्या वेळीं नवापूरला आलेच नव्हते." आम्हांला या जुन्या वादांत पडायचें कारण नाहीं. आमच्या दृष्टीनें महत्त्वाची ( म्हणजे बालकवीची पहिली कविता निसर्गपर होती. निसर्गाच्या सन्निध्यांत न जन्माला आली. सृष्टीमातेनें बालकवीला जन्म दिला. निसर्गाच्या मांडीवर … खेळला. साऱ्या आयुष्यभर त्यानें निसर्गाची गोड गाणीं गायिलीं. बालकवींच्या काव्याचा जन्म शहरवजा गांवाच्या अगदीं लगत असलेल्या बागेंत झाला. आणि म्हणूनच कीं काय एखाद्या बागेंत किंवा शहराच्या आसपास दिसणाऱ्या सृष्टीसौंदर्याचें त्यांनीं वर्णन केलें. आकाशांत उंच भराऱ्या मारणारा सृष्टीचा गायक, संध्याकाळीं सुटलेला मंद शीतल वायू, बागेंत बसलें असतां भेटणारी मधुयामिनी, अगर संध्यारजनी, वर बघतांच सहज दिसणारी संध्यातारका, किंवा तिच्या मैत्रिणींचे आकाशींच्या मैदानावर चाललेले सूर्यास्तनंतरचे खेळ, हिरव्या हिरव्या गवतावरून चालतांना डोलणारी फुलराणी आणि श्रावण मासांतल्या झडीनंतर गांवाबाहेर फिरावयास गेल्यावर सहज दिसणारें रम्य दृश्य किंवा एकाद्या टेकडीवरून दुडदुड खालीं येणारा निर्झर,यांच्यासंबंधीं गोड कल्पना, मृदुल भावना व नादमधुर शब्दरचना यांच्या त्रिवेणी संगमानें वाच ांना मंत्रमुग्ध करून टाकलें. आपल्या सभोंवतीं, घरीं, दारीं, बागेंत धरेवर, आकाशांत जें सौंदर्य पसरलें आहे पण ज्याची सामान्य माणसास फारशी दखल वाटत नाहीं, त्याची वाचकांना जाणीव करून देऊ

त्यांच्या हृदयांचे फुलबाग फुलवले, एवढेंच काय पण आनंदानें बेहोष झालेल्या मनोवृत्तीचें चित्रण " आनंदी-आनंद गडे " या सुंदर कवितेंत केलें.

*  *  *  *

बालकवींच्या काव्याचा जन्म नवापुरास झाला. पण त्र्यंबक बापूजी ठोमरे यांचा जन्म खानदेशांत धरणगांव येथें श्रावण वद्य १३ बुधवार रोजीं ( १३ ऑगस्ट १८९० रोजीं ) रात्रीं आठ वाजतां झाला.

खरें म्हटलें तर ठोमरे मुळचे कोपरगांवचे राहणार, तेथें त्यांचें घरदारही होतें असें म्हणतात. पण बालकवींचे वडील धरणगांवीं येऊन राहिल्यामुळें त्यांच्या कोपरगांवचा संबंध कायमचा सुटला.

भिल्लांची बंडाळी मोडल्यावर सर जेम्स औटऱ्याम यांनीं धरणगांव हें पोलिसांचें मुख्य ठाणें केलें. त्यामुळें धरणगांवचे पुष्कळसे लोक पोलीस खात्यांत शिरत; त्याप्रमाणेंच बालकवींचे वडील बापूराव ठोमरे हेही थोडेसें शिक्षण घेतल्यावर पोलीस खात्यांत दाखल झाले. त्यांच्या वळणदार व सुंदर अक्षरामुळें त्यांना कारकुनींत जागा मिळाली, पण अंगीं शिपायाला लागणारें धाडस, कांटकपणा, शौर्य इत्यादि गुण असल्यामुळें बापूराव कारकुनाचे शिपाई झाले व स्वतःच्या गुणांनीं फौजदारी-पर्यंत वर चढत गेले. एरंडोल, शिरपूर, साकरी, नवापूर येथें फौजदार म्हणून काम केल्यावर ते सेवानिवृत्ति होऊन एरंडोल येथें स्थायिक झाले. बापूराव ठोमरे हें अत्यंत विचारी, शांत, प्रेमळ व श्रद्धाळू स्वभावाचें होते. ते आपल्या हाताखालच्या लोकांशीं अत्यंत प्रेमानें व समतेनें वागत, त्यामुळें कनिष्ठापासून वरिष्ठापर्यंत सर्वांनाच प्रिय होते. व्हाईट नांवाचे त्यांचे एक अधिकारी तर त्यांना थट्टेनें देव मामलेदार असें म्हणत.

बालकवींच्या मातुःश्रीचें नांव गोदुबाई; त्या धरणगांवच्या विठ्ठलपंत शुक्ल यांच्या कन्या. हें शुक्लांचें घराणें सच्छील, धार्मिक व परोपकारी म्हणून धरणगांवीं प्रसिद्ध आहे. विठ्ठलपंतांनीं आपल्या चिरंजीवांना चांगलें व्युत्पन्न केलें, पण त्यावेळीं स्त्रियांना फारसें शिक्षण देण्याचा प्रघात नसल्यामुळें त्यांनीं गोदुबाईंना घरींच लिहा-वाचावयास शिकविलें. रामविजय, हरिविजय, पांडवप्रताप, इत्यादि धर्मग्रंथ वाचण्याचा त्यांना नाद असे. त्या संसारदक्ष, प्रेमळ व धार्मिक वृत्तीच्या होत्या.

बापूराव व गोदुबाई या दांपत्यास दोन मुली व तीन मुलगे अशीं पांच अपत्यें झालीं. त्यापैकीं मनूताई ऊर्फ जिजी व अमृतराव, हे बालकवीपेक्षां वयानें मोठे तर

किळाबाई व भास्कर ऊर्फ बाबूराव वयानें लहान. बालकवींच्या ज्येष्ठ भगिनी ूताई ऊर्फ जिजी यांना बालकवींचे चरित्रांत फार महत्त्वाचें स्थान दिलें पाहिजे. यांचें बालकवींवर निस्सीम प्रेम होतें. बालकवींच्या कवितांचे अगदीं पहिल्यानें ्णी कौतुक केलें असेल तर तें जिजीनींच; यांना लिहिण्यावाचण्यापुरतें घरींच क्षण मिळालें व त्यांचा विवाह धरणगांवचे श्री. प्रल्हाद कृष्ण भावे यांच्याशीं ला. जिजींचा कल स्वाभाविकच काव्याकडे असल्यामुळें त्यांनीं रामविजय, पांडव-ताप, भक्तलीलामृत इत्यादि ग्रंथ वाचून टाकले. त्यांचे यजमान शिक्षक असल्यामुळें वनीत त्यांच्या हातीं पडलें. काव्याचें मर्म कळण्याची नैसर्गिक शक्ति अंगीं सल्यामुळें त्यांना तें फार आवडलें. त्यांचीं जिजीनीं पारायणें केलीं. त्यांच्याबरोबर बालकवींनीं मोरोपंतांचें सबंध आर्याभारत वाचलें. बालकवींच्या आरंभींच्या कविता मोरोपंती वळणाच्या आहेत. नवनीतांतील इतर कविताही बालकवींनीं जिजींच्याबरोबर वाचल्या.बालकवींच्या अंगीं वसत असलेल्या काव्यशक्तीचा वारसा त्यांच्या आजीकडून आला असला तरी त्यांच्या ठिकाणीं काव्याची आवड जिजीमुळेंच उत्पन्न झाली असें म्हटल्यास चूक होणार नाहीं. बालकवींनीं जिजींबरोबर कविता वाचल्या, भेंड्या ळवण्यासाठीं पाठ केल्या व जरूर असलेल्या आद्य अक्षराची कविता न आठवल्यास ऐनवेळीं स्वतःच रचून म्हटल्या. दोघांही बहीणभावंडांना भेंड्याचा खेळ खेळण्याची फार हौस, तेव्हां साहजिकच पाठांतराची जरूरी; दोघांनाही काव्याची आवड, तेव्हा दोघेंही काव्यें वाचीत. सौ. जिजींना काव्यें लिहितां आलीं नाहींत तरी तीं कळण्याची ग सिकता अंगीं असल्यामुळें बालवींनीं कविता केली म्हणजे त्यांना त्या प्रेमानें स उत्तेजन देत. सौ. जिजी व त्यांचे यजमान प्रल्हादपंत यांचें बालकवींवर अपत्य-निर्विशेष प्रेम होतें. बालकवि परलोकवासी झाल्याला आज २३–२४ वर्षें होऊन ेलीं आहेत पण बालकवींच्या, त्यांच्या लाडक्या नानाच्या, गोष्टी निघाल्या तर आजही त्यांच्या डोळ्यांत अश्रु उभे राहतात. त्यांचें हृदय जात्या प्रेमळ व कोमल आहे. वयोमानाप्रमाणें शरीराला क्षीणताही आली आहे. त्यामुळें 'नाना'च्या आठवणीमुळें होणाऱ्या दुःखानें त्या एकादेवेळीं मूर्च्छित होतात. बालकवींसंबंधीं माहिती देण्याबद्दल त्यांना आम्ही जें पत्र लिहिलें तें श्री. प्रल्हादराव सौ. जिजींना वाचून दाखवित असतांना जिजींच्या जुन्या आठवणी जागृत झाल्या व त्या दुःखानें मूर्च्छित झाल्या. त्यानंतर त्या एक दोन दिवस आजारीच होत्या. आणि अश्रु ढाळितच त्यांनीं आम्हांला बालकवींबद्दल माहिती सांगितली. त्यांच्या अंगचे दो

प्रमुख गुण म्हणजे नितांत प्रेमळपणा व अत्यंत जिव्हाळा. प्रेमळपणाबद्दल गो: निघाल्या म्हणजे बालकवि आपल्या मित्रांजवळ जिजींच्या या दोन गुणाबद्द स्तुति करीत. ते श्री. दत्तोपंत टिळकांना म्हणत, "दत्तोपंत, तुम्हांला एक जिजीला भेटवीन. मग येईल तुम्हांला माझ्या म्हणण्याचें प्रत्यंतर." दुर्दैवा बालकवींच्या हयातींत हा योग आला नाहीं. पुढें श्री. टिळकांचीं व जिजींची गां पडली तेव्हां त्यांना बालकवींच्या म्हणण्याचें प्रत्यंतर आलें. बालकवींच्या अंगीं हे दोन गुण उत्कटतेनें वास करीत होते व त्यामुळेंच बालकवींशीं थोडी ओळ असणाऱ्या माणसांना सुद्धां ते आपले जिवलग स्नेही आहेत असें वाटे.

बालकवींच्या आयुष्याला वळण देणाऱ्या, त्यांच्यावर पुत्रनिर्विशेष प्रेम करणाऱ्या, त्यांच्याकरितां अश्रू ढाळणाऱ्या दोन्हीं व्यक्ती लक्ष्मीबाई. त्यापैकीं पहिली म्हणजे, सौ. जिजी उर्फ लक्ष्मीबाई भावे व दुसरी म्हणजे साहित्यलक्ष्मी, लक्ष्मीबाई टिळक. या दोन लक्ष्मींनीं बालकवींना वाढवलें. तिसरी लक्ष्मी म्हणजे संपत्ति, ती मात्र त्यांच्यापासून फटकूनच राहिली.

## बालपण व शिक्षण

पर्यंत बालकवींचें बालपण खानदेशच्या खेड्यापाड्यांतच गेलें. कारण त्यांचे वडील केल्यापूराव यांची बदली निरनिराळ्या गांवीं झाल्यामुळें सर्वच कुटुंबाला त्या त्या विचांवीं जावें लागलें. त्यामुळें बालकवींच्या शिक्षणाची साहजिकच आबाळ झाली खरी, पण त्यामुळें बालकवींचा एक मोठा फायदा झाला. वडिलांच्या सहवासांत निरनिराळ्या लहान अशा गांवीं रहावें लागल्यामुळें ज्या निसर्गाचें सुंदर वर्णन त्यांनीं आपल्या काव्यांत केलें, ज्या निर्झराची त्यांनीं गोड गाणीं गाईलीं, ज्या फुलवेली किंवा पांखरें यांना त्यांनीं आपल्या काव्यांत अमर केलें, त्या सर्वांचा प्रत्यक्ष सहवास व अनुभव बालकवींना यावेळीं मिळाला.

बालकवींची ही निसर्गाच्या सौंदर्याविषयींची आवड दिवसेंदिवस वाढतच गेली. पुढें मराठी शिक्षणासाठीं एरंडोल येथें राहत असतांना ते आपली धाकटी बहीण कोकिला हिच्याबरोबर पहांटेच बागेंत जात व तिच्यासाठीं सुंदर फुलें गोळा करीत. व त्या फुलांच्या आणि चिंचेच्या पानांच्या माळा करून आपल्या धाकट्या बहिणीला सजवीत. सुंदर फुलें गोळा करून लहान मुलांना सजविण्याची आवड बालकवींत प्रौढपणीही कायम होती. पुढें नगरास रहात असतांना आपली भाची

कु. मालती[1] व स्नेही श्री. पारनाईक यांची भाची मथुरा या लहान मुलींच्या कानांत ते निवडुंगाच्या फुलांचीं कर्णभूषणें करून घालीत. या विषयींची आठवण त्यांची भाची कु. मालती यांच्याच शब्दांत देणें योग्य होईल. "आम्हीं राहत होतों त्याच वाड्यांत मथू नांवाची लहान मुलगी राहत असे. आम्ही फिरावयास निघालों म्हणजे तीही आमच्याबरोबर येत असे. आम्ही दोघी समवयस्क त्यामुळें आमची दोघींची चांगली गट्टी जमली होती. नगरसारख्या रुक्ष ठिकाणींही त्यांच्या कविहृदयानें कांहीं रम्य विश्रांतिस्थानें निवडलीं होतीं. तेथेंच बहुधा आम्ही जात असूं. मथू दिसायला गोड मुलगी होती. तिचे तपकिरी डोळे, गुलाबी गाल, भुरे केंस सर्वच कांहीं मोहक होतें! तिचें बालरूप समजूनासला मामांनीं तेथें बसल्या बसल्या निवडुंगाच्या फुलां- मधील नाजूक फिक्या गुलाबी रंगाच्या तंतूंचीं अशीं कर्णभूषणें तयार करावींत कीं राण्यांची हिऱ्यामोत्यांचीं कुंडलें त्यापुढें निस्तेज पडलीं असतीं. सामान्य दृष्टीला जेथें निवडुंगाचें उपेक्षणीय कांटेरी कुंपण दिसलें असतें तेथेंच कविनेत्रांना सुंदर फुलें व अंलकार दिसलीं." सौ. मालतीबाईच्या या आठवणीचें शवटचें वाक्य खरें नाहीं असें कोण म्हणेल!! कांटेरी निवडुंगाच्या फुलांचीं सुंदर कर्णभूषणें करणाऱ्या या कवीनें रानोमाळ पसरलेल्या गवताच्या फुलांतील एका कलिकेला फुलराणी बनवून काव्यसृष्टींत स्वतःबरोबरच अजरामर करून ठेवलें नाहीं काय?

रंगीबेरंगी व सुवासिक पुष्पांप्रमाणेंच झुळझुळ वाहणारे निर्झर यांची आवड बालकवींना लहानपणापासूनच होती. एरंडोलास शाळेंत शिकत असतांना, गांवा- बाहेरच्या ओढ्याच्या बंधाऱ्यावर, नाहींतर वाळूंत, ओढ्याची मजा पाहत ते तासच्या तास पडून राहत. त्या ओढ्याच्या कांठीं बसून त्यांनीं सूर्यास्ताचें सुंदर दृश्य अनेक- वेळां पाहिलें होतें. रात्रीच्या वेळीं लपत छपत येणाऱ्या तारकाही बालकवींशीं येथेंच गुजगोष्टी करूं लागल्या. तसेंच बहिणीसाठीं फुलें गोळा करतांना अरुणाचें दर्शन झालें. वर्डस्वर्थच्या 'ल्यूसी' प्रमाणें या निसर्गाच्या कवीचें, बालकवीचें, खरें शिक्षण निसर्गा- नेंच केलें. झुळझुळ वाहणाऱ्या निर्झरानें किंवा कुहु कुहु करणाऱ्या कोकिलेनें त्याला आपलें नादमाधुर्य बहाल केलें असावें.

मराठी शिक्षण संपल्यावर बालकवि आपल्या थोरल्या बंधूबरोबर धुळ्यास इंग्रजी शिक्षणासाठीं जाऊन राहिले. तेव्हां नुकताच वंगभंग झाला होता. कर्झनशाही जोरांत

१ अहमदनगरचे सुप्रसिद्ध वकील व कार्यकर्ते नानासाहेब सप्तर्षि यांच्या सुविद्य पत्नी सौ. सुशिलाबाई.

होती. देशांत चोहोंकडे खळबळ उडालेली होती. जनता जुलमानें जागृत झालेली होती. स्वदेशी, बहिष्कार, स्वातंत्र्य, हे शब्द चोहोंकडे निनादत होते. लोकमान्य टिळक, शिवरामपंत परांजपे वगैरे देशभक्तांनीं आपल्या लेखांच्या व भाषणांच्या द्वारें या गोष्टींचा पुरस्कार केला होता. दडपशाहीवर कोरडे ओढले होते. गांवोगांव स्थानिक देशभक्त याच विषयांवर जोरदार व्याख्यानें देत होते. संबंध हिंदुस्तानभर देशभक्तीची लाट पसरली होती. त्यावेळीं विचारी वृद्धांचींही मनें स्वदेशभक्तीनें उचंबळून आलीं मग भावनासुलभ तरुणांची व बालांची काय कथा !! कांहींना भाषणें करण्याची तर कांहींना काव्यें रचण्याची स्फूर्ति झाली. बालकवींनींही कपबशी, चहा, मोरस साखर, रावसाहेबी अशा कविता लिहिल्या. त्यांनीं “ रावसाहेबी ” त पोकळ रावसाहेबांचें वर्णन केलें आहे, तर मोरस साखरेसंबंधींच्या कवितेंत, “ साखर परम पवित्र गाईच्या हाडांनीं शुद्ध केली जाते ” या रूढ प्रवादाचा उल्लेख केला आहे.

याच चळवळीच्या पोटीं निरनिराळ्या राष्ट्रीय शाळा जन्मास आल्या. रा. काळकर यांनीं एक राष्ट्रीय शाळा काढली. तिला बालकवि जाऊन मिळाले; त्यावेळीं त्यांचें वय सोळाच्या आसपास होतें. रा. काळकरांना शाळा काढण्याच्या व चालवण्याच्या कामीं बालकवींनीं चांगलीच मदत केली.

जळगांवचे प्रसिद्ध वकील श्री. नथू नारायण पाटील हे त्या वेळीं शाळेंत शिकत होते. ते सांगतात, बालकवि लहान लहान मुलांना बरोबर घेऊन पद्मालय येथें जात. व तेथें त्यांना नैतिक धडे देत. मनुष्याला काय करतां येईल, तें स्फूर्तिदायक शब्दांत सांगत. शिक्षण घ्या, देशाकरितां प्राण द्यावयास तयार व्हा, आयुष्याचें चीज करा, पराचे वित्त व स्त्री यांना विषसम माना असा ते उपदेश करीत. बालवयीन पाटील व त्यांचे सवंगडी यांच्या मनावर बालकवींची साहजिकच छाप बडली. या गुरूबद्दल आदर वाढला. त्यांच्या या छोट्या गुरुजींनीं त्यांना भीमकुंडाजवळ बसले असतांना कांहीं कविताही करून दाखविल्या. त्या वेळीं स्वदेशप्रेमाचें जें बीज रुजलें, मराठ्यांच्या इतिहासाबद्दल जो जाज्वल्य अभिमान जागृत झाला, तो शेवटपर्यंत त्यांच्या ठिकाणीं टिकून राहिला. मराठेशाही, छत्रपति शिवाजी महाराज व राजमाता जिजाबाई यांच्याबद्दल त्यांना फार आदर व अभिमान मरेपर्यंत वाटत असे. त्यांनीं जिजाबाईंच्यावर एक कविताही लिहिली होती. पण ती आतां उपलब्ध नाहीं. बालकवींच्या मनांतून मराठ्यांच्या इतिहासांतील एका उत्कृष्ट व उज्वल प्रसंगावर एक

काव्य लिहावयाचें होतें. मंगल वाद्यांच्या आवाजांत त्या काव्याचा नायक एका
वरून उतरत आहे अशी त्या काव्याची सुरवात व्हावयाची होती.
बालकवींच्या आयुष्याला परिस्थितीनें कलाटणी मिळाली नसती तर नुसती
च कविता काय पण महाराष्ट्राच्या इतिहासांतील विविध प्रसंगावर त्यांनीं
वृत्ति थरारून सोडणाऱ्या ऐतिहासिक कविता लिहिल्या असत्या असें त्यांच्या
ीं अपूर्ण कवितांवरून वाटतें. पण अमृतरावांनीं ज्वलज्जहाल राजकारणाचा
लंब केल्यामुळें त्यांच्या पाठीमागें पोलिसांचा ससेमिरा सुरू झाला. कधीं कधीं
. आय. डी. च्या लोकांनीं बालकवींकडेही आपली मेहरनजर फिरवली. अमृत-
रावांच्या कांहीं मित्रांना वेषांतर व देशांतर करावें लागलें. याच सुमारास त्यांचे
डील दिवंगत झाले. संसाराचा बोजा अंगावर पडला. सांपत्तिक स्थिति बेताचीच
ामुळें मन व्यग्र झालें. त्यावेळीं त्यांना विरंगुळ्याची, प्रोत्साहनाची जरूरी होती;
ण सुदैवानें ती अगदीं योग्य वेळीं मिळाली. ते नगरास रे.° टिळकांच्या घरीं
ाहावयास गेले. त्यांना तेथें लक्ष्मीबाई टिळकांसारखी प्रेमळ आई मिळाली.
राजकारणापासून अगदीं अलिप्त पण प्रेमळ अशा मित्रांचा सहवास घडला.
अनेक कवींची ओळख झाली. या सर्व कारणांमुळें ऐतिहासिक व राजकीय कविता
िहिण्याची वृत्ति कमी झाली. पण शेवटपर्यंत त्यांच्या ठिकाणीं राष्ट्रीय वृत्ति
स करीत होती. मरणापूर्वीं ७–८ महिने ते एका मित्राजवळ म्हणाले, "तरुणांनीं
घटना केली पाहिजे. राष्ट्राकरितां कांहीं तरी केलें पाहिजे." आपण मराठे
जिवंत रक्ताचे आहों, आपली परंपरा उज्ज्वल आहे. आपलें वर्तन आपल्या
र्वजांना साजेलसें असलें पाहिजे, असे ते शेवटपर्यंत म्हणत. सांगण्याचें कारण
तकेंच कीं त्यांची राष्ट्रीय कविता अनुकरणात्मक नसून राजकीय चळवळीनें
उद्भवली होती व त्यांच्या ऐतिहासिक कविता महाराष्ट्राच्या मराठेशाहीच्या
उज्वल इतिहासावर लिहिल्या गेल्या असत्या. असो.

## वनवासी

वर दिलेल्या गोष्टी इ. स. १९०५–१९०६ च्या सुमारास घडून आल्या.
त्याच सुमारास एरंडोल येथें एक हरदास आले. त्यांचें नांव रामचंद्र कृष्ण वैद्य.
हे इंदूरचे राहणारे; त्यांना एकाएकीं वैराग्य उत्पन्न झाल्यामुळें त्यांनीं संसाराचा
त्याग केला. वनवासी हें नांव धारण करून कथा करण्यास सुरवात केली; ते
पावागड, सिंहगड वगैरे ऐतिहासिक विषयावर कथा करीत. अंगीं कवित्व

विषयप्रतिपादनाची शैली उत्तम आणि विषय, मराठ्यांचे पराक्रम. साहजि बुवांची छाप लहानापासून थोरांपर्यंत सर्वांवरच बसली. त्यांत बालकवीही होते. त्यांची व बालकवींची ओळख झाली. बालकवींनीं ' वनवासी ' ला आप कविता म्हणून दाखविल्या; त्यांनाही त्या आवडल्या. तेव्हां बालकवीं ' गोंधळ ', ' भिकारी ' वगैरे कविता वनवासीसाठीं रचल्या; वनवासी कविता आपल्या कथाप्रसंगांत म्हणूं लागले. राष्ट्रसेवा हे श्लोक यावेळचेच अस गांव सोडतांना या हरदासी बुवांना वाटलें कीं, हा मुलगा आपल्याबरोबर राहि तर आपण त्याला चांगलें वळण देऊं व त्याचाही आपल्याला कीर्तनाला उपयो अशा काव्यरचनेच्या दृष्टीनें चांगला उपयोग होईल. ते बापूरावास म्हणाले " महाराज, तुमचा मुलगा कुशाग्र असून होतकरू आहे. त्याला माझ्याजवळ कांहीं दिवस राहूं द्या. " बुवा प्रसिद्ध व लोकप्रिय. तेव्हां बापूरावांनींही आढेवेढे न घेतां त्यांची मागणी मान्य केली. वनवासी बालकवीस घेऊन निघाले ते प्रवास करीत करीत उज्जयिनीस पोहोंचले. तेथें त्यावेळीं कॉलऱ्याची सांथ जोराची होती. वनवासी यांस कॉलरा झाला. तेव्हां दुसऱ्याचा लहान मुलगा आपल्याबरोबर आहे, त्याला प्रथम त्याच्या घरीं सुरक्षिततेनें पोहोंचविणें जरूर आहे या भावनेनें त्यांनीं तेथें असलेल्या केशवराव नांवाच्या चांगल्या परिचित गृहस्थाजवळ पुरेसे पैसे दिले व सांगितलें, कीं याला एरंडोल येथें घेऊन जा व आईबापांच्या स्वाधीन करा. वनवासींचा कॉलऱ्यानें अंत झाला. बालकवीही केशवराव याजबरोबर १ जून १९० रोजीं म्हणजे घरून निघाल्यापासून सुमारें दोन महिन्यांनीं एरंडोलास परत आले.

प. वा. रे भास्करराव उजगरे यांच्या आठवणीवरून असें दिसतें कीं, वनवास वारले तेव्हां बालकवी उज्जयिनीसच होते व वनवासींचा अंत्यविधि झाल्यावरच ते केशवराव यांजबरोबर एरंडोलास परत आले असावेत. भास्करराव उजगं म्हणतात, " चिता भडकलेली पाहून बालकवींच्या मनावर इतका भयंकर परिणाम झाला कीं, तो प्रसंग जसाचे तसाच त्यांनीं काव्यांत आणला. त्र्यंबकरावांनीं ती कविता आम्हांस त्यांची व आमची प्रथम भेट झाली तेव्हां तोंडीच म्हणून दाखविली होती. त्यावेळीं आमचे अंगावर रोमांच उभे राहिले. " श्री. देवद टिळकही बालकवींनीं आपल्याला असेंच सांगितलें असल्याचें स्मरतें असें म्हणतात

## जळगांवचें कविसंमेलन.

. नेक मराठी काव्याच्या अगदीं आरंभींच्या काळांत मराठी काव्याचा आणि

देशचा बराच निकटचा संबंध आला. केशवसुत भडगांवला तर विनायक गांवला राहिले. बालकवींचा जन्म व मृत्यु हे दोन्हीही खानदेशांत झाले. ळ मराठी काव्याला वाहिलेलें मासिक जळगांव येथें खानदेशांत सुरू झालें. त्या मासिकाच्या संपादकांच्या, कै. नाना फडणीसांच्या श्रमांनीं जळगांवला पहिलें राष्ट्र कविसम्मेलन भरलें. त्या सम्मेलनाचें अध्यक्षस्थान सुप्रसिद्ध कवि कर्नेल कीर्तिकार यांनीं मंडित केलें होतें. रे. टिळक, विष्णु मोरेश्वर महाजनी वगैरे राष्ट्रांतील २३ प्रमुख कवि त्या सम्मेलनास हजर होते. हा कवींचा अपूर्व सोहळा ण्यासाठीं आलेल्या जनसमूहानें तेथील लक्ष्मीविलास नाटकगृह अगदीं फुल्लन होतें. एका मागून एक कवि भाषण करीत होते. रे. टिळकांचें चित्रकाव्य या षयावरचें भाषण संपलें. आणि व्यासपीठावर एक किरकोळ अंगाचा पण तेजस्वी ळ्यांचा मुलगा जनसमूहापुढें येऊन उभा राहिला. त्यानें 'अल्पमती मी बालक, णें काव्यशास्त्रव्युत्पत्ति, कविवर्यांनो मदिय बोबडे बोल धरा परि चित्तीं,' अशी त्काळ रचलेल्या पद्यपंक्तीनीं सुरवात करून स्वकृत कविता धीटाईनें म्हणण्यास रवात केली. त्या लहान मुलांच्या त्या कविता ऐकून, सभा अगदीं तल्लीन झाली, त्यांना आनंद झाला. अध्यक्षांनीं खुष होऊन त्याला बालकवि अशी पदवी दिली, क पागोटें व जरीकाठीं उपरणें देऊन त्याचा गौरव केला. दुपारीं जेवणाच्या वेळींही छोट्या कविकडून कविवृंदांनीं त्याच्या कविता गाऊन घेतल्या. तेव्हांपासून ठोमरे ांना लोक 'बालकवि' या संज्ञेनें ओळखूं लागले. अशा रीतीनें या महाराष्ट्र कवि-म्मेलनानें महाराष्ट्राला एका नव्या कवीचा—बालकविचा—लाभ करून दिला.

* * * *

कवि सम्मेलन इ. स. १९०७ सालीं झालें. पण बालकवींच्या काव्यरचनेस . स. १९०२–३ सालीं सुरवात झाली होती. या चार वर्षांच्या काळांत त्यांनीं नवासी करतां कांहीं कविता लिहिल्या, कांहीं मंगलकार्यानिमित्त पद्यें रचिलीं, ावसभावाच्या संस्कृत प्रमाणपत्रांना मराठी पद्यांचा पेहराव चढवला. जुन्या ळणाच्या बऱ्याच कविता लिहिल्या. काव्यरत्नावलीमध्यें आरंभीं प्रसिद्ध झालेल्या या कविता आहेत त्यापैकीं कांहीं या कालखंडांतील असाव्यात.

त्यावेळीं त्यांचें लक्ष शब्दचमत्कृतीकडे विशेष असावें असें दिसतें. मोरोपंतांनीं श्रीरामायणांत साधलेली विशिष्ट रचना आपल्या आर्यांत साधण्याचा त्यांना ादच लागला होता. ते आपल्या कांहीं कवितांतून घरच्या मंडळींचीं नांवें गोंवून त असत, असें उपलब्ध पुढील त्रुटित चरणांवरून दिसतें.

आत्माज आपण भरतभूमीचे असुनी काय बा केलें ।
मृतवत आजीं पडली ती हो द्रव्य तियेचे गेलें ।
तयाची यात असे बंधु नाम हे विलसे ॥

* * *

बाणि धरोनि एकी करोनी सार्थक तुम्ही देशाचे ।
पुत्र म्हणोनि करा त्वरित तो हाल भोगितो साचे ।
जी हीं प्रथमाक्षरें पितृनाम तें सारें ।

★ ★ ★

ठोकोनि दंडा, पिटोनि मांड्या, जपान पुढती येई ।
मगरमिठींतून रशियाच्या तो युक्तीनें वर जाई ।
रेमे डोक्यांचे त्यांना आडनांव कैंचे ॥

पुढें त्यांना असल्या काव्य–रचनेंत मौज वाटेना, अनुकरणाचा कंटाळा [illegible] तेव्हां सकाळ, नदी, बाग, चांदणी, रात्र, यासारख्या विषयांवर त्यांनीं स्व[illegible] कविता रचण्यास सुरवात केली. विषयांत नाविन्य आलें, पण वृत्ति व व[illegible] हीं जुनींच होतीं. याच सुमारास आधुनिक कवींची कविता त्यांच्या वाचनांत आ[illegible] त्यांच्या काव्याला नवें व इष्ट वळण लागलें. निसर्गविषयक काव्यें स्फुरूं लाग[illegible] व महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध कवींनीं जळगांव येथें या नव्या काव्यरचनेचें जा[illegible] रीत्या कोडकौतुक केलें.

कवि–सम्मेलन झाल्यावर थोड्याच दिवसांनीं बालकवींचे वडील आज[illegible] पडले. बालकवि व घरची मंडळी यांनीं बापूरावांची पराकाष्टेची शुश्रूषा के[illegible] पण दिवसेंदिवस त्यांचा आजार वाढतच गेला व १६ फेब्रुवारी १९०८ रो[illegible] सकाळीं त्यांचें देहावसान झालें. ठोमरे यांचें कुटुंब सर्वस्वीं उघडें पडलें. बापूराव[illegible] येणारें पेन्शन बंद झालें. राजकीय परिस्थितीमुळें अमृतरावांनाही नोकरी सोडा[illegible] लागली होतीच; त्यामुळें आतां घरांत मिळवतें असें कोणीच नव्हतें. च[illegible] माणसांचा संसार, बालकवींचें शिक्षण फारसें झालेलें नाहीं, कोणाचा आश्रय ना[illegible] अशा परिस्थितीच्या भोंवऱ्यांत सांपडल्यामुळें ते घाबरून गेले. "पुढें काय?" प्रश्न त्यांच्यापुढें दत्त म्हणून उभा राहिला. या भांबावलेल्या मनःस्थितीचें व[illegible] त्यांनीं आपल्या "दुबळें तारू" या कवितेंत केलें आहे.

बालकवींची " यमाचे दूत " ही कविता वडिलांच्या दुखण्यांतच स्फुरली. त्यांनीं वडिलांची मनोभावनें शुश्रूषा केली. वडिलांच्या अंथरुणापाशीं ते रात्रंदिस बसून होते. विशेषतः घरांतील सर्व मंडळी थकून झोंपलेली, वडील गुंगींत अंथरुणावर पडलेले, दिवा मंद करून ठेवलेला, त्यामुळें खोलींतला अंधार जास्तच भेसूर वाटत असलेला, अंधारामुळें घरांत व वाढत्या आजारानें मनांत उदासीनता पसरलेली, खांबाच्या काळया छाया भिंतीवर पडलेल्या, अशा परिस्थितींत बालकवींचें कोंवळें व भावना–प्रधान हृदय व्याकुळ झाल्यास नवल नाहीं. अशा प्रसंगीं भयानक किंवा करुण–रसपूर्ण कल्पनांचें काहूर त्यांच्या डोक्यांत उठल्यास आश्चर्य कसलें ! ! मनाच्या या स्थितींत "बोलवितात विक्राळ यमाचे दूत" ही कविता बालकवींनीं लिहिली.

* * *

एखादी स्त्री किंवा पुरुष दिवंगत झाल्यास त्यांच्या मुलाचें किंवा मुलीचें लग्न त्या व्यक्तीच्या मरणापासून एक वर्षांत केलें पाहिजे; नाहीं तर पुढें तीन वर्षें करतां येत नाहीं, अशी एक चाल कांहीं वर्षांपूर्वीं तरी महाराष्ट्रांत रू होती. वडील वारले तेव्हां बालकवि अविवाहित होते. त्यांना कवि म्हणून प्रसि मिळाली होती. तेव्हां त्यांच्या मातुःश्रीला आपल्या नानाचें लग्न व्हावें असें वाटत होतें. याच सुमारास खेती येथील श्री. विनायक भाऊभट जोशी, यांची मुलगी सांगून आली. ही मुलगी आईबापांची एकुलती एक. त्यांनीं आग्रह धरला पण गरिबीमुळें बालकवि लग्नास तयार होईनात. आईचा मात्र आग्रह, " नाना लग्न कर. " बालकवींनीं सांगितलें, " आई, इतक्यांत लग्न नको ग, मला शिक्षण तरी घेऊं दे, " पण जुन्या काळचीं तीं माणसें लग्नाचा व शिक्षणाचा काय संबंध असें म्हणत. आर्थिक परिस्थितीही त्यांना भेडसावीत नसे. तीं म्हणत, " आहे काय, अर्ध्या भाकरींत चतकोर ती खाईल. " आजही असें म्हणणारी मंडळी कुठें कुठें आढळतात. मग २०–२५ वर्षांपूर्वीं बालकवींच्या आईस तसें वाटल्यास नवल नाहीं. तिनें फारच आग्रह केला, " नाना माझ्याकरितां तरी लग्न कर, यंदां केलें नाहींस तर आणखी तीन वर्षें होणार नाहीं. माझे डोळे मिटण्यापूर्वीं तुझे दोनाचे चार हात व्हावे असें मला वाटतें. " प्रेमळ आईच्या आग्रहास्तव शेवटीं त्यांनीं आईचें म्हणणें ऐकलें व श्री. जोशी यांच्या मुलीशीं बालकवींचा विवाह झाला.

---

१ या कवितेचा संबंध ज्योतिषानें सांगितलेल्या अपघाती मृत्यूच्या भीतीशींही लावण्यांत येतो.

बालकवींनीं विवाह केला खरा, पण ते संसाराच्या पाशांत पडले नाहींत. शिक्षणासाठीं त्यांनीं तडक नाशिक गांठलें. त्यावेळीं नाशकास खानदेशचे दूधमांडे शास्त्री हे भटजीमहाराजांच्या मठांत अध्ययन, अध्यापन करीत होते. अमळनेरचे रा. विष्णु काशिनाथ उर्फ बाळूकाका भागवत यांनीं बालकवीला पत्र देऊन रा. दूधमांडे यांजकडे पाठवलें. 'सुलगा होतकरू आहे; चांगला कवि आहे; त्याच्या वाणीवर संस्कृतचा संस्कार व्हावा, म्हणून मुद्दाम पाठविलें आहे,' असें त्या पत्रांत लिहिलें होतें. रा. दूधमांडे या आपल्या शिष्याला आस्थेनें शिकवूं लागले. ही गुरु शिष्यांची जोडी सायंकाळीं लांब फिरायला जाई. काव्याबद्दल चर्चा करी. एकदां हे दोघे फिरत फिरत तपोवनांत गेले. तेथें दोन ओढ्यांच्या संगमाजवळील वनश्रीची शोभा पाहून 'स्थाने रामायणकविर्देवीम् वाचम् अवीवृधत्' असे उद्गार बालकवींच्या तोंडून एकदम बाहेर पडले. नाशकांस असतांना बालकवींनीं रामायणांतील एका कथाभागांवर एक सहा सर्गांचें काव्य लिहिलें होतें. त्यांत रामाला कौसल्येचा वियोग झाला त्या वेळचें वर्णन अत्यंत करुणरसोत्पादक झालें होतें. तें वाचीत असतां दूधमांडें यांच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले. ते बालकवीस म्हणाले, "त्र्यंबक तुलाहि आईचा वियोग झाला आहे. रामाच्या मिषानें तूं स्वतःच्याच मनःस्थितीचें वर्णन केलें आहेस. यांतला रस फारच बहारीचा आहे."

बालकवि नाशकास ज्यांच्या घरीं राहत होते ते गृहस्थ फारच चांगले होते. बालकवींनीं आपल्या घरीं रहावें असें त्यांना वाटत होतें, पण त्या घरच्या इतर मंडळींचा बालकवींना फार त्रास होऊं लागला, त्यामुळें त्यांना सहा महिन्यांत नाशिक सोडून एरंडोल येथें परत जावें लागलें. नाशिकच्या आपल्या आश्रयदात्यावर त्यांनीं एक कविता लिहिली होती. तिच्यांत बाभळीच्या वनांत एक आम्रतरु वाढला असें त्या गृहस्थाचें वर्णन केलें होतें. पुढें ती कविता व रामायणावरील उपरिनिर्दिष्ट काव्य, हीं दोन्हींही बालकवींनीं फाडून टाकलीं.

* * *

बालकवि एरंडोल येथें गेले खरे, पण तेथें शिक्षणाची कांहीं सोय नव्हती; त्या सुमारास धरणगांवचीं कांहीं मुलें कालभवनांत शिकत होतीं. त्यांचा व बालकवींचा चांगला परिचय होता. त्या मित्रांच्या आग्रहावरून बालकवींनीं शिक्षणासाठीं बडोद्यास जावें असें ठरवलें; तेव्हां अमृतरावांनीं सेनापति बापटांकडून प्रा. जी. जी. पेंडसे यांच्यासाठीं चिठ्ठी मिळवून बालकवींस बडोद्यास रवाना केलें.

बडोद्यास धरणगांवचे जोशी वगैरे बालकवींचे स्नेही टेकडीवर दत्तमंदिरांत खोली घेऊन रहात असत. पूर्वसंकेताप्रमाणें बालकवीही त्यांच्याच बरोबर राहूं लागले. त्यांच्या शेजारीं एक गुजराथी गृहस्थाचें बिऱ्हाड होतें. तो गृहस्थही मोठा रसिक होता. कवि रसिकांची दोस्ती झाली. कलापीच्या केकारवानें बालकवींना मोहिनी घातली. त्या गृहस्थाच्या साह्यानें बालकवींनीं कलापींचीं काव्यें वाचलीं. पुढेंही कलापींच्या 'ग्राम्यमाता' या जानपद-गीतांच्या कांहीं ओळी ते वरचेवर गुणगुणत.

या गुजराथी गृहस्थाला दोन मुली होत्या. एकीचें वय १३–१४ असून ती विधवा होती. तिची धाकटी बहीण ६–७ वर्षांची होती. बालकवींना मुलांची आवड तेव्हां धाकट्या बालिकेची व त्यांची चांगलीच गट्टी जमली. पुढें थोरली मुलगी विषमज्वरानें वारली, तेव्हां तिचें प्रेत स्मशानांत नेत असतांना धाकटीनें रडून आकांत केला. त्या हृदयद्रावक प्रसंगावर बालकवींनीं एक कविता लिहिली. तें करुणगीत ऐकतांना श्रोत्यांच्या डोळयांतून अश्रूधारा वाहूं लागत असें सांगतात.

बडोद्यास असतांना प्रो. जी. जी. पेंडसे व श्रीमंत संपतराव गायकवाड यांनीं बालकवींना सर्वतोपरी मदत केली. एका मोठ्या समारंभाच्या वेळीं त्या प्रसंगानिमित्त काव्य रचण्यास श्री. संपतराव यांनीं त्यांना सांगितलें व त्याबद्दल पैसे देऊं केले. पण बालकवींना पैसे घेऊन स्तुतिपाठकी कविता लिहिण्याची कल्पना न पटल्यामुळें त्यांनीं कविता करून देण्याचें नाकारलें असें म्हणतात. श्रीमंत संपतराव यांचा लोभ पुढेंही बालकवींवर होता.

बालकवि १९०९ च्या जुलैच्या सुमारास बडोद्यास रहावयास गेले. त्याच्यानंतर चारपांच महिन्यांनीं बडोद्यास साहित्य–संमेलन भरलें. बालकवि व त्यांचे स्नेही श्री. जोशी हे दोघेही स्वयंसेवक दलांत दाखल झाले. त्याही संमेलनाचे अध्यक्ष कर्नल कीर्तिकरच होते. बालकवींनीं रे. टिळक संमेलनास येणार असल्याची बातमी काढून ठेवली होती. संमेलनाच्या दिवशीं ते रे. टिळकांना भेटण्यासाठीं त्यांच्या निवासस्थानाकडे निघाले पण वाटेंतच त्यांची व रे. टिळकांची गांठ पडली. दोघांना आनंद झाला. टिळकांनीं बालकवींजवळ त्यांच्या नव्या कवितांबद्दल चवकशी केली. दुसऱ्या दिवशीं बालकवींनीं आपल्या कांहीं कविता कीर्तिकरांना व टिळकांना म्हणून दाखविल्या. त्यावेळीं कोल्हटकर व केळकर हे दोन तात्या, आनंदकर्ते

वासुदेवराव आपटे व मनोरंजनचे काशिनाथपंत मित्र ही मंडळी हजर होती. बालकवींचा या सर्वांशीं परिचय झाला.

बालकवींची प्रकृति त्यावेळीं बरीच खालावलेली होती. बालकवींनीं उत्तम हवेच्या ठिकाणीं जाऊन रहावें असें श्रीमंत संपतराव यांनीं टिळक व कीर्तिकरांना सांगितलें, पण टिळक व कीर्तिकर यांना ही कल्पना तितकीशी आवडली नाहीं. बालकवींनीं नगरास टिळकांचेकडे राहून विद्याभ्यास करावा, असें टिळकांनीं सुचविलें. बालकवि व कीर्तिकर या दोघांनाही ती कल्पना पटली. कीर्तिकरांनीं बालकवींना शिक्षणासाठीं दरमहा दहा रुपये मदत देण्याचें आश्वासन दिलें. तेव्हां बालकवींनीं नगरास जाण्याचें निश्चित केलें; व बडोद्याची लवकरच कायमची रजा घेतली.

## अहमदनगर

खरें म्हटलें तर जळगांवचें सम्मेलन झालें तेव्हांपासून रे. टिळकांचें मन बालकवींनीं आकर्षित करून घेतलें होतें. हा छोटा कवि पुढें यावा, त्याच्या काव्यवेलीला बहर यावा, तिच्या काव्यपुष्पांचा सुगंध चोहोंकडे दरवळावा असें त्यांना तेव्हांपासून वाटूं लागलें होतें. होतकरू कवींना उत्तेजन देऊन त्यांना पुढें आणावें असा रे. टिळकांचा स्वभाव असल्यामुळें बालकवींच्याबाबत त्यांनीं त्या मार्गानें खटपट करण्यास सुरुवात केली. आपल्याप्रमाणेंच कर्नल कीर्तिकरांनाही या बालकवींबद्दल कौतुक व त्याच्या कवितांबद्दल एक प्रकारचें प्रेम वाटतें हें त्यांना माहित होतें. तेव्हां बालकवींच्या बाबत त्यांनीं कीर्तिकरांशीं बराच पत्रव्यवहार केला. त्या दोघांच्या विचारविनिमयाला दृश्य असें रूप वर सांगितल्याप्रमाणें बडोद्याच्या साहित्यसम्मेलनांत आलें.

त्या संम्मेलनानंतर महिना दीड महिन्यानें बालकवि रे. टिळक यांच्याकडे रहावयास गेले. रे. टिळकांनींही त्यांची रहाण्याची सोय आपल्या घरीं करून अमेरिकन मिशन हायस्कूलमध्यें पांचव्या इयत्तेंत त्यांचें नांव दाखल केलें व प्रकृति सुधारण्यासाठीं कॉडललिव्हरची बाटली आणून दिली. पण काडलिव्हर किंवा शाळा या दोहोंचा बालकवींना फारसा फायदा नाहीं. खरा फायदा झाला असेल तर तो टिळकांच्या घरीं राहण्यानेंच.

टिळकांचें घर म्हणजे एक सरस्वतीचा खुला दरबार होता. त्यांच्या घरचें वातावरण पूर्ण काव्यमय होतें. स्वतः रे. टिळक एक उत्तम कवि, त्यांच्या पत्नीही

कवयित्री, घरांत नवीं नवीं मराठी पुस्तकें व मासिकें एकसारखीं यायचीं. टिळक भोंवतालच्या मंडळींना आपल्या नव्या कविता नित्य वाचून दाखवायचे. त्यांतलें मर्म समजावून सांगायचे. तसेंच निरनिराळे कवि व लेखक टिळकांना भेटायला येत. परस्परांच्या कविता एकमेकांना वाचून दाखवीत, चर्चा करीत, लक्ष्मीबाईही कविता करीत, रसिकतेनें इतरांचें काव्य ऐकत. अशा काव्यमय वातावरणांत काव्यचर्चेनें, काव्यश्रवणामुळें, त्यांच्या घरीं येणारा जाणारांनाही कविता कराव्याश्या वाटत. रा. वा. भास्करराव उजगरे यांनीं ज्या थोड्या फार कविता लिहिल्या, त्या टिळकांच्या सहवासामुळेंच! वृद्ध कवि सच्चिदानंद हेही ह्या वेळीं नगरास असल्यानें, टिळकांच्या-कडे येऊन आपल्या कविता वाचून दाखवीत. टिळकांच्या चिरंजीवांनीं याच सुमारास आपल्या गोंडेदार चाबकानें काव्यसंसारास सुरवात केली. रोहिणी नांवानें "नववर्षा" ताराबाईनें आपल्या लाडक्या मांजरावर, आवारांतल्या बाभळीच्या फुलांवर गाणीं गाइलीं. कवि टेंभुर्णीकर यांना काव्य रचण्यास तेथूनच स्फूर्ति मिळाली. तेथें जमणाऱ्या बऱ्याच बालगोपालांना काव्याची वाचा फुटली. मग बालकवींसारख्या प्रतिभाशाली कवीचा काव्यवृक्ष बहरला यांत आश्चर्य कसलें! परिस्थितीचें कडक ऊन पडलें तरी लक्ष्मीबाईंसारख्या मातुःश्रीच्या प्रेमाचें वर छत्र व टिळकांसारख्या कवीचें प्रोत्साहन; मुळे, दतोपंत, पारनाईक वगैरे बरोबरीच्या आनंदी वृत्तीच्या मित्रांच्या सहवासाचें गोड वातावरण, टेंभुर्णीकर वगैरे होतकरू व उदयोन्मुख कवींचें भोंवतालीं वलय! तेव्हां बालकवि साहजिकच आपली परिस्थिति विसरले! त्यांच्या मनाचा उदासपणा पार पळाला. त्यांची कवित्वशक्ति प्रस्फुरली. नव्या नेपानें ती पालवली. प्रथितयश कवींच्या स्तुतीनें ती बहरली. 'आनंद', 'मनोरंजन', 'खेळगडी', 'बालबोधमेवा' वगैरे मासिकांतून ती झळकूं लागली; पण मनुष्य काव्य-रसांत कितीही डुंबला म्हणून कांहीं त्याची तहानभूक तो कायमची विसरूं शकत नाहीं. कवीला व्यवहार कांहीं सोडतां येत नाहीं. त्या दृष्टीनें बालकवींची स्थिति सुधारण्याचें टिळकांचे व त्यांचे स्वतःचें प्रयत्न चालूंच होते. बालकवि इंग्रजी शाळेंत दाखल झाले होते. * शाळेंतही ते रोज जात. पण त्यांचें वय त्यावेळीं १८-१९ वर्षांचें, मराठी व संस्कृतचें बरेंच वाचन झालेलें, वर्गांतील मुलांपेक्षां त्यांचें ज्ञान या विषयांत कितीतरी जास्त!

---

* १७ जानेवारी १९१० रोजीं इंग्रजी पांचव्या इयत्तेंत त्यांचें नांव दाखल केल्याचें अहमदनगर मिशन हायस्कूलच्या रेकॉर्डवरून दिसतें.

त्यामुळ त्यांचें मन वर्गांतील अभ्यासाकडे लागत नसे. कधीं कधीं वर्गांतच ते कविता लिहीत. बालकवि हा एक जन्मजात कवि आहे याची त्यांच्या वर्गबंधूंनाच काय पण शिक्षकांना सुद्धां कल्पना नव्हती. वर्गांतील अभ्यासाकडे दुर्लक्ष करून वर्गांत कविता लिहिल्यामुळें शिक्षकांनीं त्यांची कधीं कधीं हजेरी घेतली होती. पुढें लवकरच बालकवींनीं शालेय शिक्षणाला रामराम ठोकला.

याच सुमारास बालकवींना दोषी ताप–विषमज्वर–येऊं लागला. तो ताप ४० दिवस मुदतीचा ठरला. त्यावेळीं लक्ष्मीबाई टिळकांनीं त्यांची फार शुश्रूषा केली. लक्ष्मीबाई म्हणतात, "चाळीस दिवस तो एकसारखा तळमळत होता. त्यावेळीं मला रात्र रात्र झोंप नसे. त्याचें सर्वच मला करावें लागे, व म्हणून त्याला व त्याच्या आईला माझ्याबद्दल एक निराळाच स्नेहभाव वाटे. त्याची आई म्हणे, 'लक्ष्मीबाई नाना माझा नाहीं, तुमचा आहे. तुम्ही होता म्हणून त्याचा पुनर्जन्म झाला.'"

बालकवींच्या मातुःश्रीचे शब्द अक्षरशः खरे होते. बालकवींचा अनेक दृष्टींनीं नगरास पुनर्जन्म झाला होता. बालकवींच्या काव्यास इ. स. १९०२–३ पासून सुरवात झाली असली तरी, 'फुलराणी', 'निर्झर' वगैरे नितांत सुंदर अशीं निसर्गाचीं गोड गाणीं बालकवींनीं नगरास आल्यावरच रचलीं. ज्या काव्यामुळें त्यांना 'निसर्गाचा कवि' असें यथार्थ नांव मिळालें तीं नगरास आल्यानंतरच लिहिलीं गेलीं. महाराष्ट्र रसिकांना आपल्या मधुर रसवंतीनें त्यांनीं नाद–मुग्ध केलें, तें नगरास आल्यानंतरच! स्वतंत्र प्रतिभेच्या पंखावर उड्डाण करून आकाशांतील अनन्त तारकांशीं त्यांनीं गुजगोष्टी केल्या त्याही नगरास आल्यानंतरच. थोडक्यांत म्हणायचें झाल्यास नगरास आल्यानंतर त्यांचा कवि म्हणून पुनर्जन्म झाला. सृष्टीनियमानुसार वयानें ते वाढत गेले, तरी वृत्तीनें ते निरागस बालकच राहिले. तारुण्योद्भव उन्मादाची, तारुण्यसुलभ वैषयिक प्रेमाचीं गाणीं त्यांनीं जवळ जवळ गाइलींच नाहींत. 'जादुगारीण' ही कविता त्यांनीं नगरास येण्यापूर्वी बहुशः लिहिली असावी. वयोमानाप्रमाणें मनुष्य तत्त्वज्ञानाकडे वळतो. पण बालकवि अशा तत्त्वज्ञानाकडे वळले नाहींत. जगाला संदेश देण्याचा आव त्यांनीं आणला नाहीं. त्यांना वस्तुवस्तुमध्यें सौंदर्य दिसलें, तेंच त्यांनीं वाचकांना दाखविलें. बालकवि म्हणतात—

वस्तु वस्तुमधि काव्य विलसतें
श्रवणीं नयनीं हृदयीं उतरुनि

पूर्ण करी जें जड जीवातें
बाह्य वेष जरि सुन्दर धरितें
मंजुगीत त्या मधुनी स्फुरतें
दिव्य अहा मग तें अवतरतें
मी–तूं–पण तें क्षणिं विसरवितें
लावि अखण्ड ध्यास जिवातें.

काव्याप्रमाणें इतर व्यवहारांतही त्यांची बालवृत्ति कायम राहिली. मुलांची खेळकर वृत्ति, मनाचा मोकळेपणा, निष्कपटी स्वभाव, हीं त्यांच्या ठिकाणीं पुरेपूर भरलीं होतीं. ते प्रत्येकाशींच मोकळ्या मनानें बोलत व वागत. बोलण्यांत जिव्हाळा भरपूर असल्यामुळें प्रत्येकाला बालकवि आपले जिवलग स्नेही वाटत. तसें म्हटलें तर नगरला दत्तोपंत व ताराबाई टिळक, रावसाहेब विनायकराव मुळे, श्री. शंकरराव पारनाईक व प. वा. भास्करराव उजगरे यांनाच त्यांचे जिवलग स्नेही म्हणतां येईल. पुण्यास गोविंदाग्रज, नाट्यछटाकार गर्गे, सहस्रबुद्धे बंधु जळगांवास श्री. अप्पासाहेब सोनाळकर, श्री. नथू नारायण पाटील वकील व रा. बाबूराव देशपांडे मास्तर हे त्यांचे प्रमुख स्नेही होते. बालकवींच्या थोरल्या भगिनींचें यजमान श्री. वासुदेवराव भावे यांचा तर बालकवींशीं बाळपणापासून अकृत्रित स्नेह होता.

जिव्हाळ्याप्रमाणें खेळकर वृत्तीही त्यांच्या रोमरोमांतून भरलेली होती. बालकवि रे. टिळकांच्याकडे राहावयास गेले, तेव्हां ताराबाईचें वय ७–८ वर्षांचें असेल. पण बालकवि पुष्कळ वेळां ह्या लहान मुलीशीं बरोबरीच्या मुलांप्रमाणें खेळत. तिला चित्रें काढून दाखवीत. हीं चित्रें बहुधा पर्वत, नद्या, ओढे, फुलें, पक्षी, झोपडी यांचीं असत. ते चित्रकार नव्हते पण कवि होते. त्यामुळें चित्र काढतांना त्या चित्रांचें व त्या चित्राच्या कल्पनेचें इतकें काव्यमय वर्णन करीत कीं, काढलेलें चित्र सुंदर न झालें, तरी त्या वर्णनानें छोट्या बालिकेला तें खरेंखुरें चित्र वाटून खूप आनंद होई. बाकी त्या बालस्वभावी कवीला मुलांचीं मनें कशीं आकर्षावींत हें फारच चांगलें माहीत होतें. ते लहान मुलांना गोड गोष्टी व चित्ताकर्षक कहाण्या सांगत. म्हणून ते मुलांना फार प्रिय असत. वडिलांची खोली लावायची, म्हणजे इकडच्या खुर्च्या तिकडे करण्याची, चित्रांच्या जागा बदलण्याची, कागदी फुलांच्या माळांनीं बैठकीची जागा सजविण्याची ताराबाईंना आवड असे.

बालकवि या छोट्या मुलीला या कामीं मनोभावानें मदत करीत; कधीं कधीं हीं दुक्कल घरांतली अडगळ, रिकामे डबे, बिनबुचाच्या बाटल्या वगैरे जिन्नस मागच्या दारानें फेंकून देत. हे सगळे उद्योग घरीं कोणी नसतांना, लक्ष्मीबाई झोंपी गेल्या-वर, सुटीच्या दिवशीं चालत. लक्ष्मीबाई झोंपून उठल्यावर दोघांनाही रागे भरी ही गोष्ट वेगळी; पण लक्ष्मीबाई जशा त्यांच्यावर रागावत तसें बालकवीही एखाद्या मुलाप्रमाणें त्यांच्याशीं हट्ट घेत व वाद करीत. एकदां तर लक्ष्मीबाईंशीं ते भांडूं लागले—'तुम्ही माझ्यावर मुलाप्रमाणें प्रेम कां करतां?' लक्ष्मीबाईंना त्यांची समजूत घालायला बरीच उरस्फोड करावी लागली. नवी कविता लिहिली कीं लक्ष्मीबाईंना वाचून दाखवायची त्यांना सवय होती. एखादें दिवशी लक्ष्मीबाई कामांत असल्या तर त्यांचें त्या कवितेकडे दुर्लक्ष होई; असें झालें कीं बालकवीनें आपली कविता फाडलीच. या बालस्वभावाचें कधीं कधीं बालि-शतेंत व लहरीपणांत रुपांतर होई. इ. स. १९११ च्या शेवटीं बालकवीचें नग[र] सोडून पुण्यास जाणें हें सुद्धां लहरीपणाचेंच उदाहरण म्हणतां येईल. इ. स. १९११ च्या सुमारास बालकवींनीं नगरास रामराम ठोकला व पुण्यास प्रया[ण] केलें. तेथें केसरींत त्यांना सहसंपादकाचें काम मिळालें. केसरींत काम करी[त] असतांना 'अर्वाचीन कवि' हा अर्वाचीन कवींची तरफदारी करणारा ले[ख] केसरींतून प्रसिद्ध केला. या लेखाला अनंततनयांनीं उत्तर दिलें. बालकवींच्या या लेखांत, बालकवींचें आधुनिक कवींविषयीं, कवितांविषयीं तसेंच कवितेच्या स्वरूपासंबंधीं मत आलें असल्यामुळें व तो लेख आतां दुर्मिळ झाल्यामुळे त्यांतील दोन तीन महत्वाचे परिच्छेद येथें दिल्यास अप्रस्तुत वाटणार नाहीं. ते म्हणतात "आधुनिक कविता यमक—प्रास—संस्कृत शब्द यांना महत्त्व दे[त] नाहीं. 'रसात्मकं काव्यं' हें ध्येय तिच्या डोळ्यांसमोर आहे. तिच्या बोबड्या बोलांत प्रेम, आशा, उत्साह, माधुर्य आहे. क्षुल्लक विषय घेतात म्हणून आधुनिक कवि कवीच नव्हत असें म्हणणारांनीं निदान 'रांगोळी घालतांना पाहून', 'वातचक्र', 'म्हातारी', 'भृंग', 'पुष्पाप्रत' या केशवसुतांच्या कविता एकदां तरी अवश्य वाचाव्या.

बाह्यसृष्टीचा चेतनेला धक्का लागण्याबरोबर ज्यांची प्रतिभाशक्ति कल्पनेच्या वातावरणांत आपल्या मंजुळ गायनाचा झणत्कार सुरूं करते, व ज्या गायनाला मोहून अदृश्य शक्ति देखील आपलें अमूर्त स्वरूप सोडून देऊन मूर्त रूपाला येते,

असलें काव्य म्हणजे खरें काव्य, त्याला यमक प्रासाची जरुरी नाहीं, त्याला लठ्ठ जाड संस्कृत शब्द नकोत, कांहीं नको. कल्पनेच्या वातावरणांत उंच उडत असतां त्याच्या भराऱ्या मराठी भाषेंत स्पष्टपणें येऊं शकत नाहींत, म्हणून संस्कृताची मदत घेणें आवश्य होय, असें म्हणणारी कांहीं मंडळी आहे त्यांनीं "हरपलें श्रेय", "झपूर्झा" वगैरे कविता वाचाव्या म्हणजे त्यांचें भ्रमाचें पटल दूर होईल."

"मानसिक विकारांचे पडदे, सृष्टीचें सौंदर्य वगैरे पाहून आधुनिक कवींची प्रतिभा पेट घेते. अशा कविता आधुनिक कवितेंत फार आहेत. रा. लेंभे, टिळक, विनायक, चंद्रशेखर इत्यादींना काव्याच्या आम्रतरूवर बसून सृष्टीसौंदर्यानें उचंबळून आलेलें अंतःकरण प्रतिभेच्या द्वारें खुलें करण्याचें वळण आधुनिक कवितेनेंच प्रथम लावून दिलें."

"कविता पूर्ण स्वच्छंदी आहे. यमक, प्रास, चाल हीं कवितेचीं बंधूनें आहेत. त्यांनीं तिचा देह शोभायमान दिसत असेल; पण प्रतिभेच्या वातावरणांत ती स्वैर विहार करीत असतां तीं तिला अडवून धरतात यांत शंका नाहीं."

कवितेनें एका भक्तिमार्गानेंच किंवा श्रृंगारांतूनच गेलें पाहिजे, अमुक यमक-प्रासांचे दागिने आंगावर चढविले पाहिजेत, अमुक वृत्तांत तिनें नाचलें पाहिजे व अमुक एक तऱ्हेचे विषय घेतले पाहिजेत असें म्हणणें वेडेपणाचें आहे. ती वायू-प्रमाणें स्वच्छंदी आहे, व स्वच्छंदीपणा हेंच ब्रीद होय. कवितादेवी कोणत्याही पेंचांत कधींही राहूं शकणार नाहीं. ती भक्तींत तल्लीन होईल, श्रृंगाराचा अनुभव घेईल, वात्सल्यरस चाखील अगर करुणालाप काढीत बसेल. एखाद्या राजाचें वर्णन करील आणि शेतकऱ्याचें वर्णन करूं नकोस असें तिला म्हटलें तरी ती ऐकणार नाहीं. तिची दृष्टी ज्या पदार्थावर पडेल तो पदार्थ क्षुद्र असला तरी त्याला दिव्यत्व येईल असा तिचा अद्‌भुत दृष्टिप्रभाव आहे. आधुनिक कवींनीं तिला बंधनापासून बरीचशी मोकळी केलेली आहे. आतां ती पूर्वीप्रमाणें पुराणें शोधीत बसत नाहींत; तर एखाद्या मुग्ध मनोहर बालकेप्रमाणें फुलांबरोबर खेळते, म्हातारी बरोबर उडायला धांवते, प्रियकराबरोबर गुजगोष्टी करते, वातचक्राबरोबर स्वर्गांत जाते."

हे उतारे १३-१-१२ च्या केसरीच्या लेखांतील म्हणजे ३० वर्षांपूर्वीचे आहेत. या तीस वर्षांत केशवसुत, टिळक वगैरे कवींनीं सुरू केलेल्या काव्यसंप्रदायाचा विकास, उत्कर्ष होत असून आधुनिक कवितांचे लेखक व वाचकही पुष्कळच वाढले आहेत; त्यामुळें या उताऱ्यांना आतां ऐतिहासिक स्वरूपाचें महत्त्व प्राप्त

झालें असलें तरी बालकवींच्या काव्यविषयींच्या कल्पना समजण्याच्या दृष्टीनें आजही महत्त्व आहे. तसेंच बहुतेक उदाहरणें केशवसुतांच्या कवितांचींच दिलीं आहेत त्यावरून त्यांना केशवसुत हा कवि किती आवडत असे याची ओळख पटते. असो.

केसरीच्या उपसंपादकाचें काम कांहीं महिनेच त्यांनीं केलें; पुढें कांहीं क्षुल्लक कारणांवरून त्यांना त्या जागेचा राजीनामा द्यावा लागला, तेव्हां ते नगरास परत गेले. याच सुमारास बालकवींची व गोविंदाग्रजांची ओळख झाली व या ओळखीचें रूपांतर पुढें गाढ मैत्रींत झालें.

केसरींतलें काम सुटल्यावर बालकवि नगरास परत आले. त्यांनीं शिक्षण सोडल्यामुळें कर्नल कीर्तिकरांकडून येणारी मदत बंद झाली. तेव्हां बालकवींना नोकरी करणें भाग पडलें; पण रे. टिळकांच्यामुळें त्यांना मिशन स्कूलमध्यें शिक्षकाची जागा मिळाली. ते शाळेंत संस्कृत व मराठी शिकवीत. मराठी काव्यें शिकवतांना ते कवीशीं अगदीं समरस होत व मुलेंही कवितांचें विवरण ऐकत असतां तल्लीन होऊन जात. काव्यांतील मर्म जाणण्याची व श्रोत्यांना ते खुलवून सांगण्याची कला त्यांना चांगली अवगत होती. एकदां कांहीं मंडळींना त्यांनीं रे. टिळकांची वनवासी फूल ही कविता समजावून सांगितली व खुद्द रे. टिळकांना थक्क करून सोडलें.

त्यावेळीं नगरच्या ईश्वरी परिज्ञानाच्या शाळेंत ( Divinity School ) रे. टिळक आठवड्यांतून दोन दिवस मराठी शिकवीत. एखादे वेळीं टिळक तो तास दुसऱ्याला घ्यायला सांगत. त्यांनीं एकदां आपल्या पत्नीलाही पाठ देण्यास सांगितलें, व लक्ष्मीबाईनींही 'टिळकांना मी मारतें' वगैरे काल्पनिक गोष्टी सांगितल्याची मजेदार हकीकत आतां स्मृतिचित्रांतून पुष्कळ वाचकांना कळली आहेच. एकदां रे. टिळक बालकवींस म्हणाले, ठोमरे, "उद्यां तुम्ही माझा मराठीचा तास घ्या." बालकवींनीं हो म्हटलें. दुसरे दिवशीं ( २६–९–११ ) रोजीं सकाळीं ९ वाजतां रे. टिळक, लक्ष्मीबाई व बालकवि वर्गांत दाखल झाले. त्या वर्गाचे विद्यार्थी प्रौढच असत. त्या वेळीं हजर असलेले एक गृहस्थ लिहितात, "तो प्रसंग फारच बहारीचा होता. विद्यार्थ्यांनीं हॉल भरून गेला. रा. ठोमरे यांना तेथें पाहून विद्यार्थ्यांत कुजबुज सुरू झाली. इतक्यांत रे. टिळक उठून म्हणाले, आजचे पाहुणे आपल्या परिचयाचे आहेत, ते एक चांगले कवि आहेत. माझ्या वनवासी फूल या काव्याचा अर्थ ते आज आपणांस सांगणार आहेत, बालकवि व्यासपीठावर चढले व म्हणाले,

"रे. टिळक हे किती मोठे कवि आहेत याची जाणीव आपणांस आहेच. त्यांच्या आज्ञेवरून मी आपणांस त्यांचें वनवासी फूल समजावून सांगणार आहें. खुद्द कवि येथें असतांना, त्यांच्या काव्याचा अर्थ सांगणें विचित्र, तसेंच धाष्टर्याचें आहे. तरीपण मी हें धाडस करणार आहें." बालकवींनीं काव्याचें संविधानक सांगून, काव्य वाचण्यास सुरवात केली, 'मनांत किंवा जनांत किंवा वनांत सृष्टी सतीचा। मित्र खरा जो निधीच केवळ निष्काम प्रीतिचा' ही पहिली साकी वाचतांच त्यांचा सूर चढूं लागला, डोळ्यांत विलक्षण तेज झळकूं लागलें. ते तन्मयतेनें काव्य समजावून सांगूं लागले; तेव्हां त्यांच्या तोंडांतून, दुसरें काव्यच वहात आहे कीं काय असा भास होत होता. प्रत्येक कल्पना उपमा व इतर अलंकार विशद करीत असतांना अनेक गोड आणि मधुर कल्पनांचा ते एकसारखा वर्षाव करीत होते. प्रवृत्ति आणि निवृत्ति यांचें भांडण वर्णन करीत असतांना निवृत्तिपेक्षां प्रवृत्ति किती व कशी श्रेष्ठ आहे, हें त्यांनीं आपल्या ठसकेबाज व जोरदार भाषेंत श्रोत्यांना पटवून दिलें. या काव्यांतील प्रेमाचें वर्णन त्यांनीं अगदीं तन्मयतेनें केलें. 'प्रेम नाम जगदीश फुला रे। काय आणखी सांगूं। पुरें करी वनवास! ह्याहुनी काय दुज मी मागूं' ही साकी अगदीं आनंदाच्या बेहोष स्थितींत, मोठ्यानें म्हणून ते म्हणाले, "खरा मोक्ष प्रेम आहे. प्रेम केव्हांही गुलाम होत नसतें. प्रेमांतून सुटावें म्हणून तें फूल आपल्याला स्वार्थाच्या बंधनांत बांधून घेतें. पण देव प्रेमस्वरूप आहे यांतच जगाचें सारें तत्त्वज्ञान आलें आहे. जगाचा आरंभ व शेवट प्रेमच होय. सृष्टीचा मधु–मध्यबिंदु माझ्या हृदयांत आहे आणि तो प्रेम हा आहे. मनुष्य प्रेमरूप बनण्यासाठीं निर्माण झाला आहे. प्रेम नसेल तर सर्व असून व्यर्थ आहे." अशा तऱ्हेचें अस्खलित, काव्यपूर्ण, चित्ताकर्षक व रसाळ भाषण चालू असतां, इतर श्रोते तर तल्लीन झाले होतेच पण स्वतः रे. टिळकही आश्चर्यचकित झाले होते. या व्याख्यानाला पुष्कळ वेळ लागला; पण वक्त्याप्रमाणें श्रोत्यांनाही काळाचें भान राहिलें नाहीं. घरीं गेल्यावर रे. टिळक म्हणाले, 'वनवासी फूल हें माझें काव्य खरें पण त्याचें विवेचन इतक्या सुंदर रीतीनें, सहृदयतेनें मलाही करतां आलें नसतें. वनवासी फुलांत मला, खुद्द कवीला, जें सौंदर्य दिसलें नाहीं तें या रसिक कवीला दिसलें; आणि माझ्यापेक्षां मोहक वाणीनें त्यानें तें विशद केलें.'

बालकवींना रे. टिळक गुरुस्थानीं होते, तेव्हां रे. टिळकांच्या कविताच रसग्रहण त्यांनीं केल्यास त्यांत नवल कसलें, असें कोणी म्हणेल; पण बालकवि

कोणाची कां सुंदर कविता असेना, तिची मुक्तकंठानें प्रशंसा करीत. त्यांना इतर कवींबद्दल असूया कधींच वाटली नाहीं. ते केशवसुत, विनायक, गोविंदाग्रज, होनाजी बाळ यांच्या कविता पुष्कळ वेळां गात असत. गात असत म्हणण्यापेक्षां एका विशिष्ट व ठराविक चालीवर म्हणत; त्यांना गातां येत नव्हतें. त्यांच्या या विशिष्ट चालीला त्यांची स्नेही मंडळी बालकवींची चाल असें म्हणत. असा कवि व रसिक शिक्षक मिळाल्यामुळें मुलांना मराठीचा तास सहजच फार आवडे.

नोकरी मिळाल्याबरोबर बालकवींनीं आपले स्नेही रा. पारनाईक ज्या घरांत रहात होते त्याच घरांत स्वतंत्र बिऱ्हाड केलें. पुढेंही बालकवि व रा. पारनाईक एकाच घरांत पुष्कळ दिवस रहात होते. त्या दोघांचा इतका अकृत्रिम स्नेह होता कीं, घर बदलायचें झालें म्हणजे दोघे एकदमच बदलीत व दोघांना सोईस्कर असेंच घर पहात. एकदांच काय ते बालकवि माळीवाड्यांत मुळे यांच्या घरासमोर व मरणापूर्वी कांहीं महिने रा. पारनाईकांच्या घराजवळच पण त्याच गल्लींत रहात असत. दत्तोपंत टिळक व मुळे कॉलेज शिक्षणासाठीं बाहेर गांवीं गेल्यामुळें त्या सर्वांच्या गांठीं सुटींत व्हायच्या; पण पारनाईक व ठोमरे यांची जोडी कायम नगरास होती. ठोमरे जसे रसिक व कवि, तसे पारनाईक गवई व चित्रकार असल्यामुळें या दोघांमध्यें तीन ललितकलांचा संगम झाला होता. बालकवींना गातां येत नसलें तरी गाणें ऐकायला आवडे. रा. पारनाईक सांगतात, "मी अस्ताईचें गाणें म्हणत असतां 'या सुरांबरोबर संथ पोहा किंवा ताना चालू असता आपणही हवेंत भिरक्या माराव्या,' असें ते म्हणत. कविता म्हणण्यास उत्तम आवाजाची देणगी जरी त्यांना नव्हती, तरी प्रसंगानुसार अभिनय करून ते आपली कविता वाचून दाखवीत."

ठोमरे यांनीं जरी वेगळें बिऱ्हाड केलें तरी दररोज संध्याकाळीं टिळकांच्याकडे ते जायचेच. स्वतंत्र बिऱ्हाड केल्यावर बालकवींनीं मातुःश्रीस व धाकट्या बंधूस नगरास नेलें. बालकवींच्या पत्नी पार्वतीबाई इतके दिवस माहेरीं होत्या त्यांना बालकवींनीं बोलावून घेतलें; लग्न झाल्यापासून बालकवि शिक्षणार्थ नाशिक, बडोदे, नगर येथें हिंडत असल्यामुळें स्वतंत्र बिऱ्हाड करण्याइतकें स्थैर्य त्यांना आतांपर्यंत मिळालें नव्हतें व बालकवींच्या पत्नी आईबापांच्या एकुलत्या एक असल्यानें आतांपर्यंत त्या सासूकडे न राहतां माहेरींच राहत होत्या.

यावेळीं बालकवि ठोमरे यांना दरमहा १८ ते २० रु. पगार होता. तेवढ्या पगारांत एवढा संसार सुखानें चालवणें शक्य नव्हतें. मधून मधून त्यांचीं भाऊ-भावजयही मुलांबाळांसहित तेथें येत, इतर पाहुणेही होतेच, त्यामुळेंच बालकवींची खर्चाबाबत फार तारांबळ उडे; सकाळ संध्याकाळ शिकवण्या कराव्या लागत. मूळची प्रकृति अशक्त असल्यामुळें त्यांना या दगदगीचा फार त्रास होई. कधीं कधीं तर अंगांत ताप असतांना सुद्धां शिकवणी करण्यासाठीं लांब पायीं जावें लागे. कामानें ते अगदीं थकून जात, त्यामुळें मनाला निर्विण्णता येई. अशा वेळीं त्यांची पत्नी सुशिक्षित असती, बौद्धिक जीवनांत ती समरस होऊं शकती तर त्यांच्या मनाची निर्विण्णता कांहीं अंशीं नाहींशी झाली असती.

बालकवीच्या आयुष्यांत अहमदनगरला किती महत्त्व आहे, हें या प्रकरणाच्या आरंभीं आलेंच आहे. त्यांच्या लहानशा आयुष्यांचे दोन भाग कल्पिले तर पहिला भाग बडोद्यास संपून दुसऱ्याला नगरास सुरवात होते असेंच म्हणावें लागेल. नगर व पुणें येथें त्यांना काव्योत्पादनाच्या दृष्टीनें सारखेंच अनुकूल वातावरण मिळालें; नगराला रे. टिळक व त्यांच्याभोंवतीं असलेलें कविरसिकांचें मंडळ, तर पुण्यास गोविंदाग्रज, दिवाकर, भालचंद्र वगैरे मित्र व तुतारी मंडळ. दोन्ही ठिकाणीं काव्याचें वाचन होई, चर्चा होत. नगर येथें त्यांना टिळकांसारख्या ज्येष्ठ कवींचा तर पुण्यास जवळजवळ समवयस्क अशा गोविंदाग्रजांचा सहवास घडला. टिळकांच्याबद्दल जसा आदर तसें गोविंदाग्रजाबद्दल प्रेम त्यांना वाटे. दोघांच्या कविता त्यांनीं प्रेमानें वाचल्या. कधींकधीं तर गोविंदाग्रजांच्या कांहीं कविता त्यांच्या तोंडीं नेहमीं एकसारख्या घोळत; तरी पण या दोन्ही कवींच्या काव्याचें सारखें परिशीलन करूनही त्यांची कविता परभृत न होतां शेवटपर्यंत स्वतंत्रच राहिली. इ. स. १९१०–१९१८ पर्यंतच्या त्यांच्या कवितांमध्यें एक प्रकारचा एकजिनसीपणा, एकतानता आहे. आणि केवळ वर्णनाच्या सोयीसाठींच त्यांच्या आयुष्याचें नगर, पुणें असे कालखंड पाडावे लागतात.

या प्रकरणाचा शेवट करण्यापूर्वीं एका गोष्टीचा उल्लेख केल्यास तें अस्थानीं होणार नाहीं. बालकवींचा ज्योतिषावर विश्वास होता. त्यांना कोणा एका ज्योतिषानें चैत्रांतील नवमीला तुला गंडांतर आहे, असें सांगितलें होतें. कोणी म्हणतात कीं हें भविष्य एका युरोपिअन ज्योतिष्यानें वर्तविलें होतें. पुण्याचे श्री. भालचंद्र नीळकंठ सहस्रबुद्धे लिहितात कीं, 'मुंबईचे सुप्रसिद्ध ज्योतीषी रा. विष्णु गुर्जर यांनीं

हें भविष्य इ. स. १९११ सालीं वर्तविलें व शेवटीं तें अक्षरशः खरें ठरलें.' ज्योतिषी कुणी कां असें ना ?–बालकवींचा त्या भविष्य–कथनावर विश्वास बसला व त्या तिथीला ते दरसाल घाबरत असत. एकदां ते अगदीं खिन्नमुद्रेनें लक्ष्मीबाईंच्या पुढें जाऊन उभे राहिले, "लक्ष्मीबाई आज माझा घातवार ! आज मी मरणार" बालकवि फारच खिन्न दिसत होते. लक्ष्मीबाईनीं त्यांच्या डोक्यांतून हें अपमृत्यूचें भय घालविण्याचा प्रयत्न केला, पण व्यर्थ ! शेवटीं लक्ष्मीबाईनीं ठोमऱ्यांच्या मित्रांना बोलावून घेतलें. त्यांना सर्व हकीगत सांगितली व म्हटलें कीं, आजचा रात्रंदिवस तुम्ही त्यांच्याबरोबर रहा. लक्ष्मीबाईनीं खाण्याचे पदार्थ आणण्यासाठी पैसे दिले. मंडळींनीं ठरल्याप्रमाणें जमून चैन केली. बालकवींना त्या दिवशीं एकटेपणा मिळालाच नाहीं. ज्या खोलीमध्यें ठोमरे व त्यांचें मित्रमंडळ झोंपलें होतें तेथें दुसऱ्या पहांटेस लक्ष्मीबाई गेल्या व हांक मारूं लागल्या "अरे ठोमरे ऊठ ! दुसरा दिवस उजाडला, तुझा अपमृत्यू टळला" बालकवींना आनंद झाला, व तें पाहून लक्ष्मीबाईंना व इतर मित्रमंडळींनाही फार आनंद वाटला.

## महाबळेश्वर

नगरच्या मिशन हायस्कूलमध्यें बालकवींचा शिक्षक म्हणून प्रवेश झाल्यावर ते युरोपियन मिशनरींनाही मराठी शिकवूं लागले; उन्हाळयाच्या सुटींत महाबळेश्वर येथें त्यांची मिशनच्या लँग्वेज स्कूलमध्यें मराठी शिक्षक म्हणून नेमणूक होत असे. बहुतेक दर उन्हाळयांत बालकवि तेंथें शिकविण्याचें काम करीत. अशा वेळीं समवयस्क आनंदी व खेळकर वृत्तीची मंडळी बरोबर असली म्हणजे बालकवींच्या आनंदाला पारावार नसे. ज्या वर्षीं ते प्रथमच महाबळेश्वरास गेले त्यावर्षीं त्यांच्याबरोबर दत्तोपंत टिळक व त्यांच्या भगिनी ताराबाई याही होत्या. तो दोन तीन महिन्यांचा काळ म्हणजे त्या तिघांच्या आयुष्यांतलें एक गोड स्वप्न होय. बालकवि पुढें महाबळेश्वराला पुष्कळ वेळां गेले पण पहिल्या वेळचा आनंद–निदान तितका आनंद त्यांना महाबळेश्वरांत पुन्हा वाटला नाहीं. त्याचें एक कारण म्हणजे सारख्या स्वभावाची मित्रमंडळी पुढें त्यांच्याबरोबर तेथें नसत आणि दुसरें कारण म्हणजे बालकवींना एखाद्या ठिकाणचें सौंदर्य एकदां पाहिल्यावर त्यांत पुन्हा गम्मत वाटत नसे.

बालकवि व दत्तोपंत टिळक या दोघांनाही मराठी शिकविण्याचें काम मिळालें; अर्थात् दोघेही महाबळेश्वरास जाण्यास बरोबरच निघाले. ताराबाईंना मात्र सुटी

झाल्यावर म्हणजे साधारण एक महिन्यानंतर तेथें जातां आलें. दत्तोपंतांनीं यापूर्वी महाबळेश्वर पाहिलें होतें, तेथील सुंदर स्थळांचें अवलोकन केलें होतें. तेव्हां पुण्याहून निघाल्यापासून निरनिराळ्या पॉइंटस्‌वरून दिसणाऱ्या सृष्टि सौंदर्याचें वर्णन करून त्यांनीं तीं रम्य स्थळें पाहण्याची बालकवींची आतुरता वाढविली होती. त्या वेळीं मोटार गाड्या नसल्या तरी तांगे मिळत, पण हे दोघे निसर्गाचें सौंदर्य नीट व मुबलक पहावयास मिळावें म्हणून वाठारहून बैलगाडीनें निघालें; सृष्टीचें आल्हाददायक रूप पहात व तोंडानें कवितेच्या ओळी म्हणत त्यांनीं महाबळेश्वर गांठलें. त्या वेळचें रमणीय दृश्य पाहून दोघांच्या चित्तवृत्ति आनंदानें उचंबळून आल्या; ते दोघेही गाडींतून उतरले व तोंडानें 'Or if a path be dangerous known, the danger's self is lure alone' ह्या ओळी म्हणत दोहोंबाजूंच्या सौंदर्याचें अनिमिष नेत्रांनीं पान करीत, आनंदानें उड्या मारीत, मुक्कामाच्या जागीं गेले. त्या दोघांना त्या वनश्रीनें इतकें वेडावलें कीं, ते तहानभूक विसरून तडक तेथून फेरफटका करण्यास निघाले व चायनामन्स टरफॉलवरून चार मैल पायरस्त्यानें डोंगरावर भटकले. इतक्यांत त्यांना वळ्यांची आठवण झाली, आपण मावळ्यासारखेच उतरूं या असा विचार सुचला एका ओढ्याच्या ओहोळांतून त्यांनीं खालीं उतरायला सुरवातही केली; उतार सपाट्न तेव्हां पायाखालच्या वाळूवर दोघांचे पाय घसरले व दोघेही कोलमंडून खालीं जाऊं लागले. सुदैवानें एकाचा पाय एका उंबराच्या झाडाला अडकला; तेव्हां झाडाच्या आश्रयानें दुसऱ्यालाही त्यानें थोपवून धरलें. आतां त्यांना भुकेची ाठवण झाली. पोटांत कावळे कोकावूं लागले, पण खाणार काय? जवळ कांहींच ाहीं; जवळ असलेल्या एकुलत्या एक अशा त्या उंबराच्या फळांवर त्यांना भूक ामवावी लागली. थकवाही सपाट्न आला होता. बिऱ्हाडीं जाणें तर आवश्यकच तें. तेव्हां थोडावेळ विश्रांति घेऊन पाय रस्त्यानें तीन चार तासांनीं ते परत ाले. तोंपर्यंत बैलगाडीनें, सामान बिऱ्हाडीं पोहोंचलें होतें.

बालकवि रहात होतें, तेथें शेजारींच अत्यंत मधुर आवाजीचे एक मुसलमान ी राहण्यास आले. ते रोज सकाळ संध्याकाळ गाणें गात. ही गाण्याची त मेजवानी खोलींत पडल्या पडल्या रोज कानांना मिळे. एक दिवस ठोमऱ्यांना आली कीं बोवाजींच्या खोलींतच जाऊन गाणें ऐकावें. दोघेही उठले व जींकडे गेले; त्यांना आपला मनोदय कळविला; बोवाजींनीही मोठ्या आनंदानें

होकार देऊन गाण्यास सुरवात केली. गवईबुवांच्या गाण्याला जसजसा रंग चढूं लागला तसतसे त्यांचे हातवारे सुरूं झाले. तोंड वेडें वांकडें होऊं लागलें; बालकवि व दत्तोपंत यांना तें पाहून अनवार हंसू लोटलें, तेव्हां हळूच त्या दोघांनीं त्या खोलींतून पाय काढिला; त्यापुढें बुवाजींचें गोड गाणें चालू असतां हे आपल्या खोलींतूनच गाणें ऐकत; पण बुवाजींच्या पुढें पुन्हा जाण्याचा त्यांना धीर झाला नाहीं. त्या बुवांचें टर्रे हुसेनखां असें नांव ठेविलें होतें.

काम संपल्यावर रोज संध्याकाळीं निरनिराळे 'पॉइंटस्' पहावयाला ते जात. एके दिवशीं ते लॉडविक पॉइंटवर अगदीं पुढच्या टोंकावरच्या शिखरावर बसले होते. तो भाग हत्तीच्या सोंडेसारखा आहे व त्याचा एक भाग हत्तीच्या कानासारखा असून समोर खोल दरी आहे. हे दोघे ज्या ठिकाणीं बसले होते त्या ठिकाणीं त्यांना एक माणूस दिसला; तो एकदम जो गडप झाला तो बराच खालीं सोंडेच्या खालीं पुन्हा दृष्टीस पडला. तेथें तो एकदम गेला कसा? मध्यें कसा दिसला नाहीं? याची चर्चा सुरूं झाली. त्यांनीं त्या माणसाचा खालीं जाण्याचा मार्ग शोधावयाला सुरवात केली, तेव्हां ती वाट फारच अवघड आहे असें त्यांना दिसलें. एका खडकाला टेंकावयाचें व दुसऱ्या समोरच्या खडकावर पायाचा जे घेऊन पाठीनें खालीं उतरावयाचें असा तो मार्ग होता. दोघेही तरुण होते; त्यांनीं लागलीच त्या मार्गानें उतरावयास सुरुवात करून लवकरच ते उपरिनिर्दिष्ट ठिकाणीं पोहोंचले. साहजिकच त्यांना आनंद झाला; आपण कांहींतरी और केलें असें त्यांना वाटलें. समोर शिवरायाचा प्रतापगड दिस होता, मघाचा आनंद ओसरला नव्हता, उत्साह कमी झाला नव्हता; तेव्हां प्रतापगडावर जाण्याचा त्यांनी तात्काळ निश्चय केला. आपले शूर पूर्वज असे डोंगर चढत उतरत मग आपणाला तसें कां करतां येणार नाहीं असें त्यांना वाटले झालें, दोघांनीं उतरायला सुरवात केली. ते डोंगर उतरले तेव्हां त्यांना खूप भूक लागली होती; पण खायला जवळ कांहींच नव्हतें; इतक्यांत [illegible] घेऊन जाणारी एक बाई भेटली. तिकडून त्यांनीं एका दिडकीचीं तोरणें [illegible] घेतलीं. खेडेगांव तें, आणि तोरणासारखें फळ, त्या बाईनें साहजिकच खूप [illegible] दिलीं. बालकवींना मात्र वाटलें, बाई फार उदार आहे. तेव्हां त्यांनीं खूष हो[illegible] एक ढब्बू दिला. त्या गरीब बाईला दिडकीऐवजीं ढब्बू मिळतांच खूप आ[illegible]; तिनें त्यांना बरोबर जाऊन प्रतापगडचा रस्ता दाखविला. ते प्रतापगडच्या[illegible]टी

पोहोंचले तेव्हां वरीच रात्र झाली होती. भूकही सपाटून लागली होती. तोरणांनीं भूक थोडीच शमते ? गडाच्या पायथ्याशीं रहदारी बंगला आहे, जवळच तेथील मुसलमान रखवालदाराची झोपडी होती. तेथें ते दोघे गेले व म्हणाले, आम्हांला जेवायला घालतां कां ?' तो रखवालदार म्हणाला, 'बाबांनों, तुम्ही दिसतां ब्राह्मण आणि मी पडलों मुसलमान; माझ्या घरचें जेवण तुम्हांला कसें चालणार ?' आम्हांला चालेल, असें ते म्हणाले तेव्हां रखवालदारानें त्यांना चटणी भाकरीचें जेवण व रात्रीं झोंपायला जागा दिली. दुसऱ्या दिवशीं ते गडावर गेले; तेथील देवीचें दर्शन घेतल्यावर शिवाजी महाराजांचा महाल, व ज्या ठिकाणीं अफजूलखानाचें डोकें व शरीर पुरलीं आहेत त्या जागा पाहून ते परतले. शिवरायांच्या महालांत बालकवि केती वेळ तरी स्तब्ध उभे होते; शिवाजीमहाराजांच्या पराक्रमाचें त्यांना स्मरण लें. शिवाजी महाराजांबद्दल बाळकवींना फार पूज्यभाव वाटत होता; मराठ्यांच्या क्रमाबद्दल अभिमान वाटत होता. आपल्या हातून पराक्रमाचीं कृत्यें व्हावीं असें त असें. शिवरायांच्या पुण्य स्मरणानें त्यांच्या वृत्ती उचंबळून आल्या. तेथून तांना त्यांच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले, तेथून ते दोघे परतले व रात्रीं ११ च्या रास घरीं आले.

आरंभीं ते दोघेच तेथें होते तेव्हां खूप खूप लांब फिरावयास जात व खूप शिरां परत येत. असेच एकदां ते फिरावयास गेले होते. संध्याकाळ झाली होती; र्यास्त होत होता. त्याचीं सोनेरी किरणें चोहोंकडे पसरली होतीं. भोंवताली किर्रर गी होती; अशावेळीं बालकवींना स्फूर्ति झाली, "दरी दरी घुमवित येई" ही र्झर' या कवितेची ओळ साभिनय म्हणण्यास त्यांनीं सुरवात केली; मग तेथेंच न त्यांनीं ती कविता पूर्ण केली. आणखी एका कवितेबद्दल अशीच गोष्ट बालकवींनीं म्हांस सांगितली होती. ते म्हणाले, "संध्याकाळची वेळ होती, अंधार पडत ा; मला एक कविता स्फुरली; मी वाटेंतच बसून, एका कागदावर ती कविता ली, व घरीं गेल्यावर नीट लिहून काढली." त्यांनींच त्या कवितेचें नांव त्यावेळीं तलें होतें पण तें आतां आठवत नाहीं. 'मेघांचा पाऊस' कवितेच्या आरंभीच्या ही दत्तोपंताबरोबर हिंडतांनाच त्यांना स्फुरल्या होत्या.

ाबाई टिळक त्यावेळीं पुण्यास हुजुरपागेंत शिकत होत्या. त्यांना एप्रिल अखेर ावयाची होती. ठोमरे व दत्तोपंत मार्चमध्यें तेथें गेले होते. ताराबाई श्वरास जाण्यापूर्वी या जोडीनें प्रत्येक पत्रांत महाबळेश्वरला पाहिलेल्या

सृष्टीसौंदर्याचें रसभरित वर्णन केल्यामुळें, तेथें जाण्याची त्यांची उत्कंठा सारखी वाढत होती त्या महाबळेश्वरास पोहोंचल्या तेव्हां बैलगाडीच्या अड्डयावर या दोघां बंधूंनीं त्यांचें स्वागत केलें; त्यांनाही खूप आनंद वाटला. पत्रांत सृष्टीसौंदर्याचें वर्णन होतें पण राहात्या घराचें नव्हतें; कारण तें काव्यमय नव्हतें; पण तें त्या बिचारीला काय माहीत ? ती बिऱ्हाडीं गेल्यावर चहापाणी करून हे दोघे शिकवण्या करायला निघून गेले. घरांत राहिली ताराताई; स्वयंपाकाला दिसेना बाई; घर लहान व चोहोंकडे पसारा; तेव्हां तिची फारच निराशा झाली. तिनें सर्व पसारा आंवरला; कुकर भरून ठेवून ती रागानें या दोघांची वाट पहात बसली. बाकी राग कां नाहीं येणार ? महाबळेश्वर पहायचें, खूप खूप फिरायला जायचं, गप्पा मारायच्या, खिदळायचें हे सर्व मनांतले मांडे मनांत जिरले घराची आंवरासांवर, झाडझूड व वर चूल गळयांत आली. जेवतांना ती रागांत होती. जेवतांना फारसें कोणी बोललेंच नाहीं; तिघेंही जेवून दुपारचीं झोंपल्या तीन वाजतां कवि व चित्रकार यांची जोडी ( दत्तोपंतांना तेव्हां चित्रें काढण्याचा नाद होता ) पुन्हां कामाला निघून गेली. ताईसाहेबांची स्वारी उठून पाहते तों दोघे बाहेर गेलेले ! मग काय, ताराबाईच्या रागाचा पारा बराच वर चढला त्याच वेळीं त्यांनीं एक वेळापत्रक व कामाच्या वांटणीचा तक्ता तयार करून टांगून टाकला. अशा वेळीं माणूस एकटा असला कीं राग वाढतोच. तेंतें साहजिकच वाढत्या रागानें ताराबाई गाल फुगवून, त्या दोघांची वाट पहात बसल्या. ते नित्याप्रमाणें पांच वाजतां घरीं आले. चहा झाला तरी ताईसाहेबांचा राग कांहीं ओसरेना. बालकवि म्हणाले, ' चल तुला आज महाबळेश्वर दाखवून आणतों ' तरी ताराबाईचा मुगदळाचा लाडू फुटेना. तेव्हां " रागोबा आले आला, गडे आमुच्या ताईला । फुगले ग फुगले गाल । फूल झालें माझें लालसे हे चरण बालकवि म्हणूं लागले, त्याबरोबर ताराबाईना हसूं आलें, राग मावळला व ते तिघे मावळत्या सूर्याची मजा पाहण्यास जवळच्या पॉइंटवर निघून गेले; कारण बालकवींना सूर्यास्ताचें दृश्य पाहण्याची फार आवड होती. ताराबाईचा राग केव्हांच पळून गेला होता. येतांना ते तिघे गप्पा करीत, चांदण्याची गम्मत पहात घरीं आले.

आतां हें त्रिकूट रोज दुपारीं गप्पा मारण्यांत व सकाळ संध्याकाळ रम्य देखावे पाहण्यांत चूर होऊन गेलें. अशाच एका संध्याकाळीं हीं तिघें बोवा टी

कांहीं मित्रमंडळी बॅबिंग्टन पॉईंट पहावयास निघाली. ते त्या पॉईंटला पोहोंचले तेव्हां सूर्य अस्ताला जात होता, आकाश निरभ्र होतें. बालकवींच्याच शब्दांत सांगायचें झाल्यास "गेला झाला दृष्टिआडही सूर्य तरी अजुनी। पहा चमकते प्रेमपताका पश्चिमदिग्वदनीं।" असेंच त्याचें वर्णन झालें असतें. तो रक्तिमाही थोड्या वेळानें नाहींसा झाला; आकाशांत एखादी दुसरी तारा डोकावूं लागली. ती रात्र पौर्णिमेची होती. कोणालाच घरीं जाण्याची घाई नव्हती. तेव्हां कांहीं वेळ चांदण्यांत बसून मग घरीं जायचें असें सर्वांनींच ठरविलें. कांहीं वेळ जो तो शांतपणें निसर्गाचें सौंदर्य अनुभवण्यांत गुंग होता. इतक्यांत कुणीतरी म्हणालें, 'अशा या वेळीं पाहिजे कवी कुणि जवळी' दुसरा म्हणाला, "वा! आहेत कीं ठोमरे आपल्या बरोबर! ठोमरे म्हणांना एखादी कविता." ठोमरेही अगदीं आनंदांत होते; त्यांनीं लागलीच 'संध्या रजनी' ही कविता म्हणण्यास सुरवात केली. ती संपल्यावर, कां कुणास ठाऊक, खिन्नतेचा सूर असलेली कविता ते म्हणायला लागले. हसतां हसतां ते कधीं कधीं एकदम खिन्न होत, तसाच प्रकार यावेळीं झाला—चोहोंकडे शांतता पसरली होती; सर्व जण स्तब्ध होते, बालकवींची ही कविता म्हणून होते न होतें तोंच आकाशांत एक मोठा काळा ढग आला. त्यानें चंद्राला ग्रासून टाकलें. पांचदहा मिनिटांत आणखीही ढग जमा झाले; जणुं कांहीं बालकवींच्या निःश्वासानें आकाश काळवंडलें, पावसाचा रंग दिसूं लागला. सर्वांचाच आनंद मावळला; कोणी कोणाशींच न बोलतां सर्व मंडळी घराकडे परतली. हीं तिघें घरीं पोहोंचल्यावर थोड्या वेळानें जोराचा पाऊस आला. विजाही चमकूं लागल्या, मेघांचा कडकडाट सुरू झाला. चंद्र व चांदण्यांनीं काळे ढग पांघरले. या तिघांच्या हृदयांतहीं एक सारखी अशांतता, खळबळ चालू असल्यामुळें तोंडावर पांघरुण घेऊनही त्यांना बराच वेळ झोंप आली नाहीं.

बालकवींच्या ठिकाणीं जरी चटकन हंसू आंसूची अदलाबदल होई तरी त्यांची वृत्ति जात्या आनंदी, खेळकर व खेळाडू अशीच होती. ते वयानें वाढले तरी वृत्तीनें बाळच राहिले, कधीं कधीं अगदीं तर ते खेळकर मुलाप्रमाणेंच वागत. महाबळेश्वरचीच गोष्ट. एकदां ताराबाईनीं भजीं तळण्याचें ठरविलें; तळण्यास सुरवात करणार तों दत्तोपंत बाहेरून आले; बालकवींना मात्र शिकवणीहून यायला उशीर झाला. बहीणभावंडांचीं बहुतेक भजीं तळून झालीं, थोडेंच पीठ उरलें; इतक्यांत बाहेर बालकवींचा आवाज ऐकूं आला. तेव्हां या बहीणभावंडांनीं बालकवींची गम्मत करावी असें ठरविलें व ते आंत येण्यापूर्वीं झालेलीं भजीं फरताळांत लपवून ठेविलीं. बालकवि आले, स्टोव्हपाशीं बसले. गप्पांना सुरवात झाली.

बालकवींनीं बोलण्याच्या नादांत उरलेल्या पिठाची होत असलेलीं भजीं खाण्याचा सपाट सुरू केला. हीं दोघें बहीणभावंडें त्यांच्याकडे पहात हंसत होतीं; बालकवींचें लक्ष हंसण्याकडे नव्हतें, शेवटचें भजें तळून झालें व बालकवींनें तें तोंडांत टाकलें; या दोघांना हंसू न आवरल्यामुळें हसण्याची जोराची उकळी आली. बालकवींनीं त्यांना विचारलें, 'कां रे, कां हंसतां ? काय झालें हंसायला ?' दत्तोपंत म्हणाले, 'अहो ठोमरे, दुसऱ्यांचा कांहीं विचार ! तुम्ही तर सगळींच भजीं खाल्लीं. आम्ही काय खावं ?' बालकवींचें तोंड खरकन उतरलें. ते सगळेच तेथून उठले. ती बहीणभावंडें आंतल्या खोलींत जाऊन जेवणाची तयारी करूं लागलीं; पण बाल-कवींनीं भजाचें पीठ घेऊन भजीं तळण्यास सुरवात केली; ताराबाई येऊन पहातात तों हळव्या मनाच्या बालकवींच्या हातांतून भजाचें पीठ तापलेल्या कढईंत पडत होतें, आणि अतिशय वाईट वाटल्यामुळें कढत्या हृदयांतून अश्रू जमिनीवर सांडत होते. त्या दोघांचीं तोंडें तेव्हां बघण्यासारखीं झालीं. त्यांनीं त्यांना कढईपासून उठविलें, आणि सांगितलें, 'ठोमरे, आम्ही तुमची थट्टा केली. चला जेवायला.' ताराबाई भजांनीं भरलेलें ताट घेऊन बाहेर आल्या; तेव्हां बालकवींनाही हंसू आलें. तिघांनीं आनंदांत भजांचा फन्ना उडवला. मग ताराबाई म्हणाल्या, 'अप्पा, आतां तुम्ही केलेलीं भजीं खाऊं या.' खातांत तर काय, तीं अगदीं आळणीं. कारण त्या गडबडींत, भजाच्या पिठांत मीठ घालायचें बालकवि विसरून गेले होते. मग काय खूपच हंशा पिकला.

बालकवि जसे खेळकर व खोडकर तसेच दत्तोपन्तही होते, व आहेत. अशा मित्राच्या सहवासांत बालकवि सदा आनन्दी असत. एकदां सुटीचा दिवस होता. दुपारचीं जेवणें आटोपून ही मंडळी निद्रादेवीची आराधना करण्याच्या बेतांत होती. बालकवि नित्य नियमाप्रमाणें जेवण झाल्यावर पाणी पीत होते, दत्तोपंत पडल्या पडल्याच म्हणाले, 'ठोमरे, मला थोडें पाणी द्या ना !' ठोमरे म्हणाले, 'जरा उठा की दत्तोपंत ! जरा झडूं द्या पोट, फार दोंद वाढलें आहे. दत्तोपंत उठले, पाणी प्याले. पण खोडकर वृत्तीनें त्यांनीं कांहीं थेंब अंथरुणावर पडलेल्या ठोंमऱ्यांच्या तोंडावर टाकले. झाली सुरवात ! ठोमरे उठले, त्यांनीं फुलपात्रभर पाणी दत्तोपंताच्या डोक्यावर ओतलें. दत्तोपंतांनीं लागलीच ठोम-ऱ्यांच्या डोक्यावर पाण्याचा तांब्या उपडा केला. ठोमरे यांनीं दुसरा तांब्या घेतला. दोघांचें जलयुद्ध सुरू झालें. पाणी होतें आंतल्या खोलींत. बालकवि मधल्या दारांत उभे राहिले.

त्यांना वाटलें, बालेकिल्ला आपल्या ताब्यांत आहे. दत्तोपंत काय करणार ? पण मागचें दार उघडें आहे हें त्यांच्या लक्षांत आलें नाहीं. बहीण भावंडें एक झालीं. युद्धाला जोर चढला. दत्तोपंतांना वाटलें, आतां माठच ठोमऱ्यांच्या डोक्यावर ओतावा. ते मागल्या दारानें आंत गेले. माठ उचलला; इतक्यांत बालकवि त्यांच्या कानांत मोठ्यानें ओरडले, " दत्तोपंत ! " दत्तोपंताच्या हातांतून माठ सुटला. त्याच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडाल्या. घरभर पाणी झालें व जलयुद्ध संपलें. दोन्ही पक्षांत तह झाला. या तहांत एक अट होती कीं, ताराबाईंनीं शेजारणीकडून पाणी मागून आणावें व चहा करावा. दोघांच्या भांडणांत तिसऱ्याचा लाभ होतो म्हणतात. पण ह्या दोघांच्या भांडणांत ताराबाईंना चहा करण्याची शिक्षा मिळाली. त्यांनींही ती मान्य केली; आणि जलयुद्धानें थंड झालेलीं डोकीं चहानें पुन्हां गरम झालीं; असें हें वादळ चहाच्या कपांत गडप झालें.

बालकवींच्या वरील आठवणी, त्यांच्या स्वभावदिग्दर्शनाच्या दृष्टीनें, तसेंच महाबळेश्वराच्या त्यांच्या पहिल्या खेपेची ओळख पटण्यास पुरेशा असल्या तरी, त्यावेळची आणखी एक महत्त्वाची आठवण देण्याचा मोह आम्हांस टाळवत नाहीं. कारण त्या आठवणीमुळें बालकवींच्या ठिकाणची अनसूया वृत्ति व गोविंदाग्रजांवरील भक्ति चांगली व्यक्त होते. या सुमारास गोविंदाग्रजांची " पुनर्जात प्रेमास " ही कविता प्रसिद्ध झाली होती. ही कविता बालकवींची फार आवडती असल्यामुळें ते ती कविता वरचेवर म्हणत. महाबळेश्वराचें वातावरणही सौन्दर्यमय असल्यामुळें "प्रेमा, ऊठ, चल उघड झांकली मूठ," हे व इतर चरण बालकवि उठल्या बसल्या म्हणत. त्याचा परिणाम असा झाला कीं, हे तिघे सर्व गोष्टींना 'प्रेम' म्हणून म्हणत. आमटींत मीठ कमी झालें कीं, म्हणावें, ' आज आमटींत प्रेम कमी आहे,' भाजींत तिखट जास्त पडलें कीं, म्हणावें, ' भाजींत प्रेम जरा जास्त झालें आहे.' पोळी करपली तर म्हणावें कीं, 'आज प्रेमाला ग्रहण लागले आहे.' या प्रेमळ मित्रांची ही 'प्रेम' कथा ऐकून यांना कुणी वेड्यांतच काढलें असतें. बाकी शेक्सपियरनें प्रेमी, कवि व वेडे यांना एकाच सदरांत घातलें नाहीं कां ?

महाबळेश्वरचें नांव निघालें कीं दत्तोपंत व ताराबाई यांच्या मनःचक्षूंपुढें त्यावेळचीं तीं दृश्यें उभीं राहतात; व बालकवि आज हयात नाहींत या जाणिवेनें त्या दोघांना अत्यंत दुःख होत होतें. महाबळेश्वर म्हटलें कीं आम्हांलाही बालकवींची आठवण

होऊन वाईट वाटतें. कारण इ. स. १९१८ च्या उन्हाळयाच्या सुटींत आम्हीं त्यांच्याबरोबर महाबळेश्वरास जायचें, निरनिराळे पॉईंटस् पहायचे, कांहीं इंग्रजी कविता वाचायच्या असा आमचा दोघांचा संकल्प होता. पण त्या वर्षी ठोमरे महाबळेश्वरास जाऊं शकले नाहींत. त्यांना खानदेशांत जावें लागलें. व तिकडेच त्यांना मे महिन्यांत अपघातानें मृत्यु आला. अर्थात् आमचा संकल्प सिद्धीस गेला नाहीं.

या प्रकरणांतील गोष्टी मुद्दामच विस्तृतपणें दिल्या आहेत. बालकवि आनंदी मित्रांच्या सहवासांत, सुन्दर सृष्टीच्या निकट सान्निध्यांत, अत्यंत आनन्दी असत. लहान मुलासारखे खोडकर असत. कांहीं मित्रमंडळींच्या सहवासांत कधीं त्यांनीं दुःखाचे उसासे टाकले तर तो त्या वातावरणाचा प्रभाव म्हणावा लागेल. हें या प्रकरणावरून वाचकांच्या ध्यानीं आलें असेलच.

## पुणें

बालकवि एकदां इ. स. १९११ च्या शेवटीं कांहीं महिने नगर सोडून पुण्यास गेले, तेथें त्यांना केसरीच्या उपसंपादकाचें काम मिळालें वगैरे माहिती आधींच आली आहे. या पहिल्या खेपेला बालकवि यांना श्री. न. चिं. ऊर्फ तात्यासाहेब केळकर यांनीं बरीच मदत केली. त्याच सुमारास केशवसुतांच्या स्मरणार्थ निघालेल्या तुतारी मंडळाचे ते सदस्य झाले; नगरप्रमाणेंच पुण्यासही बालकवींनीं बऱ्याच सुन्दर कविता लिहिल्या; त्या प्रथम मासिक मनोरंजन वगैरे मासिकांतून व नंतर अभिनव काव्यमालेच्या दुसऱ्या भागांत प्रसिद्ध झाल्या.

इ. स. १९१४ च्या जूनमध्यें बालकवि पुनः पुण्यास रहावयास गेले. ह्या सुमारास ' पांखरा, येशील कां परतुन ? ' ही टिळकांची सुप्रसिद्ध कविता प्रसिद्ध झाली. टिळकांना ही कविता मनोरंजनाच्या मुखपृष्ठावरील उडत्या पांखरावरून सुचली असो किंवा पिंजऱ्यांतून उडालेल्या पक्ष्याला उद्देशून लिहिलेली असो, पण ती लिहितांना नगर सोडून गेलेला बालकवि टिळकांच्या मनांत असला पाहिजे. ही कविता रे. टिळकांनीं पुण्यास ठोमऱ्यांना म्हणून दाखविली तेव्हां ताराबाई टिळक तेथें हजर होत्या. त्या म्हणत कीं, ही कविता ऐकतांना बालकवींचे डोळे भरून आले. कारण त्या कवितेंतील प्रत्येक ओळ बालकवींना लागू होई. बालकवींनाही तें अक्षरशः पटलें ! अश्रूंनीं त्यांचे डोळे डबडबले व टिळकांना

आपले अश्रू दिसूं नयेत म्हणून बालकवि आंतल्या खोलींत गेले. बाकी रे. टिळकांचें बालकवींवर पुत्रवत् प्रेम होतें! बालकवींच्या मृत्यूची बातमी ऐकतांच रे. टिळकांच्या मनाला एकदम धक्का बसला; टिळक कणखर वृत्तीचे खरे; पण त्या बातमीनें त्यांचें डोकें सुन्न झालें; रे. टिळक सुन्न झालेलें डोकें दोन्ही हातांनीं घट्ट धरून कांहीं वेळ स्तब्ध बसले होते; कधींही न रडणाऱ्या टिळकांच्या डोळ्यांत त्यावेळीं अश्रू उभे राहिले.

पुण्यास रे. मॅक्‌निकल् यांच्या मदतीनें बालकवींना कांहीं मराठीच्या शिकवण्या व लॅंग्वेज स्कूलमध्यें प्रमुख शिक्षकाचें काम मिळालें. त्याशिवाय युनियन हायस्कूलमध्येंही मराठी शिकवण्याच्या कामीं त्यांचीं योजना झाली; मिसेस् मॅक्‌निकल् यांना ते 'वनवासी फूल' व तुकारामाचे अभंग शिकवीत. त्यामुळें त्यांची आर्थिक स्थिति सुधारली; त्यांनीं रास्तापेठेंत बिऱ्हाड थाटलें; धाकटे बंधु बाबूराव शिक्षकांसाठीं त्यांच्याजवळ पुण्यास येऊन राहिले; जळगांवचे स्नेही श्री. नथु ना. पाटील व नाशिकचे एक वेळचे गुरु, दूधमांडे शास्त्री, त्यावेळीं कॉलेजमध्यें विद्यार्थी म्हणून दाखल झाले होते; जुन्या मित्रांच्या पुन्हां एकदां गाठी पडल्या होत्या.

त्याच वेळीं त्यांचे नगरचे स्नेही श्री. भास्करराव उजगरेही पुण्यास राहत होते. पुण्यांतील पुष्कळ कवि, लेखक व रसिक यांचीं बालकवींशीं दाट ओळख झाली होती. गोविंदाग्रज, नाट्यछटाकार गर्गे, अनंततनय, अप्पासाहेब चिटणीस (नाटककार) व त्यांचे बंधु भालचद्रपंत टिपणीस, प्रो. श्री. बा. रानडे, प्रा. गिरीश वगैरे मित्र व परिचित मंण्डळी बहुशः बापूसाहेब व बाळासाहेब या सहस्रबुद्धे बंधूंच्या घरीं जमत. प. वा. दिवाकर यांच्या डायऱ्यांत बालकवींच्या भेटीच्या नोंदी आहेत. ही मंण्डळी रोज भेटत तेव्हां गप्पांवरच त्यांचा भर असे. पण कधीं कधीं केशवसुत, आगरकर, यांच्यासंबंधीं ते बोलत. गोविंदाग्रज, ठोमरे, दिवाकर परस्परांना आपलें लिखाण वाचून दाखवीत. एखादी कविता आपल्या मित्रांना आवडली नाहीं असें दिसलें कीं बालकवि ती फाडून टाकीत. कै. दिवाकर यांनीं बालकवींच्या अशा दोन कविता बालकवीकडून काढून घेतल्या व त्यांना त्या फाडूं दिल्या नाहींत. पुण्याचे प्रसिद्ध कवि व रसिक प्रो. वासुदेवराव पटवर्धन यांच्याशींही बालकवींचा परिचय झाला होता. बापुसाहेब सहस्रबुद्धे ह्यांच्याजवळ ते इंग्रजी ग्रंथ वाचीत. एकदां त्यांचे बंधु बाळासाहेब बालकवींना त्यांच्या सांगण्या-

वरून शेलेची 'Ode to the West Wind' ही कविता समजावून सांगूं लागले. पण सहस्रबुद्धयांना तें जमेना; उलट बालकवींनींच बाळासाहेब यांना त्या कवितेचा अर्थ विशद करून सांगितला व तो बाळासाहेबांना पटला. याच सुमारास भारत नाटक मण्डळींत रा. बाबूराव गाडे नांवाचे एक नट होते; त्यांना काव्य कशाशीं खातात हें सुद्धां माहित नव्हतें. पण बालकवींनीं आपल्या कविता रा. गाडे यांना वाचून दाखविल्या व आपल्या काव्याचें वेड लाविलें. बालकवींचें गोविंदाग्रजांवर तर फार प्रेम; त्यामुळें बालकवि पुण्यास असतांना बालकवि व गोविंदाग्रज यांच्या वरचेवर भेटी होत; अनेक विषयांवर ते दोघे मोकळ्या मनानें चर्चा करीत; गडकऱ्यांचें विनोदप्रचुर भाषण व ठोमरे यांचे मार्मिक तसे काव्यपूर्ण विचार, बैठकींतील इतर मंडळींना ती एक बौद्धिक मेजवानीच वाटे.

बालकवींच्या काव्यशक्तीबद्दल गडकरी यांना फार अभिमान वाटत असे, आणि ते स्वतः आपणास कवि या नात्यानें ठोमऱ्यापेक्षां श्रेष्ठ समजत नसत. उलट केशवसुतानंतर कवि म्हणण्यास योग्य असे केवळ ठोमरेच आहेत असें ते नेहमीं म्हणत. मराठी कवितेंत जें थोडेंसें स्वारस्य वाटतें तें बालकवीमुळेंच असें गोविंदाग्रजांचें मत होतें. ते बालकवींना विनोदानें म्हणत 'आपण कवि आहांत पण बालकवि आहांत; ते मोठे केव्हां होणार हें मला एकदां सांगा.'

गोविंदाग्रजांना ठोमऱ्यांच्या चौघडा,[१] फुलराणी, अरुण, निर्झरास या कविता फार आवडत. ते आपल्या मित्रांना कधीं कधीं म्हणत, ठोमरे यांच्या निर्झरासारखी कविता ज्या वेळीं मला करतां येईल त्या वेळीं मी कवि होईन. गोविंदाग्रज बालकवींच्या कविता आपल्या मित्रांना वाचून दाखवीत. बालकवींनाही गोविंदाग्रजांचीं काव्यें व नाटकें फार आवडत; ते पुण्याहून नगरला गेले कीं कांहीं दिवस गडकऱ्यांखेरीज दुसरी भाषा नाहीं. पुण्यप्रभावाबद्दल बोलतील; गोविंदाग्रजांच्या संकल्पित पांच संन्यासांबद्दल बोलतील किंवा त्यांच्या एखाद्या नव्या कवितेंतील सुंदर ओळी गुणगुणतील.

गडकरी ठोमऱ्यांना आपल्या धाकट्या भावाप्रमाणें मानीत. ठोमरे पुण्यास रास्ता पेठेंत ज्या घरांत रहात होते त्या घरांत प्लेगचे उंदीर पडले. ही गोष्ट गडकऱ्यांना कळली; गडकरी लागलीच आपले मित्र धाकुमामा धडफळे यांना बरोबर

---

१ ही कविता आतां कोठेंही उपलब्ध नाहीं; नेवाळीस नेल्याचें कळतें; पण पुढें तिचें काय झालें हें समजत नाहीं.

घेऊन ठोमरे यांच्या घरीं गेले; आणि बालकवींचे बिऱ्हाड लागलींच त्यांनीं आपल्या घरीं नेलें. गडकरी हे स्वतः फार भित्र्या स्वभावाचे; अशा प्रसंगीं त्यांनीं दुसऱ्या कोणाला घरांत एक क्षणभर सुद्धां थारा दिला नसता; पण मित्रप्रेमामुळें ते स्वतः त्या प्लेगदूषित घरीं जाऊन बालकवींना घेऊन आले.

गडकरी आपल्या कविता बालकवींना वाचून दाखवीत व बालकवींचे त्या कविता-विषयीं काय मत आहे हें बालकवींच्या तोंडून ऐकण्याचें त्यांना फार औत्सुक असे. पुण्यप्रभाव नाटकांत कालिंदीच्या तोंडीं घातलेल्या कांहीं पदासंबंधींची श्री. घडफळे यांची आठवण, या दृष्टीनें खासच उद्‌बोधक आहे. श्री. घडफळे सांगतात, " एकदां ठोमरे रस्त्यांत भेटले असतां तीं पदें ठोमऱ्यांस म्हणून दाखवायची आहेत असें गडकऱ्यांनीं सांगितलें, पण गडकऱ्यांना कांहींतरी महत्त्वाचें काम असल्यामुळें आमच्याबरोबर ताबडतोब घरीं येतां आलें नाहीं. मी व ठोमरे, गडकरी यांच्या अगोदर घरीं आलों तेव्हां तीं पदें गडकरी घरीं येण्याच्या आंत मी बालकवींना वाचून दाखवलीं; गडकरी घरीं आले तेव्हां त्यांना हें कळतांच ते मजवर फार रागावून म्हणाले, ' मी येण्याच्या अगोदर हीं पदें तुम्ही कां वाचून दाखविलीं ? त्यामुळें माझ्या गाण्यांतील अर्धेअधिक काव्य गेलें. ' तीं सर्व पदें पुनः गडकऱ्यांनीं बालकवींना वाचून दाखविलीं. " ठोमरे यांच्या मृत्यूची बातमी जेव्हां गडकरी यांस कळली तेव्हां त्यांच्या मनाला फार धक्का बसला; दोन तीन दिवस गडकरी अगदीं वेड्यासारखे झाले होते.

बालकवींना सृष्टी, पाणी व चंद्रप्रकाश फार आवडत. या तिन्हींचे एकवटलेलें सौंदर्य पाहण्याची त्यांना फार मनीषा होती. पुण्यास असतांना त्यांनीं ती हौस मनसोक्त पुरवून घेतली. त्यावेळीं डेक्कन कॉलेजांतील एका मित्राबरोबर बालकवि अनेकवेळां चांदण्या रात्रीं नौका-विहार करण्यास जात; ' बघुनि मन धालें, साफल्य दृष्टीचें झालें ' ही दत्तांच्या कवितेची ओळ त्यांच्या मुखावाटे अशा एका वेळीं आपोआप बाहेर पडली, असें एक मित्र सांगतात. अशा आनंदाच्या वेळीं बोट बुडावी व बुडून मरण यावें असें बालकवींना वाटे.

बालकवि पुण्यास असतांना नेहमींप्रमाणें प्लेगनें पुण्यास भेट दिली. बालकवींच्या एका मित्राचा मुलगा प्लेगनें आजारी पडला. बालकवींना हें कळतांच ते आपल्या दुसऱ्या एका मित्राला घेऊन त्या मुलाच्या समाचाराला निघाले. पण प्लेगदूषित जागीं जाण्यापूर्वी इनॉक्युलेशन करून घ्यावें असें ठरवून ते दोघे दवाखान्याच्या मार्गानें

निघाले. दवाखान्यांत इनॉक्युलेशन करणारे डॉक्टर भेटले नाहींत, तेव्हां वाटेंत बालकवींनीं एक उंची सिगारेटची पेटी घेतली. आपल्या मित्राला त्यांतली एक देऊन दुसरी स्वतः ओढण्यास सुरवात केली. त्या मित्राला ह्याचा अर्थ कळेना. तेव्हां त्यानें बालकवींना विचारलें 'याचा अर्थ काय ?' बालकवि म्हणाले, "हें पहा ! सिगारेट ओढली कीं, तोंड धुरानें भरून जाईल, धूर जंतूनाशक आहे. मग प्लेगचे जंतु पोटांत जातील कसे ? तोंडांतच मरून जातील." सिगारेट ओढींत ते त्या मित्राच्या घरीं त्या मुलाच्या समाचाराला जाऊन आले.

त्यांना धूम्रपानाचा फारच शोक होता. विडीवांचून भागायचें नाहीं; एकदां त्यांना विडी ओढायची हुक्की आली. त्यावेळीं बालकवि मित्रमंडळीबरोबर गांवाबाहेर दूर फिरायला गेले होते. त्यांच्याशिवाय दुसरा विडीबाज तेथें कोणीच नव्हता. बालकवि पडले गमती स्वभावाचे. त्यांनीं ठरवलें चौरस्त्यावर उभें राहायचें व एकाद्या भिकाऱ्यासारखें रस्त्यांत हात पसरून 'काडी द्याहो !' असें म्हणायचें. सुदैवानें त्यांना लवकरच काडी मिळाली व विडीची तलफ भागवितां आली. आणखी एकदां तर त्यांनीं काडीकरतां नुकताच विकत घेतलेला ग्रंथ[1] देऊन टाकला. बालकवींना विडी ओढायची होती, पण जवळ काडी नव्हती. तेव्हां ते ताराबाई टिळकांना म्हणाले, "बेबी, मला आगपेटींतली काडी देतेस ?" त्या म्हणाल्या, "तुम्ही मला काय द्याल ?", "मागशील तें" "पहा वरं !" "हो !" "देतां हें नवें पुस्तक ?" बालकवीनें लागलीच टांक घेऊन Presented to Tarabai Tilak असें लिहून काडीच्या मोबदल्यांत तें पुस्तक देऊन टाकलें. बाकी ताराबाई त्यांची धाकटी बहीण; तिला कोरें पुस्तक दिलें तर त्यांत नवल नाहीं हें आम्हांला माहित आहे.

आतां बालकवींचें बस्तान पुण्यास चांगलें जमूं लागलें होतें. पण बालकवींना एकाच ठिकाणीं राहण्याचा कंटाळा आला म्हणा, किंवा आपल्या हातून कविता निर्माण व्हावयाला पुणें शहर योग्य नाहीं असें वाटलें म्हणा ! पण एवढी गोष्ट खरी कीं, इ. स. १९१६ च्या मे महिन्याच्या सुमारास त्यांनीं नोकरीचा राजीनामा दिला व पुण्याचा संसार मोडून ते आपल्या थोरल्या भावाकडे नेवाळी येथें गेले. त्यांना वाटलें होतें कीं, एकांत मिळाला म्हणजे आपल्या हातून पुष्कळ काव्यानीर्मिति होईल; पण ती कल्पना खोटी ठरली. नेवाळी येथील अन्न व राहणी ठोमरे पतिपत्नींना मानवली

1 Poems of Ella wheeier wilcox.

नाहीं; बालकवि तर आजारी पडले. तेव्हां पत्नीच्या आग्रहामुळें त्यांनीं नेवाळीला रामराम ठोकला; बैलगाडीनें सासुरवाडच्या गांवापर्यंत प्रवास केला; तेथेंही त्याच्या प्रकृतीला बरें वाटेना; तेव्हां तेथून ते थोरल्या बहिणीकडे म्हणजे सौ. जिजींच्याकडे जळगांव येथें रहावयास गेले. जळगांवला त्यांची प्रकृति सुधारली. पुण्याच्या नौकरीचा त्यांनीं मागेंच राजिनामा दिला होता, तेव्हां नौकरीच्या शोधार्थ, इ. स. १९१७ मध्यें ते नगरास परतले. तेथें त्यांना पुनः मिशनच्या एका शाळेंत शिक्षकाचें काम मिळालें; शिकवण्याही हळूहळू मिळूं लागल्या; पुनः जुन्या आयुष्यक्रमाला सुरवात झाली; या वेळीं रे. टिळक नगर येथें नव्हते ते खिस्तायन लिहावयाला शांतता मिळावी म्हणून सातारला सहकुटुंब रहावयास गेले होते.

## मृत्यु

इ. स. १९१८ ची उन्हाळ्याची सुटी सुरूं झाली. एप्रिल ३० तारखेला श्री. दत्तोपंताचा मुंबईस विवाह व्हावयाचा होता; टिळकमंडळी बालकवींची प्रत्येक गाडीला मुंबईस वाट पाहत होती. पण ठोमरे मुंबईस गेले नाहींत; ते जाऊं शकले नाहींत. कारण त्याच सुमारास त्यांचे श्वशुर दिवंगत झाले. तसेंच बालकवींच्या भाचीचें-बहिणीच्या मुलीचें लग्नही त्याच वेळेला खानदेशांत व्हावयाचें ठरलें; तेव्हां मुंबईस न जातां ते प्रथम सासुरवाडीस गेले. तेथील परिस्थिति फारच वाईट होती. श्वशुर वारलेले, सासूबाई नुकत्याच अंध झालेल्या; हें पाहून त्यांचें मन फार दुःखित झालें; तेथून बालकवि बहिणीच्या गांवीं म्हणजे जळगांव खुर्दला भाचीच्या विवाहासाठीं गेले; तेथें त्यांचे दोन्ही बंधुही लग्नासाठीं आले होते. एके दिवशीं सकाळीं अमृतराव व बालकवि बाहेर हिंडायला गेले असतांना वाटेंत भाचीला अहेर काय करावा याबद्दल दोघा भावांचा बराच वाद झाला. थोरली बहीण म्हणजे आईच, तिच्या थोरल्या मुलीचें लग्न तेव्हां अहेर खूप चांगला करावा, खर्च झाला तरी हरकत नाहीं असें बालकवींचें मत, तर अमृतरावांचें मत त्याच्या विरुद्ध, दोघांमध्यें जोराचा कडाक्याचा वाद झाला; संत्रस्त अशा मानसिक स्थितींत बालकवि घरीं परत आले. इतक्यांत जळगांवहून 'असशील तसा ये' अशी श्री. आप्पासाहेब सोनाळकर यांची तार आली; अप्पासाहेबांनीं कां बोलावलें हें बालकवींना कळेना; ते बहिणीला म्हणाले, "जिजी, तार आली आहे, अप्पांचें कांहींतरी महत्त्वाचें काम आहे, मी जळगांवला आतांच्या गाडीनें जातों, संध्याकाळीं परत येईन." अमृतराव यांच्याशीं कडाक्याचें भांडण झाल्यामुळें त्यांच

मन उद्विग्न झालें होतें. त्यांत अप्पासाहेबांच्या तारेमुळें उद्भलेल्या काळजीची भर पडली. बालकवि तशाच विमनस्क स्थितींत स्टेशनच्या मार्गानें निघाले. सकाळची वेळ होती ती; धाकटा भाऊ बाबू बोलत बोलत त्यांच्याबरोबर कांहीं रस्ता चालून गेला; तो:परतला, बालकवि मात्र विचाराच्या तंद्रींत तसेच पुढें गेले. त्यांनीं भादली स्टेशन गांठलें; लेव्हल क्रॉसिंगवर रूळ ओलांडणें जरूर होतें. बालकवींनीं मेन लाईन ओलांडली व दुसऱ्या लाइन्समधून ते जाऊं लागले. त्याच वेळीं एक मालगाडी त्याच लाईनवरून येत होती. घाईनें जाणाऱ्या विमनस्क बालकवींचें त्या गोष्टीकडे लक्ष नव्हतें. त्यांनीं तेही रूळ जवळजवळ ओलांडले; पण त्यांच्या पायांतला एक जोडा रुळांत अडकला, तो काढण्यासाठीं ते मागें वळतात तोंच त्या मालगाडीचें एंजिन त्यांच्या अंगावरून गेलें. त्यांच्या देहाचे क्षणार्धांत तुकडे तुकडे झाले. त्या भीषण व निर्जीव यंत्रानें बालकवींचा बळी घेतला. त्या बिचाऱ्याला काय किंमत कवीची किंवा त्याच्या काव्याची ! अशा रीतीनें तारकांशीं कुजबुजणारा 'बुलबुल' महाराष्ट्राचा आवडता बालकवि, कधीं चंडोलासारखीं आनंदाचीं गीतें गाऊन, तर कधीं शांत निस्तब्ध वातावरणांत दुःखाचे निःश्वास सोडून मराठी वाचकांना चटका लावणारा कवि, वयाच्या अवघ्या अठ्ठाविसाव्या वर्षी जणूं कांहीं ज्योतिष्याचें भविष्य खरें करण्यासाठींच, चैत्रांतल्या नवमीला भरल्या जगांतून पांखरासारखा भुरकन् स्वर्लोकाला उडून गेला; बालकवि आजारी नव्हते; ते अपघातानें वारले. तेव्हां त्यांच्या मृत्यूची बातमी कोणाला खरी वाटेना. इतक्यांत बालवींना पडलेलें एक स्वप्न ज्ञानप्रकाशांत छापलें गेलें;: अपघाताच्या दिवशीं पहांटे बालकवींना स्वप्न पडलें कीं, आपल्या अंगावरून गाडीचें एंजिन गेलें व शरीराच्या चिंध्या चिंध्या झाल्या; आणि तें स्वप्न स्टेशनकडे जातांना बालकवींनीं आपल्या धाकट्या बंधूस सांगितलें. अशा अर्थाचा तो मजकूर होता. अशा तऱ्हेचें स्वप्न कदाचित् पडलें असलें तरी तें अपघाताच्या आदल्या रात्रीं खासच नव्हतें; बालकवींना आपला मृत्यु दैवी शक्तीनें आधीं कळला होता असें भासविण्याचा यत्न तें पत्र छापण्याच्या बुडाशीं होता असें वाटतें, पण उलट बालकवींनीं आत्महत्त्या केली असावी असा प्रवाद मात्र त्या पत्रानें लोकांत प्रसृत झाला.[१] '

---

१ तें स्वप्न फार जुनें होतें असा खुलासा ज्ञानप्रकाशांत कांहीं दिवसांनीं प्रसिद्ध झाला.

भावाभावांच्या भांडणामुळें येणाऱ्या उद्विग्नतेमुळें आत्महत्या करण्याइतके बालकवि लेचेपेचे नव्हते. हीं घरगुती भांडणें तर त्यांच्या नित्य परिचयाचीं होतीं; त्यांत नाविन्य नव्हतें. भाचीच्या लग्नाला गेलेले बालकवि आत्महत्या करून लग्नांत विघ्न उत्पन्न करण्याइतके मूर्ख नव्हते. अप्पासाहेबांनीं आपणांला तांतडीनें तारेनें कां बोलावलें हें जाणण्याचीही त्यांना उत्कंठा होतीच. मात्र विचारांच्या तंद्रींत बेसावधपणें चालण्याची त्यांना संवय होती. पुण्यास एकदां एका मित्रानें त्यांना बाजूला ओढलें नसतें तर टांग्याखालींच ते सांपडले असते. त्या दिवशीं घरीं झालेलें भांडण, अप्पासाहेब यांची आलेली तार यामुळें डोक्यांत विचारचक्रें जोरांत फिरूं लागलीं असावींत. आणि त्यामुळें ते नेहमींपेक्षां जास्त बेसावधपणें पण जोरांत चालत असल्यामुळें शंटिंग करणारी मालगाडी त्यांना दिसली नाहीं इतकें खास.

## नंतर

बालकवींच्या मृत्युनंतर त्यांच्या धाकट्या बंधूंना नोकरी लागली. थोरले बंधु यांना त्यांचा व्यवसाय होताच ! बालकवींच्या पत्नी पार्वतीबाई या कांहीं दिवस आपल्या नणंदेकडे म्हणजे सौ. जिजीकडे राहिल्या. त्यांनीं त्यांचा अपत्यवत प्रतिपाळ केला. जिजींच्या सल्ल्यानें पार्वतीबाई सेवासदनांत दाखल झाल्या. कवि गिरिशांच्या साहाय्यानें त्यांची सोलापुरास नर्सिंगचा कोर्स घेण्याची सोय झाली. त्या मिडवाईफ व सर्जिकल नर्सच्या परीक्षा उत्तम रीतीनें पास झाल्या. आतां त्या खानदेशांत नर्सचा व्यवसाय करीत असून स्वावलंबनानें आपला जीवनक्रम योग्य प्रकारें चालवीत आहेत.

## बालकवींचें औदासीन्य

खरें पाहिलें तर एथेंच बालकवींचें चरित्र संपलें; पण बालकवींची काव्यरचना थोडी, तिच्यांत कांहीं ठिकाणीं निराशेचे, उद्विग्नतेचे सूर ऐकूं येतात; तेव्हां कवि मित्रांनीं सद्हेतूनेंच या दोन गोष्टींचें मूळ शोधण्याचा यत्न केला, तर्क चालविला व त्यांना ठरविलें कीं, बालकवींच्या उद्विग्नतेचें एकमेव कारण त्यांच्या पत्नी. आपल्या मित्राच्या या वैगुण्याचें समर्थन करण्याच्या भरांत त्यांनीं भडक रंगाचा उपयोग केला व लिहिलें कीं, 'प्रस्तुत बालकविही गृहिणीसुखाला अगदीं मुकला होता.' 'त्याच्या उद्विग्नतेचें मूळ कारण तेंच होतें.' * हें मूळ विधान बालकवीच्या एका चांगल्या स्नेह्यानें केलें असल्यामुळें त्याबद्दल शंका घेण्याला मन धजेना; पण मनांत

* बालकवींबद्दल लेख लिहिणारांनीं याच विधानाचा पुढें अनुवाद केला.

अशीही शंका आली कीं, यांत बालकवींच्या पत्नींना अन्याय तर होत नसेल ना ? सत्यान्वेषणासाठीं म्हणून, ह्या प्रश्नाला दुसरी बाजू असल्यास, ती जनतेपुढें यावी, व जिव्हाळ्याचे स्नेही ह्यांच्याजवळ चवकशी केली; माहिती मिळवली. तेव्हां आम्हांला असें दिसून आलें कीं, वरील विधानांत सत्यांश फार थोडा आहे व पार्वतीबाईंना बराच अन्याय झाला आहे.

या चरित्रांतील महाबळेश्वर हें प्रकरण, व शेवटीं दिलेलीं पत्रें बालकवींचा स्वभाव जात्या आनंदी व खेळकर होता हें सिद्ध करण्यास पुरेशी आहेत. कधीं कधीं ते उद्विग्न असत हें खरें, पण याचीं कारणें निरनिराळीं असण्याचा संभव आहे. बालकवींची प्रकृति म्हणण्यासारखी सुदृढ नव्हती. ते नगरला गेल्यावर मातुःश्री, धाकटे बंधु, कधीं कधीं थोरली भावजय, एवढ्यांचा संसार एकट्यानेंच चालवावयाचा ! शाळेंत नोकरी असली तरी तेवढ्यावर गुजारा होणें शक्य नसल्यामुळें शिकवण्या कराव्या लागत. कधीं कधीं अंगांत १०२ डिग्रीपर्यंत ताप असतांना शिकवण्या करण्यासाठीं दोन दोन मैल पायीं जावें लागे. हें सर्व या चरित्रांत आधीं दिलेंच आहे. अशा या बिकट परिस्थितीला तोंड द्यावें लागल्यामुळें ते साहजिकच कधीं कधीं म्हणत, “ शरीर पिळून निघालें आहे. ” शरीराला व मनाला थकवा आल्यामुळें काव्यनिर्मिति न झाल्यास कविहृदयाला औदासीन्य येणें शक्य आहे; तसच बालकवींच्या स्वभावांत एक प्रकारचें वैगुण्य होतें. त्यांच्या ज्येष्ठ भगिनी सौ. जिजी सांगतात, “ नानाला सुंदरता दिसे, आनंद वाटायचा, पण शेवटीं त्यापासून नैराश्य उत्पन्न होई. तो म्हणे, मला मूल गोंडस दिसतें. त्याच्याशीं खेळावेंसें वाटतें, पण मला लगलींच त्याचा मृत्यु दिसूं लागतो. सुंदरतेंत भेसुरता दिसते.” या सर्व गोष्टींत ज्योतिष्याच्या भाकिताची भर पडली. अपमृत्यूबद्दलचें ज्योतिष त्यांना भेडसावी, कारण त्यांचा ज्योतिषावर विश्वास होता व ते थोडे बहुत ज्योतिषही जाणत असत. त्यामुळें चैत्र वद्य नवमीला व त्या सुमारास कांहीं दिवस साहजिकच निराश असत. या उद्विग्नतेबाबत रे. टिळक यांनीं बालकवींबद्दल लिहिलेल्या मृत्युलेखांत म्हटलें आहे, कीं श्री. ठोमरे यांना आंग्ल कवि वुइल्यम कूपर यांचेप्रमाणें क्षुद्र कारणामुळें किंवा कधीं कधीं निष्कारण सुद्धां जीवाला कंटाळण्याइतकें विमनस्क होऊन बसण्याचा विकार होता. बालकवींच्या उद्विग्नतेचें ह्याहून आणखी एक कारण असेल. त्यांचे एका काळचे शिष्य व पुढें मित्र झालेले रा. नथु ना. पाटील सांगतात कीं, ते पुण्यास शिकत असतांना बालकवीही तेथें

होते. त्या वेळीं बालकवींना आपल्या ठिकाणीं एक प्रकारची अपूर्णता आहे असें वाटे. ते आपलें हरपलें श्रेय मिळविण्याच्या पाठीं होते. आपल्या हातून पुरेसें काव्य होत नाहीं याबद्दल त्यांना फार वाईट वाटे. प्रतिकूल आर्थिक परिस्थितीची जाणीव त्यांना फार बोंचत असे. अशा या निरनिराळ्या कारणांनीं त्यांच्या मनावर औदासीन्याचे, निराशेचे काळे ढग कधीं कधीं येत; पण आनंदी मित्रांच्या सहवासांत ते ढग लवकरच विरून जात.

बालकवींच्या उद्विग्नतेची एवढी चर्चा केल्यावरही एक प्रश्न उरतोच कीं, त्यांच्या औदासीन्याशीं त्यांच्या पत्नीचा संबंध किती ? पत्नीमुळेंच त्यांच्या गृहसौख्याला आग लागली होती का ? कारण जसा दारिद्र्य दोष गुणराशिनाशीं आहे तसाच पतिपत्नींमधील ३६ चा आंकडा इतर सर्व सुखें असतांही पूर्ण निराशा उत्पन्न करण्यास पुरेसा आहे. या नाजुक प्रश्नास हात घालण्यापूर्वी एवढें प्रामाणिकपणें कबूल करणें जरूर आहे कीं, त्या दोन जीवांचें तादात्म्य झालें नव्हतें. पण त्याचा दोष एकट्या पत्नीकडे नसून, परिस्थिती, पत्नी व बालकवि ह्या तिघांकडेही जातो.

भावनांचे खेळ व कल्पनांचे स्वैरविलास यांत दंग असणाऱ्या कवीला आपल्या पत्नीनें आपल्या कविता वाचाव्यात, ऐकाव्यात, उत्तेजन द्यावें, कवितांचें कौतुक करून आनंद द्विगुणित करावा, असें वाटावें, हें साहजिक आहे. सुगरण पत्नीनें केलेलें सुरस मकान्न पतीनें कौतुक करून खावें असें पत्नीला वाटतें, तसेंच आपल्या पत्नीनें आपल्या काव्याचा रस चाखावा, आनंदानें डोलावें, असें कवीला वाटणें शक्य आहे. कोणीहि आपली काव्यकृति आपल्या मित्राला दाखविण्यास, त्याच्याकडून स्तुति ऐकण्यास उत्सुक असतो. आणि पुरुषांचा पत्नीपेक्षां जास्त जवळचा, जिव्हाळ्याचा स्नेही कोण असणार ? आपल्या पत्नीकडून ती अपेक्षा सफल न झाल्यास तो निरुत्साह झाल्यास नवल नाहीं. आपल्या महाराष्ट्रांत गेल्या पिढींत तरी मुलांमुलींचीं लग्नें लहानपणीं होत. त्या वेळीं थोड्याशा मुलींना जास्तींत जास्त, मराठी चवथीपर्यंत शिक्षण मिळे. मग त्यांना कवींचीं काव्यें कशीं कळणार ? आणि ती नवऱ्याच्या काव्याचें कौतुक तें काय करणार ? साहजिकच काव्यमय वातावरणांत, कल्पनेनें निर्माण केलेल्या दिव्यांगनांच्या सहवासांत रमणाऱ्या कवींना, व्यवहारी व अरसिक पत्नी आवडणें शक्य नाहीं. कविवर्य सोनाळकर म्हणतात त्याप्रमाणें रेंदाळकर, गोविंदाग्रज वगैरे कवींना गृहिणीसुख

लाभलें नसल्यास आमच्या म्हणण्याला पुष्टीच मिळते. शेलेच्या प्रथम पत्नीबद्दल सुप्रसिद्ध कवि फ्रॅन्सिस थॉम्प्सन् म्हणतो कीं, शेले प्रथम पत्नीच्या पार्थिव सौंदर्याला कण्टाळला नव्हता पण आत्म्याला कंटाळला होता. हीच गोष्ट बालकवि, रेंदाळकर, गोविंदाग्रज या कवींच्या बाबतींतही लागू होऊं शकणार नाहीं कां ? कवि टिळक व व्यवहारी लक्ष्मीबाई यांचे अनेक वेळां खटके उडाले; तरी रे. टिळकांच्या ठिकाणीं दगडापासून देव निर्माण करण्याची कणखर शक्ति असल्यामुळें व लक्ष्मीबाईही मूर्ति बनविण्यालायक असा संगमरवरी चिरा असल्यामुळें, हा लक्ष्मीनारायणाचा जोडा मराठीवाङ्मयांत मानाचें स्थान मिळविता झाला. इतर कवींना तें साध्य झालें नाहीं; ह्याचा दोष त्या कविपत्नींच्याकडे कसा जाईल !

हें इतकें सामान्य विवेचन केल्यावर आतां आपण बालकवींच्या विवाहित आयुष्याकडे वळूं. बालकवींच्या पत्नी पार्वतीबाई यांचे वडील एका लहानशा खेडेगांवीं राहणारे, त्यांतून मुलगी एकुलती एक आणि म्हणून साहजिकच लाडांत वाढलेली; तेव्हां ह्या मुलीला शिक्षण मिळालें नसल्यास, शहरी राहणी माहीत नसल्यास तो तिचा दोष नाहीं. मुलगी आईची लाडकी असल्यामुळें तिला स्वयंपाक साहित्याची किंवा पाकनिष्पत्तींतील रसोत्पादनाची चांगलीशी ओळख नव्हती; तेव्हां शिक्षणाच्या अभावीं वाङ्मयसाहित्यांतील रसांची ओळख कुठली असणार ? आणि काव्यरसाचा आनंद चाखण्याची पात्रता नसल्यामुळें रसगंगेंत पोहणाऱ्या पतीचें कौतुक तिनें न केल्यास नवल कसलें ? सहवासानें प्रेम उद्भवतें, वाढतें, सहानुभूति उत्पन्न होते; पण बालकवींच्या व त्यांच्या पत्नीच्या दुर्दैवानें, आर्थिक हलाखीमुळें, बालकवींना लग्न होतांच गृहत्याग करावा लागला. लग्नानंतर तीन एक वर्षें तरी संसार थाटण्याइतकें त्यांना स्वास्थ्य लाभलें नव्हतें. आणि जेव्हां संसार थाटला तेव्हांही आई, भाऊ यांची जबाबदारी त्यांच्यावर होती. सगळीच मण्डळी एकत्रित होती. मनाची घडण जुन्या पद्धतीची, घरीं सासू वगैरे वडील माणसें; नगरसारखें गांव कीं जेथें स्त्रियांनीं पायांत जोडा घालणें, हातांत छत्री घेणें हीं छचोरीचीं लक्षणें समजलीं जात; तसेंच कल्पनेच्या आकाशांत भराऱ्या घेणाऱ्या कवि चंडोलाला, आपल्या पतीला, प्रेमाच्या रेशमी पाशांत बद्ध करून ठेवण्याची जाणीव उत्पन्न होण्याला, ती कला हस्तगत करून घेण्याला पुरेसा कालावधि न गेलेला; तेव्हां त्या उभयतांचे खटके उडाल्यास आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. साध्या माणसांच्या संसारांतही दोन मनांची

मिळणी होण्यापूर्वी खटके उडतात, पण कालांतरानें भेद नाहींसे होतात. वाढत्या वयाबरोबर जीवित हें तडजोडीवर उभारलें जातें, याची जाणीव उत्पन्न होते व तशी कृतीही उभयपक्षीं घडून येते. पण बालकवींच्या विवाहित आयुष्याला सुरवात झाल्यावर ७।८ वर्षांतच त्यांचा शेवट झाला. व तो ७।८ वर्षांचा आयुष्यपथही खडबडीत खांचा खळग्यांचा. अशा स्थितींत पत्नी दहाजणीं सारखी; तेव्हां ती कवीच्या काव्यवाणीला, काव्यमय जीवन–संगीताला, सुरेल सांथ देणारी वीणा न झाल्यामुळें, त्यांच्या काव्य निनादाचे पडसाद तिच्या हृदयांतून न निघाल्यामुळें, कवीनें कधीं कधीं सुस्कारे टाकले असतील, त्यांना केव्हां केव्हां विषण्णता वाटली असेल; पण याबाबत दोषी कोण ? पत्नी कां परिस्थिति ? खेड्यांतल्या या मुलीला बालकवींनीं म्हटल्याप्रमाणेंच 'प्रणयचंचला त्या भूलीला अवगत नव्हत्या;' त्यामुळें बालकवींचा विरस झाला. पण कांहीं काळानें ही स्थिति बदलली असती, त्यांना हवा असलेला फरक पत्नींत झाला असता, त्या दोघांचीं मनें मिळालीं असतीं, असें ताराबाई टिळकांच्या आठवणीवरून खासच वाटतें. दत्तोपंत, ताराबाई व ठोमरे यांचें बहीणभावंडाप्रमाणें अकृत्रिम प्रेम होतें. त्यामुळें ह्या वादग्रस्त मुद्यांबद्दल त्यांच्या आठवणी विश्वसनीय व खास उपयुक्त आहेत. ताराबाई म्हणतात, "त्यांच्यामध्यें एक उणीव होती ती पत्नीप्रेमाची. पण या बाबतींत बालकवींचा व माझा नेहमीं मतभेद व वादविवाद होत असे. पार्वतीबाईचें शिक्षण कालमानानें साधारण म्हणजे तिसऱ्या चौथ्या इयत्तेपर्यंत झालेलें होतें. कवि रसिकांचा चाहता असतो. त्यांतल्या त्यांत आपली पत्नी–सहधर्मचारिणी–रसिक असावी अशी बालकवींना इच्छा असली तर ती साहजिकच होती. पार्वतीबाई जरी रसिक नसल्या, तरी प्रेमळ व गोड स्वभावाच्या होत्या खास ! बालकवींनीं नगरास बिऱ्हाड थाटल्यावर माझी व पार्वतीबाईंची चांगलीच गट्टी जमली होती. मी त्यांना वहिनी म्हणत असे. माझा अनुभव असा आहे कीं, पार्वतीवहिनी फार लाजाळू होत्या. बालकवींना बोलायला फार हवें तर त्या बोलत फार कमी. त्यांच्या मनांतल्या प्रेमाची मुग्ध कळी अजून पूर्णपणें उमलली नव्हती. पण ती कांहीं दिवसांनीं उमलूं पण लागली. एक दिवस संध्याकाळीं बालकवि हंसत हंसत आमच्या घरीं आले, मीं त्यांना विचारलें, 'आज कांहीं विशेष झालें वाटतें ? तुमचें हंसूं आंत ओठांत मावत नाहींसें दिसतें !' बालकवि म्हणाले, 'हो बुवा ! आहे खरें असेंच विशेष कारण. आज तुझी वहिनी माझ्याबरोबर आली

आहे, आणि ती हंसूंही लागली आहे.' मी लगेच म्हटलें, 'अप्पा, (मी बालकवींना अप्पा म्हणत असे) ठरलें ना माझें भविष्य खरें ? आतां मला काय बक्षीस द्याल ?' त्यावर त्यांनीं हंसून माझा एक गालगुच्चा मात्र घेतला. पुढें बालकवींना पुण्यास जावें लागलें व त्यांनीं आपल्या मंडळींना कांहीं दिवसांकरितां खानदेशांत पाठवून दिलें. यानंतर बरेच दिवस, म्हणजे पुण्यास संसार थाटीपर्यंत, त्या आपल्या माहेरींच होत्या. या व अन्य कारणांमुळें त्यांच्या फुलत्या प्रेमवल्लीला बहर येण्यास अवकाश मिळाला नाहीं."

असो !, पतिपत्नींचे संबंध अत्यंत नाजुक व पवित्र ! त्यांची चर्चा अशी उघडपणें करणें योग्य नव्हे, याची पूर्ण जाणीव असतांही बालकवींचें चरित्र रेखाटतांना तें यथार्थ व्हावें, तसेंच दुसऱ्या व्यक्तींच्या बाबत अन्याय होऊं नये, एवढ्याच हेतूनें इतकी साधार व विस्तृत चर्चा केली आहे. ती वाचून बालकवींस गृहसौख्य, पत्नीसुख लाधलें नसल्यास, त्याबाबत एकट्या पार्वतीबाईच सर्वस्वी दोषी नसून, त्यांच्या बरोबर बालकवि व भोंवतालची परिस्थितिही जबाबदार आहेत, हें विधान सर्वांस पटेल असें वाटतें.

**—भा. ल. पाटणकर**

# कवितांचें समालोचन

बालकवींच्या चरित्राला खरें महत्त्व त्यांच्या काव्यामुळें; तेव्हां त्यांच्या काव्याच्या एखाद्या विशेषाचा उल्लेख किंवा प्रसंगोपात्त चर्चाही, चरित्र कथनाच्या ओघांत आली असली, तरी त्यांच्या काव्यांतील वैशिष्ट्यांचा एकत्रित विचार करणें जरूर आहे.

बालकवींच्या कवितांचा या दृष्टीनें विचार करतांना एक गोष्ट लक्षांत ठेवणें जरूर आहे कीं, त्यांच्या कवितासंग्रहांतील कांहीं कविता म्हणजे कवितांची नुसतीं कच्चीं टिपणें किंवा मसुदे आहेत; कांहीं कवितांवर त्यांचा शेवटचा हात फिरलेला नाहीं; निर्झर, कविबाळें, संध्यातारक ह्या कवितांचीं दोन दोन रूपें उपलब्ध आहेत; रजनीस आवाहन १ व २ यांतील 'ये ये ये आई' वगैरे ओळींचें 'आवाहन' या कवितेमधील कांहीं ओळींशीं इतकें साम्य आहे कीं, या तीन स्वतंत्र कविता नसून एकाच कवितेच्या सुधारून काढलेल्या आवृत्ति आहेत असें वाटतें. त्यावरून बालकवि आपल्या कविता किती कसोशीनें व काळजीपूर्वक सुधारीत याची कल्पना येते; तेव्हां या कविता आज ज्या स्वरूपांत उपलब्ध आहेत त्या स्वरूपांत बालकवींनीं खासच छापल्या नसत्या; त्यांच्यातील दोष काढून, योग्य त्या सुधारणा करून प्रसिद्ध केल्या असत्या. तेव्हां कवितांचें कच्चें टिपण या दृष्टीनेंच अपूर्ण कवितांकडे पाहणें आवश्यक आहे.

त्यांच्या सर्व कवितांचे लेखनकाल उपलब्ध असते तर त्यांच्या उपजत काव्यशक्तीचा विकास कसा होत गेला आणि परिस्थितीमुळें तिच्यांत काय फरक घडून आले हें पाहणें मनोरंजक व उद्बोधक झालें असतें; पण अशा निश्चित माहितीच्या अभावीं त्यांच्या काव्याचे विशेष किंवा विषय यांच्या अनुरोधानेंच चर्चा करणें जरूर आहे.

बालकवींच्या काव्याच्या अंतःस्वरूपाकडे पाहण्यापूर्वी आपण जर त्यांच्या कवितांच्या बाह्य स्वरूपाकडे लक्ष दिलें तर चटकन् एक दोन गोष्टी आपल्या ध्यानांत येतात. त्यांनीं आपल्या काव्यासाठीं अत्यंत साधीं सोपीं वृत्तें व गेय अशा चालींचा उपयोग केला आहे. तसेंच त्यांची भाषा संस्कृतप्रचुर असली किंवा तिच्यांत कांहीं ठिकाणीं ज्ञानदेवींमधील किंवा जुन्या मराठींतील शब्द आले असले

तरी कवितेचा अर्थ अगदीं सहज प्रतीत होतो. त्यांनीं वापरलेल्या पुष्कळशा शब्दांत–त्यांतील वर्णांत, मार्दव असून त्यामध्यें अधून मधून डोकावणाऱ्या कठोर टकार किंवा उकारादिमुळें त्या मृदुल वर्णांच्या प्राचुर्यानेंसुद्धां कवितेंतील वर्णमाधुरीचा कंटाळा किंवा वीट येत नाहीं; तसेंच हिरवे हिरवे, लाजत लाजत, दरी दरी किंवा गुंगत गुंगत वगैरे शब्दांची पुनरुक्ति, डोल डोलवी, खेळ खेळते किंवा झुलति झुलति यासारखी शब्दरचना व अनुप्रास यांचा जागोजाग केलेला उपयोग, यामुळें त्यांच्या कवितांतून भरपूर नादमाधुर्य आलें आहे. आणि म्हणूनच बालकवींचें नांव निघतांच त्यांच्या कांहीं पद्यपंक्ती आठवतात व कानांत कांहींतरी गोड सूर ऐकल्याचा भास होतो. कांहीं ठिकाणीं कवितेची चाल व शब्दयोजना वर्ण्यविषयांशीं इतक्या संवादी असतात, कीं कवितेचा अर्धा अधिक भाव कविता नीट म्हटल्यानेंच प्रतीत होतो; तारकांच्या गाण्यांतील 'कुणि नाहीं ग कुणि नाहीं' (या पद्यपंक्तींत मृदुवर्ण फारसे नसले तरी) किंवा 'लाजत लाजत। हलुच हासत' या ओळी वाचतां वाचतांच, लाजत लाजत, पण हळूच हसत, पुढें येणाऱ्या तरुणीच्या मनःस्थितीची कल्पना येते. निर्झरांतील

**कड्यावरुनि घेऊन उड्या । खेळ लतावलयीं फुगड्या**
**घे लोळण खडकावरती । फिर गरगर अंगा भंवति**
**जा हळु हळु वळसे घेत । लपत छपत हिरवाळींत ।**

या ओळी वाचतांच एखाद्या खेळकर अशा लहान मुलाप्रमाणें खेळत खेळत वाहणाऱ्या निर्झराचें चित्र डोळ्यापुढें उभें राहतें.

त्यांच्या कवितांच्या बाह्यरूपाकडून अंतरंगाकडे वळलें तर आपल्याला दिसून येतें कीं, त्यांच्या निम्म्या अधिक कविता निसर्गपर आहेत. नुसत्या कवितांच्या विषयांचा विचार केला तर दिसून येईल कीं, त्यांत अरुण आहे, संध्यारजनी, संध्यातारक आहेत, तारकांचें गाणें आहे. त्यांचें 'आवाहन' रजनीस उद्देशून आहे, पावसाप्रमाणें श्रावणमासाचें शब्दचित्र आहे; पक्ष्यांना उद्देशून लिहिलेलीं 'बालविहग', 'सृष्टीच्या गायकास', वगैरे आनंदी-वृत्तीचीं, तर पांखरांस हें त्याच्या उलट, करुणरसानें भरलेलें, अशीं अनेक गीतें आहेत; पक्षीच काय पण पक्ष्याचें गाणें यावरही एक सुंदर कविता आहे. क्षुद्र अशा तृणपुष्पावर, गवताच्या फुलांवर त्यांनीं कविता लिहिल्या मग फुलराणीवर कविता असल्यास नवल काय! बालकवींची निसर्गाची आवड

वसंत या बालगीतांत व 'या बाई या, बकुलीच्या झाडाखालीं फुलें वेंचू या' या अंगाई गीतांतही दिसून येते. 'ऊठ मुला' या बालगीतांत कवीनें अरुणोदया-पासून सकाळपर्यंतच्या काळांत निसर्गाच्या पार्श्वभूमीवर दिसणारी सुंदर दृश्यें रंगाविलीं आहेत. ही सृष्टिसौंदर्याची आवड बालकवींना अगदीं लहानपणापासून होती, हें 'पक्ष्याचें गाणें', व 'माझें दिव्य' यावरून दिसून येतें. 'माझें दिव्य' या कवितेंत कवि म्हणतो.

सृष्टि हांसवी मला फुलांनीं तारांनीं नभ तसें
सदाचें मंगल मज देतसे
जिकडे तिकडे दिव्य सांठलें रत्त झालें गायनीं
पहाया जनीं मनीं कीं वनीं
त्या सहजी क्रीडा प्रेमच माझें खरें
ही क्रीडा म्हणजे जीवित माझें बरें
या दिव्यासह सखि कवितेशीं जिणें वेंचिलें जरी
खरी मज माझी मुक्ति तरी

या पद्यपंक्तीवरून पृथ्वीवर पसरलेल्या व आकाशांत विखुरलेल्या सौंदर्याची कवीची आवड प्रतीत होतेच; निसर्गाच्या सौंदर्यांत रममाण होण्यांत, त्या दिव्यासह कवितेशीं जिणें वेंचण्यांत, त्याला खरा मोक्ष दिसतो. बालकवींना लहानपणापासून वाटत असणारें निसर्गाचें,–त्याच्यांतील सौंदर्यासंबंधीचें प्रेम वाढत्या वयाबरोबर वृद्धिंगतच होत गेलें.

बालकवींच्या निसर्गपर कवितांचा आपण विचार करूं लागलों म्हणजे आप-ल्याला दिसून येतें कीं त्यांचा निसर्गाकडे पाहण्याचा दृष्टिकोन निसर्गाचा कवि वर्ड्सवर्थ याच्या दृष्टिकोनाहून भिन्न होता; वर्ड्सवर्थच्या दृष्टीनें निसर्ग मनुष्याचा गुरु असून, त्याच्या पायापाशीं बसून मनुष्यांनीं धडे घेतले पाहिजेत. वर्ड्सवर्थला निसर्गामध्यें परमेशाचा भास होई. बालकवींना सृष्टि आवडे ती केवळ तिच्या सौंदर्यामुळें; त्यांना आकाशांत, अधांतरीं, सृष्टीमध्यें, तान्यांच्या, पक्ष्याच्या व पुष्पाच्या रूपानें सौंदर्य दृग्गोचर होई; बालकवींना सृष्टि गुरुमाउली वाटली नाहीं किंवा तिच्यांत ईश्वराचें दर्शन झालें नाहीं; त्यांना तेथें दिसली असेल तर कळ्यांचा मुकुट घातलेली सृष्टिदेवता; विश्वांतील सौंदर्यानें, ते मंत्र–मुग्ध

होत असत. 'तडाग असतों तर' या कवितेंत बालकवि म्हणतात 'मी जर तडाग असतों' तर

**सौंदर्यानें जीवन बाणे, प्रेमजागृती हो मग त्यानें ।**
**लहरींवर हें लिहुनि गाणें, मग दिवसां बसतों गात. ॥**
**चित्रकाराला कविरायाला, अशक्य जे कां उठवायाला ।**
**सौंदर्याच्या नव नव लीला उठल्या मम हृदयांत ॥**

त्यानें या सौंदर्यांचा अमूप आनंद स्वतः लुटलाच पण आपल्या कवितांच्या द्वारें इतरांनाही तो प्रतीत करून दिला.

बालकवींच्या निसर्गपर कवितांबाबत आणखी एक गोष्ट ध्यानांत येते. 'लतिकेस', 'पक्ष्याचें गाणें' वगैरे कविता त्यांनीं वयाच्या अकराव्या किंवा बाराव्या वर्षी लिहिल्या, किंवा 'तृणपुष्प', 'माझा लहानसा बाग,' 'भ्रमर आणि कवि', अशा सारख्या कविता त्यानंतर कांहीं काळानें लिहिल्या, हें जरी खरें तरी त्यांच्या हृदयांतील काव्यकलिका नगरास रे. टिळकांच्या घरीं उमलली व पुण्यास गोविंदाग्रजां-दिकांच्या सहवासांत फुलली. बालकवींच्या निसर्गपर कवितांचे इ. स. १९१० पूर्वीचा एक व नंतरचा एक, असे दोन भाग केले तर असें दिसून येतें कीं महाराष्ट्राला ज्या कवितांनीं वेड लावलें त्या 'निर्झर', 'फुलराणी' वगैरे कविता दुसऱ्या भागांत पडतात. याच कालखंडांत 'निर्झर', 'संध्यातारका', 'फुलपांखरूं—फुलवेली' अशा सारख्या कविता बालकवींना स्फुरल्या; या साऱ्या कविता निसर्गांतील वस्तूंमुळें स्फुरल्या असल्या, तरी वर्ण्य वस्तूंवर मानवी धर्मांचे, भावनादिकांचे आरोप करून त्यांच्याद्वारें कोमल अशा भावनांचा सुंदर आविष्कार या कवितां-मधून कवीनें केला आहे. संध्याकाळच्या वेळीं, हिरव्या हिरव्या गवतांत डोलणारी कालिका वाऱ्यानें हलली पण कवीनें त्या दृश्यापासून कल्पनाशक्तीनें किती सुंदर मोहक कथा निर्माण केली! क्षणार्धांत अल्लड कलिका, मुग्धा—तरुणी बनली, रविकर तिचा प्रियकर झाला, आणि बंधुराज वायूनें थट्टा केली, 'कुणाकडे ग पाहत होती.' विवाहाच्या आधली रात्र ती; तेव्हां त्या कलिकेच्या प्रणयाचीं स्वप्नें पडलीं; सकाळीं दंवाचा अंतःपट दूर होतांच तिचें रविकरांशीं लग्न झालें. त्या लग्नासाठीं नटून थटून मेघ वऱ्हाडी बनले व निर्झर कोकिलांनीं मंगल वाद्यें वाजविलीं, ही कविता वाचित असतां मनाला

आल्हाद वाटतो, आनंद वाटतो; त्यावेळीं या दृश्याची जननी प्रतिभा का अनिर्बद्ध कल्पना हा विचार सुद्धां डोक्यांत येत नाहीं. मागाहून विचार करूं लागलों म्हणजे 'फुलराणी म्हणजे फूल कीं लवकरच लग्न होणारी नववधू, दोन्ही, कां दोन्ही नाहींत, असा संभ्रम उत्पन्न होतो. तों' पुन्हा असें वाटतें कीं, बालकवि म्हणाले असते, ती हलणारी कलिका पाहून माझ्या अंतःचक्षुपुढें जें रम्य चित्र उभें राहिलें त्याचेंच चित्रण मीं केलें; मजप्रमाणेंच तुम्हांला आनंद झाला ना, संपलं माझं काम, आपणांला असेंही म्हणतां येईल कीं हा संभ्रम असला तर निदान गोड संभ्रम आहे. संध्यातारक, तारकांचें गाणें, फुलपांखरूं, फुलवेली, संध्यारजनी वगैरे कवितांमध्यें सुद्धां फुलराणीप्रमाणेंच अचेतनांवर मानवी धर्मांचे आरोप करून नयनमनोहर दृश्यें बालकवींनीं निर्माण केलीं आहेत.

या खेरीज अरुण, निर्झर, श्रावणमास, आवाहन वगैरे किती तरी सुंदर अशा सृष्टिवर्णनात्मक कविता बालकवींनीं लिहिल्या आहेत. निर्झरास ही बालकवींची एक नितांत सुंदर कविता आहे, या कवितेंतील पहिल्या दहा ओळींत अर्थवाही शब्दरचना व नादमाधुर्य यांचा उल्लेख आधीं आलाच आहे. या ओळींत काढलेलें निर्झराचें शब्दचित्रही सुंदर आहे. या दहा ओळींत बालनिर्झरानें आपल्या मार्गावर केलेल्या क्रिडांचें वर्णन उड्या, फुगड्या, लोळण, फिर गरगर वगैरे शब्दांनीं केलें आहे; ते शब्द वाचीत असतां लहान मुलांच्या विविध कृति आपल्या डोळ्यांपुढें चित्रपटाप्रमाणें दिसूं लागतात व मनाला आनंद होतो. या दहा ओळींत कवीनें आपणाला ओढ्याच्या कांठाकांठानें हिंडवून एकामागून एक अनेक दृश्यें दाखविलीं आहेत. निर्झराच्या सौंदर्यानें, जादूनें भारलेला कवि निर्झराशीं बोलूं लागतो, त्याच्या गानाचें वर्णन करतो, त्याला कविराज म्हणून आळवतो, व शेवटीं विनंति करतो 'शिकवी रे शिकवी मातें । दिव्य तुझीं असलीं गीतें' आणि तसें झालें तर, कवि म्हणतो, 'जसें सगळें रान । गातें तव मंजुळ गान । तेविं सृष्टीची सतारही । गाइल मम गाणीं कांहीं' ।। या शेवटच्या दोन ओळी बालकवींच्या काव्याला अक्षरशः लागू पडत नाहींत काय ? 'निर्झरा'नंतर बालकवींच्या 'अरुण' या कवितेची आठवण होते. लहाणपणीं त्यांनीं अरुणाचें दृश्य अनेक वेळां पाहिलें होतें; त्यांच्या सौंदर्याचा ठसा मनावर कायम उमटला होता.

---

१ प्रा. रा. श्री. जोग कृत अभिनवकाव्यप्रकाश पान २२३

ही कविता लिहितांना तीं स्मृतिचित्रें जागृत झालीं व त्यावरून बालकवींनीं कवितेच्या आरंभीं अरुणाचें वर्णन केलें; तें वर्णन स्थूल मानानें केलेलें असल्या-मुळें ह्या अरुण कोणत्या ऋतूंतला, व कोणत्या स्थळीं पाहिलेला याचा बोध होत नाहीं असा या वर्णनावर एका टीकाकारानें साहाजिकच आक्षेप घेतला[1]. तो आक्षेप खरा असला तरी अरुण ही कविता निर्झराप्रमाणेंच मनोहर आहे. कारण या कवितेची घडण कौशल्यपूर्ण आहे. अरुणागमानें आरक्त झालेली पूर्वदिशा मधुमृदुल हांसते गालीं असें पूर्वदिशेनें केलेलें वर्णन गोड आहे. अरुणाचें वर्णन खुलवण्यासाठीं माफक उत्प्रेक्षांचा उपयोग कवीनें केला आहे. त्यामधील एकदोन उत्प्रेक्षा फार सुंदर आहेत. अरुणाच्या आगमनानें दिशा खुलल्या, पृथ्वी, गिरीशिखरें वनमाला आनंदित झालीं; पांखरें तो आनंद गोड आवाजांनीं व्यक्त करूं लागलीं असें अरुणोदयाचें सुंदर पण यथार्थ चित्र या कवितेंत रंगवलेलें आहे. या कवितेंतही अचेतन दिशांवर सचेतनतत्त्वाचा आरोप केला आहे; त्यामुळें दिशा डोलूं लागल्या, विनयवती पूर्वदिशा लज्जेनें अवनतमुखी झाली.[2] असो. श्रावण मासांत संध्याकाळच्या सुमारास सूर्यास्तापूर्वी पावसाची जोराची सर येऊन गेल्यावर कोंवळ्या किरणांनीं नटलेल्या निसर्गाची शोभा व अशा वेळीं श्रावण मासांत दिसणारीं विविध रम्य दृश्यें यांचें यथार्थ वर्णन 'श्रावण मासांत' आलें आहे. याखेरीज 'तृणपुष्प', 'आनंदी पक्षी', 'अप्सरांचें गाणें' 'आवाहन' या कविता सुंदर आहेत. अगदीं लहानपणीं लिहिलेल्या पक्ष्याच्या गाण्यांत निसर्गाचें वर्णन गोड व प्रसादयुक्त वाणीनें केलेलें आहे. सृष्टीच्या गायकास हें पक्ष्याला गाइलेलें एक गोड असे आनंदमय गीत आहे; तें वाचित असतां वाटतें कीं या पक्ष्याप्रमाणेंच बालकवींनीं निसर्गावर गोड गाणीं गाइलीं नाहींत कां ? आणि त्यामुळें पक्ष्याप्रमाणें कल्पनेच्या पंखावर आकाशांत भराऱ्या मारणाऱ्या या बालकवीला सृष्टीचा गायक असें यथार्थ नांव द्यावेसें वाटतें.

बालकवींनीं निसर्गांतील रम्य दृश्यासंबंधीं आनंदाचीं गोड गीतें गाइलीं त्याच-प्रमाणें एका दुःखी पांखरावर त्याच्याशीं समरस होऊन एक करुणरसात्मक कविता

---

१ कै. वा. प्रा. ग. स. भाटे कृत वाचन हा निबंध.

२ अर्वाचीन साहित्यसेवक भाग २ः डॉ. मा. त्रि. पटवर्धन यांचा बालकवि ठोमरे यांच्यावरील लेखांतील आक्षेप.

१५७०९

लिहिली आहे. ‘ निष्प्रेम मनाचें केविलवाणें ’ गाणें म्हणणाऱ्या पक्ष्याला कवि सांगतो निष्प्रेम मनाला कोठेंहि सुख नाहीं; कवीला त्याच्याबद्दल सहानुभूति वाटून त्या पक्ष्याला तो म्हणतो.

जग समाधिस्थ जणुं सर्व सर्व हें होतें
परि शांतिलेशहि नव्हता ठाउक तूतें ।
बैसून कुठें तरि कांटेरी झुडुपांत । तव हूंहूंहूंचें होतें गीत वहात ।
येईल एक परि धन्य दिवस सौख्याचा ।
जो करिल तुझ्यासह अंत तुझ्या गीताचा ॥

त्या पक्ष्याच्या आयुष्यांत उगवणारा सौख्याचा दिवस कोणता तर म्हणे मरणाचा; किती निराशा, निर्विण्णता आहे या समाधानांत; शब्द अगदीं साधे आहेत; पण ते वाचतांना त्या ‘ होल्या ’ प्रमाणेंच एकाकी दुःखमय आयुष्य कंठणाऱ्या जिवांची आठवण होते व मनाला वाईट वाटतें.

बालकवींच्या निसर्गपर काव्याचें स्वरूप अशा प्रकारचें आहे. पण या विषयाची रजा घेण्यापूर्वी आणखी एक दोन गोष्टींचा उल्लेख करणें जरूर आहे. आपण बालकवींच्या निसर्गपर कविता वाचल्या तर असें दिसून येतें, कीं ज्या पांच सहा कवितांत अचेतनावर मानवी धर्मांचे आरोप केले आहेत, त्या साऱ्याच कवितांमधून तारे, त्यांचे नाच, त्याप्रमाणेंच लग्नें हीं ठरलेलींच; कांहीं ठराविक संकेतांचा या कवितांतून भरपूर उपयोग केलेला आहे. त्याचप्रमाणें या निसर्गप्रिय कवीच्या काव्यांत निसर्गाच्या कांहीं अंगांचा यत्किंचितही उल्लेख नाहीं. त्यांच्या काव्यांत दाट अरण्य, किर्र् झाडी, खोल दरी, उंच डोंगर, पावसाळ्यांतील धों धों वाहणारी नदी, चवथीचा चांद वगैरे दृश्यांचें वर्णन नाहीं, थोडक्यांत सांगायचें तर शहराच्या आसपास दिसणाऱ्या सुंदर वस्तूंचें किंवा सामान्य वस्तूंत जें असामान्य सौंदर्य दिसलें त्याचें बालकवींनीं उत्कटतेनें वर्णन केलें आहे.

* * *

बालकवींच्या काव्यांत जसे उत्कट आनंदाचे उद्गार आहेत तसे दुःखाचे उसासे आहेत; त्यामध्यें अधून मधून निराशेचे सूर ऐकूं येतात, मात्र लहानपणापासून त्यांना तशी संवय असावी असें वाटतें; अगदीं लहानपणीं लिहिलेल्या

निराशेच्या गीतांत, तसेच 'दिव्य,' 'कवितेस' या बालपणीच्या कवितांत मनाची दुःखी निर्विण्ण स्थितीच त्यांनीं वर्णन केली आहे. बाल्याची सीमा ओलांडून तारुण्याच्या प्रांतांत शिरल्यावर अशाच प्रकारच्या मनःस्थितीचें वर्णन त्यांनीं साधारण प्रौढपणीं लिहिलेल्या ८–१० कवितांत केलें आहे. स्फुट श्लोकांत ते म्हणतात, "झालों खिन्न निराश पंथ न दिसे भांबावलों चालतां," 'कालास' या कवितेंत ते म्हणतात, 'झोंप न ये लोचनीं शांतता न मन्मनीं, दाहकता घोर भरे', 'यमाचे दूत' या कवितेंत तर ते आपल्या विषादाचें एक कारणही सांगतात. 'परिस्थितीचीं कठोर भूतें । क्षणांत करिती शून्य मनातें । पूर्वस्मृति मग ताजी होते । जळतें त्यांत ! हृदयाचें होऊनि भूत ॥' 'प्रीति व कर्तव्य' या कवितेंत या दोहोंत जास्त चांगलें कोणतें हें न कळल्यानें होणारा मनाचा गोंधळ, किंकर्तव्यमूढता याचेंही त्यांनीं कवितेंत वर्णन केलें आहे.

पण कधीं कधीं त्यांना नकळत उदासीनता वाटे, मन एकाएकी निराश होई. या मनःस्थितीचें वर्णन 'निराशा' व 'उदासीनता' या कवितांत त्यांनीं फारच साध्या पण समर्पक व सुंदर शब्दांनीं केलें आहे. उदासीनता कवितेंत ते म्हणतात;

**कोठुनि येते मला कळेना, उदासीनता ही हृदयाला**
**काय बोंचतें तें तमजेना हृदयाच्या अंतर्हृदयाला**
**मुक्या मनाचे मुके बोल हे, घरें पाडितीं पण हृदयाला**

ही लहानशी कविता वाचीत असतां असें वाटतें कीं, किती साध्या थोड्या व मोजक्या शब्दांत अगदीं हळुवार रीतीनें उदासीनतेचें वर्णन केलें आहे कवीनें ! 'निराशेंत' ते म्हणतात, "सुंदर सगळे मोहक सगळे । खिन्नपणा परि मनाचा न गळे ! नुसती हुरहुर होय जिवाला । कां न कळे कांहीं". 'शून्य मनाचा घुमट' सुद्धां अशाच मनःस्थितीचें यथार्थ वर्णन आहे. कवि म्हणतो—

**शून्य मनाच्या घुमटांत । कसलें तरी घुमतें गीत**
**अर्थ कळेना कसलाही । विश्रांती परि त्या नाहीं**
**वारा वाहीं । निर्झर गाई । मर्मर होई ।**
**परि त्याचें भीषण भूत । घोंघावत फिरलें येथ**

या करुणरसपूर्ण कवितांतून बालकवींनीं तारुण्यांत वाटणाऱ्या औदासीन्याचें, निराशेचें वर्णन केलें आहे; त्यांत त्यांनीं आपला अनुभव ओतला आहे असा भास

होतो. या तीन चार कवितांखेरीज इतर कवितांतून लहानपणीं लिहिलेल्या कवितांत सुद्धां, दुःखाचे निराशेचे उद्गार येतात व त्या सर्वांचें मूळ 'क्षय' या कवितेंत शोधण्याचा मोह होतो. ही कविता आत्मवर्णनपर असेल तर लहानपणापासून त्यांची प्रकृति अशक्त असावी असें वाटतें. जळगांवला बालकवि म्हणून त्यांचा गौरव झाला त्यावेळीं त्यांचें वय १७–१८ वर्षांचे होतें. पण त्यावेळच्या वृत्तपत्रांत १३–१४ वर्षांचा मुलगा असें त्यांचें वर्णन आहे. बालकवि नगराला आले तेव्हांही त्यांची प्रकृति सुदृढ नव्हती, त्यांना रे. टिळकांनीं नगरला येतांच कॉडलिव्हर सुरू केलें होतें; पुढेंही त्यांची प्रकृति म्हणण्यासारखी केव्हांच सुदृढ नव्हती; तेव्हां अशक्त प्रकृति, प्रतिकूल परिस्थिति यांचा मनावर परिणाम होऊन राष्ट्रसेवेची उर्मि जिरली, इच्छा असूनही व्हावी तितकी काव्यनिष्पत्ति झाली नाहीं, यामुळें मन दुःखी, निराश झालें व त्या मनःस्थितीचें प्रतिबिंब त्यांच्या कवितांत पडलें असावें असें वाटतें.

बालकवींनीं प्रेमावरही थोड्याशा कविता लिहिल्या आहेत. 'जादुगारीण' या कवितेंत तारुण्यांतील उन्मादी,उच्छंखल प्रेमाचें वर्णन आहे. 'प्रीति हवी तर' या कवितेंत प्रेम म्हणजे तलवारीची धार, लसलसीत नागीण, ब्रह्मांड दाहिनी दाहकता असलेली आग, असें प्रेमाचें जोरदार वर्णन केलें असलें तरी त्यांत भावनेचा ओलावा नाहीं; पण प्रेमाचा आनंद मनांत मावेनासा झाला, प्रेम डोळ्यांतून ओसंडूं लागलें म्हणजे साऱ्या जगांत चोहोंकडे प्रेम दिसूं लागतें; अशा मनःस्थितीचें सुंदर चित्र 'प्रेमाचें गाणें' या कवितेंत कवीनें काढलें आहे. या गाण्यांत आनंद आहे; भावनेची उत्कटता आहे. कवि म्हणतो—

**प्रेम कुठें ? तें रानभर**
**प्रेम खेळतें फुलावर**
**गातें मंजुळ तें गाणीं**
**जगतीं साऱ्या दिनरजनीं**
**प्रेम जिथें तें कांतार**
**उघडें स्वर्गाचें द्वार**
**त्यास आळवूं ये गाणें**
**प्रेमावांचुनि सर्व जुनें**

'आनंदी आनंद गडे, इकडे तिकडे चोंहिंकडे' असाच भास होत नाहीं कां ह्या ओळी वाचतांना ?

तसेंच दुसऱ्या एका कवितेंत कवीची मानसराजहंसी स्त्रीरुपानें अवतरली तेव्हां कवि तिला म्हणतो:—

'जा प्रेमदेवते जा जा। बंदिस्थ तुझ्या दासानें ॥ तव पुण्यदर्शन केलें। निमिषांत जिवाचें सोनें। देहाचा दास मरून। प्रेमाचा उरला जीव। प्रेमांतच झाला सारा। विश्वाचा अंतर्भाव। तारुण्य मदाचा श्वास। प्रेमाचा पहिला भास। मुग्धेचें मोहन तेंही। याहुनि मनोहर नाहीं।' प्रेमाच्या पहिल्या भासाचें असें सुंदर वर्णन कवीनें केलें असलें तरीही ही मानसराजहंसी मानवी सृष्टींतील नसून कवीच्या कल्पना साम्राज्यांतील असावी असें वाटतें. दिव्य आणि प्रीति या कवितेंतील प्रीति तर खासच मानवी प्रेम नाहीं. तिचें वर्णन करतांना कवि म्हणतो:

**आत्म्याची जी पुरोगती, नांव तिचें प्रीती प्रीती**
**विश्वात्म्याचे मधुहास, दिव्य जगीं वदती त्यास...**
**प्रीती लुब्ध दिव्य वरते, प्रीतिबद्ध दिव्यहि होतें.**

अशी ही दिव्य आणि प्रीतीची जोडी आहे.

पण बालकवींच्या एकंदर कवितांचा आढावा घेतला तर तारुण्योद्भव प्रेमाचें, त्यांतील आतुरतेचें, आनंदाचें किंवा निराशेचें वर्णन त्यांच्या कवितेंत फारसें दिसून येत नाहीं. प्रेमावर आनंदानें गाईलेलीं गाणीं किंवा प्रेमनिराशेचे विषण्ण सूर त्यांच्या काव्यांत फारसे ऐकूं येत नाहींत.

प्रेमाप्रमाणेंच धर्म, नीति, किंवा तत्त्वज्ञान यासंबंधीं मतें ज्यांतून प्रतीत होतात अशा कविता बालकवींनीं फारच थोड्या लिहिल्या आहेत. बालपणीं लिहिलेल्या 'क्षय' व 'आत्मविश्वास' त्यांच्या कविता वाचल्या तर बालकवींचा धर्मावर, ईश्वरावर आरंभीं पूर्ण विश्वास होता असें दिसतें. 'धर्मीं नित्य रमावें' 'परमेशपदीं......सदाचा वास होईल असा पंथ धरावा' असें त्यांनीं बालपणीं लिहिलेल्या एका कवितेंत म्हटलें आहे. 'पंथ,' 'काय करूं,' 'प्रेमदेवता' या त्याच काळच्या कवितांतून तत्त्वज्ञानाचे बोल आलें तरी त्यांत स्वानुभूतीचें खरें

नाणें कुठून असणार ! हे विचार मांडतांना आत्मानुभवाच्या वाटिका, समानतेचा टिळक, नीतीचीं मंगलसूत्रें, स्वानंदाची पैठणी, शांतीची रम्य कांचोळी अशा वर्णनांत सांप्रदायिक पद्धतीचा अवलम्ब केला आहे. पण बालकवींच्या तरुणपणींच्या कवितांकडे आपण वळलों म्हणजे त्यांच्या धर्मविषयक कल्पनांत फारच मोठी क्रांति झाल्याचें दिसून येतें. बालपणीं जरी त्यांनीं 'काय करूं विठ्ठला' असा धांवा केला असला तरी प्रौढपणीं एकटा विठ्ठलच काय, पण साकार अशा सर्वच देवांवरचा त्यांचा विश्वास उडाला; त्यांना सारें जग विष्णुमय दिसूं लागलें; 'स्वर्ग नको, कीर्ति नको, पर उपकारी शक्ति' खर्च होवो असें ते म्हणूं लागले. संतांच्या अनुवादांत[1] त्यांनीं देव, धर्म याविषयींच्या आपल्या कल्पना जास्त विशद करून सांगितल्या. ते म्हणतात, 'क्रिया कर्मी देव नाहीं देव कीर्तनीं न राही।' व त्यांचा देव आहे तरी कोण व कुठला असा आपण विचारण्यापूर्वी ते सांगतात, 'देउळीचा देव मेला। विश्वीं विश्वरूप झाला'. ते पुढें म्हणतात, हिंदुस्थानांतील प्रत्येक गरीब माणूस, अर्ध्यापोटीं, उघड्या अंगानें, दिवसभर कष्ट करणारा, पंगु, रोगी, दीणवाणा असा प्रत्येकजण माझा देव आहे. मी त्याला माझ्या हृदयमंदिरांत स्थापन करीन, त्याची अहर्निश सेवा करीन; हा निष्काम सेवेचा मार्ग खऱ्या धार्मिकपणाचा नाहीं असें कोण म्हणेल ! त्यांची धर्मवीर ही कविता 'वैष्णवधर्म' किंवा संतांचा अनुवाद या दोन्ही कवितांपेक्षां मोठी आहे. केशवसुतांनीं तुतारी वाजवली, रे. टिळकांनीं रणशिंग फुंकलें, गोविंदाग्रजांनीं दसरा साजरा केला तर बालकवींनीं धर्मवीर लिहिला. या कवितेंत सामाजिक रूढि, जुन्या धार्मिक कल्पना यांच्यावर जोराचा हल्ला बालकवींनीं चढवला, ते म्हणतात, ...धर्म नव्हे संध्या स्नान, धर्म नव्हे आसन ध्यान!...अंतरंगीं तुमच्या वसतो, आचरणीं तुमच्या दिसतो, धर्म खरा तुमचा तोच...सत्यधर्म निरहंकार, सर्वांचे समता सार। सत्यधर्म जगतीं प्रेम—सत्यधर्म जीवंतपणा।...आद्यऋषींनीं सांगितलें, संतांनीं आमुच्या कथिलें। धर्मतत्त्व हें खरें खरें, आम्हांला कळलें सारें ।। ज्या तेजाची आद्यऋषींनीं पूजा केली व ज्या तेजांत जाऊन ते मिनले, तें तेज प्राप्त करून घ्या; सत्यधर्माचा, विश्वबंधुत्वाचा धडा

---

१ या कवितेंत रमाईचा उल्लेख आहे. पण रमाई या त्यांच्या मातुःश्री नव्हत; या बाई योगिनी तपस्विनी आहेत असें त्यांना एका कवि मित्राच्या सांगण्यावरून वाटत असे

जनतेला शिकवा. ही जोरदार कविता सुधारणाप्रिय वाचकांना आवडली; तरी कवीनें रूढीवर आवेशानें हल्ला चढवितांना 'दिडकीला सतरा पार्पे...ब्रह्मचर्य... तुमचे थोर...चवदावें वर्षीं पोर' यासारख्या केलेल्या विधानांचा कांहीं टीकाकारांना फार राग आला व त्यांनीं या कवितेवर वाजवीपेक्षां जास्त कडक टीका केली. या कवितेंत सत्य धर्माचा पुरस्कार करतांना तेज प्राप्त करून घ्या; आद्यऋषि ज्या तेजांत जाऊन भिनले तें मिळवा असें म्हटलें आहे. हें तेज काय आहे हें पाहाणें जरूर आहे. तेज हा शब्द कांहीं विशेष अर्थानें कवीनें वापरला आहे असें दिसतें. 'तेजोवीणेची रागदारी', 'कवीचा विचार' वगैरे कवितांतूनही तेज हा शब्द त्याच विशिष्ट अर्थानें वापरलेला दिसतो. सगळ्या जगाच्या बुडाशीं असलेलें जें सत्तत्त्व आहे, जें मंगलमय असून सुंदर आहे, ज्याच्यासंबंधीं Truth is Beauty असें म्हणतां येईल तें जाणणें, अंगीं बाणणें, असा तेज शब्दाचा अर्थ येथें अभिप्रेत असावा असें वाटतें. हें तत्त्व आद्यऋषींनीं जाणलें होतें तसें आपण जाणलें तर आपल्याला सत्यधर्माची खरी जाणीव होईल असें कवीनें म्हटलें तर ती चूक होईल कां ?

* * * *

बालकवींनीं केशवसुताप्रमाणेंच कवि, कवीचें अंतरंग, कवीची इच्छा वगैरे कविता लिहिल्या; पण आपण कोणी मोठे आहों, 'आम्हांला वेगळा गतप्रभ झणि होतील तारांगणें,' असें ते कोठें म्हणत नाहींत. ते म्हणतात, 'वेडा झाला म्हणा हवा तर उठला जनतेंतुनी', 'कवि हा तन्मय निजगायनीं' 'स्वच्छंदी हा प्रभात वायु झोंके घे अंबरीं, लतांना पुलकित करितो तरी ...... हो असाच समजा स्वच्छंदी कवी'......'खरा भिकारी, खराच वेडा परंतु मोठा गुणी। कवीही, हा जगताचा धनी;' कवीची इच्छा ही सुंदर. काव्यमय आहे. तो म्हणतो,

ब्रह्मांडाची सदाफुली। अक्षयतेमध्यें फुलली
फुलें तिची बघता नयनीं । वेड भरुनि अंतःकरणीं
फूलपांखरें परोपरीं। निर्बंधपणें फुलांवरी
जशी स्वयें तरलित होतीं। मंद तरल गंधावरती
तेंवि जगाच्या फुलांवरी। गंध दाटले परोपरीं
अनुभवुनि हर्षित व्हावें। सुखदुःखें चुंबित गावें।

सुमकोषी आपोआप । क्षण घ्यावी सांखरझोंप
डोलतची जागें व्हावें । हांसतचि गुंगत जावें ।
सत्याची स्वप्नें व्हावीं । स्वप्नांतच व्हावा अंत.
मरणाचें स्वप्नहि गोड । जगण्याचें स्वप्नहि गोड
येणें परि सर्वहि भास । अमृताचे व्हावे कोष

पुढें कवि म्हणतो, ' जग म्हणेल हें काव्य पांखरू मेलें,' आणि मग

प्रेतहि माझें पाहून । प्रेमानें गुंगत गान
यापरि जग हर्षित व्हावें । हें इच्छी जीवेंभीवें.

' कविबाळें ' या कवितेंत कवि अशी सुंदर कल्पना करतो, कीं देवाचा लाडका कवि हा प्रारंभीं गाण्यांत वाद्यवादनांत स्वर्गांत गुंग होता; पण विषारी वाऱ्यानें तो कोलमडला व पृथ्वीवर आला. या पृथ्वीवरच्या अंधारांत ठेंचाळून विव्हळ झाला, त्यामुळें त्याच्या जिवास आग लागली, तेव्हां त्याच्या पूर्वस्मृति जाग्या होतात व तो दुःखानें किंकाळ्या मारतो.

परि त्याच दीर्घ किंकाळ्या ठरतात जगाची गाणीं ।[१] निःश्वास आंत जे कढती ती स्फूर्ति लोक हा मानी । संतप्त अश्रुमालेला गणितात कल्पनाश्रेणी । जग सर्व डोलवी माना परि मुग्ध मधुर आत्म्यांना । त्या काय बोचतें चित्तीं ।

* * *

बालस्वभावाचा अभ्यास करून त्यांच्या आवडी निवडी, भावना, विचार, यांच्याशीं समरस होऊन त्यांच्याबद्दल किंवा त्यांना आवडतील असें बालवाङ्मय लिहिणारे आजही फार थोडे लेखक आहेत. तरी पण तीस वर्षांपूर्वी बालबोधमेवा, आनंद, खेळगडी वगैरे मासिकें बालवाङ्मय प्रसिद्ध करीत असत. जेव्हां बालकवि नगरला रहायला गेले तेव्हां रे. टिळकांनीं बालबोध मेव्यांत टलाट पलाप या नांवाचें कवितांचें एक सदर सुरू केलें होतें. दत्तोपंत टिळकांच्या व आठनऊ वर्षांच्या ताराबाईंच्या कविता याच मथळ्याखालीं प्रसिद्ध झाल्या; त्यांच्याच घरीं राहाणाऱ्या या अभिजात कवींच्या बऱ्याच कविता, बरींच बालगीतें, बालबोध-मेव्यांत याच सदरांत प्रसिद्ध झालीं; कांहीं शिशुगीतांना आनंद, खेळगडी वगैरे

---

[१] ही ओळ वाचतांना Our Sweetest songs are those that sing of saddest thoughts ह्या skylark या कवितेमधील ओळींची आठवण होते.

मासिकांतूनही प्रसिद्धी मिळाली; त्यांची कांहीं बालगीतें निसर्गपर आहेत; व त्यांचा उल्लेख पूर्वींच आला आहे. त्यांची दोन्ही अंगाईगीतें, ' पाळणा ' ही शिशूंना गाईलेलीं गीतें गोड आहेत. पण ' घोडा घोडा, ' ' माझा ग भाऊ ' ह्या कविता खेळकर मुलांना निसर्गपर कवितांपेक्षां खासच अधिक आवडतील. त्यांचीं अभिनय गीतेंही मुलांना आवडण्यासारखीं आहेत. मात्र अंगाई गीतांतील नादानें तान्ह्या बाळाला झोप येईल, पण त्याची मौज आईलाच कळेल, मुलाला नव्हे. त्यांचीं एकदोन बालगीतें निसर्गपर असूनही लहान मुलांना आवडतील. बालोद्यानगाणीं या पुस्तकांत आलेल्या व या पुस्तकांत संकलित केलेल्या चिमणीचा घरटा चोरीस गेला, या मथळ्यामधील, घरटा बालकवींचा खास नव्हे हें येथें नमूद करणें जरूर वाटतें.

* * * *

बालकवींच्या कथानकप्रधान कवितांचा आपण विचार करूं लागलों कीं मनाला विषाद वाटतो; कारण वर्णनात्मक कवितेच्या रचनेला लागणारे गुण त्यांच्या ठिकाणीं भरपूर आहेत; पण त्यांच्या वर्णनात्मक साऱ्या कविता अपुऱ्या आहेत. ' तूं तर चाफेकळी ' हा मुग्ध प्रणयाचा मोहक संवाद घ्या, किंवा मोहिनी व विजयसिंग या प्रणयी युगुलांची बागेंत गांठ पडते तो प्रसंग घ्या; पाहिजे तर चांदण्या रात्रीं थडग्याजवळ बसलें असतांना चांदबिबिसारख्या तेजस्विनीचा झालेला भास याकडे नजर टाका, या साऱ्या कविता अपूर्ण आहेत. ' दौलतरावांची मंजुळा ' या खंडकाव्याच्या तर प्रारंभीच्या थोड्याच ओळी उपलब्ध आहेत; ' दुबळी भूल ' या कवितेंतील कांहीं भाग नष्ट झाल्यामुळें ती कविता अगदीं दुर्बोध झाली आहे. ' निःश्वास ' या कवितेचें खंड वाचीत असतां मन खिन्न होऊन वाचकही निःश्वास सोडूं लागतो.

एक तरुण मराठा वीर व त्याच्यावर प्रेम करणारी तेजस्विनी तरुणी यांच्या प्रेमावर ' निःश्वास ' ही कविता रचण्याचा बालकवींचा विचार होता; तिचे कांहीं भाग त्यांनीं सुचतील तसे वेळोवेळीं लिहून ठेवले; बालकवींनीं ती कविता पूर्ण केली असती, तिचे सर्व दुवे नीट जुळविलें असतें, पुनः एकदां हात फिरवला असता तर श्रृंगारवीरकरुण रसांनीं रसरसलेलें एक खंडकाव्य निर्माण झालें असतें. ज्या गडावर ही हकीकत घडली त्याची सांप्रतची स्थिति ' जीर्णदुर्गांत ' आली आहे. ' निःश्वास २ ' या कवितेंत प्रेमासाठीं हातीं तलवार घेणाऱ्या रणरागिणीचें

चित्र आहे. वीर मराठा, वीरगडी व रणघोष या कवितांत गडावरील रणसंग्रामाचें, या कथेंतील नायकाचें, त्या वीराच्या शौर्याचें व त्याच्यासाठीं झरणाऱ्या मंद-निःश्वासाचें वर्णन आहे. वीरगडी हा मथळा असलेल्या कवितेंतील 'दुर्गा मधुनि उसळुनि आला' या ओळी पुढच्या ७–८ ओळी, व रणघोष याच्या आरंभीच्या कांहीं ओळी यांत फार साम्य आहे; तेव्हां 'रणघोष' या कवितेच्या ओळी 'वीर गडी' या मूळ कवितेच्या ओळीच्या जागीं घालण्यासाठीं विस्तारानें लिहिल्या असाव्यात असें वाटतें व रणघोषानंतर वीरगडी मधील रात-किड्यांच्या कठोरगानीं...हा भाग येत असावा. निःश्वास ही कविता आधींच अगदीं अपुरी, त्रुटित, तिच्या वेगवेगळ्या भागांना निरनिराळीं नांवें देऊन, पुनः ते भाग विलग छापल्यामुळें आणखी गोंधळ उडून गेला आहे. ही कविता वाचीत असतां असें ध्यानांत येतें कीं, बालकवि जसे कोमल भावनांचें वर्णन कोमल शब्दांनीं करीत तसेच वीररसाचें वर्णन त्या रसाला परिपोषक शब्दांनीं करीत.

येथपर्यंत बालकवींच्या कवितांतील विविध वैशिष्ट्यांचें विवेचन केलें आहे. तरीपण या चर्चेंत आतांपर्यंत न आलेल्या थोड्याशा कवितांचा स्वतंत्र उल्लेख करणें जरूर आहे. 'औदुंबर' या कवितेच्या पांचसहाच आणि त्याही अगदीं साध्या वाटणाऱ्या ओळी असल्या तरी त्या वाचतांच तो औदुंबर, त्याची पार्श्वभूमि, हीं सर्व डोळ्यांपुढें उभीं राहतात. ज्यांनीं ओसाड उजाड खेडीं पाहिलीं असतील त्यांना खेड्यांतील रात्रीचें वर्णन पटेल. ती कविता वाचीत असतां उजाड खेड्यांतील सायंकाळचें भेसूर वातावरण बालकवींनीं साध्या शब्दांत व थोड्या ओळींत फारच चांगल्या रीतीनें निर्माण केलें आहे. 'पारवा' या कवितेंतील भिंत खचली, खांब कलथून गेला, तरी पण तेथेंच राहणाऱ्या, दुपारच्या भर बारा वाजतां, उन्हाच्या तीव्रतेनें जीवमात्र त्रस्त झाले असतांना, तेथेंच निद्रिस्त असलेल्या बुद्धराजाचें वर्णन यथार्थ व चटकदार नाहीं असें कोण म्हणेल. 'ओवाळणी घाली भाई,' ही कविता वाचीत असतां 'त्या स्वप्नांच्या मनोमय लीलाहीं मन माझें गुंगुनि जाई' असेंच कोणाही वाचकाला वाटेल. त्यांनीं लिहिलेलीं सुनीतें, रचना व कल्पना या दृष्टीनें सुंदर आहेत. बालकवींच्या सर्व कविता वाचल्यावर असा गोड सुंदर कविता लिहिणारा कवि चंडोल वयाच्या अवघ्या २८ वर्षीं उडून गेला याचें वाईट वाटतें.

# कवितांची संहिता

या पुस्तकांतील कवितांची संहिता तयार करतांना तीन साधनांचा उपयोग केला आहे. १ मासिकांतून प्रसिद्ध झालेल्या बालकवींच्या साऱ्या कविता. २ त्यांच्या बंधूंनीं तयार केलेलें कवितांचें बाड. ३ श्री. द. गो. भालेराव यांनीं बालकवींच्या कविता हयातींतच तयार केलेला संग्रह.

१–निरनिराळ्या मासिकांत प्रसिद्ध झालेल्या सर्व कविता या पुस्तकांत संकलित केल्या आहेत. इ. स. १८९८ मध्यें प्रसिद्ध झालेली. प. वा. रे. टिळकांची ऊन पाऊस ही कविता बालकवींच्या नांवावर त्यांच्या मृत्युनंतर छापली होती. पण ती रे. टिळकांची असल्यामुळें गाळली आहे. चिवचिव चिमणी छतांत ही कविता आम्ही डॉ. मिस् बिसेल यांच्या बालोद्यानगाणीं या पुस्तकांतून घेतली; कवितेखालीं त्र्यं. बा. ठोमरे असें कवींचें नांव छापलें आहे. तेव्हां ती कविता बालकवींची आहे अशी साहजिकच समजूत होऊन आम्ही या पुस्तकांत संगृहीत केली. सर्व कविता छापून झाल्यावर बोलतां बोलतां सहज श्री. सोपानदेव चौधरी यांनीं शंका प्रदर्शित केली कीं, ही तांब्यांची कविता वाटते; घरीं गेल्यावर तांब्यांचा कवितासंग्रह उघडला तर अकराव्या पृष्ठावरच ही कविता दिसली; तिचा रचना काल इ. स. १८९३ असून ती कविता कशी स्फुरली याचें स्पष्टीकरण टिपणींत सांपडलें. तेव्हां अर्थात् ही कविता कविवर्य तांब्यांची असून डॉ. मिस् बिसेल यांनीं अनवधानतया ठोमरे यांच्या नांवावर छापलीं असें ध्यानीं आलें; पण कविता तर छापून गेली त्याला इलाज नाहीं. या कवितेबद्दल झालेल्या या चुकीबद्दल अत्यंत दिलगिरी वाटते.

२–बालकवींच्या बंधूंनीं बालकवींच्या मृत्यूनंतर त्यांच्या विऱ्हाडीं असलेल्या कवितांच्या कागदांवरून एक बाड तयार केलें. या कवितांपैकीं एकही कविता बालकवींच्या हयातींत प्रसिद्ध झाली नव्हती. त्यांतील बऱ्याच कविता अपूर्ण आहेत. त्यांना बालकवींनीं मथळेही दिले नव्हते. तरी पण बालकवींच्या बंधूंनीं आपल्या बंधूंबद्दल वाटणाऱ्या आत्मीयतेनें त्यांच्या कवितांच्या मिळालेल्या चार सहा ओळी, किंवा एखाद्या कवितेचा नुसता प्रारंभीचा भाग सुद्धां संग्रहीत केलेला आहे. पण तसें करतांना मुळांतील कविता अपूर्ण असल्यास, अस्पष्ट लिहिलेली असल्यास, किंवा संदर्भ न लागल्यास त्यांनीं बाडांत

तसे उल्लेख करून ठेवले आहेत. बाड तयार करून त्यांनीं मराठी वाचकांना कायमचे ऋणी करून ठेवलें आहे. बालकवींच्या कांहीं कवितांचे जे संग्रह प्रसिद्ध झाले त्यांत या बाडांतील बहुतेक कविता प्रसिद्ध झाल्या आहेत. 'राष्ट्रगायित्री' हा तर एका कवितेचा नुसता प्रारंभ आहे. पहिल्या ओळींत संधीच्या दोन ढोबळ चुका आहेत. 'रजनीस आवाहन' या दोन समजल्या जाणाऱ्या कविता 'आवाहन' या कवितेचीं मूळ रूपें असावींत. 'काव्याची कल्पना' ही कविताही अन्य दूषणग्रस्त आहे. 'दुवळी भूल या कवितेंतील महत्त्वाचा भाग गळाल्यामुळें ती दुर्बोध झाली आहे. 'निःश्वास' या कवितेच्या खंडाचे तर फारच हाल झाले आहेत. पण त्याचा स्वतंत्र खुलासा आधीं आलाच आहे. या साऱ्या अपूर्ण कविता पूर्वसंग्रहांत छापिल्या असल्यामुळेंच या संग्रहांतही छापल्या आहेत.

३-श्री. द. गो. भालेराव यांनीं लिहून ठेवलेल्या कविता बालकवींच्याच असल्याचा बाह्य व आंतर पुरावा मिळतो. सुमारें २० वर्षांपूर्वी प. वा. रे. उजगरे यांना बालकवींचे मेहुणे श्री. प्रल्हादराव भावे यांनीं लिहिलेल्या एका पत्रांत श्री. द. गो. भालेराव यांच्या संग्रहीं असलेल्या बालकवींच्या कविता मागवून घेण्यासंबंधींचा मजकूर आहे; व या कविता आपले स्नेही श्री. भालेराव यांनीं लिहून ठेवल्याचें बालकवींनीं स्वदस्तुरानें लिहून ठेवलें आहे. श्री. भालेराव यांनीं यांच्या संग्रहांतील बालकवींच्या कवितांची काव्यरत्नावलींत प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या कवितांशीं तुलना केल्यास विषय, वृत्तयोजना व शेवटीं तात्पर्य काढण्याकडे कल या बाबतींत मोठें साम्य दिसून येतें. पण याहून महत्त्वाची गोष्ट म्हणजे या संग्राहांतील 'ध्येय' ही कविता बालकवींच्या नांवावर त्यांच्या हयातींत काव्यरत्नावलींत प्रसिद्ध झाली आहे. या तीन गोष्टी या कविता बालकवींच्याच आहेत एवढें सिद्ध करण्यास पुरेशा आहेत.

सर्व कविता मूळ स्वरूपांत छापण्याचा प्रयत्न केला असून रा. निफाडकर यांनीं मूळांत केलेले फरक तळटीपेंत नमूद केले आहेत. वृत्त दोष टाळण्यासाठीं जेथें एकादा शब्द घातला आहे तेथें तो ( ) अशा कंसांत दिला असून पूर्व आवृत्तींतून गाळलेल्या ओळी नव्यानेंच घालतांना [ ] अशा कंसांचा उपयोग केला आहे.

# निवेदन

## ( आभार व खुलासा )

इ. स. १९४२ मध्यें आम्हीं " बालकवीची समग्र कविता " हें पुस्तक प्रसिद्ध केलें. त्याच पुस्तकाची दुसरी आवृत्ति आज आम्ही मराठी रसिकांपुढें सादर करीत आहोंत व या संधीचा फायदा घेऊन एक दोन गोष्टींचा खुलासा आम्ही मुद्दाम करींत आहोंत.

बालकवि यांना अत्यंत अकालीं व अपघाती मृत्यु आला. त्यामुळें त्यांच्या संपूर्ण कवितांची संहिता ( Canon ) त्यांच्याच हस्ताक्षरांत सांपडत नाहीं. त्यांच्या बंधूंनीं, बहुशः नगरचें बिऱ्हाड हलवितांना, घरांत मिळालेल्या कागदांवरून उपलब्ध झालेल्या कविता किंवा कवितांच्या ओळी यांचा एक संग्रह तयार केला. तसें करतांना त्यांनीं जागोजाग " अपूर्ण ", " शब्द लागत नाहींत ", असे उल्लेख केलेले आहेत. पण बालकवींच्या हयातींत त्यांच्या ज्या कविता प्रसिद्ध झालेल्या आहेत त्या कविता या संग्रहांत नाहींत. बालकवींच्या मृत्यूनंतर तीन चार वर्षांनीं कै. एकनाथ यादव निफाडकर यांनीं हा हस्तलिखित कवितासंग्रह व मासिकांतून प्रसिद्ध झालेल्या कांहीं कविता यांचा एक संग्रह प्रसिद्ध केला. तसें करतांना त्यांनीं उपरिनिर्दिष्ट हस्तलिखित कवितासंग्रहांतील कवितांना पुष्कळ ठिकाणीं चुकीचे मथळे दिले. गायक मित्राच्या सहाय्यानें शाब्दिक फेरफार केले. आमच्या मतें हें सर्व संपादकाच्या अधिकाराचें अतिक्रमण होय. या हस्तलिखित कवितासंग्रहांतील ज्या कविता अपूर्ण व अशुद्ध होत्या त्या श्री. निफाडकर यांनीं अेकतर गाळल्या असत्या वा शेवटीं अेका परिशिष्टांत प्रास्ताविक खुलासा लिहून छापल्या असत्या तर फार बरें झालें असतें. इ. स. १९२५ मध्यें श्री. अधिकारी यांनीं बालकवींच्या कवितांची एक नवीन आवृत्ति प्रसिद्ध केली. पण श्री. अधिकारी यांनीं तर निफाडकरांच्यापुढें अेक पाऊल जाऊन, निफाडकरांनींच प्रसिद्ध केलेल्या कविता त्यांतील शेवटचे ' अपूर्ण ' असे शब्द गाळून पुनः प्रसिद्ध केल्या. त्यांनीं बालकवींच्या हयातींत प्रसिद्ध झालेल्या " धर्मवीर " या कवितेंतील सुमारें छत्तीस ओळी अजिबात गाळल्या. त्यांच्या पुस्तकांतील " मेघांचा कापूस " ही कविता दोन अपूर्ण कविता व त्याही भिन्न विषयावरच्या अेकत्र करून बनविलेली आहे; असे

अनधिकृत फेरफार पाहून दुर्दैवी बालकवीला फार अन्याय झालेला आहे असें आमचें व आमच्या कांहीं मित्रांचें प्रामाणिक मत झालें. तेव्हां बालकवींच्या सर्व —संपूर्ण, अपूर्ण, प्रसिद्ध, अप्रसिद्ध—कविता आहेत त्याच स्वरूपांत, कोणतेच फरक न करतां शुद्धलेखनादि दोष न सुधारतां छापून प्रसिद्ध कराव्या असें बालकवींचे बंधुतुल्य व निकटवर्ति स्नेही श्री. दे. ना. टिळक यांच्याशीं आम्ही विचारविनिमय करून ठरविलें व तें धोरण स्वीकारून आम्ही प्रस्तुत पुस्तकाची पहिली आवृत्ति प्रसिद्ध केली. या नव्या आवृत्तींत मात्र कोठेंही शाब्दिक फेरफार न करतां व अर्थहानि न होऊं देतां शुद्धलेखनाच्या दृष्टीनें सर्व कविता शुद्ध केल्या आहेत. तसेंच आम्ही व इतरांनीं बालकवींच्या कवितांचे जे संग्रह प्रसिद्ध केले त्यामध्यें विराम-चिन्हांबाबत अेकवाक्यता नव्हती, व ती या आवृत्तींत आणली आहे. हें सर्व काम आमचे माजी सहकारी व परमस्नेही सुप्रसिद्ध कवि, लेखक व मार्मिक टीकाकार, प्रा. रा. श्री. जोग यांनीं या पुस्तकाची स्थूल मुद्रितें तपासतांना अत्यंत कसोशीनें केलें आहे. त्यांनीं केलेल्या या दुहेरी मदतीबद्दल आम्ही त्यांचे अत्यंत आभारी आहोंत. तसेच रामकृष्ण बुकडेपोचे अुत्साही संचालक श्री. वि. र. बाम यांनींहि आपले मामा कै. शंकर बापूजी रानडे यांच्याप्रमाणेंच या पुस्तकाच्या उत्तम छपाईचें व सुंदर सजावटीचें काम अत्यंत हौशीनें व आपुलकीनें केलें, याबद्दल आम्ही त्यांचेही आभार मानतों. मराठी रसिकांनीं या पुस्तकावरील लोभ व बालकवींचा गौरव पहिल्या आवृत्तीच्या वेळींच केलेला आहे. तोच अनुभव याहि आवृत्तीच्या वेळीं येवो अशी आशा प्रदर्शित करून हें निवेदन आटोपतें घेतों.

हं. प्रा. ठा. कॉलेज, नाशिक
नाशिक, जुलै १९५०

**भा. ल. पाटणकर.**

**टीप**:—आमचे स्नेही प. वा. रे. भास्करराव अुजगरे हे स्वभावतः कवि होते, त्यांच्या ठिकाणीं वसत असलेली काव्यशक्ति रे. टिळकांच्या सहवासानें वृद्धिंगत झाली. पण अुपोद्‌घातांत "प. वा. भास्करराव अुजगरे यांनीं ज्या थोड्याफार कविता लिहिल्या त्या टिळकांच्या सहवासामुळेंच" असें आम्ही अनवधानतया चुकीचें विधान केलें आहे. त्यामुळें त्यांच्याबाबत झालेल्या या अन्यायाबावत आम्ही अत्यंत दिलगीर आहोंत.

**भा. ल. पाटणकर.**

# अनुक्रमणिका


१ चरित्र ... ... ... ... ... १

२ कवितांचें समालोचन ... ... ... ... ५९

३ कवितांची संहिता ... ... ... ... ६४

४ आभार ... ... ... ... ... ६७

५ कवितांची अनुक्रमणिका ... ... ... ६९

६ कविता ... ... ... ... ... ७३–२२२

७ परिशिष्टें

(१) बालकवींच्या कांहीं कवितांचे प्रसिद्धि स्थळ व काळ... २२३

(२) बालकवि यांनीं उपयोजिलेलीं वृत्तें ... ... २२५

(३) बालकवींचीं कांहीं पत्रें ... ... ... २२८

(४) अनंत (व) गति (दोन गद्य पारिच्छेद.) २४३ ते २४४

# कवितांची अनुक्रमणिका


| कविता | पान |
|---|---|
| १ आनंदी—आनंद गडे | ७३ |
| २ अरुण | ७४ |
| ३ निर्झरास | ७८ |
| ४ मधुयामिनी | ८० |
| ५ संध्यारजनी | ८१ |
| ६ फुलराणी | ८४ |
| ७ मंगलमय प्रेम कवन | ८६ |
| ८ तारकांचे गाणें | ८७ |
| ९ संध्यातारक | ८८ |
| १० संध्यातारक २ | ८९ |
| ११ श्रावणमास | ९१ |
| १२ फुलपांखरूं—फुलवेली | ९२ |
| १३ बाल-विहग (अष्टदिशांचा गोफ) | ९४ |
| १४ तडाग असतो तर— | ९६ |
| १५ माझा लहानसा बाग | ९७ |
| १६ तृणपुष्प | १०१ |
| १७ आनंदी पक्षी | १०२ |
| १८ सुकलेलीं फुलें | १०३ |
| १९ पांखरास | १०५ |
| २० अप्सरांचें गाणें | १०७ |
| २१ दीपशिखा | १०८ |
| २२ वनमुकुंद ( अगदीं पहिली कविता ) | ११० |
| २३ आवाहन | ११० |
| २४ शुक्रोदय | ११२ |
| २५ अनंत | ११३ |
| २६ भ्रमर आणि कवि | ११४ |
| २७ शारदीय सौंदर्य देवता | ११५ |
| २८ बाळें तीं खेळत होतीं | ११६ |
| २९ कविबाळें | ११८ |
| ३० सृष्टीच्या गायकास | १२१ |
| ३१ संतांचा अनुवाद | १२२ |
| ३२ धर्मवीर | १२३ |
| ३३ यमाचे दूत | १२७ |
| ३४ शून्य | १२८ |
| ३५ दुबळें तारूं | १३० |
| ३६ भरलें घर ओकें ओकें | १३१ |
| ३७ ओंवाळणि घाली भाई | १३२ |
| ३८ कवि | १३४ |
| ३९ कवीची इच्छा | १३५ |
| ४० काव्याची कल्पना | १३७ |
| ४१ शारदेस | १३७ |
| ४२ माझें गाणें | १३८ |
| ४३ कवीचें अंतरंग | १३९ |
| ४४ कवीचा विचार | १४० |
| ४५ जिकडे तिकडे गाणेंच गाणें | १४१ |
| ४६ मी | १४२ |
| ४७ ध्येय | १४३ |
| ४८ बालसुभाषित | १४४ |
| ४९ दिव्य आणि प्रीति | १४४ |
| ५० प्रेमाचें गाणें | १४५ |
| ५१ गोफ | १४६ |

| कविता | पान |
|---|---|
| ५२ काळाचे लेख | १४७ |
| ५३ सुभाषित | १४७ |
| ५४ प्रेमलेख | १४८ |
| ५५ सौंदर्याचा अभ्यास कर | १४८ |
| ५६ स्फुट श्लोक | १४९ |
| ५७ काळ आणि जीवित | १४९ |
| ५८ काळास | १५० |
| ५९ ज्योत | १५१ |
| ६० दोष व प्रीति | १५२ |
| ६१ बीज | १५२ |
| ६२ निजलेल्या मुलास | १५३ |
| ६३ वसंत | १५३ |
| ६४ अंगाई–गीतें १ व २ | १५४ |
| ६५ चांदोबा मजला देई | १५४ |
| ६६ रागोबा आला | १५५ |
| ६७ चिव् चिव्...चिमणुताई (बाळ आणि चिमणी) | १५६ |
| ६८ वनमाला | १५७ |
| ६९ घोडा घोडा | १५८ |
| ७० माघा भाऊ | १५९ |
| ७१ चिमणीचा घरटा चोरीस गेला | १५९ |
| ७२ माझा भारत | १६० |
| ७३ पाळणा | १६१ |
| ७४ भिकारी | १६१ |
| ७५ गवताचे गाणें | १६३ |
| ७६ जीर्ण दुर्ग | १६४ |
| ७७ जादुगारीण | १६५ |

| कविता | पान |
|---|---|
| ७८ तूं तर चाफेकळी | १६६ |
| ७९ प्रीति हवी तर | १६७ |
| ८० प्रीति व कर्तव्य | १६८ |
| ८१ प्रेमाचा पहिला भास | १६९ |
| ८२ वैष्णव धर्म | १६९ |
| ८३ पाऊस | १७० |
| ८४ तेजोवीणेची रागदारी | १७१ |
| ८५ दुबळी भूल | १७१ |
| ८६ उदासीनता | १७३ |
| ८७ भटकणें | १७३ |
| ८८ निराशा | १७४ |
| ८९ पारवा | १७५ |
| ९० खेड्यांतील रात्र | १७६ |
| ९१ प्रतापसिंह | १७६ |
| ९२ –ला | १७७ |
| ९३ कवीची इच्छा | १७७ |
| ९४ दौलतरावांची मंजुळा | १७८ |
| ९५ मोहिनी (ताराराणी) | १८० |
| ९६ शाहीर | १८२ |
| ९७ वीर मराठा | १८३ |
| ९८ वीरगडी | १८६ |
| ९९ रणघोष | १८८ |
| १०० निःश्वास २ | १८९ |
| १०१ मूढ मालती | १९० |
| १०२ हृदयाची गुंतागुंत | १९१ |
| १०३ मेघांचा कापूस | १९३ |
| १०४ थडग्यांतील रमणी | १९३ |
| १०५ औदुंबर | १९५ |

| कविता | पान |
|---|---|
| १०६ रजनीस आवाहन | १९५ |
| १०७ शून्य मनाचा घुमट | १९७ |
| १०८ राष्ट्रसेवा | १९७ |
| १०९ विश्वाचा प्रवास | १९८ |
| ११० राष्ट्रगायित्री | १९९ |
| १११ आर्यांची अवनति | १९९ |
| ११२ नीति व अनीति | २०० |
| ११३ संशय | २०० |
| ११४ रजनीस | २०१ |
| ११५ गाण्याची चढली कमान— | २०१ |
| ११६ भारद्वजास | २०२ |
| ११७ अश्रुमाळ | २०२ |
| ११८ निःश्वास (?) | २०३ |
| ११९ संशय | २०३ |
| १२० जिज्ञासु | २०३ |
| १२१ दवबिंदु | २०४ |
| १२२ कवीचें स्वप्न | २०५ |
| १२३ प्रेमाचें अल्लडतेचें चित्र | २०५ |
| १२४ वत्सलता | २०६ |
| १२५ अतृप्ति | २०६ |
| १२६ आत्मविश्वास | २०८ |
| १२७ पंथ | २०८ |
| १२८ क्षय | २०९ |
| १२९ निराशेचें गीत | २१० |
| १३० काय असे संसारांत ? | २१० |
| १३१ हरिण आणि गायन | २१२ |
| १३२ दुःखी भावाची बीज | २१३ |
| १३३ माझें दिव्य | २१३ |
| १३४ काय करूं ? | २१४ |
| १३५ दिव्य | २१५ |
| १३६ कवितेस | २१५ |
| १३७ गाणाऱ्या पक्ष्यास | २१७ |
| १३८ लतिका | २१८ |
| १३९ शीतल जग | २१९ |
| १४० प्रेमदेवता | २२० |
| १४१ जग | २२१ |
| १४२ पक्ष्यांचें गाणें | २२२ |

# आनंदी-आनंद

१

आनंदी-आनंद गडे !
इकडे, तिकडे, चोंहिंकडे.
वरतीं-खालीं मोद भरे;
वायूसंगें मोद फिरे,
नभांत भरला,
दिशांत फिरला,
जगांत उरला,
मोद विहरतो चोहिंकडे;
आनंदी-आनंद गडे !

२

सूर्यकिरण सोनेरी हे,
कौमुदि ही हंसते आहे;
खुलली संध्या प्रेमानें,
आनंदें गाते गाणें;
मेघ रंगले,
चित्त दंगलें,
गान स्फुरलें,
इकडे, तिकडे, चोहिंकडे.
आनंदी-आनंद गडे !

३

नीलनभीं नक्षत्र कसें
डोकावुनि हें पाहतसें;
कुणास बघतें ? मोदाला !
मोद भेटला का त्याला ?
त्यामध्यें तो
सदैव वसतो,
सुखें विहरतो,
इकडे, तिकडे, चोहिंकडे;
आनंदी-आनंद गडे !

४

वाहति निर्झर मंदगति,
डोलति लतिका वृक्षतती,
पक्षि मनोहर कूजित रे,
कोणाला गातात बरें ?
कमल विकसलें,
भ्रमर गुंगले,
डोलत वदले—
इकडे, तिकडे, चोहिंकडे
आनंदी-आनंद गडे !

५

स्वार्थाच्या बाजारांत
किती पामरें रडतात;
त्यांना मोद कसा मिळतो ?
सोडुनि स्वार्था तो जातो-
द्वेष संपला,
मत्सर गेला,
आतां उरला
इकडे, तिकडे, चोहिंकडे
आनंदी-आनंद गडे !

# अरुण

पूर्वसमुद्रीं छटा पसरली रम्य सुवर्णाची
कुणीं उधळिली मूठ नभीं ही लाल गुलाबाची ?
पूर्व दिशा मधु मृदुल हांसते गालींच्या गालीं,
हर्षनिर्भरा दिशा डोलती या मंगल कालीं.
क्षितिजाची कड सारविली ही उज्ज्वल दीप्तीनें,
सृष्टिसतीनें गळां घातलें कीं अनुपम लेणें ?
हे सोन्याचे, रक्तवर्ण हे, हे पिवळे कांहीं,
रम्य मेघ हे कितेक नटले मिश्रित रंगांहीं.
उदरांतुनि वाहते कुणाच्या सोन्याची गंगा,
कुणीं लाविला विशुद्ध कर्पुररस अपुल्या अंगा ?

*    *    *    *

अरुण चितारी, नभःपटाला रंगवितो काय,
प्रतिभापूरित करी जगाला कीं हा कविराय ?
कीं नवयुवती उषासुंदरी दारीं येवोनी
रंगवल्लिका रम्य रेखिते राजस हस्तांनीं ?
दिवसयामिनी परस्परांचें चुंबन घेतात—
अनुरागाच्या छटा तयांच्या खुलल्या गगनांत !
स्वर्गींच्या अप्सराच अथवा गगनमंडलांत
रात्रीला शेवटचीं मंगल गीतें गातात ?
किंवा ‘ माझी चोरुनि नेली मोत्याची माला ’
म्हणुनि नभःश्री रुसली, आली लाली गालांला ?
कीं रात्रींचें ध्वांत पळालें, आशेची लाली
उत्साहाशीं संगत होउनि ही उदया आली ?
किंवा फडके ध्वजा प्रीतिची जगता कळवाया,
कीं आपणांवर आज पातली हीच खरी विजया ?
कीं स्वर्गींच्या दिव्यांचें हें फुटलें भांडार,
जणूं वाटतें स्वर्गच त्यासह खालीं येणार ?

प्रगट जाहलें श्रीरामाचें पुष्पक किंवा हें ?
कीं सोन्याची पुरी द्वारका लखलखते आहे ?

*  *  *  *

" तेजानें न्हाणितें जगाला कोण सखे बाई !
नवल अगाई ! तेजोमय तूं ! तेजोमय मीहि ! "
परस्परांना दिशा म्हणाल्या प्रेमळ वचनांनीं
" विरहकाल संपला गा गडे, प्रेमाचीं गाणीं !
या मेघाच्या कुंजामध्यें ही लपली कोण ?
तिला बोलवा–पुरे गडे ग ! हा तुमचा मान !
अम्ही गवळणी हृदयरसांनीं पूजूं प्रेमाला,
प्रेमकाल हा ! म्हणोत कोणी अरुणोदय याला.
पूर्वदिशेशीं गोफ खेळतो कृष्णगडी बाई !
उधळित सोनें सर्व तयाच्या लागूं या पायीं.
मधुस्मितानें विश्व भरूं ग ! शंकित कां म्हणुनी ?
सर्व सारख्या ? हांसावें मग कोणाला कोणीं ? "
गोफ चालला गगनमंडळीं, रंग नवा आला,
त्यांत लागला कृष्णाचा[१] कर पूर्वेच्या गाला.
विनयवती ती पूर्वदिशा मग अधोवदन झाली,
तों प्रेमाची अद्‌भुत लहरी वसुधेवर आली !

*  *  *  *

या प्रेमाच्या लाटेखालीं मस्तक नमवावें,
हें आम्हांला, ब्रह्मांडाला, देवाला ठावें.
परंतु ही बघ भूदेवी तर वेडावुनि गेली,
टकमक पाहत स्वस्थ बैसली या मंगल कालीं !
दंवबिंदूंचा–नव्हे नव्हे ! हा पडदा लज्जेचा—
मुग्धपणाचा, बालपणाचा, कोमल हृदयाचा—

---

१ कर्षति इति कृष्णः अर्थात् ज्याचे किरण सर्वंकष आहेत असा जो सूर्य तो कृष्ण.

निजवदनाहुनि या प्रौढेनें दूर पड्दा केला,
योग्यच अथवा, प्रेम न मोजी क्षुद्र लौकिकाला !
प्रेमातिशयें मला वाटतें विसरुनि जाइल ही
प्रिय नाथाचा आगमनोत्सव हा मंगलदायी.
कविते ! तिजला साह्य तूंच हो, तूंही पण वेडी !
परंतु वेडाविण सुटतिल का हृदयाचीं कोडीं ?
जा जा ! आतां लाजुं नको ग ! पाहुं नको खालीं !
लाजच अथवा–खुलशिल तूंही या मंगल कालीं.
या लज्जेनें कविमानस हें होउनियां लोल,
प्रेमचंचले ! प्रेमच तुजवर मग तें उधळील !
प्रेमावांचुनि फेड कशानें प्रेमाची व्हावी ?
हा बघ सविता प्रेमळ भूतें प्रेमानें नटवी ?

*   *   *   *

हा प्रेमाचा लोंढा वरुनी आला हो आला
भव्य गिरींनों ! निजशिखरांवर झेलुनि घ्या याला.
नील झग्याला वेलबुटी तो तुमच्या चढवील,
'निगा रखो ! ' येईल तुम्हांला सरदारी डौल !
कविवाणीचा स्फूर्तियुक्त मग होतां अभिषेक,
तटस्थ होउनि तुम्हांस बघतिल हे सारे लोक !
सुवासिनींनों, वनदेवींनों, डोला ग डोला !
नटवा, सजवा वनमालेला तुमच्या बहिणीला !
वनमालांनों हळूंच हलवा हा हिरवा शेला,
सूत्रधार हा नभीं उदेला, उधळा सुमनांला !
'जय ' शब्दानें आळविण्याला लोकनायकाला
नभोवितानीं घ्या धाडुनि ही विहगांची माला !
सरोवराच्या फलकावरतीं स्वर्गाच्या छाया
कुणी रंगवा, कुणी फुलांवर लागा नाचाया !
वेलींच्या वलयांत बसोनी गा कोणी गाणीं,
या झाडावर त्या झाडावर हंसत सुटा कोणी.

११.०९
अ.
२२५
दि. ८/१

कुणीकुणी या नदीबरोबर नाचत जा बाई,
प्रपातांतही बसुन गा कुणी मंजुळ शब्दांहीं.
उषःकालच्या सुगंध, शीतल मृदुल मंद वाता !
विहार कर, ये पराग उधळित अवनीवर आतां !
या कोमल रविकिरणांवरतीं स्वर्ग बसुनि आला,
सख्या मारुता, गाउनि गाणीं झोंके दे त्याला ?

* * * *

ऊठ कोकिळा ! भारद्वाजा ? ऊठ गडे, आतां,
मंगल गानीं टाका मोहुनि जगताच्या चित्ता !
सरिते ! गाणें तुझें सुरांमधिं या मिळवी बाई !
साध्याभोळया तुझ्या गायना खंड मुळीं नाहीं !
पिंवळीं कुरणें यां गाण्यानें हर्षोत्कट झालीं,
गाउं लागलीं, नाचुं लागलीं, वेडावुनि गेलीं !
चराचराच्या चित्तीं भरलें दिव्याचें गान !
मूर्त गान हें दिव्य तयाला गाणारें कोण ?
दिव्य गायनें, दिव्य शांतता, दिव्याचे स्रोत,
वसुंधरेच्या अरुण ओतितो नकळत हृदयांत !
त्या दिव्यानें स्वर्भूमीचें ऐक्य असें केलें;
त्या दिव्यानें मांगल्याचे पाट सुरू झाले !
मंगलता ती दिव्य कवीला टाकी मोहोनी,
वाग्देवीनें सहज गुंफिलीं मग त्याचीं गाणीं.

# निर्झरास

गिरिशिखरें, वनमालाही
दरीदरी घुमवित येई !
कड्यावरुनि घेऊन उड्या
खेळ लतावलयीं फुगड्या.
घे लोळण खडकावरतीं,
फिर गरगर अंगाभंवतीं;
जा हळुहळु वळसे घेत
लपत–छपत हिरवाळींत.
पाचूंचीं हिरवीं रानें
झुलव गडे, झुळझुळ गानें !
वसंतमंडप–वनराई
आंब्याची पुढतीं येई.
श्रमलासी खेळुनि खेळ
नीज सुखें क्षणभर बाळ !
हीं पुढचीं पिंवळीं शेतें
सळसळती–गाती गीतें;
झोंप कोठुनी तुला तरी,
हांस लाडक्या ! नाच करीं.
बालझरा तूं बालगुणी,
बाल्यचि रे ! भरिसी भुवनीं !

*  *  *  *

बालतरू हे चोंहिकडे
ताल तुला देतात गडे !
प्रेमभरें त्यांवर तूंहि
मुक्तामणि उधळुनि देई !
बुद्‌बुद–लहरी फुलवेली
फुलव सारख्या भंवतालीं.
सौंदर्य हृदयांमधलें
दे विश्वीं उधळून खुलीं !
गर्द सावल्या सुखदायी
वेलींची फुगडी होई !
हवलालीं गवतावरतीं
रानफुलें फुलती, हंसती.
झुलवित अपुले तुरे–तुरे
निळी लव्हाळी दाट भरे.
जादूनेंच तुझ्या बा रे !
वन नंदन बनलें सारें !
सौंदर्याचा दिव्य झरा
बालवसंतचि तूं चतुरा;
या लहरीलहरीमधुनी
स्फूर्ति दिव्य भरिसी विपिनीं

*  *  *

आकाशामधुनी जाती
मेघांच्या सुंदर पंक्ति;
इंद्रधनूची कमान ती
ती संध्या खुलते वरतीं;
रम्य तारका लुकलुकती
नीलारुण फलकावरतीं;
शुभ्र चंद्रिका नाच करी
स्वर्गधरेवर एकपरी;

हीं दिव्यें येती तुजला
वेधुनि त्यांच्या तेजानें
धुंद हृदय तव परोपरी
त्या लहरीमधुनी झरती
नवल न, त्या प्राशायाला
गंधर्वा ! तव गायन रे
रात्रंदिन भेटायाला !
विसरुनिया अवघीं भानें,
मग उसळी लहरीलहरी
दिव्य तुझ्या संगीततति !
स्वर्गहि जर भूवर आला !
वेड लाविना कुणा वरें !

*　　*

पर्वत हा, ही दरीदरी
गाण्यानें भरलीं रानें,
गीतमय स्थिरचर झालें !
व्यक्त तसें अव्यक्तहि तें
मुरलीच्या काढित ताना
धुंद करुनि तो नादगुणें
दिव्य तयाच्या वेणुपरी
गाउनि हें झुळझुळ गान
गोपि तुझ्या हिरव्या वेली
तुझ्या वेणुचा सूर तरी
तव गीतें भरलीं सारीं.
वर-खालीं गाणें ! गाणें !
गीतमय ब्रह्मांड डुले !
तव गीतें डुलतें-झुलतें !
वृंदावनिं खेळे कान्हा;
जडताही हंसवी गानें;
तूंहि निर्झरा ! नवलपरी
विश्वाचें हरिसी भान !
रास खेळती भंवतालीं !
चराचरावर राज्य करी !

*　　*

काव्यदेविचा प्राण खरा
या दिव्याच्या धुंदिगुणें
मी कवितेचा दास, मला
परि न झरे माझ्या गानीं
जडतेला खिळुनी राही
दिव्यरसीं विरणें जीव
तें जीवित न मिळे मातें
दिव्यांची सुंदर माला
तूंच खरा कविराज गुणी
अक्षय तव गायन वाहे
तूंच निर्झरा ! कवीश्वरा !
दिव्याला गासी गाणें.
कवी बोलती जगांतला,
दिव्यांची असली श्रेणी !
हृदयबंध उकलत नाहीं !
जीवित हें याचें नांव;
मग कुठुनी असलीं गीतें ?
ओंवाळी अक्षय तुजला !
सरस्वतीचा कंठमणि
अक्षयांत नांदत राहे !

*　　*

शिकवी रे, शिकवी मातें     दिव्य तुझीं असलीं गीतें !
फुलवेली–लहरी असल्या     मम हृदयीं उसळोत खुल्या !
वृत्तिलता ठायींठायीं     विकसूं दे सौंदर्याहीं !
प्रेमझरी–काव्यस्फूर्ति     ती आत्मज्योती चित्तीं
प्रगटवुनी चौदा भुवनीं     दिव्य तिचें पसरी पाणी !
अद्वैताचें राज्य गडे !     अविच्छिन्न मग चोहिंकडे !
प्रेमशांतिसौंदर्याहीं     वेडावुनि वसुधामाई
मम हृदयीं गाइल गाणीं     रम्य तुझ्या झुळझुळ वाणी !
आणि जसें सगळें रान     गातें तव मंजुळ गान,
तेंवि सृष्टिची सतार ही     गाइल मम गाणीं कांहीं !

---

# मधुयामिनी

मधुयामिनि नील–लता
हो गगनीं कुसुमयुता
धवलित करि पवनपथा
कौमुदि मधु मंगला–
दिव्य शांति चंद्रकरीं
आंदोलित नील सरीं
गिरिगिरिविरि, तरुतरुवरि
पसरी नव भूतिला–
सुप्रसन्न, पुण्य, शांत
रामण्यकभरित धौत
या मंगल मोहनांत
विश्वगोल रंगला

---

# संध्यारजनी

अस्तगिरीच्या अभिनव कुंजीं निजला निजनाथ,
बघतां बघतां त्यास रंगलें वारुणिचें चित्त.
हळुंच पाहते, मधुर हांसते, जाते लाजून,
म्हणे मनाशीं " जीव टाकुं का हा ओवाळुन ! "
प्रेमनिर्भरा बघुन सखीला भास्कर मायावी
जातां जातां साखरचुंबा एक तिचा घेई !
लाजलाजुनी जीव सतीचा मग अर्धा झाला,
त्यांतच आल्या रोषाच्याही लहरी गालाला !

* * * *

गेला, झाला दृष्टिआडही सूर्य, तरी अजुनी
पहा चमकते प्रेमपताका पश्चिमदिग्वदनीं.
थक्क होउनी दिशा म्हणाल्या " काय मोहिनी ही !
प्रेमसमाधी अजुनि खुळीची या उतरत नाहीं !
" किती पश्चिमे ! आतां त्याचें चिंतन करशील ?
दृष्टि लावुनी अशीच बसशील सांग किती वेळ ?
खिन्नपणा हा पुरे, पुरे ग अश्रूंची माळ !
उद्यां बरं का तो राणीला अपुल्या भेटेल. "

* * * *

संध्येच्या खिडकींत येउनी ही हंसरी तारा,
हळुंच पाहते, खुणावितेही ' या–या ' कोणाला ?
पलिकडचा तो तेजोमय नव पडदा सारून
बघते, हंसते, क्षणांत लपते, ही दुसरी कोण ?
लाजत लाजत असाच येईल सारा स्वर्लोक,
मुग्ध बालिका जमतील गगनीं आतां नवलाख.
प्रथम तारके ! पहा सखी तव एक पुढें आली
ही दुसरी, ही तिसरी–आतां किति तरि भंवताली !

* * * *

आली होती भरती, आतां अस्तसमुद्राला,
त्या लाटांतुन काय सांडल्या या मौक्तिकमाला !
कल्पतरूचीं फुलें उडालीं कीं वाऱ्यावरती ?
आकाशींच्या गंगेला कीं बुदूबुद हे येती ?
नवटिकल्यांची चंद्रकळा कीं गगनश्री नेसे ?
स्वर्गीचें भांडार उघडलें कीं रात्रीसरसें ?
विश्वशिरावर टोप चढविला हिऱ्यामाणकांचा !
मंगल, मंगल, जिकडे तिकडे जय मांगल्याचा !

* * * *

रजनीदेवी ! वैभवशाली तूं अमुची राणी,
हीं नक्षत्रें, तारा साऱ्या, लीन तुझ्या चरणीं.
ज्याच्या त्याच्या तारा वांटुन दे ग्रहगोलांना,
गगनमंडलीं फेर धरूं दे प्रेमाचा त्यांना
दिशादिशांला तुझीं गाउनी प्रेमाचीं गाणीं
रजनीदेवी ! विश्व टाक हें प्रेमें भारोनी !
काळ्या काळ्या या पडणाऱ्या अंधारासंगें
ब्रह्मांडाचें हृदय नाचवी प्रेमाच्या रंगें !

* * * *

काळ्या अंधारांत खेळतें विश्व लपंडाव,
ताऱ्यांवरतीं बसून बघती तें कौतुक देव.
दहा दिशांनीं पांघरूनि या काळ्या बुरख्याला
काळा बागुल काळोखाचा एक उभा केला.
मंद मंद तेजांत शोधिते गगनश्री त्यांना,
पाजळूनि हे नक्षत्रांचे रत्नमणी नाना.
खेळ चालला एकसारखा हा खालींवरतीं,
पूर्व दिशाही तोंच हांसली, सांपडली हातीं.

* * * *

उदयगिरीवर नवतेजाची शांत पताका ही !
कीं गंगेच्या शुभ्र जलाचा स्रोत वरी येई.

हे मेघांचे धुऊन पडदे स्वच्छ कुणीं केले ?
मंगल मंगल तेज चहुंकडे कुठुनि बरें आलें ?
अर्ध्या मिटल्या अर्ध्या उघड्या असल्या नयनांनीं
कुणास बघती दिशा केळेना मंदस्मित करुनी ?
पहा उदेला दिव्य गोल हा–छे ! भलतं कांहीं !
हा तारांचा सखा तयांना भेटायां येई.

★ ★ ★ ★

तुमची राणी बसे सारखी तुम्हां न्यहाळीत,
गगनाच्या चौकांत चला हो, या रजनीनाथ !
धवल चंद्रिके ! दे आलिंगन दिव्य यामिनीला,
वहिणी–बहिणी तुम्ही सुखानें चंद्राशीं खेळा !
कां तारांनों ! तुम्ही लाजतां ? हा मंगल काल !
निर्मत्सर व्हा, प्रेमसंगमीं पोहा चिरकाल.
ब्रह्मांडाचा गोल धरी या प्रेमाचा फेर,
फुलें शांतिचीं महा उधळलीं जगतीं चौफेर !
निज निज आतां म्हणे जगाला वत्सलता माता,
रजनीदेवी गात बैसली अंगाईगीतां.
गगनाच्या या शेजेवरतीं निजवा तारांना,
चंद्रा ! दे ओढणी तुझ्या नव तेजाची त्यांना
हंसतां हंसतां झोंप लागली दहा दिशांनाहि,
ब्रह्मांडाचा गोल डोलतो, पण जागा नाहीं !
या प्रेमाला गातां गातां कविचेंही चित्त
प्रेमाच्या निद्रेंत रंगलें पाठ गात गात.

# फुलराणी

हिरवेहिरवे गार गालिचे—हरित तृणाच्या मखमालीचे;
त्या सुंदर मखमालीवरतीं—फुलराणी ही खेळत होती.
गोड निळ्या वातावरणांत—अव्याज मनें होती डोलत;
प्रणयचंचला त्या भ्रूलीला—अवगत नव्हत्या कुमारिकेला.
आईच्या मांडीवर बसुनी—झोंके ध्यावे, गावीं गाणीं;
याहुनि ठावें काय तियेला—साध्या भोळ्या फुलराणीला ?

*    *    *    *

पुरा विनोदी संध्यावात—डोलडोलवी हिरवें शेत;
तोच एकदां हांसत आला—चुंबून म्हणे फुलराणीलाः—
" छानी माझी सोनुकली ती—कुणाकडे ग पाहत होती ?
कोण बरें त्या संध्येंतून—हळुंच पाहतें डोकावून ?
तो रविकर का गोजिरवाणा—आवडला अमुच्या राणींना ? "
लाजलाजली या वचनांनीं—साधी भोळी ती फुलराणी ?

*    *    *    *

आंदोलीं संध्येच्या बसुनी—झोंके झोंके घेते रजनी;
त्या रजनीचे नेत्र विलोल—नभीं चमकती ते ग्रहगोल !
जादूटोणा त्यांनीं केला—चैन पडेना फुलराणीला;
निजलीं शेतें, निजलें रान,—निजले प्राणी थोरलहान.
अजून जागी फुलराणी ही—आज कशी ताळ्यावर नाहीं ?
लागेना डोळ्याशीं डोळा—काय जाहलें फुलराणीला ?

*    *    *    *

या कुंजांतुन, त्या कुंजांतुन—इवल्याशा या दिवल्या लावुन,
मध्यरात्रिच्या निवांत समयीं—खेळखेळते वनदेवी ही.
त्या देवीला ओव्या सुंदर—निर्झर गातो; त्या तालावर—
झुलुनि राहिलें सगळें रान—स्वप्नसंगमीं दंग होउन !

प्रणयाचिंतनीं विलीनवृत्ति—कुमारिका ही डोलत होती;
झुलतां झुलतां गुंग होउनी—स्वप्नें पाही मग फुलराणीः—

*          *          *          *

"कुणी कुणाला आकाशांत—प्रणयगायनें होतें गात;
हळुंच मागुनी आलें कोण—कुणी कुणा दे चुंबनदान !"
प्रणयखेळ हे पाहुनि चित्तीं—विरहार्ता फुलराणी होती;
तों व्योमींच्या प्रेमदवता—वाऱ्यावरतीं फिरतां फिरतां—
हळूंच आल्या उतरुन खालीं—फुलराणीसह करण्या केली.
परस्परांना खुणवुनि नयनीं—त्या वदल्या ही अमुची राणी !

*          *          *          *

स्वर्भूमीचा जुळवित हात—नाचनाचतो प्रभातवात;
खेळुनि दमल्या त्या ग्रहमाला—हळुंहळुं लागति लपावयाला
आकाशींची गंभीर शांती—मंदमंद ये अवनीवरतीं;
विरूं लागलें संशयजाल,—संपत ये विरहाचा काल.
शुभ्र धुक्याचें वस्त्र लेवुनी—हर्षनिर्भरा नटली अवनी;
स्वप्नसंगमीं रंगत होती—तरीहि अजुनी फुलराणी ती !

*          *          *          *

तेजोमय नव मंडप केला,—लख्ख पांढरा दहा दिशांला,
जिकडेतिकडे उधळित मोतीं—दिव्य वऱ्हाडी गगनीं येती;
लाल सुवर्णी झगे घालुनी—हांसतहांसत आले कोणी;
कुणी बांधिला गुलाबी फेटा—झकमकणारा सुंदर मोठा !
आकाशीं चंडोल चालला—हा वाङ्निश्चय करावयाला;
हें थाटाचें लग्न कुणाचें—साध्या भोळ्या फुलराणीचें !

*          *          *          *

गाउं लागले मंगलपाठ,—सृष्टीचे गाणारे भाट,
वाजवि सनई मारुतराणा—कोकिळ घे तानांवर ताना !
नाचुं लागले भारद्वाज,—वाजविती निर्झर पखवाज,

नवरदेव सोनेरी रविकर—नवरी ही फुलराणी सुंदर !
लग्न लागतें ! सावध सारे !—सावध पक्षी ! सावध वारे !
दंवमय हा अंतःपट फिटला—भेट रविकर फुलराणीला !

* * * *

वधूवरांना दिव्य रवांनीं,—कुणीं गाइलीं मंगल गाणीं;
त्यांत कुणीसें गुंफित होतें—परस्परांचें प्रेम ! अहा तें !
आणिक तेथिल वनदेवीही—दिव्य आपुल्या उच्छ्वासांहीं
लिहीत होत्या वातावरणीं—फुलराणीची गोड कहाणी !
गुंगतगुंगत कवि त्या ठायीं—स्फूर्तीसह विहराया जाई;
त्यानें तर अभिषेकच केला—नवगीतांनीं फुलराणीला !

---

## मंगलमय प्रेमकवन

सृष्टि निमाली स्वर्गहि उरले,
तेज हरपलें तम मालवलें,
जागृति नव्हती, स्वप्नहि नव्हतें,
सूरहि नव्हते, शब्दहि नव्हते,
सृष्टि पातली, स्वर्गही आले,
सूर उदेले, शब्द निघाले,

प्रेम मात्र मंगलमय भरलें;
उन्मनींत[१] मन तन्मय मुरलें.
भाव मनोज्ञ स्फुरले तेथें;
गीतच हृदयंगम बनलें तें.
तेज-तमांचें मीलन झालें
विश्व कवन तें ऐकुनि धालें.

---

[१] उन्मलीत

# तारकांचें गानें

कुणि नाहीं ग, कुणि नाहीं　　आम्हांला पाहत बाई.
शांति दाटली चोंहिकडे,　　या ग, आतां पुढें पुढें.
लाजतलाजत,　　हळूंच हांसत,
खेळ गडे, खेळूं कांहीं,　　कोणीही पाहत नाहीं.　　१

सुंदरतेला नटवून,　　कोमलतेला खुणवून[१],
प्रेमाच्या वसतीकरितां　　जगदंरत[२] फुलवूं आतां,
दिव्य[३] सुरांनीं　　गीतें गाउनि
विश्वाला निजवायाला　　वाऱ्याचा बनवूं झोला,　　२

फेकुनि द्या इकडेतिकडे　　थोडेसे दंवबिंदु गडे,
या निर्मल अवकाशांत　　प्रेमाचें पेरूं शेत,
दिव्यमोहिनी[४]—　　सर्व गुंगुनी
विश्वाला[५] वत्सलतेनें　　प्रेमाचें गाऊं गाणें,　　३

सरितांच्या लहरींवरतीं　　नाचूं या निर्भयचित्तीं;
अर्धोन्मीलित फुलवोनी　　लपूं चला कलिकांत कुणी;
कविहृद्यांत　　गरके घेत
जाउनिया खेळूं आतां　　हीं गाणीं गातां गातां.　　४

एखादी तरुणी रमणी　　रमणाला आलिंगोनी,
लज्जामूढा भीरुच ती　　शंकित जर झाली चित्तीं,
तिच्याच नयनीं　　कुणी बिंबुनी
धीट तिला बनवा बाई;　　भुलवा ग, रमणालाही.　　५

---

१ सुंदर तें तें नटवून । कोमल तें तें खुलवून. २ जग सगळे. ३ दिव्य स्वांनीं । गाणीं गाउनि । ४ मंदयामिनी ५ झोंप लागली जगताला । या ग आतां खेळूं चला.

सुखस्वप्नांनीं गुंगवुनी
आशा ज्या त्यांच्या चित्तीं,
दयितचिंतनीं,
दिवसां ही झुरली बाला,
अनेक असले खेळ करूं,
सोडुनिया अपुले श्वास
प्रभातकाळीं
होऊनिया आपण राहूं;

पुण्यात्मे हसवा कोणी;
त्याच रचा स्वप्नांवरतीं;
विरहभावनीं;
भेटूं द्या स्वपती हिजला. ६
प्रेमाशा विश्वांत भरूं,
खेळवुं[1] नाचवुं उल्हास;
नामनिराळीं
लोकांच्या मौजा पाहूं. ७

---

## संध्यातारक

दिनरजनींच्या हृदयावरलें
प्रेमसंगमीं उद्भवलेलें
मुग्ध तान्हुलें फूलच पाहिलें !
कोमल किरणीं, नभ फुलवोनी, खेळ खेळतें त्यांत १

लहरींच्या सुंदर आंदोलीं
लहानग्याची शय्या केली,
रजनी ओंव्या गाउं लागली:—
तूं लाडिवाला ! निज निज बाला ! मातेच्या हृदयांत. २

विश्वाचें विश्रांतिस्थान
तें माझ्या गुणिलाचें गान
अशी गडे अक्षय गाईन !
तूं वेल्हाळा ! निज निज बाळा ! या मम गीतसुरांत. ३

---

१ जगीं.

तेजाला आंदोलन देत
मंदपणें विचरे स्वर्वात
शांत शांत अवघ्या गगनांत;
दिव्य अप्सरा, सुगुणागारा, प्रीतिगीति गातात. ४
त्या गीतींच्या मधु लहरींनीं
गुंगी चढुनी या तव नयनीं
लागो डोळा तुझा म्हणोनी—
मींही गातें अस्फुट गीतें हृदयाच्या हृदयांत. ५
झोंप कशी ती परी अजुनिही
आज गडे तुज लागत नाहीं ?
सांग करूं तरी आतां काई ?
बघ ना बा रे ! विश्वच सारें निजलें प्रभुहृदयांत. ६
आन्दोलीं तुज नीज न येई
येतें तर उचलुनि मी बाई
झांकियलीं ग मधुनेत्रें हीं
पदराखालें झोंपीं गेलें बाळ कसें इतुक्यांत ? ७

[ ही कविता अगोदर चित्रमयजगत्मध्यें छापिली होती. मासिक मनोरंजन–मध्यें पुनः छापतांना मूळ कवितेंतील कांहीं पद्यपंक्ति गाळल्या आहेत; कांहीं ओळी बदलल्या आहेत, त्यामुळें चित्रमयजगतांत ती जशी प्रसिद्ध झाली तशीच पुढें छापली आहे. ]

---

## संध्यातारक २

दिनरजनीच्या हृदयावरलें
प्रेमसंगमीं उद्भवलेलें
मुग्ध तान्हुलें फूलच पहिलें !
कोमल किरणीं नभ फुलवोनी खेळ खेळतें त्यांत. १

परमवत्सला जननी रजनी
संध्येचा पट दूर करोनी
रम्य गुलाबी फुलांवरोनी
चुंबुनि घे उचलोनी, बाळाला घे स्वकरांत. २

' आज दिसे पण मलूल बाई
छबूकल्याची मृदु मुद्रा ही ?
काय तरी सुकुमारा होई ?
खेळुनि दमलें गडे चिमुकलें झोंपलेंच निमिषांत.' ३

स्वर्वाधूच्या दिव्यांदोलीं
लहानशी मृदु शय्या केली
रजनी ओंव्या गाउं लागली–
तूं लडिवाळा ! निज निज बाळा आतां पाळणियांत. ४

' विश्वाचें विश्रांतिस्थान
तें माझ्या गुणिलाचें गान
अशी गडे अक्षय गाईन
तूं वेल्हाळा निजनिज बाळा या मम गीतरवांत.' ५

स्वर्गाला आंदोलन देत
मंदपणें विचरे स्वर्वात
शांत शांत अवघ्या गगनांत;
दिव्य अप्सरा सुगुणागारा प्रीतिगीति गातात. ६

त्या प्रीतीच्या मधु लहरींनीं
गुंगी चढुनी या तव नयनीं
लागो डोळा तुझा म्हणोनी
मीही गातें अस्फुट गीतें हृदयांच्या हृदयांत. ७

झोंप कशी पण ती अजुनीही
आज गडे तुज लागत नाहीं
सांग करूं तरि आतां काई
बघ ना बा रे विश्वच सारें निजलें प्रभुहृदयांत. ८

कीं दोलीं तुज नीज न येई,
घेतें तर उचलुनि मी बाई;
झांकियलीं ग मधुनेत्रें हीं.
पदराखालें झोंपीं गेलें बाळ कसें इतुक्यांत ? १

## श्रावणमास

श्रावणमासीं हर्ष मानसीं हिरवळ दाटे चोंहिकडे;
क्षणांत येतें सरसर शिरवें, क्षणांत फिरुनी ऊन पडे.
वरती बघतां इंद्रधनूचा गोफ दुहेरी विणलासे,
मंगल तोरण काय बांधिलें नभोमंडपीं कुणि भासे !
झालासा सूर्यास्त वाटतो, सांज अहाहा ! तों उघडे;
तरुशिखरांवर, उंच घरांवर पिवळेंपिवळें ऊन पडे.
उठती वरतीं जलदांवरतीं अनंत संध्याराग पहा;
सर्व नभावर होय रेखिलें सुंदरतेचें रूप महा.
बलाकमाला उडतां भासे कल्पसुमांची माळचि ते,
उतरुनि येती अवनीवरती ग्रहगोलचि कीं एकमतें.
फडफड करुनी भिजले अपुले पंख पांखरूं सांवरिती,
सुंदर हरिणी हिरव्या कुरणीं निजबाळांसह बागडती.
खिल्लारें हीं चरती रानीं, गोपहि गाणीं गात फिरे,
मंजुळ पावा गाय तयाचा श्रावणमहिमा एकसुरें.
सुवर्णचम्पक फुलला, विपिनीं रम्य केवडा दरवळला;
पारिजातही बघतां भामारोष मनींचा मावळला !
सुंदर परडी घेउनि हातीं पुरोपकंठीं शुद्धमती
सुंदरबाला या फुलमाला रम्य फुलें-पत्री खुडती.
देवदर्शना निघती ललना, हर्ष माइना हृदयांत,
वदनीं त्यांच्या वाचुनि घ्यावें श्रावणमहिन्याचें गीत.

# फुलपांखरूं—फुलवेल

‘ हें फूल या उडल्या स्वर्गांतील.
माणिक हें बाइ गडे झुलतें आहे !
हें तान्हें सृष्टीचें गोजिरवाणें ’
कौतुकली मधुवदना हंसली वदली— १

‘ स्वच्छंदी फूलपांखरा ! आनंदी
माधविका पाठविते तुज या लोका,
ये, गाई चुम्बनमय गाणीं कांहीं;
खेळ इथें या कोमल कलिकेवरतें;
ही बाला, फूलपांखरा ! चुंबि हिला ’ २

फुलें नवीं मुग्धलतेवरतीं यावीं,
त्यापरि ती प्रेमलता फुलली चित्तीं.
हाय ! परी फूलपांखरूं तिचें दुरी !
नातरि तें या सुमनीं स्वर्गचि बघतें ! ३

‘ थांब गडे धांवुं नको इकडेतिकडे;
कलिका ही मुग्ध हृदय उकली पाहीं.
प्राणच तूं एक तिचा जीवनहेतु !
थांब तरी— कठिणच गे नरजाति खरी ! ४

फुलवेली क्षणरोषें रञ्जित झाली,
ते बाण मदनाचे हरिते भान.
रंगहि ते जडतेला जीवन देते.
अरसिक तें फूलपांखरूं परि होतें.
रसिक न कां हाय पण तिचा प्राणसखा ! ५

हें सुमन तुजवांचुनि चुंबिल कवण ?
' सांग तरी '– गद्गदली फुलवेल परी
' विरहानें शून्य न का गमतीं भुवनें ? '
हृदयाला पूर पुरा भरुनी आला ! ६

' या आतां– अन्त किती बघतां नाथा !
मी फूल या निर्जन रानांतील
श्वासानें व्यर्थ आर्द्र करितें भुवनें ! '
' व्यर्थचि कां ? ' ' कोण ?–बाइ ग प्राणसखा ! ' ७

सांज खुले दिनरजनीमीलन झालें,
दंवमाला उपमा तरि कसली त्याला ?
टपटपती स्वर्भूच्या हृदयावरतीं
कूजनही मधुनिमधुनि ऐकूं येई ! ८

सांजचि ती वर्णावी कैशी गीतीं ?
त्या छाया कवि होता अवलोकाया;
कौतुकला, शब्द परी न फुटे त्याला !
मूकपणीं अक्षय गुंगे हेंच मनीं
' गोड भलीं फूलपांखरूं–फुलवेली ! ' ९

# बाल–विहग

## ( अष्टदिशांचा गोफ )

सांज खुले सोन्याहुनि पिंवळें हें पडलें ऊन;
चोहिंकडे लसलशित बहरल्या हिरवाळी छान.
पांघरली जरतार जांभळी वनमाला शाल;
सांध्यतेज गिरिशिखरीं विखरी संमोहनजाल.
त्या तेजाचा प्राण चिमुकला संध्येचा दूत
बाल विहग आनंद मूर्तिमान् झुलतो गगनांत.
क्षणभर येथें, क्षणभर तेथें, भिंगोरी साची
अवकाशीं जशि काय फिरविली फिरकी जादूची !
खेळाडू कविबाळ करुनि जणुं भावांची होडी
मूर्तरूप देउनी तिला या वाऱ्यावर सोडी.
गिरिशिखराचें गोड[1] फूल हें सांध्य तरंगांनीं
झुलुनि त्यांतला पराग कीं हा भरभरतो गगनीं !

*   *   *   *

अष्टदिशांचा गोफ सभोंतीं हा भिरिभिरि पाहे;
मंद झुले वनमाल, वाहता शांत झरा राहे.
समाधिस्थ जणुं काय जाहलें हा गिरि, हें रान
हा आनंदोद्रेक नाचरा गगनीं पाहून !
सुंदरतेचा जलसा असला पाहुनिया धाला
कालहि वाटे विस्मित चित्तें स्तब्ध उभा ठेला

*   *   *   *

सृष्टिदेविच्या सगुणा बाळा स्वर्गाच्या तान्ह्या
नांवहि रे तव ठाउक नाहीं मज गोजिरवाण्या !
निजदेहाचा करुनि असा हा सुंदर आंदोल
आत्मरंगीं रंगल्या मनाला झुलविसि कीं बोल ?
किंवा कोणी दिव्य देवता जरि न दिसे मज ती
लीलेनें तुज हालविते का घेउनिया हातीं ?

---

१ गोल.

सुंदरतेच्या सुमनावरचें दंव चुंबुनि घ्यावें,
चैतन्याच्या गोड कोंवळ्या उन्हांत हिंडावें,
प्रीतिसारिका गीत तियेचें ऐकावें कानीं,
बनवावें मन धुंद रंगुनी काव्यसुधापानीं,
अंधाराचे पाश मनाचे हे गळुनी जावे,
चित्त वाटतें तरळ तुझ्यापरि खगबाळा व्हावें.

*   *   *   *

भवदुःखाच्या अनंत डोहीं परि बुडतों पाहीं;
शांति मिळेना क्षणभर जीवा विश्रांती नाहीं.
काव्यदेवता अंतरली मज गरिबाला आज;
काळ लोटला हाय किती मन वरिताहे लाज.
आते माझे वातावरणीं तुजपरि भरभरती;
पंख तुटुनिया विव्हल पडलों मीं धरणीवरती.

*   *   *   *

सुंदरतेच्या मोहनांत मन अमुचेंही नाचे;
बंधहि होतीं शिथिल, हरपतें भानहि जगताचें.
जीव ओढतो वरवर जाया चैतन्यापाठीं;
[1]हाय ! सुटेना दृढ देहाची परि बसली गांठीं !
दिव्यानंदीं म्हणुनि उमाळा दुःखाचा दाटे
सत्यहि जो आनंद कल्पनामय केवळ वाटे.

*   *   *   *

अपूर्णताही यापरि मजला जरि बुडवी शोकीं,
चित्र मनोहर खगबाला परि मी तव अवलोकीं.
अपूर्ण अपुलें इप्सित झालें पूर्ण दिसे जेथें,
मनुजाचें मन सहज पावतें आकर्षण तेथें.
तुजला बघतां भरभर उडतां कविता आठवली.
कशीबशी ती त्वत्प्रीतीस्तव या कवनीं ग्रंथिली.

---

१ हाय सुटेना दृढ देहाच्या परि बसल्या गांठी ।

## तडाग असतों तर–

विमळ चंद्रिका क्षितिजावरतीं,
तरळ तारका चमचम करिती,
दिव्य लोकिंची रुचिरा शांती,
तुडुंब भरली गगनांत; १
ग्रहाग्रहावर भरलें तेज,
तेजाची लयलूटच आज,
रात्रीचा शेवटला साज
देव करिती जणुं स्वर्गांत. २
(तेज दाटलें, शांति दाटली,
सौंदर्याची वेलहि फुलली;
प्रेमाच्या नव पुष्पीं नटली
कविच्या हृदयांत.) ३
मंद तेज अवनीवरतें तें
मधु एकांता वाढवितें तें;
त्यांतहि वारा हळूंच हाले
निर्भर रुचिरानंदांत. ४
(या समयीं जर तडाग असतों;
रम्य दिव्य तें रेखित बसतां;
हींच शांतता अशीच धरितों
शुभ्र जलाच्या हृदयांत. ५
[ सौंदर्यानें जीवन बाणे,
प्रेमजागृती हो मग त्यानें,
लहरीवर हें लिहुनी गाणें,
मग दिवसा बसतों गात. ६
चित्रकराला कविरायाला,
अशक्य जें कां उठवायाला,
सौंदर्याच्या नव नव लीला,
त्या उठत्या मम हृदयांत. ] ७

# माझा लहानसा बाग

(श्लोक)

हें पांडुरंग नभ नील असोनि झालें,
अभ्रें तदीय शरिराप्रति वेष्टियेलें,
वाटे मना बहुत वृष्टि निशींत झाली,
ऐशा सुशांत अरुणोदयिं एक काळीं १

सकुतुक बघण्यातें बाल उद्यान जाई;
अमुनि बनविलें जें पार्श्वभागास पाही.
सुकुसुमधुर तेथें पाहुनी सल्लतांला
नयनसुखद झाला बाग त्या बालकाला. २

प्रियकरजलपातें मोद वेलींस झाला,
म्हणुनि जवुनि पर्णी ठेविती त्या पयाला;
सहजच नगप्राप्ती त्यांस संतोष दे ती;
बहुत रमवि बाळा तोयमुक्तावली ती ३

निबीडतर पल्लवी टवटवी नवी त्यावरी
चढे अमृत वर्षले म्हणुनि मेघ वृक्षांवरी;
बहार नव पातला कितिक सल्लतांना तयें
नवी रुचिर कांति त्या चिमुकल्याहि बागेस ये. ४

येथें दुरून तंव एक मधूप आला,
जो मानसीं पिउनिया सुरभीस धाला.
आनंदवृत्तिस निसर्गचि लाट आली
बागेंत या चिमुकल्या करि रम्य केली ५

राहे न निश्चल कुठें क्षण एकही तो;
विश्रांतिसौख्य नच अन्य (हि) भोग घेतो,
माधुर्यसौरभ सदा पिउनी रहातो,
काव्यांतरीं कवि जसा सुमनीं रमे तो. ६

पुष्पावरी बसुनिया क्षण एक संथ
राहे अधांतरिं मुखें रव मंजु गात;
शुंडा मृदू मग मधूप्रति आकळाया
पुष्पीं धरी वरि मधूस क्षणैक पेया. ७

बघुनि दंग मधूप फुलांवरी
पवन वाटत मत्सर हा धरी;
लववितो म्हणुनी स्वबळें लता
परि नसे लव लाभहि कोणता. ८

स्वभाविकचि चंचला गति यदीय लक्ष्मीपरी
सुखांत असतां अहा ! स्वमनभंग झाला परी;
गमे भ्रमर जाहला खचित त्यामुळें बावळा
नसे स्वमनभंगसें खचित दुःख या भूतळा ९

सुटे सुमन, आळवी भ्रमर काय गानें तया
वियोगभर शोधितो उपवनीं तदीय प्रिया,
दिसे न नयना कुठें म्हणुनि धीर त्याचा सुटे;
फुटे स्वमनिं कामवृक्ष न तयेंच कार्यीं नटे १०

सुपुष्प नव लाधलें पुनरपी जसें भेटलें
स्वपूर्वविधिच्याबळें हरित वित्त वाटे मलें.
अपार सुख मानवा गमत कीं तयानें जसें
दुजें कुसुम भेटतां भ्रमर मानसीं होतसे. ११

नों. दि.

क्षणभरी मग गुंगत त्यावरी
दिसत मोद किती स्वमनीं धरी;
सुखविण्याप्रति त्याप्रति गायनें
करित उच्चरवें मग बोलणें,

बागेंत ज्याची सुमती रमे ती
कर्णीं मुलाचे रव मंजु येती;
होता जरी बंभर मात्र हो तो
बालास सद्‌गानसमान होतो. १३

दृष्टी तयाची मग अन्य भाती;
सोडोनि झाली भ्रमरा पहाती;
तेजस्विनी कृष्णपणा धरी ती,
कांती मुला वाटत तोषदा ती. १४

मधुग्रहण तो करी बघुनि बाल ती तत्कृती
धरोनि विपरीतता परिहि तापला निश्चितीं.
" अहा अधम गांजिसी धरुनि दुष्टता मानसीं
फुलांस तरि नीच तूं कृति वरोनि हें दाविसी. १५

स्वशुंड सुमनास टोचिसि अहा सुईच्यापरी
खरा बहुत दुष्ट तूं कृति कथी तुझी ही खरी.
म्हणोनि तुज शासणें खचित योग्य वाटे मना
स्वरूप नच योग्यता मिळवि सत्कृतीच्याविना." १६

वदोनि इतुकें करी कुसुमरक्षणा धावणें
सुशब्द तंव आयके, " नच छळी तया ताडनें,
अकार्य करण्यास तूं नच प्रवृत्त हो हे मुला!
नसे भ्रमर दुष्कृती स्वमनिं जाण गा हे तुला," १७

वदे कवण; पाहण्या करित वक्र दृष्टी जरा,
बघोनि जननीप्रती क्षणिक जाहला लाजरा.
सुबोधरस त्याप्रतीं जननि जाहली अर्पिती;
मुलांस्तव तयांतली सुवचनेंच सांगेन तीं. १८

'मुला, न म्हण टोचितो भ्रमर तो स्वशुंडा फुला,
पितो सुरस तो, गुणग्रहण सांगतो बा तुला;
धरोनि बहु मोद तो रस सदा जसा चाखितो
तसा पिउनि तूं मुले सुगुण मानसीं वांछितो. १९

गुणग्रहणमाधुरी सतत सेविती त्यां कळे;
कळे न इतरांस ती कथुनि गोडवेही बळें.
सदा कमल सेवितो भ्रमर त्यावरी गुंगतो;
कशास, तरि काय हें स्वमनिं भेक जाणेल तो. २०

( आर्या )

सुगुणग्रहणार्थ झटे जरि पडले कष्ट त्यांत सोसावे;
नच सोडी कमलांतें भ्रमर जरी बद्धतेसही पावे.' २१

# तृणपुष्प

मनोवेधका सृष्टिसतीच्या अगा चिमुकल्या बाला !
स्वागत तव, ये तृणासहित या भूतें डोलविण्याला. १

सजल नील घन करोनि गेले अमृताचा वर्षाव;
चलत्तृणावरि तुला पाठवी प्रेमभरें मग देव. २

खेळ लाडक्या या सृष्टीच्या अंकावरती आतां;
घे आंदोलन सुखें ताल दे या विहगांच्या गीतां. ३

या वायूच्या प्रशांत लहरी, हे गगनाचे श्वास,
या प्रेमाच्या छटा सुमना, चुंबुनि घे तूं यांस. ४

म्हणोत कोणी तूं अवनीच्या उदरांतुनि आलास;
मज गमसी परी नभोविहारी देवदूत तूं खास. ५

ही मोहकता, तुझी फुला ही प्रेमनिर्भरा वृत्ती;
सदानंद हा उद्भवेल का या भूपृष्ठावरती. ६

सदैव सस्मित, सदैव अपुला डोलत तूं असतोस;
दुःखसृष्टी कधीं स्पर्शली नाहीं तव चित्तास. ७

तुला तुडविती कितेक करिती तुजवरती आघात;
म्हणोनि नाहीं कधीं पाहिलें खिन्न तुझें मी चित्त. ८

मैदानावर मी मित्रांसह या खेळाया येतों;
प्रतिवर्षीं तुज बघतों येथें, सवेंच वेडा होतों. ९

तुझीं चुंबनें असंख्य घेतों, धरितों तुज हृदयाशीं;
तृप्ति न हो परि चित्त धांवतें पुन:पुन्हां तुजपाशीं. १०

तृणपुष्पा चल, तुज कवितेच्या ठेविन उद्यानांत;
सख्या रहा तूं तिथें निरंतर, रंजव माझें चित्त. ११

---

# आनंदी पक्षी

केव्हां मारुनि उंच भरारी । नभांत जातो हा दूरवरी,
आनंदाची सृष्टी सारी । आनंदें भरली. १

आनंदाचे फिरती वारे, । आनंदानें चित्त ओसरे,
आनंदें खेळतो कसा रे । आनंदी पक्षी ! २

हिरवें हिरवें रान विलसतें, । वृक्षलतांची दाटी जेथें,
प्रीती शांती जिथें खेळते । हा वसतो तेथें. ३

सुंदर पुष्पें जिथें विकसलीं, । सरोवरीं मधु कमलें फुललीं
करीत तेथें सुंदर केली । बागडतो छंदें. ४

हासवितो लतिकाकुंजांनां, । प्रेमें काढी सुंदर ताना,
आनंदाच्या गाउन गाना । आनंदें रमतो. ५

जीवित सारें आनंदाचें । प्रेमरसानें भरलें त्याचें;
म्हणोनिया तो रानीं नाचे । प्रेमाच्या छंदें ! ६

आम्हांकरितां दुर्धर चिंता, । नाना दुःखें हाल सभोंता,
पुरे ! नको ही नरतनु आतां । दुःखाची राशी ! ७

या आनंदी पक्ष्या, देई । प्रसाद अपुला मजला कांहीं,
जेणें मन हें गुंगुन जाई । प्रेमाच्या डोहीं. ८

उंच भराऱ्या मारित जाणें । रूप तुझें तें गोजिरवाणें !
गुंगुन जाईल चित्त जयानें । दे, दे तें गाणें ! ९

# सुकलेलीं फुलें

( अंजनीगीत )

आयुष्याच्या प्रभातकालीं
चित्ताच्या क्षितिजावर आलीं,
सुस्वप्नें तीं क्षण लकलकलीं—
विलयाला गेलीं. १

कालतरूचीं गलित फुलें तीं
पुनरपि फुलतिल का मजभोंतीं ?
स्मरतां त्यांना अहा उसळती—
हृदयाच्या वृत्ती. २

स्मरणाच्या थडग्यांतुनि या रे !
सुमनांनो भूवरतीं सारे !
खेळ करूं ते पुन्हां एकदां
पूर्वीं जे केले. ३

दिव्य माक्षिया नक्षत्रांनो !
बाल्यवनींच्या वनविहगांनो !
या चिमण्यांनो ! या छकुल्यांनो !
या, या, या आतां. ४

प्रेमपूर्ण मधु बाल्य अहा तें
तुम्हांसंगतीं येईल येथें;
मीही सोडुनि तारुण्यातें
होइन बाल पुन्हां. ५

प्रेमावांचुनि अन्य न कांहीं,
दुष्टपणाचा स्पर्शहि नाहीं,
अंधाराचा मागमूसही
न दिसे ज्या ठायीं, ६

त्या बाल्याच्या सीमेवरते
दुष्ट मत्सरी जगतापरते
प्रेमाचें साम्राज्य सभोंते
बनवोनी राहूं. ७

स्वानंदाच्या त्या रानांत
मृदु हास्याचें पेरुनि शेत,
परस्परांचे धरुनी हात
नाचूं स्वच्छंदें. ८

सत्त्वविशिष्ट प्रेमावरतीं
स्वर्गाची जर आहे वसती
नयनरज्जुंनीं बांधुनि आणूं
तर तो भूवरतीं. ९

ज्या प्रीतीच्या मंजुळ नादें
बाल्याच्या मोहोनी छंदें
वाजविली मुरली गोविंदें—
सर्वांना ठावें १०

ती मुरली घेवोनी हातीं
दिव्य नाद तो भरित दिगन्तीं
या बाल्याच्या सीमेवरतीं
आपणही राहूं. ११

# पांखरास

पांखरा, गाइलें तुला कधींहि न कोणीं.
न च अश्रु गाळिले कुणीं वनीं येवोनी !
निःश्वास धांवती सौख्यामागें सारे;
दुःखाचा वाली कुणा कुणींहि न बा रे !

मधु सुखद उष्णता मिळतां रविरायाची
हीं पवनांदोलीं कमलें उमलायाचीं.
तेव्हांच कोकिलामैना गातिल गाणीं,
होतील फुलें स्मरविव्हल त्या गीतांनीं.

त्या मधुर मुखींचें अश्रुजाळ चुंबीत
झुलतील फूलपांखरें निजानंदांत.
रविवदनावरचा रंग जरा परि बदले,
मग गान, सर्व सौंदर्य, सर्व हें थिजलें !

या मत्त कोकिळा गिरिकुहरीं रडतील,[२]
कोंवळ्या कळ्या मोडोनि मान पडतील;
ल़वदार मनोहर वेलबुटी नवलाची
त्या काळीं कोठें नाहीं प्रगटायाची.

रवि वरतीं वरतीं चढत चढत गगनांत
अंगार भरिल या मंद शीत पवनांत;
निष्प्रेम मनाचें गाणें केविलवाणें
तें तुझें मात्र राहील जसेंच्या तैसें.

ती पूर्वतारका प्रभातरेषेवरतीं
जशि काय उभी सौंदर्यदेवता होती;
पीतांबर कसिले, रानवेत्र धरि हातीं[३],
शिरिं मुकुट कळ्यांचा, त्रिलोकसुखदा मूर्ति.

---

१ भराभर २ सोडुनी आम्र जातील ३ परिधान करी ती पीतांबर कटिभागीं

हळुवार हिमाचें अवगुंठन हलवोनी
बोलेल[४] सर्व निद्रिस्त विश्व म्हणवोनी.[५]
सारून जरा कचभार बालिका पाहे.
एकेक तारका समाधिचें सुख लाहे.

निद्रिस्त भूमिला स्वप्न जणों हें दिसलें,
स्वप्नांत लाडके, सुंदर डोळे भिजले.
स्मरतां हि जया हो रोमांचाची भरती,
मधु मंद अहा ती घटिका सौख्यद होती.

परि तोहि काळ तव हृदया नच सुखदायी,
निष्प्रेम मनाला कोठेंही सुख नाहीं.
चुंबीत गुलाबी गाल मधुर संध्येचा
कर वरतीं आला सुंदर रविरायाचा,
जग समाधिस्थ जणुं सर्व सर्व हें होतें,
परि शांतिलेशही नव्हता ठाउक तूंतें !
बैसून कुठें तरि कांटेरी झुडुपांत
तव हूं-हूं-हूं-चें होतें गीत वहात !

येईल एक परि धन्य दिवस सौख्याचा
जो करिल तुझ्यासह अंत तुझ्या गीताचा.
फिरवून फरारा गोफण तो झाडील
कांट्यावर उपडें भग्न हृदय पाडील !
मग एकच धडकी, एकच अंतिम बोल
बोलून तुझें हें जळतें हृदय निवेल !

---

४ गाईल, ५ डुलवोनी

# अप्सरांचें गाणें

सुमनांच्या गर्भामाजीं । रसगंगा भरली ताजी;
आजूबाजूला वसलीं । शुभ्र अद्रिशिखरें सगळीं;
सांभाळुनि उतरा बाई । वेळ गडे स्नानाची ही ॥ १ ॥

*        *        *        *

गर्द दाट मधली झाडी । मंदमंद हलवा थोडी;
पराग, सुमनें हसलेलीं । नीट बघा पायाखालीं;
पुष्पांचा बसला थाट । हळूं हळूं काढा वाट ॥ २ ॥

*        *        *        *

गोड सुवासाचे मेघ । आळसले जागोजाग;
हिमकणिका त्यांच्या पडती । गोड गोड अंगावरतीं;
पुनीत ही गंगामाई । स्नान करा झटपट बाई ॥ ३ ॥

*        *        *        *

संध्येच्या कोमल किरणीं । नटुनि थटुनि वस्त्राभरणीं
गुंजतसे अक्षयगीतें । बैसुनि त्या भृंगावरतें;
मग आपुल्या भरभर जाऊं । देवांचें दर्शन घेऊं ॥ ४ ॥

# दीपशिखा

दीपशिखे, फडफडतेसी । कां म्हणुनि वद गे मजसी ?
तेजाचे पसरुनि पंख । विगतभान होउनि देख
धडा करुनि जीवाचाही । कुठें उडूं बघसी बाई ?
हर्ष, शोक, उन्माद गडे । उदासता कीं तुला जडे ? १

स्वैराची केवळ पुतळी । तूं तर बाला अनलकळी;
आवरणें देहाभंवतीं । हीं तुझिया, तुज आडविती;
म्हणुनिच कीं मारून उडी । तोडुनिया त्यांची बेडी
स्वैराला भेटायाला । जीव तुझा उत्सुक झाला ? २

[ ही मधुरा मारुतलहरी । मंद मंद संचार करी;
रम्य तिचा करुनी वारू । विश्वभरी विचरूं, विहरूं;
जें न पाहिलें कधीं कुणीं । दिव्य दावुं तें प्रगटवुनी
इच्छा कीं असल्या कांहीं । नाचविती तुजला बाई ! ] ३

किंवा तुजभंवतीं जमल्या । अदृश्यरूपें दीपकळ्या,
कीं त्यांची फुलली बाग । त्वन्नयनीं दिसते सांग;
प्रेमभरें चुंबायाला । कडकडुनी भेटायाला,
तोडुनि हे हृद्‌बंध गडे । धांवतेस कीं तयांकडे ? ४

किंवा त्या ताराज्योती । नील नभीं लुकलुकताती,
सखी तयांची तूं म्हणुनी । त्याच वाहती तुला कुणी,
ती त्यांची बोली कळली । खूण पटे हृदयामधली,
जीवाचा ओढा लागे । झेप घालिसी त्यांमागें ? ५

तेजाचे डोंगर वरतीं । कासारहि सरिता असती,
विश्वजननिचें दूध गडे । तेथ वर्षतें चोंहिकडे;
नक्षत्रें बाळें गगनीं । दूधच तें त्यांच्या वदनीं;
सुधा सुधा प्राशायाला । तीच–लागली भूक तुला ! ६

भूक लागली–माझाही । तळमळतो आत्मा बाई;
पाजुनिया निजविल त्याला । माय अशी न दिसे मजला.
ती आई तुजला बाई । दिसली ग शंका नाहीं
देहपात्र हें झुगारुनी म्हणुनिच तूं उडसी गगनीं ७

थांब थांब गे निमिषभरी । थांब येवढी कृपा करीं;
निश्वसितावरतीं बसुनी । दिव्य तुझ्या तेजामधुनी
जड मूढा येऊं देईं । याहि, तुझ्यासंगें ताई !
परम धाम हृदयाचें तें । दाखव, गे दाखव मातें. ८

आई ती हृदयीं भरते । जल नयनीं भरुनी येतें,
बहु दिवसां ताटातूट । दे करुनी आतां भेट;
गाय वासरूं एक करीं । पुण्य पुण्य घे शिरावरी;
ने, ने, ने उचली बाई । चल झरझर घेउनि जाई. ९

आईच्या मांडीवरतीं । गोड अहाहा शब्द किती !
प्रेमसुधाकल्लोळच ते। चल जाऊं राहूं तेथें.
तूं भगिनी मी तव भाऊ । दोघेही एकच होऊं;
आईच्या हृदयांत गडे । ऐक्य तुझें माझेंहि घडे. १०

---

'धर्मदीपिकेंत' कंसांत दिलेल्या चार ओळी नाहींत; पण बालकवींचे आप्त व स्नेही श्री. वासुदेव कृष्ण भावे यांच्याजवळच्या हस्तलिखितांत त्या आहेत व तें हस्तलिखित बालकवींच्या हातचें असावें असें श्री. भावे यांचें मत आहे–**संपादक**

# 'वनमुकुंद'

( अगदीं पहिली कविता )

निंब जांब जांभूळ शेंदरी तुळशी बहुतचि झांक मारी ।
जणुं काय ती घेई धांवुनि असेंच वाटे पहा साजणी ।
पुढें पाहिलीं खैरीं झाडें तशीच मोठी मेंदी वाढे ।
जाइजुई ती फार वाढली गुंफा मोठी बहुतचि झाली ।
अशा वनीं मीं ऐकिलि मुरली तिला ऐकुनि वृत्ति निमाली ।
काय कथूं त्या सुस्वर नादा पुढें पाहिलें रम्य मुकुंदा ।
गोपांनीं तो वेष्टित झाला गळीं फुलांचा हार शोभला ।
कटिं पीतांबर सुंदर दिसला गोप खेळती नाना लीला ।
कितिक खेळती आट्यापाट्या कितिक खेळती दांडु विट्या ।
अशा करिति ते नाना लीला देवहि भक्ताआधिन झाला ।
वाटतें जावें, तत्कमलमुखा पाहावें ॥

---

# आवाहन

श्रमलें दमलें वणवण फिरुनी गगनीं रविकरजाल;
शिणल्या सुंदर सांध्यदेविचें हो घर्मांकित भाल,
शिणले मारुत, खिन्न पयोधर दुर्धर साहुनि ताप
शून्य गिरिदरी, जर्जर निर्झर गळती आपोआप.
उदासवाणें एकच गाणें शून्य मनें वनराई
घोळित राही, लागुनि तंद्रा शीण भरे तद्देहीं.
शिणलें कोणी संसाराचा वाहुनि माथां भार,
अनंत चिंताकाहूरांनीं भरे कुणाचें ऊर.
गायन गातां शिणली माता, शिणलें तान्हें बाळ,
शिणला पाळख; मंद हालुनी घालविताहे काळ.
शिणली काया, शिणली माया, शिणले लोकाचार
सौख्यहि शिणलें, दुःखहि शिणलें, तत्त्वविचार.

काळवंडल्या वातावरणीं ये करुणामय वाणी,
क्षीण पावली प्रीतिदेवता ब्रह्मांडाची राणी.
जगन्मोहिनी काव्यविणेचा मंद पडे रणकार,
ग्रहगोलांवर गंधर्वांचा एक जुळेना सूर,
पक्वपणाची पिवळी छाया सुंदरतेवर रांगे,
ब्रह्मांडाचीं क्षीण पावलीं, श्रमलीं, दमलीं अंगें.
ये, ये, ये जगदेकमाउली ! ये रजनी लवलाही,
सृष्टिदेवता नातरि बुडते भीषणतेच्या डोहीं.
तव अधरावर जन्म पावती नंदनवनिंचे वात,
नवजीवन ये उसळुनि तुझा वरती फिरतां[1] हात.
तुझिया स्पर्शें मृदु पल्लविता शांत लता ही घेई;
दिव्यदर्शनीं तुझ्याच जननी, फुलते सुंदरताहि.
आद्यदेवते, रजनी, ये, ये निजले श्रीभगवान,
ब्रह्मांडाचा भार माउली तुजविण वाहिल कोण ?
प्रीतिदेविला नवसंजीवन कोण पुन्हां देईल ?
ग्रहगोलांना निज कक्षांतुनि कोण पुन्हां नेईल ?
ये ये रजनी, ये फिरफिरुनी, येशील न तूं जेव्हां
प्रळयकाळ या ब्रह्मांडाचा सत्वर होइल तेव्हां !

---

१ फिरतां तव प्रेमांकित हात.

# शुक्रोदय

सौंदर्य शब्दातीत—स्वर्भूवर अवतरतात,
तेजाची फुटली पेठ—दिव्यत्वाची लयलूट,
कृष्णपक्षिंची चंद्रकला—त्यावरतीं तरते विमला,
शांति दाटली निस्तुल ही—मंद कौमुदीसह [1] वाही.

स्वर्गाच्या वरचें तेज—तारांगाणिं भरलें आज,
त्यांतच तमही भासतसे—रजनीचे मधुमंत्र जसे;
निश्चितपणा अवनीला—निश्चितपणा गगनाला,
विश्वामधिं मिश्रित झाला —निस्पंदपणा अवनीला.

तेजतमांचें झुंज परी—अव्यक्त नभीं हास्य करी;
संधिकाल अत्युत्कट तो—क्षितिजावर अस्फुट फुटतो !
अत्युत्कट सगळें कांहीं—नित्य नवी शोभा पाही;
सौंदर्य वेडें झालें—तेजाची वारुणि प्यालें.

दिव्याच्या मागुनि चाले—विश्व, खरें कळुनी आलें;
केंद्र तथा सौंदर्यांचा—शुक्र नभीं उगवे साचा.
मुकुट कळ्यांचा दिव्य शिरीं—पीतांबर परिधान करी,
तेज विखुरलें चोंहिकडे—पुष्पावर गगनीं उघडें.

मंगल मंगल गीत म्हणे—अस्फुट रजनी मूकपणें
बालसुधाकर बालकरीं—बालशिरीं अभिषेक करी.

---

१ कौमुदीसहवासी.

# अनंत

अनंत तारा नक्षत्रें हीं, अनंत या गगनांत
अनंत दीप्ती, अनंत वसुधा हे शशिसूर्य अनंत. १

वरतीं खालीं सर्व सांठलें वातावरण अनंत,
माप कशाचें, कुणा मोजितां, सर्व अनंत अनंत. २

कितेक मानव झटती, करिती हाडाचेंही पाणी,
अनंत वसुधा आजवरी हो परी मोजिली कोणी ? ३

म्हणोत कोणी ‘ आम्हीं गणिला हा ग्रह, हा हा तारा ’,
परंतु सांगा कुणी मोजिला हा सगळाच पसारा ? ४

विशाल वरतीं गगन नव्हे, हें विश्वाचें कोठार,
उदात्ततेचा सागर हा चिच्छांतीचा विस्तार. ५

कुणी मोजिला कुणास त्याची लांबीरुंदी ठावी ?
फार कशाला दिग्वनितांची तरी कुणी सांगावी ? ६

अनंत सारें विश्व, जाहलें अनंतांत या लीन;
क्षुद्र मानवा, सांग कशाचा बाळगिसी अभिमान ? ७

तव वैभव हें, तुझीं धनें हीं, हे अत्युच्च महाल
जातिल का गगनास भेदुनी ? अनंत का होतील ? ८

तुझ्या कीर्तिचें माप गड्या का काळाला मोजील ?
ज्ञान तुझें तूं म्हणशी ‘ जाइल ’, कोठवरी जाईल ? ९

‘ मी ’ ‘ माझें ’ या वृथा जल्पना, तूं कोणाचा कोण ?
कितेक गेले मी मी म्हणतां या चक्रीं चिरडून. १०

# भ्रमर आणि कवि

सखया भ्रमरा सदैव होसी तूं कमलावरि गुंग,
कवितेचा मी दास, पदाशीं तिच्याच असतों दंग. १

चाखुनि घेसी पुष्पांमधला तूं मधुतर मकरंद;
काव्यरसास्वादाचा मजला तसाच भारी छंद. २

प्रेमभरानें तूं पुष्पांवर सदैव गासी गाणें;
आळवितों मी कवितादेवी मंजुल आलापानें. ३

बागडसी तूं स्वैर मजेनें नभांत गरके घेत;
बागडतों मी सुज्ञ जनांना हर्षभरीत करीत. ४

समशीलाचे आपण दोघे, ये, ये भ्रमरा आतां;
उडूं, बागडूं, फिरूं मजेनें नुरे कशाची चिंता. ५

ये प्रिय सखया, वनलतिकांच्या झोपाळ्यांत बसून;
गाऊं सुंदर गीत आपुलें, होऊं त्यांत विलीन. ६

ये, ये कमलीं प्रेमबंधनें बांधुनि घेऊं काया;
आनंदाच्या सुधासमुद्रीं जाऊं स्नान कराया. ७

वनराजींतुनि कुंजांमधुनि वेणुध्वनी करून;
वात विहरतो; त्याचा जाऊं आपण पंथ धरून. ८

ये, ये स्वच्छंदानें मारूं नभांत उंच भराऱ्या;
गिरक्या घेऊं परमानंदें ओसरल्या ज्या साऱ्या. ९

रम्य गायनें वेधुनि टाकूं चाल दिशांना चारी;
अमृताचा वर्षाव करूं ये ईशाच्या बाजारीं. १०

# शारदीय सौंदर्यदेवता

प्रभातकालीं काव्यतारका सोज्ज्वल गगनांत
उदयाचलिं परिधान करुनिया पीतांबर येत.
मुगुट कळ्यांचा शिरीं, उषेचें सिंहासन केलें,
हालवीत कचभार सृष्टिचें उत्थपन बोले.

प्रसन्न पवनें जलदजाल तें अपसारुनि नेलें,
तारामंडळ विश्वविभव हें आकाशीं ठेलें.
कणकणांनीं शुद्धचेतना भरुनी अवकाश
सर्व धुवुनि हा निवळ साजिरा रंग भरे त्यास.

पिकलीं शेतें मंद वायुनें आंदोलन घेतीं,
सौंदर्याच्या मूर्त देवता वनमाला होती.
निर्झरिणी या मुक्तमण्यांचें घेउनि भांडार
विमल सैकतामधुन हालतां चमचमती फार.

हां कुरणांचा थाट दाटला वर्णावा कोणीं ?
शारदीय सौंदर्यदेवता अवतरली भुवनीं.
आर्यभूमिच्या दिव्य पुरातन या देवी दोन
शरद्देवता, उषादेवता झाल्या अवतीर्ण.

भूवरचा संसार दाविते सुफलित ही बाला;
तसा स्वर्गसंसार आमुचा दिव्य तिनें केला.
एक गातसे मानवतेचें मधुमंगल गाणें;
देवपणाचे दिव्यमंत्र परि धरिले दुसरीनें.

# बाळें तीं खेळत होतीं

स्वर्गाच्या तेजोगर्भीं । बाळें तीं खेळत होतीं,
वत्सलता प्रभुरायाची । जोजवी तयां निज हातीं;
झुलवी त्या पाळणियांत । छायामय मधु रजनी ती.
संध्येची सुंदर तारा
करि त्यावर विंझणवारा,
लडिवाळें परमोदारा—
देवास बहू आवडती । बाळें तीं खेळत होतीं, १

बैसून सूर्यकिरणांत । सोन्याच्या कारंज्यांनीं
कधिं जलदजाल खुलवावें । स्वर्गीय सुधेनें त्यांनीं,
कधिं चंद्रकला सजवावी । नवरंगीं हार विणोनी,
शांतीचा करुनी पांवा
अवकाशीं सूर भरावा,
नक्षत्रलोक[1] झुलवावा,
सौंदर्यें उधळित होतीं । बाळें तीं खेळत होतीं. २

एकदां सडा संध्येचा । शिंपून महोत्सव केला,
वनविलें बीन बाळांनीं । ओढुनि सूर्यकिरणांला;
तें वाद्य वाजवायाला । अनिवार हर्ष हृदयाला.
ते सांध्यगिरी बहुवर्णी,
छायामय त्या निर्झरिणी
गजबजल्या सुरललनांनीं;
परिसाया देवहि येती । बाळें तीं खेळत होतीं. ३

---

१ खुलवावा

वाद्याचे ते झंकार । एकेक जसे उदयाला,
एकेक सृष्टिचें फूल । लागे मग उमलायाला;
निःस्तब्ध मूक गगनाला । निमिषांतच मोहर आला.
आनंद गडे ! आनंद,
गाण्याचा एकच छंद,
स्थिर भरला परमानंद,
ये रंगनाथ संगीतीं । बाळें तीं खेळत होतीं. ४

परि हाय ! कुठुनि तरि आला । अति तीव्र विषारी वारा,
कंपित हो एकाएकीं । मधु दिव्य देश तो सारा;
बाळांचे गळले हात । वीनाच्या तुटल्या तारा.
ती स्वप्नसृष्टि जळाली,
गाण्याची तार गळाली,
काजळी चढे वरखालीं,
झाली हो माती माती । बाळें तीं खेळत होतीं. ५

या खोल भूमिगर्तेंत । अंधार खळाळत होते,
मोहाचें वीख विखारी । बेभान करी सकलांतें,
वाऱ्यावर भेसुर भारी । अंधुकता पसरित ये तें !
वाफारा तो लागोनी
तीं रम्य बालकें तान्हीं
कळवळुनी पंचप्राणीं
कोसळुनी खालीं येतीं । बाळें तीं खेळत होतीं. ६

मग भयद काळडोहांत । भोवंडुनि गरके खाती
फणि डंख विखारी मारी । वर लाट चपेटा दे ती
अंगार ! तडकते लाही–। जंजाळ जिवाचे होती.
तडफडती माशावाणी,
आक्रंदति करुणागानीं,
हा ! हा ! ते हाल बघोनी
पाषाणहि भंगुनि जातीं । बाळें तीं खेळत होतीं. ७

कळवळुनि शेवटीं आला । यमधर्म सुमस्त्रेहाळ,
जर्जरित बाळगालांत । निश्चेष्ट दृष्टि तेजाळ;
मालवती जीवज्योत । लवली ती किंचित्काळ;
अप्सरसा निर्भरचित्तीं
गंधर्वगायनें गाती,
स्वर्गांत दिवाळी होती,
जाती न परंतू वरतीं । बाळें तीं खेळत होतीं. ८

---

## कवि—बाळें

स्वर्गाच्या तेजोगर्भी बाळें तीं खेळत होतीं,
वत्सलता प्रभुरायाची जोजवी तयां निजहातीं;
झुलवी त्यां पाळणियांत छायामय मधु रजनी ती.
मोत्यांचें घालुनि पाणी
स्वर्गंगा त्यांना न्हाणी,
लडिवाळें बाळें तान्हीं,
देवाचीं आवडतीं तीं—कविबाळें खेळत होतीं ! १

बैसूनि सूर्यकिरणांत सोन्याच्या कारंजांनीं
कधिं जलदजाल खुलवावें स्वर्गीय जादुनें त्यांनीं,
कधिं चंद्रकला सजवावी, ज्योत्स्नेचें ज़ाल विणोनी,
शांतीचा करुनी पांवा
कधिं रात्रीं सूर धरावा,
नक्षत्रलोक डुलवावा,
सौंदर्यं उधळित होतीं—बाळें तीं खेळत होतीं !

एकदां सडा संध्येचा शिंपुनी महोत्सव केला,
बनविलें बीन ओढोनी कोंवळ्या सूर्यकिरणांला,
तें वाद्य वाजवायाला बाळांचा मेळा आला;
ते सांध्यगिरी बहुवर्णी,
छायामय त्या निर्झरिणी
टाकिल्या क्षणीं व्यापोनी !
परिसाया देवहि येती ! बाळें तीं खेळत होतीं ! ३

वाद्याचा ये झंकार एकेक जसा उदयाला
एकेक सृष्टिचें फूल लागे हो उमलायाला !
निस्तब्ध मूक गगनाला, निमिषांतच मोहर आला.
आनंद गडे–आनंद,
गाण्याचा एकच छंद,
हो चोहिंकडे गोविंद,
ये रंगनाथ संगीतीं, बाळें तीं खेळत होतीं ! ४

परि आला तीव्र विषारी, हा न कळे कुठचा वारा !
कंपित हो एकाएकीं कां दिव्य देश हा सारा !
बाळांचे गळले हात, बीनेच्या तुटल्या तारा !
ती स्वप्नसृष्टि जळाली,
गाण्याची तार गळाली,
काजळी चढे वरखालीं,
झाली हो माती माती ! बाळें तीं खेळत होतीं ! ५

त्या खोल भूमिगर्तेंत अंधार खळाळत होते;
मोहाचें जालिम वीष बेभान करी सकळांतें;
वायूसह तीव्र विषारी अंधुकता पसरित ये तें.
वाफारा तो लागोनी
तीं दिव्य बालकें तान्हीं
कळमळुनी पंचप्राणीं
कोसळुनी खालीं येतीं ! स्वर्गीय दिव्य बाळें तीं ! ६

कडकडला गगनीं तारा ढांसळला, भूवर आला !
स्वर्गीय तेज मालवुनी पाषाण क्षणार्धीं झाला !
हा प्रभाव या जगताचा दोषावें यांत कुणाला ?
स्वर्गाचे ते शृंगार,
प्रेमाचे मौक्तिकहार,
गांठितां जडाचें दार
जडतेनें वेष्टित होतीं ! स्वर्गीय दिव्य बाळें तीं ! ७

काळाच्या आवर्तांत भोवंडुनि गिरके घ्यावे,
चांचपतां अंधारांत ठेंचाळुनि विव्हल व्हावें,
जें जीवित या जगतींचें तें त्यांस कसें मानावें ?
जीवास आग लागोनी
तळमळती माशावाणी,
स्मरुनी ती पूर्वकहाणी
फोडितात टाहो चित्तीं– बाळें तीं खेळत होतीं ! ८

परि त्याच दीर्घ किंकाळ्या ठरतात जगाचीं गाणीं !
निःश्वास आंत जे कढती ती स्फूर्ति लोक हा मानी.
संतप्त अश्रुमालेला गणितात कल्पनाश्रेणी !
गौरवितें विश्व कवींना,
जग सर्व डोलवी माना,
परि मुग्ध मधुर आत्म्यांना
त्या काय बोंचतें चित्तीं ? बाळें तीं खेळत होतीं ! ९

---

[ ‘ बाळें तीं खेळत होतीं ’ व ‘ कवि बाळें ’ या दोन वेगळ्या कविता नसून एकाच कवितेचीं दोन रूपें आहेत, हें वाचकांच्या सहज ध्यानांत येईल. ]

# सृष्टीच्या गायकास

गा, गा, गा विहगा गीतें,
टाक भारुनी जगतातें.
सुंदर वातावरणांत
निर्मुनि देवाचे दूत
जड जगताला,
शून्य नभाला,
ब्रह्मांडाला
जीवित नव अर्पायातें
गा, गा, गा विहगा गीतें ॥ १ ॥

आकाशामधले बोल,
सृष्टीचे मंजुळ ताल
एकसरें वर्णायाला
गाण्याची गुंफीं माला.
हीं सृष्टीचीं
निगूढतेचीं
तत्त्वें साचीं
सांग उकलुनी आम्हांतें
गा, गा, गा विहगा गीतें ॥ २ ॥

काळाचे भेसुर बोल
गोड करुनि तूं कथिशील.
विश्वाला माधुर्य खरें
तूंच गोजिऱ्या, देशिल रे !
प्रेमलतेनें,
सौंदर्यानें,
सुधारसानें
सृष्टीला न्हाणायातें
गा, गा, गा विहगा गीतें ॥ ३ ॥

जाइल हें तम वितळोनी
उज्ज्वल तव ऐकुनि गाणीं;
या नश्वर जगतावरतीं
दिव्याची होइल वसती.
तुझ्या गायनीं
धुंद होऊनी
दिव्य भावनीं
गुंगवीत ब्रह्मांडातें
गा, गा, गा विहगा गीतें ॥ ४ ॥

भविष्य विश्वाचें सारें
तव गानीं भरलें बा रे !
म्हणोनि विहगा, तव बोल
ब्रह्मांडीं दुमदुमतील.
तन्मयतेनें
वेडें गाणें
तुझ्या सुरानें
विश्वाला शिकवायातें
गा, गा, गा विहगा गीतें ॥ ५ ॥

# संतांचा अनुवाद

देउळींचा देव मेला । विश्वीं विश्वरूप झाला ॥
देव झाला शतखंड । तेणें कोंदलें ब्रह्मांड ॥
क्रियाकर्मीं देव नाहीं । देव कीर्तनीं न राही ॥
देव नाहीं ज्ञानामधीं । ती तों देवाची समाधी ॥
सत्य देव विश्वांतरीं । हिंडतसे दारोदारीं ॥ १ ॥

एक देव कष्ट करी । एक उघडा शरीरीं ॥
एक पोटासाठीं फिरे । एक भुकेलेला मरे ॥
एक देव झाला रोगी । देहदुःखीं दुःख भोगी ॥
एका आपंगीता नाहीं । देव दीनवाणी पाही ॥
ऐसे देव नानापरी । हिंडताति दारोदारीं ॥ २ ॥

देवें तुम्हां दिली आई । तैशी ब्रह्मांडीं रमाई ॥
देवें तुम्हां दिला तात । तैसा माधव जगांत ॥
देव तुम्हां पाठींपोटीं । तैसे देव घटीं घटीं ॥
नका पाहूं त्यांची धूळ । देव माझे अमंगळ ॥
धरा कारुण्य अंतरीं । सत्य देव व्हावा जरी ॥ ३ ॥

नको पुण्याईचें ओझें । सर्व म्हणा 'माझें माझें' ॥
नका ठेवूं अहंकार । करा साह्य थोडें फार ॥
नका लाजे देऊं थारा । सर्वेश्वर आणा घरा ॥
नको संपत्तीची चाड । नको कीर्तीचेंही वेड ॥
दारीं पडे देवराणा । तया मंदिरांत आणा ॥ ४ ॥

माझें हृदयमंदिर । माझ्या देवाजींचें घर ॥
माझे तीस कोटी देव । नको अद्वैताचें नांव ॥
जळो माझी दोषदृष्टी । जीव तुटो तयांसाठीं ॥
हातें घडो त्यांची सेवा । निदिध्यास लागो जीवा ॥
म्हणे रमाईचें बाळ । हेचि आस सर्वकाळ ॥ ५ ॥

# धर्मवीर

आद्य ऋषींनीं जी केली तेजाची पूजा पहिली,
ती करणें ज्यां ज्यां लोकां, ते सारे सावध ऐका !
गर्जू द्या हिंदिस्तान ऐकुनि हें माझें गान,
धर्मवीर हिंदिस्तान, देवाचा कलिजा प्राण,
बाळ तयाचे जे कोणी, धर्मवीर हिंदिस्तानीं,
ते सारे सावध ऐका, सत्यधर्म कथितों लोकां–
ज्या तेजामध्यें भिनले आद्य ऋषी जाउनि सगळे,
तेंच तेज हृदयीं भिनतां, आद्य ऋषी बघतां बघतां–
अवतरुनी तुमच्या हृदयीं, स्फूर्तिमंत्र गातिल कांहीं !
जडतेचें लागुनि भूत सृष्टि करी हळहळ येथ.
उणिव तेजाचीच जगीं भासतसे जागोजागीं.
क्षुद्र तुम्हीं बनलां का रे ! मायेनें भुललां सारे !
तेजाला अवमानुनियां अंधारीं मरतां वाया.
मरणाचें काढुनि मरण द्या मिळवा जीवंतपण !
वाट करा तेजाला रे, फोडुनि हीं कारागारें
प्रकाश द्या सृष्टीला तो, जो तुम्हांवरतीं येतो !
धर्माचारांची माती कां धरुनी बसलां हातीं !
मातिवर चढतें कीट, सत्य धरा ध्यानीं नीट.
सत्य सदा निर्मळच तें, आज उद्यां येथें तेथें.
रूढींचें चढलें कीट धर्मावर, परजा नीट !
सत्याची समशेर धरा, असत्य सारें पार चिरा !
आद्यऋषींचा सद्धर्म हेंच मात्र त्याचें वर्म—
सत्य प्रस्थापित व्हावें, देहमनें जीवेंभावें.
जडतेची काढा कीट, तेजाची उजळा वाट.
धर्मपताका घ्या हातीं, उदार व्हा देहावरतीं ![1]

---

१ प्राणांवरतीं

अहंकार जिरला नाहीं,
मोह पुरा विरला नाहीं—
धर्माच्या वाफा नुसत्या
दवडितसां भलत्यासलत्या !
तोंडावर बसली माशी
शक्ति न ती उडवायासी !
विषयांचा नयनीं धूर,
धर्म मात्र तुमचा थोर !
दिडकीला सतरा पापें,
धर्म धर्म म्हणणें सोपें !
ब्रह्मचर्य तुमचें थोर,
चवदावें वर्षीं पोर !
देहाचे बनलां दास,
मायेचा बसला फांस,
स्वार्थानें वेडे झालां,
धर्माचा मुडदा केला !
धर्म नव्हे संध्यास्नान,
धर्म नव्हे आसनध्यान;
तत्त्वज्ञानाचे बोल,
तें धर्मावरचें फोल !
अंतरांगीं तुमच्या वसतो,
आचरणीं तुमच्या दिसतो,
धर्म खरा तुमचा तोच,
बाकीचे शाब्दिक नाच !
वर्णाया सुंदर फार
धर्म नव्हे नाजुक नार,
जीवाचें द्यावें मोल,
धर्म तेधवां समजेल.
तोंवरि या वाफा सोडा,
'धर्म' म्हणा, छाती झोडा—
अधःपात टळणें नाहीं,
धर्म खरा कळणें नाहीं !
रूढि अशी कोणी दावा,
बदल [1] जिला नाहीं ठावा.
नामरूप बदलायाचें [2] !
चंचलता जगतीं नाचे [3] !
ही वरची [4] पोपटपंची,
अजुनि किती घोकायाची ?
आंत चला उघडा डोळे,
मोहाचे सोडा चाळे;
परात्पराची कांस धरा,
तेजाची समशेर करा !
अंधकार तोडा मोडा,
धर्म खरा [5] पदरीं जोडा.
बाधक ते तोडुनि बंध,
सत्याचा मिळवा छंद
भिऊं नका कलिकाळाला;
धर्मवीर ! जय जय बोला !
अग्नीनें जळणें नाहीं,
शस्त्रानें तुटणें नाहीं;
पाण्यानें बुडणें नाहीं,
वाऱ्यानें उडणें नाहीं.
दिक्कालापरते तुम्ही,
विश्वाचे अवध्या स्वामी !
धर्म तुम्हांसाठीं बनला,
धर्म तुम्ही तुमचा केला.

---

१ मृत्यु २ हीं मरणाचीं ३ साची ४ जगताचीं ५ सत्यधर्म.

सत्याला नांदायाला, देव जगीं स्थापायाला;
तेज़ जनीं पसरायाला, धर्म तुम्ही तुमचा केला.
देवाला विसरूनि कां रे, या पोकळ धर्माचारें
सत्याचा अपमान करां ? अधःपात हा खराखुरा !
सत्य खरें स्थिरलें जेथें, तेज खरें भुरलें जेथें
देव खरा विलसे जेथें, धर्म खरा अमुचा तेथें.
सत्यासाठीं नित्य नवे धर्मनियम आम्हांस हवे.
तेजाचीं आम्ही बाळें, सत्यरूप आम्ही सगळे.
धर्मवीर हिंदिस्तान[1], देवाचा कलिजा प्राण !
बाळ तयाचे जे कोणी धर्मवीर हिंदिस्तानीं,
स्वार्थाला देऊनि लाथ, तेजाचा धरुनी हात,
खरे विरागी धीरवर, गांभीर्याचे महीधर,
दिव्य चिंतनीं रमणार, स्वयंपणें विश्वाकार.
विश्वकुटुंबी विश्वधनी, तेच खरे हिंदिस्तानी,[2]
धर्मवीर हिंदिस्तान, देवाचा कलिजा प्राण !
सत्य बोल हे करा उठा– धर्मवीर ! अद्वैत लुटा !
शुद्ध सत्य हृदयांत धरा, तेजाचा उपदेश करा !
मायामय कारागारा, तोडा मोडा पार करा !
आचारांची प्रौढि[3] नसे, सत्य ठसावें करा असें.
धर्मपताका घ्या हातीं, व्हा केवळ तेजोमूर्ती.
व्हा सगळया विश्वां नेते,[4] धर्मतत्त्व अमुचें हें तें.
सत्यधर्म निरहंकार, सर्वांचें समता सार;
सत्यधर्म जगतीं प्रेम, चोंहिंकडे आत्माराम.
स्वार्थाचा नुरला लेश, देहाचा गळला पाश,
मरणाला आलें मरण, सत्यधर्म जीवंतपण !
सत्यधर्म कळणें नाहीं, जोंवर ही जडता राही;
धर्माचें तोंवर सोंग, जा मिरवा नुसतें ढोंग !

---

१ हिंदुस्तान २ हिंदुस्तानीं ३ रूढि ४ सगळया विश्वाचे नेते.

मेलेल्या सजवा रूढी, गात बसा त्यांची प्रौढी !
शूद्रांचे सोसा शाप, देशावर लादा पाप !
विधवांना रडतचि ठेवा धर्माच्या मिरवा नांवा !
कोणि असो कसली जात, आम्ही तर पसरूं हात[१] !
देशाचाहि बंध नसे, विश्व सर्व अमुचेंच असे.
चोहिंकडे आत्माराम, सर्वांवर अमुचें प्रेम.
खाणारे आम्ही मोतीं राजहंस भूमीवरतीं.
आद्य ऋषींनीं सांगितलें, संतांनीं अमुच्या कथिलें.
धर्मतत्व हें खरें खरें आम्हांला कळलें सारें !
धर्मवीर भूमीवरतीं, धर्मतत्व अमुच्या हातीं;
देवाचे आम्ही प्राण, आम्हांला भिवविल कोण ?
काळाचे आम्ही[२] काळ, काळदिशा अमुचा खेळ !
तेजानें भरलीं अंगें, ! नेउं जगा तेजामागें !
हिमगिरिचा काढा कांटा, एकिकडे सागर लोटा;
वाट करा आम्हांला रे, कां मरतां व्यर्थचि सारे !
तेजाचे आम्ही दास, सत्याची धरिली कांस;
देवांला फिरवूं मागें, दाखवितां कसलीं[३] सोंगें,
देहाची परवा नाहीं, नांवाची परवा[४] नाहीं;
धर्मवीर भूमीवरतीं त्या अमुची असली गीती !

---

ही कविता बालकवींच्या हयातींत मासिक मनोरंजनांत जशी प्रसिद्ध झाली तशीच येथें प्रसिद्ध केली आहे. रा. निफाडकर यांनीं संपादिलेल्या बालकवींच्या कविता संग्रहांत मूळांतील 'हिंदिस्तान' बद्दल प्रत्येक ठिकाणीं 'हिंदुस्थान' असें छापलें आहे आणि इतरही कांहीं फेरफार केले आहेत व मूळाबरहुकूम ही कविता छापणाऱ्या गोविंदाग्रजमंडळाच्या कवनगुच्छाच्या संपादकास 'हिंदुस्थान'चें 'हिंदिस्तान' असा अनधिकृत (!) फरक केल्याबद्दल अनेकवार वृथा दूषण दिलें आहे.—संपादक.

---

१ कोणि असो कुठली पाहूं का ? आम्ही पसरूं बाहू २ कवि हे ३ कांहीं ४ कीर्तीची चाडहि नाहीं.

# यमाचे दूत

बोलवितात । विक्राळ यमाचे दूत,
गिरिशिखरावर आ पसरोनी,
काळ्या अंधारांत दडोनी,
किंवा पडक्या बुरुजावरुनी,
शब्द येतात । 'चल नको बसूं जगतांत.'

खोल खोल भेसुर दरडींत,
पडक्या घोर जुन्या विहिरींत
उगवुनि पिंपळ वर येतात
ते म्हणतात । 'चल जगांत दुसऱ्या शान्त.'

परिस्थितीचीं कठोर भूतें
क्षणांत करिती शून्य मनातें,
पूर्वस्मृति मग ताजी होते,
जळतें त्यांत । हृदयाचें होउनि भूत.

क्षणभर सांपडतां एकांत
विचारलहरी उद्भवतात,
विझते प्रेमाशांची ज्योत,
पेट घेतात–हे असंख्य वणवे आंत.

पुस्तक वाचायाला घ्यावें,
कवितेनें कीं मन रमवावें,
सृष्टीचें सौंदर्य बघावें,
हृदयीं तों तों । हा विकार दृढतर होतो.

वेडें भूत बनोनी जावें,
लिहिलें दैवीं काय असावें,
न कळे तोंड कुठें लपवावें,
कां छळतात–हे असे यमाचे दूत ?

धांव धांव सदया, जगजेठी !
दया करीं रे दीनावरतीं,
आशा तुजवांचुनिया परती
तुरली कांहीं—जननी गे, धावुनि येई.

---

## शून्य

अंतःशक्ती प्रगट जाहली,
दृष्टीही शून्यांत उतरली,
तेजोमय हृदयांत शांतता रात्रीची प्रतिबिम्बित झाली.

वाऱ्याचीं होवोनी अंगें
नादब्रह्मीं चित्त तरंगे,
विश्व चिरंतन, त्यांत विरे मन, स्वानंदीं गिरकी घेत.

ज्यांत स्फुरलीं विश्वें सारीं,
ज्यानें तीं प्रतिपाळित केलीं,
शून्य तेंच तें अनन्त होतें पहिल्यानें अस्तित्वांत.

[ जगदुत्पत्तिस्थितीलयाला
घेऊनि त्यांतुनि पुरुष उदेला;
पुरुष एक तो मात्र स्फुरतो या साऱ्या ब्रह्मांडांत.

सहस्रशीर्षा त्या पुरुषानें
काळाचें विरचोनी ठाणें
व्योम बांधुनी अवकाशानें निर्मियलीं विश्वें त्यांत. ]

दिव्य पसारा दिव्यच सारा
दिव्यांतुन उदयाला आला;
घरही त्याचें एकच साचें त्या दिव्याच्या उदरांत

कितेक त्यांतुनि येती जाती
अनंत विश्वें विशाल पुरतीं
उठती विरती लाटेसम तीं त्या पुरुषाच्या हृदयांत.

अनाद्यनन्ता ! अपरंपारा !
अनादिपुरुषा ! सर्वाधारा !
काय पसारा हा तव सारा आम्हांला न कळे येथ.

[ तंडुलकणसम अनन्त जगतीं
दिव्य दिव्य हीं नयनीं दिसतीं
येती जाती लीला नुसती गूढ तुझ्या साम्राज्यांत. ]

शक्ति लोपली विरली वाणी
चित्त चाललें भलते स्थानीं
चिंतित असतां ही तव गाथा मज माझा झाला अंत

शून्य पाहतों सभोंवतीं हें,
दिव्य शून्यमय सारें आहे,
शून्यपणानें शून्य नांदतें उत्पत्तिस्थित्यन्तांत.

त्या शून्यांतुनि उदया येती,
शून्याला अक्षय्य शोधिती,
जागृत सारे एकाकारें शून्याच्या आवर्तात. *

---

* ही कविता बालकवींना आवडली नव्हती व ते ती फाडणार होते, पण कै. दिवाकर यांनीं बालकवींना तो फाडूं दिली नाहीं. ती कविता बालकवींनीं रा. दिवाकर यांना दिली तेव्हां कंसांतील कडवीं बालकवींनीं पेन्सिलीनें तात्काळ खोडलीं होतीं.—संपादक.

# दुबळें तारूं

कसें हाकारूं । शीडाविण दुबळें तारूं ?
तुडुंब सागर भरला आहे,
दुष्ट काल झंझानिल वाहे,
तुफान तेणें खेळत राहे,
कसें हाकारूं । शीडाविण दुबळें तारूं ? १

सुखदुःखाच्या लाटा येती,
क्षुब्ध समुद्रातें त्या करिती,
तेणें उपजे चित्तीं भीति
कसें हाकारूं । शीडाविण दुबळें तारूं ? २

षड्रिपु जलचर पसरुनि जाळें
स्वैरगतीनें फिरती सगळे,
ओढुनि घेतिल नौका स्वबळें,
कसें हाकारूं । शीडाविण दुबळें तारूं ? ३

मायावर्तीं भ्रमेल का हें ?
भ्रमतां प्रलयीं बुडेल का हें ?
चित्ता चिंता जाळित आहे;
'कसें हाकारूं । शीडाविण दुबळें तारूं ?' ४

पार पाहतां न दिसे कांहीं,
दुसरा त्राता कोणी नाहीं,
सदा भयाची जाचण हृदयीं,
कसें हाकारूं । शीडाविण दुबळें तारूं ? ५

नको नको हा प्रवास याचा !
अब्धि नव्हे, दरबार यमाचा;
सोडुनि द्यावा पंथचि याचा,
कसें हाकारूं । शीडाविण दुबळें तारूं ? ६

# भरलें घर ओकें ओकें

भरलें घर ओकें ओकें । मज न कळे दिसतें कैसें ?
मजभंवते जमले सगळे । स्वप्नीं परि बघतों जैसें;
ही दूध पाजिते ताई । परि वाटे घोटुं नयेसें.
स्फुंदूनि माय रडताहे,
समजावित भाऊ आहे,
ती रमा भयाकुल पाहे;
वैकल्य भरी हृदयातें । पाहूंच नये परि गमतें.

संवेदनशक्ती मेली । उघडेहि नयन मिटतात,
बघण्याचे ही श्रम गमती । येई न विचार मनांत;
वरचेवर येतां ग्लानी । जणुं जीव बुडे गहनांत.
परि नलगे औषधपाणी,
मजसाठिं नका रडुं कोणी,
सुख भोगा अपुल्या स्थानीं;
द्या आशीर्वाद मुलांतें । झोपेन सुखें मग एथें.

अस्फुट वच वदुनी ऐसें । झांकुनि घे थिजले डोळे;
देहावर जडता पसरे । परि नुसता हातच हाले;
नयनांवर सांचे पाणी । श्वासाची धमनी चाले;
मायेच्या हलकल्लोळीं
भंवतालीं गर्दी केली;
परि टाकुनि पंजर[1] खालीं
दुखवूनि उडाला जीव । मायेचा हिरवा रावा.

---

१ त्यजुनि पिंजरा.

# ओंवाळणि घाली भाई

सुखशयनीं मी निजलें होतें बाई !
स्वप्नें मज पडलीं कांहीं !
त्या स्वप्नांच्या मनोमयी लीलांहीं,
मन माझें गुंगुनि जाई.
त्या प्रणयाच्या स्वर्गसुखाच्या लीला
अंतरल्या मज दुबळीला !
निद्रा ती उडुनी गेली–गे !
रजनी ही प्रगटे मेली !
भयचिंता जडली भालीं—
मन आतां हें विषण्ण वदतें बाई !
"गेलें तें गेलें पाहीं !"

*　　*　　*

तों आकाशीं शशांक ये उदयाला
पूर्वेला हांसविण्याला;
मधुकौमुदिचें क्षौम धवल नेसोनी
नटली ती होती रजनी;
मी प्रणयाचीं रेखित चित्रें तेव्हां
सौधावर बसलें, देवा !–
तों मेघ भराभर आले–गे
चपलेनें कंपित केले !
हस्तांतुनि चित्र गळालें !
त्यामागें हें हृदय पळालें बाई !
"गेलें तें गेलें पाहीं !"

*　　*　　*

मज स्वर्गींचें सुमन लाधलें रानीं,
मी आणीलें उचलोनी;
मधुगंधानें त्याच्या तन्मय झालें,
तद्रूपीं रंगुनि गेलें !
तें स्वर्गींचें सौख्यच माझें झालें,
नंदनवन गेहीं आलें;
तों भूमि दुभंग जहाली—गे !
सुम माझें घेउनि गेली !
लोटिले मला पाताळीं ।
हा ! निर्लज्जा दैवा तव करणी ही,
" गेलें तें लाधत नाहीं "

* * *

तों एकाकी दिव्य तेज मज दिसलें,
नकळे मज कोठुन आलें;
" चल भगिनी ये " ऐसे शब्द निघाले,
कोणीसें मज उद्धरिलें !
मज आशा ज्याची नव्हती—गे !
तें साक्षात् माझ्या पुढतीं !
मी वेडी झालें पुरती !
तें माझ्या ह्या कंठीं बांधुन देई !
ओवाळणि घाली भाई !

## कवि

वेडा झाला, म्हणा हवें तर उठला जनतेंतुनी,
कवी हा तन्मय निजगायनीं;
सुखदुःखांच्या व्यामोहाच्या सुटला फेऱ्यांतुनी
नसे जग याच्या ध्यानींमनीं
स्वार्थ विसरला, अविरत फिरतो गुंगत विजनीं, वनीं
म्हणुनिया निंदो याला कुणी.
परि जगीं मिळालें याचें याला पुरें,
वैभवें वाटतीं यास दुजीं पामरें,
मग करील कां हा स्पृहा तयांची बरें ?
एकच याचें यास पुरे, मग हसोत हसतिल कुणी,
कवी हा, हा जगताचा धनी, ॥ १ ॥

मदांध कमले ! जगीं कुणावर जा पसरी मोहिनी,
न हा वश कविवर तुजलागुनि !
दंभा ! नीचा ! कळे न का तुज हा सत्याचा झरा,
सुखें जा नाच जगीं पामरा !
सैताना ! मत्सरा ! अरेरे ! जासी कोणाकडे ?
दिसेना कविवर का तुज पुढें ?
हा पवित्र पुरता ज्ञानसूर्य कीं अहा !
जा, तमा नीघ, हा उदया आला पहा !
अविवेका घूका, दडुनि कुठेंही रहा.
हा प्रेमाचा धवलचंद्रमा भूवर ये उतरुनी;
कवी हा, हा जगताचा धनी ॥ २ ॥

स्वच्छंदी हा प्रभातवायू झोके घे अंबरीं,
लतांना पुष्पित करितो तरी;
चंद्र पहा हा गगनमंडलीं हसतो वेड्यापरी,
कर्षितो सागरलहरी तरी;

हो ! असाच समजा हा स्वच्छंदी कवी
हा जगास अपुल्या इच्छेसम वागवी,
हा भूस अर्पितो सदैव सुख मानवी,
खरा भिकारी, खराच वेडा, परंतु मोठा गुणी;
कवी हा, हा जगताचा धनी ॥ ३ ॥

---

## कवीची इच्छा

तुला बघावें गुंगावें । गुंगतची चुंबुनि घ्यावें;
गुंगतची होउनि जावें । स्वदाधीन जीवेंभावें.
गुं गुं गुं गुं जोंवरती । जडतेची पडते माती,
तरलित हो हृदयज्योती । दिव्य सूर श्रवणीं येती.
मग त्यांचा धरुनी सोल[1] । एकेकच गुंफित बोल—
सौंदर्याचे, स्वप्नाचे । भासाचे, कल्पकतेचे–
अर्धस्फुट नयनांवरचे । निद्रेचे जागेपणिंचे–
मुग्ध मधुर हास्यावरले । बिंदुकिरण कलिकेमधले,
हृदयतार हालविणारे । मनस्ताप मालविणारे,
मनोवृत्ति कालविणारे । अंधकार घालविणारे,
दिव्य तरंगीं तरणारे । गोड गोड गुंफित सारे.
प्रतिभेच्या सौधावरुनी । मरुद्गणांवरतीं चढुनी,
अनंतांत गगनीं उडुनी । लीन बनुनि वातावरणीं,
होउनियां सौंदर्यधनी । गुंजावीं मंजुळ गाणीं,
ब्रह्मांडाची सदाफुली । अक्षयतेमध्यें फुलली.
फुलें तिचीं बघतां नयनीं । वेड भरुनि अंतःकरणीं;
फूलपांखरें परोपरी । निर्बंधपणें फुलांवरी
जशीं स्वयें तरलित होतीं । मंद तरल गंधावरतीं,
तेंवि जगाच्या फुलावरी । गंध दाटले परोपरी,
अनुभवुनी हर्षित व्हावें । सुखदुःखें चुंबित गावें.

---

१ झोल

सुमकोषीं आपोआप । क्षण घ्यावी साखरझोंप
डोलतची जागें व्हावें । हांसतची गुंगत जावें,
सत्याचीं स्वप्नें व्हावीं । सत्याला स्वप्नें यावीं[1]
स्वप्नींही स्वप्नें बघत । स्वप्नांतच व्हावा अंत !
मरण्याचें स्वप्नहि गोड । जगण्याचें स्वप्नहि गोड ।
येणेंपरि सर्वहि भास । अमृताचे व्हावे कोष.
काव्यपांखरूं हें मेलें । जन म्हणतिल पाहुनि सगळे
नवल परी यावर कांहीं । मृत्यूचें चिन्हहि नाहीं !
स्वर्गींचीं बहरून फुलें । सूर्यफुलें नक्षत्रफुलें
नंदनवन सुंदर वरतें । तें दिसलें नयनीं यातें;
मधुगीतें गंधर्वांचीं । नृत्यकला अप्सरसांची
देवांचीं 'राज्यें' बघुनी । हें भुललें गेलें उडुनी
अक्षय तेथें तरंगतें । तरल मनें डुलतें झुलतें.
काव्यपांखरूं स्वैरपणें । चुंबनगीतें अजुनि म्हणे;
नाहिं खरें जगतीं मरण । काव्यपांखरूं बघा खुण;
नसत्याची भीती धरुनी । असतें कां द्यावें त्यजुनी ?
कां म्हणुनि वेडें व्हावें ? चुंबितची यासम जावें
भासाचीं सर्वहि सुमनें । चला चला चुंबित वदनें,
होइल मग सर्वचि गोड । मरण गोड जगणें गोड
दुःखाश्रूंतिल ही गोडी । हास्याहुनि नाहीं थोडी.
दोघेंही गोडच[2] भास । आवडती चुंबायास.
प्रेमानें भरलें गात्र । सांपडला चुंबनमंत्र !
चुंबितची आम्ही जाऊं । स्वैरपणें जगतीं राहूं.
प्रेतहि माझें पाहून । प्रेमानें गुंगत गान[3]
यापरि जग हर्षित व्हावें । हें इच्छीं जीवेंभावें !

---

१ सत्याचें स्वप्न पहावें । सत्यानें स्वप्नें घ्यावें; २ नाहीं ३ प्रेमें मी गुंगे गानीं

# काव्याची कल्पना*

वस्तुवस्तुमधिं काव्य विलसतें;
श्रवणीं नयनीं हृदयिं उतरुनी
पूर्ण करी जें जड जीवातें.
बाह्यवेष जरि सुंदर धरितें,
मंजुगीत त्यामधुनी स्फुरतें;
दिव्य अहा मग तें अवतरतें.
मीतूंपण तें क्षणिं विसरवितें;
लावि अखंड ध्यास जिवातें.

---

# शारदेस

प्रिय कविते अमरसुते[1] तेजाची तूंच उज्ज्वले, खाणी;
मर्त्य जगीं अमर तुझी विश्वाला स्फूर्ति देतसे वाणी.
रविशशितारकमाला सायंतन मंगलें तुझीं माते,
तव अरुण–वरुण–इंद्रहि, सुरलोकच भूति अर्पितो तूंतें
ग्रहगोलांवरुनि तुवां मंगलता मूर्त आणिली खालीं;
हिमगिरिवर मानवता मुनिवदनीं बोल बोलती झाली.
आले पुण्य ऋषीश्वर, अवतरले भरतमंडलावरतीं;
स्वर्गाहुनी अधिक या भूमीची वाढली तयें महती.
तीं दिव्य अद्रिशिखरें हिममंडित सूर्यमंडलाखालीं
भासविती दिव्य उषा अक्षय कीं उतरुनी जनीं आली.

---

* ही कविता बाडांत नाहीं पण बालकवींची आहे असें म्हणतात, म्हणून रचनेच्या दृष्टीनें सदोष असतांही छापिली आहे.

१ अमर तुंतें ( बाड )

ते शुद्ध पूत निर्झर उज्ज्वलता मूर्त पसरिती पाहीं !
धांवति कड्याकड्यांहुनि मधुगीतें धुंधकारुनी जाई.
पसरे कर्कश कानन .............. रान भरे *
घोर दरी किर्र करी मैदानहि थोर त्यापुढें पसरे.
असल्या चमत्कृतींचे पाहुनि नाना विलास नयनांहीं
या क्षुद्र मर्त्य देहीं आसक्ती अल्प राहिली नाहीं.
निर्झरमय, काननमय, गायनमय दिव्य जाहला देह;
सृष्टीचेंहि पुरेना विचाराया स्वैर त्याजला गेह.
मग गूढ अमूर्ताचीं मधुगीतें गोड गावया लागे,
आनंदरूप झाली मानवता, मृत्यु राहिला मागें.
ही सर्व कृपा देवी, तव चरणाचीच, शारदे, वाटे;
सान मनें हीं अमुचीं तेजाच्या तूंचि लाविलीं वाटे;
रविकरणीं भासतसे कीं निर्झरतांडवांत नाचतसे,
पुष्पांवर हांसतसे रूप तुझें क्षणिक मानवांस दिसे.

---

## माझें गाणें

माझें गाणें, एकच माझें नित्याचें गाणें;
अक्षय गाणें, अभंग गाणें, गाणें हें गाणें. १
सर्व जगाचें मंगल, मंगल हें माझें गाणें;
या विश्वाची एकतानता हें माझें गाणें. २
आशेच्या वीणेचा चढवुनि सूर भौतिकांत
हें गाणें, हें प्रियकर माझें गाणें मी गात. ३
ही प्रेमाची, ही शांतीची, विश्वमंगलाची,
सौभाग्याची तार तशी ही, ही जगदैक्याची. ४
निरध्वनी हें, मूकगान हें यास म्हणो कोणी,
नभांत हें सांठवलें, यानें दुमदुमली अवनी. ५
सर्व धर्म हे, भेद-पंथही सर्व एक झाले;
माझें, माझें विश्व, तार ही प्रेमाची बोले ६

---

* या शब्दापुढें फुली मारून ‘ समजत नाहीं ’ असें बाडांत लिहिलेलें आहे.

शांत मत्सर, प्रशांत कपटस्वार्थांची ज्वाला,
चिच्छांतीनें अहा भरीलें सगळ्या विश्वाला. ७
ही मोक्षाची, स्वातंत्र्याची, उन्नतिची माला,
सौभाग्याची तार लागलों मी छेडायाला. ८
हें नंदनवन ही स्वर्भूमी एक पहा झाली !
मंगल मंगल मद्गानाची गति ही शेवटली. ९

---

## कवीचें अंतरंग

सख्या वाचका गीत कवींचें ऐकुनिया निज कानीं
न वदे, कळलें महाकवींचें अंतःकरण निदानीं.
हृन्मंजूषीं भाव गुप्त जे भरले, जनसम्मर्दीं
कथील का कधिं उच्चरवानें कवि हृदयाचा दर्दी ?
जा, जाउनिया अब्धिकिनारीं एक शुक्तिका घेईं,
रंग मनोहर दीप्तिहि अनुपम याविण अन्य न कांहीं.
अगाधगहनें सागरलहरी झांकुनि ठेवति कांहीं;
गूढतळींचीं त्याविषयीं ती शब्दहि बोलत नाहीं[1]
[ त्या शुक्तीपरि हींहि गायनें विचारलहरींवरतीं
हृदंतरांतुन महाकवींच्या उसळुनि वरतीं येती.
घे हातीं, कर कौतुक यांचें परि चित्तीं ( नच ) आणी
या गीतांनीं कळलें कविचें अंतःकरण निदानीं ]

---

१ अगाध गहनें सागर ठेवी झांकुनिया निजहृदयीं
खोल खोल त्याविषयीं कांहीं शब्दहि बोलत नाहीं।

श्री. निफाडकर व श्री. अधिकारी यांनीं पायटीपेंतील या दोन ओळींनीं कवितेचा शेवट करून मूळ बाडांतील शेवटच्या महत्त्वाच्या चार ओळी गाळल्या होत्या त्या येथें कंसांत दिल्या आहेत.

# कवीचा विचार

दिव्यकल्पनामय पक्षांहीं । दिव्य विचारा ! ये लवलाही;
स्वर्गीय तुझ्या आलापानें । गा कविहृदयीं मंजुळ गाणें,
देवदूत तूं स्वर्लोकींचा । तूंच गूढगूढांची वाचा;
परोक्षासही तूं सोपान । तूंच मर्त्य जगताचा प्राण.
विश्वात्मक देवाची वाणी । विश्वात्मक दिव्यांची खाणी;
विश्वात्मा[1] तूं येथें तेथें । प्रगटविसी या अज्ञेयातें.

* * * *

मायाजालीं परि अवघडला । आत्मराज तेजोमय पहिला;
एकसुराचें गीत तुझें तें । कळुनि येईना तेणें त्यातें.
रम्य उषेच्या पहिल्या किरणीं । कीं रजनीच्या गभीर गानीं
दिव्य दर्शनें मोहुनि जातें । परि न बघे मन तेथें तूंतें.
सृष्टीचा मनिं भाव कळेना । तेजोमार्गीं चित्त वळेना,
म्हणुनि असें उद्विग्नपणें तें । हांक मारितें अखंड तूंतें.

* * * *

वत्सल मातेच्या उच्छ्वासीं । सात्त्विक कांतेच्या करपाशीं.
लहानग्याच्या कीं मृदुहास्यीं । भूमितलीं या तूं वावरसी ?
[ जेथ मानवी ध्येय अहा तें । क्षण ( भर ) भूवर चमकुनि जातें
अक्षय्यपणें नांदायातें । राहतोसि तूं कीं वद तेथें ]

---

१ विश्वाला

# जिकडे तिकडे गाणेंच गाणें !

हें जिकडे तिकडे गाणें, गाणें, गाणें !
ब्रह्मांड भारिलें न कळे या जादूनें.
वर गाणें कसलें ? कोण तिथें गाणार ?
हे रवी शशी तारका तसे ग्रहगोल.
ही सृष्टिसुंदरी मजला गाया शिकवी;
हीं चराचराचीं निगूढ गीतें कांहीं.
हा वायू विखरी मधुर सूर गाण्याचे
. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .
ये उघडुनि पडदा गाढ गाढ तिमिराचा
तो सूत्रधार रवि गात गात ये साचा.
मग सस्मित हर्षित होते । सृष्टि ही,
नव मौक्तिकसम ढाळीते । अश्रुही,
त्यासवेंच मंजुल गीतें । गात ही.
मग हांसत हांसत नेत्रें उघडी कोण ?
ती कमलिनि गाई प्रेमाचें मधु गान. १
नभिं रम्य तारका खेळ कुणाशीं करिती ?
निज नाथासंगें विहरत हर्षें गाती.
तो चंद्र नव्हे, गडि कृष्ण खेळतो रास,
मधु गोप गुंफितो अधरिं धरुनि पाव्यास,
त्या मंजुळ गानें कितितरि हर्षित झाल्या;
बघ वरी तारका, खालीं कुमुदिनि हसल्या,
तो सागर गाई, गाई पर्वत गाणें,
तो निर्झर जाई गात गात डौलानें,
ते हिंस्र पशूही गाती । भेसुर,
हे विहंग सारे गाती । सुस्वर;
हीं मुलेंफुलेंही गाती । सुस्वर;
मीं जिकडे जावें तिकडे गाणें, गाणें !
ब्रह्मांड भरिलें न कळे या जादूनें. २

---

( बालकवींची ही अप्रसिद्ध कविता संगमनेरचे कवि श्री. केशव ल. टेंभुर्णीकर यांच्या संग्रही होती; ती त्यांनीं आम्हांला छापण्यासाठीं दिली.—संपादक. )

# मी

मी न जगाचा, मी न कुणाचा, मी नच माझा माझा;
परी पसारा सगळा माझ्या विश्वीं मत्प्रेमाचा. १

मी स्वच्छंदी, पुरता छंदी, धारीं मी न कुणास;
परी मोहिनी विविधरूपिणी सृष्टीचा मी दास. २

मी येथें, मी तेथें, जगतीं जरी पूर्ण भरलों मी;
प्रशांततेसह परंतु माझा वास सदाचा व्योमीं. ३

मी शूरांचें शौर्य संगरीं, मी योग्यांचें ध्यान,
सृष्टीमध्यें स्वर्ग मीच, मी या विश्वाचा प्राण. ४

कल्पतरूंचीं फुलें तारका वेंचुन आणिन खालीं;
वाहिन मत्प्रिय वसुंधरेला नित्याची लाखोली. ५

जिथें न कांहीं तेथुनि आणिन मूर्ति व्यक्तित्वाला
जादुगार मी, हवें तसें या वांकवीन जगताला. ६

अधर युवतिचा कोमल, त्याहुनि कोमल सुमनें फार;
मी पुष्पासम, नव्हे नव्हे हो, त्याहुनिही सुकुमार ७

शून्याकारें, शून्याधारें, शून्यवृत्तिनें चालें;
परी हांसतां मी या विश्वीं वस्तुजात हें डोलें. ८

# ध्येय

## पद

हारवलें, तें परकें झालें, मी शोधित फिरतों त्याला;
कुठें पाहिलें, कुठें लपालें, बोला हो कोणी बोला ॥ ध्रु० ॥
या देहाच्या जीर्णपंजरीं थांबवुनी या जीवाला
धरूं कोठवर; त्याच्यासाठीं हा तर वेडावुनि गेला ?
नैराश्याला, या काळाला हाच भिववितो दृक्पातें,
जगताचा तर छंद सोडिला कधींच या याच्या चित्तें.
बनला हा निःसंग पुरा, हा त्यासाठीं वेडा झाला;
कुठें पाहिलें कुणी तरी हो तें याचें सांगा याला;
नभाप्रमाणें जें सर्वांवर करिल छत्र हो तें याचें;
या जगतीं अत्युच्च उच्च जें, तें याचें हो, तें याचें;
भेदपंथ हे एक जाहले, राज्य शांतिचें तें याचें;
तें याचें पद, जिथें दिसेना द्वेषाचें, औदास्याचें.
समानता सर्वत्र नांदली, प्रेमाचे फिरती वारे,
अखंड शुद्ध प्रेमच जेथें जीवन जीवाचें झालें.
जें याचें तें आणुनि देईल कोणी कां याचें याला । कुठें पाहिलें ॥ ध्रु० ॥

---

# बालसुभाषित

नाहीं सौख्य जगांत हाय ! वदती वेडे जगीं ते जन.
स्वर्गीं काय विशेष ? मृत्युभुवनीं आहे उणें कोणतें ?
पूर्णानंद जगीं, जरा उघडुनी डोळे बघा त्याकडे;
नाहीं स्वर्ग दुजा, मदीय मग ही मानाल वाणी खरी. १
आहे देह मुळीं अशाश्वतचि हा, विद्युल्लतांनीं झडो,
किंवा वज्र पडोनि नित्य चिरडो, वा काळपाशीं दडो;
माझें कार्य करीन मी, न परवा या संकटांची करीं;
आहे तो मष राखणार सगळ्या त्राता जगाचा हरी. २

---

# दिव्य आणि प्रीति

## पद

दिव्य जिथें, प्रीती तेथें;
आलिंगुनि अन्योन्यातें.
प्रीति तुला जर हवी खरी ?
विलीन हो दिव्यांत तरी.
विश्व फुलूं दे,
चित्त भुलूं दे,
जाऊं दे झरझर त्याला
दिव्याला कवळायाला. १
मर्यादेच्या अंधारीं
प्रीति वसे का कधींतरी ?
अफाट जगताचें रत्न,
प्रीतीला अडवी कोण ?
दिव्य ज्योति
स्फुरतां चित्तीं
विश्वें हीं स्फुरती बाई !
प्रीति–दिव्य एके ठायीं २
विशाल ब्रह्मांडापरती
प्रेमवल्लि चढवी वरती,
तिचीं फळें, तिचिया शाखा
व्यापूं दे तेजोलोका.
तीच गडे ती,
दिव्यप्रीती,
दुःखदायिनी दुसरी ती
स्वार्थोद्भव लहरी नुसती ! ३

चोंहिकडुनि निज हृदयांत
दिव्याचे उधळित झोत
प्रीतीची चमके स्वारी
दिव्यांतुन पाझरणारी.
दिव्य एक तें,
प्रीती जेथें;
दिव्यरूप जी ती प्रीति
दुसरी ती केवळ भ्रांति ! ४
आत्म्याची जी पुरोगती,
नांव तिचें प्रीति प्रीति.
विश्वात्म्याचें मधुहास,
दिव्य जगीं वदती त्यास.
वेडी गीतें
अखंड गाते,
प्रीति लुब्ध दिव्यावरते,
प्रीतिबद्ध दिव्यहि हो तें. ५
दिव्यप्रीतीसंगमता
होऊं दे हृदयीं आतां.
स्वभूंची संगमता ती
मग येइल उतरुन चित्तीं.
स्वर्गधरा ती
प्रीति–प्रीति
मी, तूं, ही अवघी जगती,
प्रीतीनें न्हालीं नुसतीं. ६

# प्रेमाचें गाणें

प्रेमावांचुनि सर्व सुनें,
जग भासें बापुडवाणें;
मोठ्या उल्हासें म्हणुनी
प्रेमाचीं रचितों गाणीं.
आकाशीं तें,
जगीं विलसतें,
दिशांत हंसतें;
विश्व वेष्टिलें प्रेमानें;
प्रेमावांचुनि सर्व सुनें १

संध्याराग म्हणो कोणी,
यातें मी अक्षय मानीं.
म्हणो कुणी ' ती भूल खरी '
नाहीं मी म्हणणार परी.
सौख्य मावळे,
दुःख कोसळे,
उदास सगळें;
प्रेम वाढतें परी दुणें;
प्रेमावांचुनि सर्व सुनें २

उचंबळे जें तुझे मनीं,
गुंग तुला टाकी करुनी,
तेंच खेळतें दिनरजनीं,
मित्रा, माझ्या नित्य मनीं.
त्याविण जगतीं
—दुःखें, खंती—
भरलीं भाती.
व्यर्थ त्याविणें हो जगणें;
प्रेमावांचुनि सर्व सुनें ३

प्रेम कुठें ? तें रानभर;
प्रेम खेळतें फुलांवर
गातें मंजुळ तें गाणें
जगतीं साऱ्या दिनरजनी !
कुणी बांधिलें
कुणी रोधिलें
नाहीं अडलें
तें फिरतें स्वच्छंदानें
प्रेमावांचुनि सर्व सुनें ४

प्रेमावांचुनि रान घर,
जाच मना दे घोरतर !
प्रेम जिथें तें कांतार
उघडें स्वर्गांचें द्वार !
ये तर गगनीं
जगीं हिंडुनी
आणूं शोधुनि,
त्यास आळवूं ये गाणें,
प्रेमावांचुनि सर्व सुनें ५

# गोफ

( चाल—आनंदी आनंद गडे )

सपाट मैदानावरतीं
मंद मंद वारे फिरती,
रम्य लतांचे कुंज किती !
त्यांत डोलती वृक्षतती;
पुष्पें सुंदर,
रम्य मनोहर
हसुनि परस्पर
गोफ खेळती प्रेमानें;
गोफाचें गाऊं गाणें. १

गोफ चालला बाळांचा,
प्रेमाचा, आनंदाचा;
वर्तुल फिरतो गोफ जसा,
फिरे भूमिचा गोल तसा;
चंद्र हासतो,
तारक डुलतो,
बालक बघतो,
टाळि वाजवी प्रेमानें;
गोफाचें गाऊं गाणें. २

ह्या टाळीला ताल धरा,
मंजुळ गाणें गात फिरा;
पाउल टाका संथ जसें
नभीं टाकितो चंद्र तसें;
गोफ रंगला,
बाळ दंगला,
डोलत वदला,
धरा हात, या, प्रेमानें
गोफाचें गाऊं गाणें ३

अन्य बालकें अन्य दिनीं
जाउन बघति त्या स्थानीं,
दिसलें मंडळ भूवरतीं
फुलें विखुरलीं रम्य किती.
ओळख पटली,
मनीं दाटलीं
सुखें बोललीं
चला ! सर्व या ! प्रेमानें
गोफाचें गाऊं गाणें ४

अनुक्रम ....१४७..
विभाग
क्रमांक
नों. दि.

## काळाचे लेख

ब्रह्मांडावरि नित्य नूतन अशीं चित्रें सुरम्यें किती
पंखांहीं अपुल्या विशाल लिहितो हा काळ दिव्यकृती;
संध्या आणि उषा, तसे रविशशी, नक्षत्र-तारांगण
दिव्यें दाखवितो अनंत असलीं आम्हांस रात्रंदिन १

त्यानें शांति नभीं गंभीर लिहिली, आम्हां न ती लाभते;
दिव्य प्रीती तयें जगीं पसरिली, आम्हीं तियेचीं भुतें;
विश्वाच्या हृदयांतल्या निवडुनी स्वर्गीय भावांप्रती
चित्रें रंगविलीं तयें, न कळती हा हंत आम्हांस तीं! २

" मातें स्वर्ग दुरावला " म्हणुनिया चित्तीं बिचारी कुढे
त्रस्ता दीन वसुंधरा बघुनिया व्योमस्थ तेजाकडे;
" स्वर्गाचें सगळेंच गूढ वसलें काळाचिया लेखनीं "
बोले विश्वसुनी " कधींतरि मला सांगेल कां तें कुणी ? "
काळाचीं जर हीं निगूढ लिखितें आम्हां कळालीं तरी
देवा रे ! वसुधा क्षणांत बनवूं प्रत्यक्ष स्वर्गांपरी.

---

## सुभाषित

वेली डोलत, वृक्ष हस्त पसरी आलिंगण्याला तिला,
गुंगे भ्रमर या सुमावरि गडे ! आस्वाद घे त्यांतला,
प्रीती निर्जन काननांत फुलली, कोठोनि आली तरी ?
बाळे ! प्रीतिस या समान गमते प्रासाद आणि दरी.

---

# प्रेमलेख

मघाचें करिं भूर्जपत्र धरुनी अस्ताचलीं प्रत्यहीं
स्वर्गीचे नव लेख कुंकुमरसें ती सांध्यदेवी लिही;
रात्रीं शांत गभीर अंबुनिधिच्या आनील पृष्ठावरी
लज्जालेख लिही विकंपित करें ती तारकासुंदरी;
श्यामा निर्झरिणी पुनःपुनरपी सारीत नीलांचला
मुग्धालेख सुरम्य सैकतिं लिही मंदोर्मिमालाकुला;
वेलींचें स्वकरें कराग्र धरुनी त्या मंदमंदानिलें
क्रीडालेख वनस्थलीहि लिहिती कांहींतरी आपुले.
हे सारे मधुलेख वेडुनि जगीं नाचोत वेडे कवि,
गावो गीतशतें तयांस, मजही त्यांची कळे थोरवी.
लज्जामुग्ध परी शिरःकमल तें ठेवून माझ्या उरीं
श्वासांच्या कवनीं लिही प्रियतमा ही प्रेमलेखावलि.
सारे ते मग लेख तुच्छ गमती चित्ताचिया लोचनीं,
तीचा अक्षय लेख एकच, उभा मी मग्न पारायणीं !

---

# सौंदर्याचा अभ्यास कर !

गाणें हें रचिलें असें जुळवुनी कोठून कांहींतरी,
वाणी सत्य तुझी असेल भरली द्वेषानलानें जरी,
रम्याकार चमत्कृतिप्रचुर हें ब्रह्मांड नेत्रीं दिसे,
खेळे कांहितरी तयांतुनि, मनीं गाणें तदा होतसे.
सूर्याचीं किरणें, सुनिर्मल तशा त्या तारकामालिका,
संध्येचे रमणीय रंग, उदयीं सृष्टी मनोहारिका,
वृक्ष श्यामल पुष्पसंकुल चलद्दूर्वादलाच्छादिता,
वाहे शांतपथा सुरम्य सरिता कल्लोलमालायुता;
प्रेमानें अभिषिक्त चित्र मग त्या रामण्यविश्वीं दिसे,
चित्ताची रमणीयता उतरुनी संगीत होतें तसें.
तें सौंदर्यच आणिलें जुळवुनी कोठून कांहींतरी,
तूंतें तें न दिसे म्हणून सखया, अभ्यास याचा करी.

# स्फुट श्लोक

झालों खिन्न निराश, पंथ न दिसे, भांबावलों चालतां,
भीति, त्रास, अनंत दुःख दिसलें चोहोंकडे पाहतां;
तों लाधे मज कायसें, दिसतसे आनंद आतां जनीं;
नाहीं क्लेश, न दुःख, भीति अथवा स्पर्शूं शके ना मनीं.
जीं रत्नें समजोनि विश्वपुलिनीं हर्षे अहो! वेचिलीं,
मानीं धन्य मनीं सदैव हृदयीं राखोनि जीं ठेविलीं;
झाली पारख हाय तींच ठरलीं हीं कांचखंडें अतां
हा दैवा!! दुबळ्या वृथैव मम ही गेली जगीं जीविता!

# काल आणि जीवित

गेले भंगुनि दुर्ग, दुर्गगिरिचीं गेलीं झरोनी शिरें,
गेले देश कितेक राख बनुनी संतप्त कालानलें.
होवोनी थरकांप, पेटुनि मनीं, ज्वालामुखें प्रत्यहीं
जें तें नश्वर! हाय! हाय! म्हणुनि निश्वास टाकी मही!
भूमीचा बडिवार काय तरि या, तो विश्वसाक्षी वरी,
कालव्याधशरें प्रतापनिधिही घायाळ हो अंतरीं;
शुक्राच्या शशिच्या कला स्मरुनि हो स्वर्देवतासुंदरी
भीतिग्रस्त खगोलनेत्र करुनी दिङ्मूढ वेड्यापरी!
काळाचा घनघोर उग्र वणवा दुर्वार्य ऐसा जरी
ब्रह्मांडांत प्रतिक्षणीं भडकुनी अस्वस्थ चित्ता करी,
चित्ताच्या परि नंदनांतिल पहा एकेक माझ्या कळी
स्वानंदांत डुलोनियां प्रगटवी स्वामित्व कालानलीं!
'जावो विश्व जळून, जीवित तुझें कालस्थलाबाधित,'
प्रीतीनें मज हा धडा शिकविला, हो शांति हस्तंगत!

# काळास

अंधकार मातला, वेष्टितसे भूतला,
शून्य मना खिन्नपणें सुखदायक जाहला.
झोंप न ये लोचनीं, शांतता न मन्मनीं,
दाहकता घोर भरे परि अंतरशोषिणी !
हा मारुत वाहतो, नेइल मज काय तो
काळ जिथें विगतचिंत विस्मरणीं नांदतो ?
तेजोमय चमकती दिव्य गोल हे किती !
त्यावरतीं असतिल किती देवलोक संप्रती !
मजलागीं बघूनियां येइल कां तयां दया ?
अमृतसेक करितिल शिरीं शांति मला द्यावया ?
सप्तलोक वेष्टुनी स्थिर बसली यामिनी,
देइल मज आणुनि ती शांतपणा कोठुनी ?
लपवूं दिग्वदनीं मुख होईल तरि मजला सुख ?
ये काळा, ध्यान तुझें मात्र मला लागलें !
मित्रपणा भेसुर हा काळकूट प्रेम महा !
मारिल मज म्हणुनि तुला वाहतसे बाळ हा !
विस्मृतिमधिं बुडवि जीव, तव हृदयीं हृदय ठेव
तूं आतां आप्त–जगा संबंधचि संपला !

# ज्योत

व्योमीं पाहुनि अरुणातें । दीप विझविला पटवातें ॥
मावळली ती वायूंत । तेजोमय दीपज्योत ॥ १ ॥

देहाला टाकुनि जाती । प्राण्यांचे आत्मे वरतीं ॥
त्यापरि टाकुनि धूमाला । दीपाचा आत्मा गेला ॥ २ ॥

अदृश्य जें जग त्याच्यांत । जाउनि ती विरली ज्योत ॥
गेली ! नाशाला गेली । नाहीं हो ! अक्षय झाली ॥ ३ ॥

वायूच्या उदरीं गेल्या । असंख्यात ज्योती असल्या ॥
स्वर्ग तोच, त्या बसतात । जेथें या अवकाशांत ॥ ४ ॥

देवाच्या छत्राखालें । संमेलन त्यांचें झालें ॥
पावित्र्याच्या त्या मूर्ती । दिसतिल का फिरुनी जगतीं ॥ ५ ॥

मूर्तच त्या होतील जरी । चकाकेल सृष्टी सगळी ॥
खरी दिवळी येईल । तेजोमय जग होईल ॥ ६ ॥

हाय ! परी होईल का तें । येतिल का ज्योती येथें ॥
रमल्या त्या स्वानंदांत । मर्त्य जगीं का येतात ? ॥ ७ ॥

निदान दर्शन बा वायो । आम्हांला त्यांचें होवो ॥
पाहूं दे तीं भांडारें । नेत्र भुकेले झाले रे ॥ ८ ॥

दिसतिल ते सारे तेथें । देशाचे अमुच्या नेते ॥
या विश्वाचे दीपक रे । असतिल तेथें बघूं बरें ॥ ९ ॥

दाविसी न मज कां वाता । जा नच तव पर्वा आतां ॥
देहदीप विझणारच हा । जाइन मीं मग तिथें अहा ॥ १० ॥

दिव्यपणा येईल मला । बघण्याला ज्योती विमला ॥
त्यांसह त्यांतच राहीन । स्वानंदीं होउनि लीन ॥ ११ ॥

# दोष व प्रीति

दोष असती जगतांत किती याचें
नसे मजला सामर्थ्य गणयाचें;
दोष माझा परि हाच मला वाटे,
दोष बघतां सप्रेम कसें दाटे ?
दोष असती जगतांत, असायाचे;
मला त्यांशीं तरी काय करायाचें ?
प्रेमगंगेच्या शुद्धसिंचनेंहि
शुद्ध होइ न जो, दोष असा नाहीं;
गड्या पूर्णा ! मज आस तुझी नाहीं.
सख्या न्यूना ! ये मार मिठी देहीं.
प्रीति, माझ्या हृदयांत करी वास.
न्यूनतेला पूर्णत्व द्यावयास !

---

# बीज

आहे बीज म्हणोनि आज तुजला चंद्रा ! बघोनी मनीं
माझीही भगिनी असेल नयनें माझ्याकडे लावुनी,
आला कंठ असेल दाटुनि तिचा, नाना मनीं भावना
येवोनी असतील त्या करितही दुःखी तियेच्या मना.
ताई, भाउ तुझाहि त्याच बघतो चंद्राकडे या क्षणीं;
आणोनी तव मूर्ति चित्तफलकीं उद्विग्न तोही मनीं.
काळें घोर दरी जरी पसरिली प्रेमामधें दुःखदा
प्रीतीनें परि एकरूपच असूं मी तूं पहा सर्वदा
घेवोनी करिं दीप, अक्षत तुवां चंद्राकडे फेकुनी,
भाऊ आज कुठें असेल म्हणतां जें होय तूझ्या मनीं,
तें तेथें; परि गे, क्षणीं मम मनीं नेत्रांतुनी धांवती
हे अश्रू तुज तेच घालित असें ओंवाळणी संप्रती.

---

# निजलेल्या मुलास

ऊठ मुला, ऊठ मुला, बघ हा अरुणोदय झाला !
नवरंगीं किरणांनीं भूषविली बघ ही अवनी.
मोदभरें रान भरे, मंद सुगंधातें विखरे.
शीतल हा वात पहा, आळस हरण्या येत अहा !
किलबिलती, बागडती, वृक्षांवरती पक्षि किती !
रव करिती भृंगतती, पुष्पांचा मकरंद पिती.
फुलांवरी, फळांवरी, पतंग मोदें मजा करी.
झट्कन् बसे, झट्कन् उठे, उंच भराऱ्या घेत सुटे.
आनंदें नभ कोंदे, हरुनि आळसा तरतरि दे.
पूर्वेला रवि आला, मुला उठाया कथित तुला.

---

# वसंत

वसंत आला । बाळा तुज रंजविण्याला.
वृक्षांवरि नव पल्लव आले,
लाल लाल वन दिसूं लागलें,
दिगंतरीं हिम दडोनि गेलें,
आम्रतरूला । मोहोर कसा बघ आला ! १

पुष्पित लतातरू हे होती,
दिशा सुगंधें भरोनि जाती,
गाणें भ्रमर मनोहर गाती,
शीतल वारा । श्रम दूर करी तव सारा. २

मधमाशा मधुसंचय करिती,
नभांत पक्षी स्वैर विहरती,
कोकिळ मंजुळ गायन गाती,
सुखकर झाला । हा वसंत सर्व जगाला. ३

# अंगाई—गीतें

१

बोल बाई बोल ग । तुझ्या बोलाचें काय वाणुं मोल ग ।
डोल बाई डोल ग । जाईजुईचीं लाख फुलें तोल ग ।
हांस बाई हांस ग । माझ्या अंगणीं माणिकांची रास ग ।
नीज बाई नीज ग । गाई अंगाई काऊचीऊ तूज ग । १

२

या बाई या । बकुळीच्या झाडाखालीं फुलं वेंचूं या ।
ऊन पडलें । पानफुल दिसें कसें गोडगोडुलें ।
गोडगोडुलें । मोतियाचे दाणे कोणीं खालीं पाडिले ? ।
रान हाललें । पहांटेला शुकदेव गाणें बोलले २

---

## चांदोबा मजला देई

आई आई । चांदोबा मजला देई.
धांवत धांवत देवा[1] दातो,
माध्या[2] मादें तोही येतो,
मी थांबे तल तोही थांबतो,
खेलत [3]लाही । चांदोबा मदशीं पाहीं १
मला [4]दली चांदोबा देथिल
ललायचा नाहीं मी पलभल[5]
त्याशी मी थेलेन दिवसभल,
देई आई । चांदोबा खेलन्या देई २
फोलायाचा नाहीं त्याला
तुददवली[6] देहून थेवायला[7]
पाहूं देशिल ना पन मदला ?
तो मी ताहीं[8] । देनाल तुनाला नाहीं ३

---

( १ जेव्हां २ माझ्यामागें ३ राही ४ जरी ५ पळभर ६ तुजजवळ ७ ठेवायला ८ कांहीं.)

# रागोबा आला

१

रागोबा आला, आला,
गडे आमुच्या ताईला,
फुगले ग फुगले गाल,
फुल झालें माझें लाल.
धांवुनि ही आली, आली;
गंगायमुनेसह खालीं.

२

ताई बाई सोनुकले,
तूं तल माझें फूल गले!
जा गे सगळ्या दूर चला.
राग फुलाला या आला
गेला, गेला राग अहा!
हंसली ताई, पहा पहा!

३

हंसली ग हंसली ताई,
हें फूलहि हंसलें बाई,
उनपाउस हीं एक गडे
एक ताईचें हंसें-रडें
राग ताइचा हारवला;
चला चला खेळायाला.

# चिव् चिव् चिव् ग चिमणूताई

( चालः—ताई गुणाची माझी छकुली, )

चिव् चिव् चिव् चिव् ग चिमणूताई,
ये ये आपुल्या बागांत बाई;
चिमणी आली, बाळ हासला,
टाळी वाजवी नाचूं लागला. १
टाळी वाजली, चिमणी उडाली,
भीऊन झाडांत कुठें दडाली;
बाळ म्हणतो " ये ये ग बाई, "
चिमणूताई आलीच नाहीं. २
एक वाऱ्याची झुळूक आली,
बागेंत फुलें डोलूं लागलीं,
लक्ष गेलें बाळाचें त्यांवर,
तेथें दिसला भुंगा सुंदर. ३
" भुंगोबा, आतां तूं तरि येथें
रहा चिमणी उडून जाते "
" गुं गुं गुं हो हो " भुंगा बोलला,
बाळाच्या मनीं आनंद झाला. ४
फुलें हुंगलीं, रस चाखला,
भुंगा उडोनि जाऊं लागला;
बाळ मारितो हांका त्याजला,
गेला तो गेला ! नाहींच आला. ५
" गड्या पतंगा, तूं तरी येई,
येथें बागेंत खेळत राही. "
पतंग आला, क्षण खेळला,
भुर्कन् उडोनी नाहींसा झाला. ६
बाळ लागला रडावयाला,
गेला आईला सांगावयाला;
आई म्हणे, " ये खेळूं आपण "
झोंप लागली बाळाला पण. ७

# वनमाला

काव्यरसाच्या गुंगींत गेलों एका रानांत,
कधिं न मिळे ती बघण्याला वनमाला दिसली मजला.
ही वनमाला
नको कुणाला
चुंबायाला ?
हास्य तिच्या गालीं चढलें तेंव्हां वच कवि हे बोले. १

कलिका सगळया घेऊन. माळ तयांची गुंफून.
कुणी ठेविली ही येथें ? मन्मन वेडे परि होतें ?
मुग्धपणाची
जणुं सौख्याची
आनंदाची
गोड गोड ही वनमाला तीच एकटी प्रेमाला. २

ईशाची दावी लीला देई कविते, स्फूर्तीला
वायु तिजसवें नृत्य करी भृंग तियेचा हात धरी.
तुजसह जीवित
जावें वाटत.
आशा दाटत,
प्रेमाची तूं खाण गडे, गोड गोड तूं गोड गडे ! ३

वनमाला ही पाहून नेत्राचें सार्थक जाण.
जन्मभरी गाइन तिजला, कशी स्थिती येवो मजला.
त्या कालाची
त्या प्रेमाची,
त्या भेटीची,
स्मृतिही राहिल वनमाले ! जीवित शुष्क जरी झालें. ४

जें नाहीं तें दाखविलें, प्रेमरूप तूं मज केलें ?
ठायीं एक्या तूं वससी, अणुरेणुमधीं मज दिससी;
तरि मी गावें,
तुला हसावें,
ममत्व न्यावें,
परि नच जगतीं ? एक भृंग गाइल कीर्ती. ५

बोल एकदां वनमाले ! ना तरि प्राण लया गेले.
अमृतबिंदूवर्षाव कर तूं, दे कवि नवजीव.
बोल हाटले,
गाणें नुरलें,
प्रेमच दिसलें,
म्हणेन प्रेमाची खाण ना तर जीवच नादान. ६

---

## घोडा घोडा

घोडा घोडा खेळु चला रे । मौज घडीभर करूं चला.
घोडे शंकर विठू करा,
लगाम हातीं कुणी धरा,
दोरीचा चाबूक करा,
हां ! तर आतां पळा चला रे, घोडा घोडा. १

भले मुलांनों बसा जरा,
चित्त आपुलें शांत करा,
धांवत जाउं पुन्हा झरा रे, घोडा घोडा २

गेलीं धांवत मुलें घरीं,
गंमत झाली घडीभरी,
आनंदहि चित्ता झाला रे घोडा घोडा. ३

# माधा भाऊ

पाहत लाहूं–गोदिला ग माधा भाऊ.
कँवा हंथतो, कँवा ललतो,
हात पहा हा कथे हलवितो ।
घेतो कांहीं, ताकुनि देतो,
माधा भाऊ–गाने का तुदला गाऊं ? १

बाहुलि का खेळाया व्हावी ?
लबाड कांहीं बोलत नाहीं;
हाथत हाथत कैथा पाही ।
माधा भाऊ–तुद कलेवली का घेऊं ? २

पहा कथा हा भाई, हथतो,
माधे केथ कथे बघ धलितो,
लागलीच मग थोलुनि देतो,
तल ले भाऊ–खेलन्याथ आपन दाऊं. ३

---

# चिमणीचा घरटा चोरिस गेला

चिंव् चिंव् चिंव् रे । तिकडे तूं कोण रे ?
'कावळे दादा, कावळे दादा, माझा घरटा नेलास, बाबा ?'
'नाहीं ग बाई, चिमुताई, तुझा घरटा कोण नेई ?
'कपिला मावशी, कपिला मावशी, घरटें मोडून तूं कां जाशी ?'
'नाहीं ग बाई, मोडीन कशी ? मउ गवत दिलें तुशीं ॥'
'कोंबडी ताई, कोंबडी ताई, माझा घरटा पाहिलास बाई ?'
'नाहीं ग बाई, मुळीं नाहीं तुझा माझा संबंध कांहीं'
'आतां बाई पाहूं कुठें ? जाउं कुठें ? राहूं कुठें ?'
'गरीब बिचाऱ्या चिमणीला सगळे टपले छळण्याला'

चिमणीला मग पोपट बोले ‘ कां गे तुझे डोळे ओले ? ’
‘ काय सांगूं बाबा, तुला ? माझा घरटा कोणी नेला ?
‘ चिमूताई, चिमूताई, माझ्या पिंजऱ्यांत येतेस, बाई ? ’
‘ पिंजरा किती छान माझा ! सगळा शीण जाईल तुझा ’
‘ जळो तुझा पिंजरा मेला ! त्याचें नांव नको मला ! ”
‘ राहीन मी घरट्याविना ’ चिमणी उडून गेली राना.

---

## माझा भारत

अंधारामधुनी प्रकाशकिरणें चैतन्य वाहोनिया
आणी भूमिवरी, अपार गमली सर्वेश्वराची दया;
माझा भारत एकलाचि तिजला हा पारखा जाहला,
शंका ये तुजला अशी तरि कशी आश्चर्य वाटे मला ! १

आहे हा हतभाग्य दीनदुबळा संत्रस्त दुःखी जरी,
दारिद्र्यें जरि अस्थिपंजर उरे त्या तच्छरीरावरी,
त्याला पाहुनिया भिऊन दुसरे कोणी पळाले दुरी,
या दुःखीं परि प्रीति वाढत असे माझी तरी त्यावरी. २

आहे देव विभागिला सकल या विश्वांत चोहींकडे,
तो माझ्या हृदयांतरीं वसुनिया हे शब्द बोले पुढें,
‘ नाहीं भारत दीन दुर्बल जरी माझा मला अप्रिय,
मी न्यायप्रिय देव वारिन पहा आतां तयाचें भय ! ’

## पाळणा

निज रे निज बाळा, लडिवाळा, हालविते हिंदोळा.
आणुं नको चित्तीं, क्षणही ती, नश्वर संशयभीति.
चंचल निमिषाचें, मोहन तें, सुंदर म्हणती ज्यातें,
फसवुनियां तूंतें, जाइल तें, अक्षय वा दुःखातें.
आशा हृदयाच्या, जरि दिसती, दुरून सोज्वलकांति,
धरितां परि हातीं, हो माती, सोडुन दे ती भ्रांति.
काळा नच कांहीं, ठाउक ती, थोर तुझी विख्याति.
निंदास्तुति सारी, सोडुन दे, निज निज परमानंदें.
झोंपेमधिं कांहीं, भयदायी, स्वप्न न सजणा पाहीं.
सुखदुःखें चिंता, निभ्रांता, भिववितिं न तुला आतां.

---

## भिकारी

किनरीवाला—दारांत भिकारी आला ॥ ध्रु० ॥
मंजुळ सुंदर किनरी त्याची,
प्रेमरसाची आनंदाची,
लकेर घेई किति मौजेची
मोहविण्याला ! १
सुखदुःखाची चाड न याला,
मीतूंपण हा विसरुन गेला,
नसे जगाची परवा ह्याला
उद्धत झाला ! २
काळ्या काळ्या घन अंधारीं,
किंवा खरतर घोर दुपारीं
काढित बसतो मंद लकेरी
भुलवि जगाला. ३

वनामध्यें वा जनांत किंवा
गिरिशिखरीं प्रासादीं अथवा,
सुनील गगनीं दिशांमधें वा
बंध न याला ! ४
समान सर्वां भूतीं पाहे,
प्रेमें बांधी विश्व सर्व हें,
समाधानरत सदैव राहे,
क्लेश न याला ! ५
लतिकांवरतीं फुलें पहातो,
बघतो, हसतो, मोहुनि जातो,
गान आपुलें सर्वेचि गातो,
गुंगुनि गेला ! ६
समतेचें या वेड लागलें,
भेदाभेद पळोनी गेले,
म्हणोनि चाळे असले सुचले
ह्या वेड्याला ! ७

---

# गवताचें गाणें

परस्पराकंठीं हात घालुनिया बसलों गात
ऐको ना ऐको कोणी हीं आमुचीं वेडीं गाणीं
उच्छृंखल ओढा चाले, उच्छृंखल मारुत डोले,
उच्छृंखल अभ्रें झालीं, उच्छृंखल अमुची बोली.
अर्थ तयाचा कुणा जरी कळे न, परवा काय तरी ?
ज्ञान असो अज्ञानच हें गोड अम्हां अमुचें आहे.

*　*　*　*

स्वर्गांतुनि आली आई, मंजुरवें आम्हां बाही.
ती वदली " लाला लाला " या या रे नाचायाला.
वारापाउस ऊन गडे नाचनाचती स्वैर पुढें.
पंख पांखुचे तुम्हींहि ते या उडवित येथें तेथें.
या जननीवचनीं धालों, नाचत वर आलों आलों.

*　*　*　*

पवनाच्या आंदोलांत देवदूत होते गात.
आलिंगुनि आम्हांला तें हालविती गद्गद हातें.
परस्परां चुंबित जावें, नाचावें, मंजुळ गावें;
झोंक्यावर झोंके घ्यावे, सृष्टीशीं समरस व्हावें.

*　*　*　*

उंच कड्यावरतीं कोणी प्रेमाचीं बसवी ठाणीं.
खोल दरी अंधारांत तेथेंही कोणी झुलत,
एक परी अमुचें गीत. सर्वांचें एकच चित्त.
द्वैताला ठावच नाहीं, प्रेम दिसे ज्या त्या ठायीं.
प्रेम बनुन जीवेंभावें प्रेमाला शोधित जावें.

# जीर्ण दुर्ग

दुर्ग भयंकर जीर्ण पसरला पुढतीं, जो [१]गतकालीं
शूर साहसी नरसिंहांनीं अपुली वसती केली.
कड्याकड्यांमधिं घुमुनि नर्मदा गात यशोमय गीतें
सांगत होती सर्व देशभर सद्यःकर्तव्यातें.
रंगमहालीं शेज फुलांची याच गडावर झाली,
स्वातंत्र्यास्तव अग्नि भडकला–राख तयाची केली.
तरवारीची धार देवता हीच जयांची एक,
ब्रीद जयाचें सदा तियेला रुधिराचा अभिषेक.
जीव नव्हे संसार ओपिला स्वातंत्र्यास्तव ज्यांनीं,
त्या वीरांचा वास जाहला गतकालीं या स्थानीं.
आतां कोणी क्षुद्र पुजारी देविस पूजायातें
घालित बसतो कुंकुमपूरित चंदन अपुल्या हस्तें.
आणि पिवोनी भांग दुखारी झिंगत वदतो कांहीं
पूर्वकथा निर्विकार चित्तें...हर्षित दोन पयांहीं.
हे काळाचे खेळ, कुठेंही असेच चालायाचे,
त्यास कशाला परि आम्हाला कांहिं न वाटे त्याचें.
एक खुराडें–भाड्याचें तें–राहूं त्यांत खुशाल
क्षुद्र जिवांना अम्हां कशाला असले रंगमहाल !

# जादुगारीण

दे दे सोडुनि ही, लाज गडे, चुंबुनि लाडेंकोडें.
धर मज कवळोनी, करपाशीं, स्निग्ध तुझ्या हृदयाशीं !
मोहनमालेच्या, बालेच्या, गोड कळ्या गालींच्या,
फुलल्या मन्नयनीं, तद्‌गंधें, अननुभूत आनंदें.
घेउनि शिथिलपण, निस्राण, होउनि पंचप्राण,
झिंगुनिया काया, कलली ही, सांवर गे धर हृदयीं !

*    *    *    *

मधु मंद श्वास, फुंकोनी, मृदुल मधुर अधरांनीं,
झांपड जादूची, मन्नयनीं; जादुगारिणी आणी !
झांकळुनी प्राण, धुंदिगण ( ? ) भरुनि जीव बेभान—
होता मग नयनीं,...रमणी, मोहर मूक मुक्यांनीं !

*    *    *    *

बंदा दास तुझा, हा असला, दगडाचा घडलेला.
पुतळी जादूची, बनतांची, जीवकळा मग त्याची—
सोडुनि मातीला, अचलीला, तुझ्या हृदयज्योतींला,
पाहुनिया गिरक्या, घेइल ती, तुझ्याच भंवतींभंवतीं !

*    *    *    *

जादूची झोंप, ही असली, देहमनीं जरि ठसली,
गुंगत परि जीव, नव दृष्टी, बघतिल अद्‌भुत सृष्टि,
तुझिया श्वासांच्या भंवतालीं मधुर नयनकरजालीं

अपूर्ण

# तूं तर चाफेकळी

" गर्द सभोंतीं रान साजणी तूं तर चाफेकळी !
काय हरवलें सांग शोधिसी या यमुनेच्या जळीं ? "
ती वनमाला म्हणे " नृपाळा, हें तर माझें घर;
पाहत बसतें मी तर येथें जललहरी सुंदर.
हरिणी माझी, तिला आवडे फारच माझा गळा;
मैना माझी गोड बोलते, तिजला माझा लळा.
घेउनि हातीं गोड तिला त्या कुरणावरतीं फिरे—
भाऊ माझा, मंजुळवाणें गाणें न कधीं विरे. "
" रात्रीचे वनदेव पाहुनी भुलतिल रमणी ! तुला;
तूं वनराणी, दिसे न भुवनीं तुझिया रूपा तुला.
तव अधरावर मंजुळ गाणीं ठसलीं कसलीं तरी;
तव नयनीं या, प्रेमदेवता धार विखारी भरी !
क्रीडांगण जणुं चंचल सुंदर भाल तुझें हें गडे,
भुरु भुरु त्यावर नाचत सुंदर कुंतल कुरळा उडे.
अर्धस्मित तव मंद मोहने, पसरे गालावरी;
भुललें तुजला हृदय साजणी, ये चल माझ्या घरीं. "

* * * *

सांज सकाळीं हिमवंतीचे सुंदर मोतीं घडे;
हात लावितां परि नरनाथा तें तर खालीं पडे.
ती वनबाला म्हणे नृपाळा सुंदर मी हो खरी,—

अपूर्ण

# प्रीति हवी तर

प्रीति हवी तर जीव आधि कर अपुला कुरबान;
प्रीति हवी तर तळहातावर घे कापुनि मान !
तलवारीची धार नागिणी लसलसती प्रीत,
याद ठेव अंगार जगाला लाविल निमिषांत !
प्रीति निर्मिली तुला वाटतें का दुबळ्यासाठीं ?
प्रीतिदेवि जगदेकवीर जो जाय तयापाठीं !
नव्हे प्रीतिला रंग लाविला लाल गुलाबांचा,
परि रुधिराचा, धडधडणाऱ्या जळत्या जीवाचा.
गुल गुल बोले प्रीति काय ती ? काय महालांत ?
प्रीति बोलते काळ घालितां कलिजाला हात !
स्त्रैणपणाच्या चार भावना नच पचती ज्याला
हीन जिवानें घेउं नये त्या[1] हा जहरी प्याला !
सह्य जिवाला होय जाहला जरि विद्युत्पात,
परी प्रीतिचा घात भयंकर दुसरा कल्पांत !
जीवंतपणीं मरण घेउनी फिरणें जगतांत;
सांठविली ब्रह्मांडदाहिनी दाहकता यांत !

---

१ त्या जहरी प्याल्याला.

# प्रीति व कर्तव्य

प्रीतीचा पथ हा भयाकुल दिसे, सौंदर्य–सौदामिनी
डोळ्यांना क्षण तेज दाखवुनिया अस्तंगता हो क्षणीं;
चित्तांमाजि विकारसिंधु खवळे चांचल्य जीवीं भरे,
नेत्रांतून उदास तेज जगतीं वेड्यापरी वावरे. १

वरतीं हा ग्रहगोल शांत, वरतीं हा चंद्रमा मंगल,
तैसें नील गंभीर हें गगनही निश्चिंत उर्वीतल.
पाहोनी असला विरोध जगतीं चिद्वृत्ति हो घाबरी.
देवा पाप तरी असेल कुठचें ? मी खिन्न कां यापरी ? २

कोठें जाउं कसें करूं मज विभो, कर्तव्य कैसें कळे ?
आलें तें समजूनही तरि पुन्हां हें चित्त कैसें वळे ?
माझ्यामाजिंच शत्रु घोर बसले माझा कराया वध;
कर्तव्यास बघूं टपून बसुं कीं यांच्यावरी सावध ? ३

गेला तास निघूनिया दिवसही याच क्रमें जातसे,
गेले मासहि, वर्षही निघुनिया, सार्थक्य कांहीं नसे;
खा, पी, नीज पुन्हा असेंच करितां आनंद नाहीं पुन्हा;
चित्तामाजिं सदैव टोचित वसे कर्तव्य ही भावना. ४

डोकें जाय विचार एक करुनी चित्तीं दुजें तोंच ये;
चित्ताचा पगडा विशेष; बळ तें बुद्धीबळाला न ये.
त्या योगें परि जीव हा निशिदिनीं ठेंचाळतो सारखा;
साऱ्या हाय ! सुखास होउन बसे मी माझिया पारखा ! ५

अपूर्ण

# प्रेमाचा पहिला भास

जरि धूप जळत अनलांत । वाऱ्यावर भरतो वास;
जरि देह शिजे दुःखांत । परि सुटका आज मनास.
मन्मानसराजसहंसी । अवतरली स्त्रीरूपानें,
सौंदर्य हृदंगम ज्योती । पाजळते दिव्यत्वानें.
जा, प्रेमदेवते जा जा । बंदिस्त तुझ्या दासानें
तव पुण्यदर्शनें केलें । निमिषांत जिवाचें सोनें.
देहाचा दास मरून । प्रेमाचा उरला जीव;
प्रेमांतच झाला सारा । विश्वाचा अंतर्भाव.
तारुण्यमदाचा श्वास । प्रेमाचा पहिला भास,
मुग्धेचें मोहन तेंही । याहूनि मनोहर नाहीं.
नवरागरक्तिमा रांगे । रविरंजित रजनीवरतीं.

---

# वैष्णव–धर्म

विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म
संतजनीं वर्म सांगितलें.
तयांचें भजन घडो अहर्निश
माझ्या मीपणास आग लागो.
पर–उपकारीं वेंचो सर्व शक्ति
हेचि माझी भक्ति पामराची.
सर्व ही आघात येवो मजवरी
सुखी राहो परी देव माझा.
नको स्वर्गवास जनधनकीर्ति
प्रेमाची संपत्ति प्रेमरूप.

---

# पाऊस

थबथबली, ओथंबुनि खालीं आली,
जलदाली मज दिसली सायंकालीं.
रंगहि ते नच येती वर्णायातें !
सुंदरता मम त्यांची भुलवी चित्ता.
व्योमपटीं जलदांची झाली दाटी;
कृष्ण कुणी काजळिच्या शिखरावाणी,
नील कुणी इन्द्रमण्याच्या कान्तिहुनि,
गोकर्णी मिश्र जांभळे तसे कुणी;
तेजांत धूमाचे उठती स्रोत,
चकमकती पांडुरही त्यापरिस किती !
जणुं ठेवी माल भरुनि वर्षादेवी
आणुनिया दिगंतराहुनि या ठाया !
कोठारी यावरला दिसतो न परी.
पाहुनि तें मग मारुत शिरतो तेथें;
त्याहळुनी नाहिं बघत दुसरें कोणी
मग हातें अस्ताव्यस्त करी त्यातें.
मधु मोतीं भूवरतीं भराभर ओती !

## तेजोवींणेची रागदारी

निजला होता क्षीरसागरीं परेश विश्वंभर;
निजलें होतें विश्व धुंदिनें, धुंद दिसे अंबर.
जागी होती दिव्य देवता एक मात्र ब्याक्षणीं;
छेडुं लागली रागदारि मग तेजोवीणेंतुनि.
सकंप रव तो ब्रह्मकपाटीं मंद घुमूं लागला;
हळूं हळूं ये नवी चेतना दिव्य विश्वमंडला[1].
निशेंत विरला तमःप्रसर, ती लीन रवीच्या करीं,
रविकर होती लीन अंबरीं, अंबर परमेश्वरीं.
परेश तोही लीन जाहला या गाण्याभीतरीं;
तो गाण्याचा सूर सांठला वसुधेच्या अंतरीं.
आला, आला, आला गडि हो जगासंगतीं कवि;
आला, आला देव, तयाही आदिशक्ति जागवी.
करूं चला जयघोष तियेचा पहिला मानच तिला,
उदो उदो सौंदर्यदेवते, विश्वगोल बोलला.

---

## दुबळी भूल

जळ काळें काळें हंसे, भयानक दिसे, सहज बघशील,
तर दिसेल तुजला तुझीच दुबळी भूल.
यक्षिणी, देवता कुणी, कपारींतुनी,
घोर घुमतील
हे काय बोलते बोल, भावडी भूल.

..............................

नको म्हणुं कांहीं,
बघ हिरवा मांडव मजवर होइल बाई.

---

१ विश्वमंगला.

दुरदूर माय चालली, बाळ परतली,
भरे हुरहूर,
तिज उदासवाणें—दिसतें सगळें दूर.
भावांनिं घेतलें पुढें, नको रडुं गडे,
घालुं ये चुडे
तुझ्या हातांत;
तुज आवडतोना ? आज करूं दहिभात.
लोभाचा भरला पूर, विखारी घोर,
भरे महापूर,
लोपली माया,
ते विखार पिवळे लागति त्यास दिसाया.
दारांत बहिण भेटली, भीति वाटली,
चरकला भारी,
परि पुन्हां घनाची आली लहर विखारी.
ऐकून माय घाबरे, निघाली त्वरें
आडवी येई,
वेल्हाळ लाडकी चिमणी सोनाबाई !
तुज रानांनीं बाहिलें, काल सोनुले,
राजबागांत,
जा, भिऊं नको, मी तुला जोडितें हात.

---

ज्या कागदावरून ही कविता बाडांत उतरून घेतली त्यावरच ती अतिशय पुसट असल्यामुळें कशीतरी लिहून घेतली आहे. ( तसें बाडांत नमूद केलें आहे ) तसें करतांना या कवितेचा कांहीं भाग ( निदान कांहीं ओळी ) न लागल्यामुळें वगळला गेला असावा; पण त्यामुळें कविता बरीच दुर्बोध झाली आहे.—**संपादक**

## उदासीनता

कोठुनि येते मला कळेना
उदासीनता ही हृदयाला.
काय बोंचतें तें समजेना
हृदयाच्या अंतर्हृदयाला.
येथें नाहीं तेथें नाहीं,
काय पाहिजे मिळवायाला ?
कुणीकडे हा झुकतो वारा ?
हांका मारी जीव कुणाला ?
मुक्या मनाचे मुके बोल हे
घरे पाडिती पण हृदयाला.
तीव्र वेदना करिती, परि ती
दिव्य औषधी कसली त्याला !

---

## भटकणें

सर्व जगानें मला टाकिलें म्हणून धरिलें तुला;
तुझ्याच भजनीं तुझ्याच चरणीं जीवभाव वाहिला.
तुझ्याजवळ मी कशी देवते, प्रेमयाचना करूं ?
हा गवताहुनि दीन दास तव, दूर नको परि धरूं.
थोर थोर नर नित्य वांछिती तुझें कृपावीक्षण,
तव चरणाच्या धूळिं लोभलें दुबळें माझें मन.
तव हाताचा गोड जाहला स्पर्श मला जेधवां,
तुझिया भजनीं मात्र वाहिलें तेव्हांपासुनि जिवा.
गेला भडकुन राही जाउन वनस्मशानीं जरी,
या गगनाची शपथ, लोचनीं तुझीच मूर्ती परी.
निराश झालों बघुनि सभोंतीं पर्वतमाला जरी,
रडत बैसलों बाळपणींही तुझ्याच नांवें तरी.

परदेशामधिं दिवस कंठिले, सौख्य सर्व टाकिलें;
आशा कीं मज दिसतिल कोठें रम्य तुझीं पाउलें.
मैदानावर खुळ्या पिशापरि भटकत फिरलों किती !
किति लोटली रात्र तयाची नाहीं हृदया क्षिती.
किति हृदयाची तीव्र वेदना तुजसाठीं सोशितों !
परि अजुनी तूं दूर किती वद पथ दुःखद वाटतो.

अपूर्ण

---

# निराशा

रात्र संपली, दिवसहि गेले,
अंधपणा ये फिरुनि धरेला,
खिन्न निराशा परि हृदयाला—या सोडित नाहीं.
नित्यापरि रविकिरणें देती
रंग मनोहर सांध्यमुखीं तीं,
खळबळ ओढा गुंगत गीती—राईंतुनि वाहे.
सुंदर सगळें, मोहक सगळें,
खिन्नपणा परि मनिंचा न गळे,
नुसती हुरहुर होय जिवाला—कां न कळे कांहीं !
चंद्रबिंब धरि अभिनव कांती,
मेघ तयांनीं धवलित होती,
परि हृदयीं नैराश्यकालिमा—मम खंडत नाहीं !
भोंवऱ्यांत जणुं पडलों कोठें,
स्वप्न भयंकर दिसतें वाटे,
जीवित केवळ करुणासंकुल—नैराश्यें होई !

अपूर्ण

# पारवा

भिंत, खचली, कलथून खांब गेला,
जुनी पडकी उद्ध्वस्त धर्मशाला;
तिच्या कौलारीं बसुनि पारवा तो
खिन्न नीरस एकांतगीत गातो.
सूर्य मध्यान्हीं नभीं उभा राहे,
घार मंडळ त्याभंवतिं घालिताहे,
पक्षि पानांच्या शांत सावल्यांत
सुखें साखरझोपेंत पेंगतात.
तुला नाहीं परि हौस उडायाची,
गोड हिरव्या झुबक्यांत दडायाची,
उष्ण झळया बाहेर तापतात.
गीतनिद्रा तव शांत अखंडीत.
चित्त किंवा तव कोंवळया विखारें
दुखतखुपतें का सांग, सांग बा रे !
तुला कांहीं जगतांत नको मान ?
गोड गावें मग भान हें कुठून ?
झोंप सौख्यानंदांत मानवाची
पुरी क्षणही कोठून टिकायाची ?
दुःखनिद्रें निद्रिस्त बुद्धराज
करुणगीतें घुमवीत जगीं आज.
दुःखनिद्रा ती आज तुला लागे;
तुझें जगही निद्रिस्त तुझ्या संगें.
फिरे माझ्या जगतांत उष्ण वारें,
तुला त्याचें भानही नसे बा रे !

अपूर्ण

## खेड्यांतील रात्र

त्या उजाड माळावरती
बुरुजाच्या पडल्या भिंती;
ओसाड देवळापुढतीं
वडाचा पार—अंधार दाटला तेथ भरे भरपूर.
ओढ्यांत भालु ओरडती,
वाऱ्यांत भुतें बडबडती,
डोहांत सांवल्या पडती
काळ्या शार—त्या गर्द जाळिमधिं रात देत हुंकार.
भररानीं काकस्थानीं
उठतात ज्वाळ भडकोनी,
अस्मान मिळालें धरणीं,
खार ना पार—अवकाळ रात्रिचा प्रहर घुमे तो घोर.

---

## प्रतापसिंह

हा अंतःकलहाग्नि घोर पडला, पृष्ठें जळालीं किती !
रक्ताचे ठिपके भयंकर निजद्वेषें किती माजती !
स्वार्थाचें अति तीव्र खड्ग पडुनि, चित्रें किती कापिलीं !
झालीं कृष्णकभिन्न दैवलिखितें, ही स्त्रैणता हो बळी.
क्रुद्धा ग्रंथसमीक्षणीं भरतभू हुंकार फोडी बळें,
गेला पेटुनि विंध्यपर्वत पहा तद्दिव्यघोषानलें !
विश्वेशप्रिय विश्वधूरि—असुरां दुर्दांत निर्दाळुनी
दिव्यात्मे निजले तयावर तया चैतन्य ये त्या क्षणीं.
झाले ते रजपूत पूत करण्या दिव्यध्वजा भारतीं
तो निर्घोष प्रतापसिंह अमुचा मार्तंड चंडाकृति !

अपूर्ण

---

## —ला

दुर्धर करुणा तीव्र वेदना मनास माझ्या दंश करी;
काळिज फुटतें, रक्त गोठतें, वीजहि त्याहुनि फार बरी ?
जीव येवुनी थिजल्या नयनीं शून्य दिगंतीं खिन्न मनें,
वण वण बघतां, हाय ! अवचिता मूर्ति तुझी.....

अपूर्ण

---

## कवीची इच्छा

जगाचे बंध कोणाला—जगाला बांधला त्याला;
मला जो थांबवी ऐसा—जगीं निर्बंध ये कैसा ?
जगानें देह हा केला—जगाला वाहिलें त्याला;
हणा मारा खुडा तोडा—परी आतां मला सोडा.
न कीर्तीला, न प्रेमाला—न सौख्याला, विलासाला,
न विघ्नाला, न मृत्यूला—मला ये आडवायाला ?
वृथा या वाहणें चिंता—वृथा अश्रू, वृथा ममता;
वृथा निःश्वासमालाही—मला जी थांबवीना ही.
पुरे संबंध प्रेमाचा—नको हा खेळ प्रेमाचा
खरा जो प्रीतिचा प्याला—जगीं प्याला, सुखी झाला.

अपूर्ण

# दौलतरावांची मंजुळा

नाकीं डोळीं चित्र बाहुली देवानें केली,
हतदैवानें लिहुन ठेविलें काय परी भालीं ![1]
येउनिया मागून ठेवुनी खांद्यावेर हात,
करुणावदनीं धाउन माला मोत्यांची येत.
वाहूं दे ती मंगलमाया अशीच वाहूं दे;
अश्रुपुरानें या करुणेच्या जग हें न्हाऊं दे.
मिळेल वैभव दिसतिल जगतीं रत्नांच्या राशी;
अश्रु दयामय, मृत्युजगीं या मोल नसे त्यांसी.
मिळतिल कवनें, मिळतिल दुर्मिळ तत्त्वांचे बोल;
दिव्य अश्रुंनों ! तुम्हांपुढें परि ते सगळे फोल.
दिव्य तारका दूर राहिल्या त्या स्वर्लोकांत;
दिव्य अश्रु परि शुद्ध मनाचे त्यांहुनि निभ्रांत.
अमृताचा वर्षाव जगीं जरि केला जलदांनीं
तृषा न जाइल शोकदग्ध या अवनीची त्यांनीं.
प्रतिजीवाला अखिल जगाला एक सुधा व्हावी,
अंतःकरणीं ओतितसे जी दिव्य दया देवी.
गंगायमुना शुद्ध दयामय अश्रूंची जेव्हां,
त्या गंगेच्या पुण्यदर्शनें नर तरतिल तेव्हां.
परजीवास्तव जेथ आंतडें कळवळुनी येई,
त्या हृदयाविण स्वर्ग दुजा या ब्रह्मांडीं नाहीं.
स्वर्ग हवा का ? देव हवा का ? ये तर मग येथ;
मलूल अपुलें बनव गड्या, या बालेसम[2] चित्त.

* * * *

---

१ यापुढील कांहीं ओळी गहाळ झाल्या असाव्यात असें तिसऱ्या ओळीवरून वाटतें. —संपादक

२ बाळासम.

राजस बाळा बाळ मंजुळा दौलतरावांची
पोर पोरकी एक राहिली थकल्या जीवाची.
बरोबरीचे पुत्र लाडके जीवाहुनि फार,
एकामागुनि एक लोपले समरीं रणशूर.
तुटे तटतटा हृदय लागला जीवावर घाय;
झुरून पांजर माय तयांची त्यांमागुनि जाय.
दुर्धर दुःखें देह खचाया काळमुखीं लागे;
एकच दुबळा पाश ओढितो त्यास पुन्हां मागें.
परलोकींचें स्वप्न मनाच्या नयनावर येतें;
जागेपणचें चित्र मंजुळा परि उघडी येथें !
अखंड चिंताव्यवधानांच्या जीव बुडे डोहीं,
डोळ्यांपुढची बाळ मंजुळा परि हालत नाहीं.
तीव्र विषारी रोग पोखरी आंतुन वृक्षाला,
बाळकळीला सहज ज्यामुळें म्लानपणा आला.
दुःख रेखितें सान जिवावर जी करुणा कांहीं,
काव्यलेखनीं चित्रदर्शनीं ती दिसणें नाहीं.
भोळा हृदयीं भाव दाटला, बाही देवाला;
मूकरोदनीं अभागिनीचा नच लागे डोळा.
जीर्ण पसरले हात, उराशीं धरिलें तनयेला;
डोकीवरुनी कुरवाळित कर पाठीवर नेला.
थिजली आशा, जीव गोठल्या नयनांतुनि पाही;
शून्य भविष्यें विकल चेतना करुणाकुल होई.
सरली माया, लोचन मिटले, शांतपणा आला;
एकच झटका क्षीण कलेवर गळलें भूमीला.

* * *

नश्वर जग हें, नश्वर अमुचे मायेचे पाश,
क्षणीं तोडुनि काळ तटतटा फेंकुनि दे त्यांस.
वैभव गेलें, नांव निमालें, बुडलें घरदार;
फिरला नांगर ओस जाहला भरला संसार.

स्वप्नमात्र हा क्षणिक पसारा, मायेचा भास;
सत्य बोल हे परि न शांतता देतिल जीवास.

*　　*　　*

अनाथ बाला पोर मंजुळा केवळ अज्ञान,
भूमि फाटली तिला वाटलें तुटलें अस्मान !
धार लागली जी ममतेच्या रुधिराची जीवा,
मायेचें जग ओस कुणाला दाविल ती देवा.
कालवतें ब्रह्मांड मनीं, घर खायाला येतें,
निजेल कैसी पोर मंजुळा कुणि सांगा येथें ?

अपूर्ण

---

## मोहिनी

### [ ताराराणी ]

( या पद्यपंक्ति एखाद्या खंडकाव्याच्या आरंभींच्या असाव्यात, कथानायिकेवरून नांव द्यावें, तर तें या पद्यपंक्तींत आढळत नाहीं. चवदाव्या ओळींतील 'मोहिनी' हें त्या कथानायिकेचें तर नांव नसेल ना ? —संपादक )

या शुभ्र विरल अभ्रांचें । शशिभंवतीं नर्तन चाले,
गंभीर धवळली रजनी । बेभान पवनही डोले;
तंद्रींतच अर्धीमुर्धी । लुकलुकते ताराराणी,
ये झुंजुमुंजु[1] तेजानें । पूर्वेवर पिवळें पाणी;
निस्पंद मंद घटिका ती । अंधुकता धुंद भरीत,
ब्रह्मांडमंदिरीं गाई । सौभाग्यसुभग संगीत.

*　　*　　*

निद्रिस्त नील वनमाला । निद्रिस्त सरोवर खालीं,
वर मूक मोहनें जैसीं । शशिकिरणें विरघळलेलीं;

---

१ मंजु मंजु.

इवलाच अधर हलवून । जल मंद सोडितें श्वास;
इवलाच वेल लववून । घे नीज पुन्हां पवनास.
निश्चिंत शांति–देवीचा । किंचितसा अंचल हाले;
रोमांच कपोलीं भरती । कुंजांत कोकिला बोले.

*        *        *        *

घननील लतावलयांत । हिमधवल शिलातलभागीं
चमकून मोहिनी झाली । जणुं कुंजगुंजनें जागी.
सौंदर्यभरीं भरलेलें । तारुण्य चढे रंगास,
अलवार कोंवळें अंग । जशि काय फुलांची मूस.
धरि आम्रमंजरी कानीं । हातांत जुईची वेणी,
कंठांत मालतीमाला । माधवीच भासे बाला.

*        *        *        *

मदनाची मंगलमाया । नटनाच करी हृदयांत;
स्फुरतात कल्पनातीत । रणकार सुखाचे त्यांत.
किति होत नाच नयनांचा । किति रंग मुखावर आले;
तें चित्र चोर चित्ताला । कितिदा तरि चुकवुनि गेलें.
उत्कंठा धीर धरीना । लागला दुखाया ऊर;
तारुण्यतरल बालेच्या । चित्तांत भरे हुरहूर.

*        *        *        *

पायांत रुप्याचा तोडा । घे थबकत थोडा थोडा
युवराज विजयसिंहाचा । झाडींतुनि पिवळा घोडा.
शिरपेंच शिरावर साजे । पाठीवर लटके ढाल,
रूदार झगा जरतार । अंगावर हिरवी शाल;
उतरून विलासी वीर । चुंबुनि ती मोहनमाला
जणुं रम्य हृदय रमणीचें । हळुवार धरी हृदयाला.
उतरून वारुवरतून । सरदार शिपाई आले;
हळुवार हृदय रमणीचें । हृदयाशीं संगत झालें.

अपूर्ण

# शाहीर

शूर वीर सरदार मराठी मानकरी मंडळी,
पाठ भाट वर्णिती जयाची उदार बिरुदावली.
धीर धिंग रणसिंग बैसले नरनायक त्यामधीं,
ऐटदार जरतार आपल्या भर पोषाखीं सुधी.
सौंदर्याची वेल बहरली, ठरली उजवीकडे;
राजबाळ वेल्हाळ बघत अलुमाळ पावलांकडे.
वीर्य सारसर्वस्व जयाचें विशाल वक्ष:स्थळ
नाथ तिचा तो सनाथ करि जणुं अनाथ भूमंडळ.
नवा युवा वनराज केसरी सलील बसला जसा
ठाणमाण मांडुनी, तयाचा तसाच उठला ठसा ?
थाटदाट थाटला सभेचा थाप डफावर बसे,
ताल धरी खंजिरी, तारिचा झणत्कार होतसे.
' उदो उदो ! ' जयघोष घणघणे चकित जाहली सभा,
वीर्याचा नटनाच प्रीतिचा रोमांचावर उभा.
चित्त थरकलें, प्रेम थरकलें वीर्य, हरखलें अहा !

अपूर्ण

# निःश्वास

[ बालकवींच्या मनांतून निःश्वास नांवाचें एक प्रदीर्घ ऐतिहासिक काव्य लिहावयाचें होतें. त्याचे कांहीं भाग—क्रमशः नसावेत—बालकवींनीं निरनिराळ्या वेळीं रचिले, मित्रांना वाचून दाखविले, पण एकत्रित न लिहितां निरनिराळ्या कागदांवर लिहिले. त्यांपैकीं एकावर निःश्वास २ असें नांव होतें; व बाकीचे अनामिक होते. अर्थात् बाडांत लिहितांना ते एकाच कवितेचे भिन्न भिन्न भाग आहेत असें न लिहिल्यामुळें श्री. निफाडकर यांनीं त्या भिन्न भिन्न ऐतिहासिक कविता आहेत या समजुतीनें त्यांना विषयानुरोधें नांवें दिलीं. ' वीर मराठा ' ' वीरगडी ', ' रणघोष ', ' निःश्वास ' या कविता वाचल्या म्हणजे, पहिल्या तिन्हींत येणारा स्त्रीच्या मंद निःश्वासाचा प्रामुख्यानें उल्लेख, तिन्हीमध्यें सुद्धां—वर्णिलेला एकच विषय, त्या विषयाला अनुरूप सारख्याच प्रकारची रचना या सर्वांमुळें त्या एकाच कवितेचे भाग असून, ज्या जीर्णदुर्गाच्या परिसरांत या घटना घडतात त्याचें 'जीर्णदुर्ग' हें वर्णन हा प्रस्ताविक भाग आहे असें ध्यानांत येतें. रा. टिळकांना तर हे भाग निःश्वास या खंडकाव्याचेच आहेत अशी खात्री वाटते; एवढेंच काय, पण महाबळेश्वर येथें बालकवींनीं हे भाग वाचून दाखविले तेव्हां ' पाणी पाणी जलमय...पर्वत झाला ' हें महाबळेश्वराचें वर्णन आहे असें बालकवींनीं सांगितल्याचेंहि आठवतें; या कवितांचा क्रम जीर्णदुर्ग, वीर मराठा, निःश्वास, रणघोष असा असावा. ' शाहीर ' ही अपूर्ण कविताहि त्याच काव्याचा भाग असावा असें वाटतें. —**संपादक** ]

## ( वीर मराठा ! )

**उग्र कडेच्या कडे तोडुनी वीर बालिका वननिर्झरिणी**
**पुन्हा एकदां वळुनी बघते स्वाभिमान दृष्टीनें जेथें,**
**त्याच तिच्या सुंदर वळशावर विंध्यशिरापरि भव्य भयंकर**
**विश्वरक्षणा जणूं उदेला, दुर्ग दिसे अभिमानच पहिला.**
**उच्च उच्च तत्सौधावरतीं धीर गभीर प्रसन्नमूर्ती**
**वीर मराठा कुमार कोणी बघे सहज पलिकडच्या रानीं** १

*   *   *   *

भयाण दरडी घोर कऱ्हाडी किर्रे दाट अंधारी झाडी;
कृष्ण राक्षसी शिला पसरती गर्द मातल्या गवतावरतीं.
ढासळलेले कडे भयंकर तुटुनि घसरले परस्परांवर;
त्यांत चेपला वननिर्झर तो कालभुजंगासम सळसळतो.
कृष्ण भयानक तीं गिरिशिखरें, त्या खिंडी, तीं रानभुयारें,
विरूपाक्ष कालाचें तेथें भेसुर रूप दिसे न कुणातें ? २

* * * *

काळमुखीं पण वावरणारा रणदेवींचा पंचीप्यारा.
वीर्याचा अतिरेकच नुसता वीर बाल तो कुमार होता.
रणक्षेत्र तें बघुनी नयनीं प्रस्फुरला वीर्याग्निकणांनीं;
ज्योत नवी फोफावुन झाली लाल लाल वदनावर आली.
दृष्टींतुनि फूत्काच ओती उग्र नागिणी मनस्विता ती;
रणदेवींचा हृदयमणी तो, विचारीं यापरि झुलतो. ३

* * * *

शूरवीर समरांगणगाजी निजपूर्वज बघतो तो आजी;
तीं मैदानें प्रदेश सारा आज अपूर्वच दिसतो त्याला.
बघतां बघतां नटला बाळ काळ दुजा बनला विकराल;
तोंच कळेना कुठुनी कसला एक मंद निःश्वास उदेला.
स्वप्न चळे ? वरतीं मग पाहे निशावात घोंघावत आहे;
प्रकाश गेला, संध्या गेली, रात्र उदेली विचारजालीं. ४

* * * *

रणक्षेत्र ते कडे विशाल वाढविती रेवेचे बोल;
घूं घूं घूं मंत्रांची माला घुबड लागलें बोलायाला;
वन्य पशूंचे भेसुर नाद दुर्गावर घेती पडसाद,
कसा कळावा त्यांतुनि त्याला एक मंद निश्वास उदेला ?
श्रवणरांध्रिं परि अझुनी घुमतो मारुतचेष्टाभास मात्र तो.
बालवीर क्षण चंचल झाला ...........
रणदेवींचें.....प्रीतिस्थान कर्कश रणधीरांचे प्राण[1] ५

* * * *

१ अस्फुट वच आपणाशिच वदला : रणदेवींचें प्रीतिस्थान, कर्कश रणधीरांचे प्राण.

मजसाठीं झरणाऱ्या[१] श्वासा, दाब आंतल्या आंत उसासा.
समोर दिसतें रणस्थान तें, हृदय नाचतें अमुचें तेथें.
शौर्यासाठीं शूरापोटीं रणांगणाच्या घ्याया गांठी
रजपूताचे आम्ही छावे, मरण–मारणें आम्हां ठावें.
प्रेमभुकेलें असेल कोणी, पहा शोधुनी, जा त्या स्थानीं.
मी समरीं रणशूर बनोनी इच्छितसें खड्गाचें पाणी. ६

*  *  *  *

पाणी पाणी, जलमय सारा आसपासचा पर्वत झाला;
धो धो धांवति निर्झर खालीं, दरी दरी धोधोमय झाली.
कृष्णवर्ण घनपर्वत वरतीं काळकृतान्तापरी विचरती;
कडाडती चपला त्या घातें स्वभूमी क्षण दुभंग होते.
काळोखाचें काळिज फुटलें, फिरे रात्र अंधारीं बोले;
कसला पर्वत, कसलें रान, एक मात्र अंधार भयाण. ७

*  *  *  *

दुर्ग गजबजे, बसल्या थापा, घोड्यांच्या टपटपल्या टापा;
वीर मराठे दिसले, लपले; निस्तब्ध पुन्हां कानन डोले.
कृष्णरात्रिची भयाण वेळ, रान सभोंतीं जड जंजाळ;
शौर्यदेवता परी नाचते कड्याकड्यांतुनि जेथें तेथें.
हादरीत जड पर्वत सारा घो घो घुमताहे हा वारा;
त्याच निनादें बसुनी टाळी प्रतिध्वनी हो भयद निराळीं. ८

अपूर्ण

# ( वीरगडी )

'या घुमत्या रात्रीचा वारा घुमवूं दे तुमच्या हृदयाला[1]
वीर्यश्रीचें अपूर्व पाणी वीरांनो ! निधड्या छात्यांनीं
याच झऱ्यापरि पसरुनि द्या रे कड्यावरुनि चोहिंकडे खालीं
जों तेजाची दिव्य तुतारी प्रतापनिधि घुमवीत निराळीं,
तोंच आपुल्या खड्गलतांनीं शत्रुरक्तमय बनवा अवनी.
कचेल जो-पण नांव कशाला, पुरे हाच संदेश तुम्हांला;
कडकडणाऱ्या चपलेवाणी वीरमणीची गभीर वाणी
नाचनाचुनी कड्याकड्यांत तेजाची संचरवी ज्योत.
काळवेळ, परि कसलें काय, वीर पुन्हां परते असहाय,
साह्य कशाला ? विलसे हातीं रिपुरुधिरप्रिय खड्गलता ती.
क्षणाक्षणा त्या दुर्गामधुनी दीप तळपतो लपतो विपिनीं;
विजा चमकती, प्रगटे रान, गर्द भरे अंधार फिरून.
दरड भयंकर वरतीं आली, रिपुसैन्याचा पडाव खालीं.
मार्ग संपला, चुकला घोडा, वीर थरकला मनांत थोडा;
अन्यक्षणिं नवकांति उसळली अग्निकणांपरि नयनीं गालीं.
निमिषार्धीं सरसावुनि हात नाचुं लागलें खड्ग नभांत;
अंधेरी परि भलती झुकली, दृष्टि विरमली ठकली थकली.
गुप्त रिपूचा जडला, भिडला वीराच्या हृदयाशीं भाला;
दबा धरुनिया बसला छावा, वीर केसरी खवळुनि यावा,
त्यापरि तो उसळुनिया वीर जों घाली अरिवर तरवार,
तोंच मधें टंकार उदेला खड्गाचा खणखण रव झाला.
किंकाळी श्रवणावर आली, पुढें निनादें बसली टाळी;
स्तब्ध वीर न्याहाळित तेथें भूवर तों पडलेलीं प्रेतें.
भास दिव्य हो क्षणैक नयनीं तोंच उठे निःश्वास दुरोनी.
दुर्गामधुनी उसळुनि आला एकजात सरदारी भाला;
पलिकडच्या अत्युग्रकड्यांत रणवाद्यांचा उठला धोत.

---

१ हृदयांना.

मार्गे पुढतीं एकच मारा, शत्रू गजबजे क्षणांत सारा;
वीर पुरा बनला बेहोष, क्षणाक्षणा गर्जे रणघोष.
धन्य वीर व्हा पुढतीं पुढतीं, पाहुं बरें काळाची छाती.
भंग भंगुनी हो धुळधाणी, शत्रुदळाचें जिरलें पाणी.
वीर्यश्रीचा नवरा गाजी बेभान चरे समरामाजीं;
• शत्रुदलाचा कोट अफाट चिरित चालला तसाच थेट. ×

*　　　*　　　*

रातकिड्यांच्या कठोर गानीं बेभानपणा भरला रानीं;
कड्याखालच्या उभ्या कपारी पाणथळीच्या गलिच्छ भारी;
त्यांमधुनी घोंघावत गीतें सैराटपणें उठलीं भूतें;
भालूंचें विव्हळणें चाले, कुठें पिंगळा भकास बोले;
कुठें खिदखिदे दरीच वाटे, रान करकरे भयाण मोठें.
क्षणीं भारिला पुतळ्यावाणी वीर जशाचा तसाच रानीं.
मृत्यु-प्रीती मृत्यु-प्रीती नाद भयंकर नभांत होती;
भीति ‾ ।री वनेंहि सारीं नाचुं लागलीं घनांधकारीं.
उठल्या ज्योती, भग्न हास्य ये भकास चित्तीं.
२. ' आरडोनि कोणी क्षणीं धबधबा उरास हाणी;
मगरापरि वासुनिया तोंडें गरगर घेत भवंडें;
किंकाळ्या फोडित लवलाही पिशाचमाला अदृश्य होई.

अपूर्ण

---

× या ओळीपुढचा भाग गळाला असावा. "पुढचा संदर्भ लागत नाहीं. स्वतंत्र पानांतून लिहिलें आहे" असें बाडांत लिहिलेलें आहे. —**संपादक**

# रणघोष

अरिसैन्याचा अफाट सागर, त्यांत गर्जतो दुर्ग भयंकर;
अग्निवर्षणीं वीर न्हाउनी, क्षणाक्षणीं आदळती धरणीं
तो दुर्गांतुनि बाहिर आला, एकजात सरदारी भाला;
वीर पुरा बनला बेहोष, क्षणक्षणां गर्जे रणघोष.
धन्य वीरहो, पुढतीं–पुढतीं, पाहु बरें काळाची छाती.
वीरश्री नवरा तो गाजी, बेभान चरे समरामाजीं;
त्यांत नटे रिपुरक्तस्नानीं, भाग्यवान एकादा कोणी.
तडिल्लतेचा तुटुनी लोळ, क्षणामधें करपून भुगोल;
क्षणामधें नवतेज भरोनी, अग्निशिखा धगधगल्या नयनीं.
क्षणांत वरतीं ऊर उभारे, क्षणार्धांत हो भयाण सारें;
दुर्ग फाटला उठला त्यांत, अग्निशिखेचा भयाण धोत.
काळच तो किंकाळ्या फोडी, वीर विराची धरितो नरडी;
काळाची विक्राळ क्रीडा, तो मृत्यूचा भयाण कीडा.
तोंच पलिकडे उग्र कड्यांत, दाट धुराचे उठले धोत;
मागें पुढतीं एकच मारा शत्रु गजबजे क्षणांत सारा.
भंगभंगुनी हो धुळधाणी, शत्रुदळाचें जिरलें पाणी;
भान कशाचें ? नव नवसाचें, समरतीर्थ खऱ्या शूराचें
अन्य क्षणिं अंधार अघोर, तसा जाहला क्षणैक वीर;
क्षणार्धांत मधु सुषमा आली, क्षणीं रोष ये नयनीं गाली.
निःश्वसिता किंकाळी फोडी, परि न चळे ओठांची जोडी.—

अपूर्ण

# निःश्वास २

हे सौंदर्यध्वंसी काला । भीति दाविसी काय ? कुणाला ?
विद्युत्पातासह कडकडुनी । कडेकडे जा टाक फोडुनी.
गर्वराशि हा गभीर भूधर । ने पाताळीं तुला हवा तर;
क्षुब्धाब्धीच्या लाटांमधुनी । धांव जिभाळ्या चाटित गगनीं.
गर्भगळित[1] ती तारा-वाला । बळी तुझ्या घे हृत जठराला.
परी प्रीतिचा न्यारा वारा । खबरदार आडवितां याला !

* * * *

नाजुक मी ललना फुलवेल । प्रेमहि माझें काय मल्लल;
अशा विचारीं मूढा हृदया । क्षणक्षणां धडधडसी वायां.
प्रेमरक्षणीं दक्ष देवता । अव्यक्त जगीं करिती सत्ता.
प्रलयवज्र कीं कृतान्त तोही । सामर्थ्यें अवगणिला त्यांहीं.
पडल्या स्त्रीहृदयाचा तोल । त्याच देवता सांवरतील.
भीति कशाची आणि कुणाला । पहा जगा, ललनेची लीला !

* * * *

चला सरा सुमनांनो दूर । दे हातीं प्रेमा समशेर
उग्ररूपिणी शिवा भवानी । प्रीतिदेवते, उतरे भुवनीं.
क्षुद्र मूषका काळा मूढा । पसर तुझ्या त्या कराल दाढा !—

अपूर्ण

---

१ गर्भभरित

# मूढ मालती !

प्रेमतरूंच्या मरुद्गणांची पहिली लहरी आली;
हृदयीं शिरली मुग्ध मालती, ईषत्कंपित झाली.
तेंच रूप तें, दृष्टि तीच ती, माधवही तो पहिला,
आज निराळा परंतु गमला त्या वेड्या हृदयाला.
वेडे वेडे विलक्षणचि या आज भावना काय ?
पुसूं कुणाला ? जिकडे तिकडे भरले माधवराय.
मंद वायुनों, शपथ तुम्हांला गुणगुणतां तें काय ?
मूढ मालती ! नाहीं नाहीं, बोलत माधवराय.
हृदय गडे धडधडे ! कशाच्या लहरी येती अंगीं ?
जागी का मी, काय बोलल्यें, बसलें कोण्या जागीं ?
अमृतमयी स्वधारा त्यांतचि शशांक पोहत आहे;
निःश्वासांची उष्ण झरी का मद्हृदयांतुन वाहे.
पलिकडचें हें मेघाडंबर धांवत येइल बाई,
दिव्य चंद्रिके, विचार असले नकोत भलते कांहीं.
स्वर्ग स्वर्गीं तेजोमय, तूं वसुधा दीन बिचारी;
मूढ मालती तशी माधवा तुजसाठीं झुरणारी.
आर्द्र करावें विश्व अश्रुंनीं दूषविल्या श्वसितांहीं,
स्त्रीहृदया ! तुज मार्गच दुसरा जगीं नसे बा कांहीं.
जर वातांना भाव मनींचे प्रगट कराया येते,
तेच सांगते त्या बालेचें हृदय कसें होतें तें.
निश्वसितें तीं, तीं प्रेमाचीं मुकीं कोंवळीं गीतें,
फुलें अहा तीं प्रेमतरूंचीं लाजविती स्वर्गातें.
गर्द वनांतिल मुक्या झरीपरि तिची प्रेममय वृत्ती
स्वर्गंगेला लाजविणारी दिसती अवकाशीं ती.
प्रेमकल्पनामय प्रेमाचा सेतू अद्भुत कांहीं,
दिसला असता जो कोणीही कधीं पाहिला नाहीं.
कुमारिकेच्या मूक मनाच्या स्निग्ध सांवळ्या छाया
दिसल्या असत्या जर [1] का येते विचार अबलेचे या— अपूर्ण

१ जरी काय ते विचार अबलेचे या.

# हृदयाची गुंतागुंत

हृदयाची गुंतागुंत कशी उकलावी ?
ही तीव्र वेदना मनामनाची ठावी.
अंधार दाटला अपार भरला पूर,
परि पार तयाच्या कोण मला नेणार ?
हें ज्ञान मला तर अज्ञानापरि भासे,
मी सोडवितां तें उलटें बांधी फासे.
मन विटलें, विटली शब्दचिकित्सा सारी;
मी फिरतां गरगर बुद्धि तयामाझारीं.
सौंदर्य फुलांचें, गाणीं वनविहगांचीं,
ती गोड शांतता हिरव्या वृक्षलतांची,
शीतलता सुंदर चंचल निर्झरिणींची,
गंभीरपणाची मूर्ती गिरिरायाचीं,
मज रुचे न किमपी व्यापकता गगनाची;
तीं अनंततेचीं किरणें ग्रहगोलांची.
मर्यादता अचिंत्य गूढ दिशांची,
अगाधता कीं सर्वंकष कालाची !
हें दिसून सर्वहि मज न दिसेसें होई,
समजून मनाला कांहीं उमगत नाहीं.
हे धर्म सांगती भिन्न भिन्न पथ कांहीं,
मम वृत्ति सांगती भिन्न तुझा पथ पाहीं.
ही बुद्धि सांगतां मन ऐके ना तीतें,
हें चित्त वदे तें पटेच ना बुद्धीतें.
द्वैताची असली अक्षय झोंबी चाले,
सुखदुःखीं खातें चंचल चित्तहि झोले.
दुर्भाग्य दुबळा मनास दिसतें सारें,
परि चंचल चळतें चपळहि चित्त कसें रे !
मानवतो कवणां स्वार्थ, कुणां परमार्थ,
परि अर्थ दिसेना हाय मला उभयांत.

# मूढ मालती !

प्रेमतरूंच्या मरुद्गणांची पहिली लहरी आली;
हृदयीं शिरली मुग्ध मालती, ईषत्कंपित झाली.
तेंच रूप तें, दृष्टि तीच ती, माधवही तो पहिला,
आज निराळा परंतु गमला त्या वेड्या हृदयाला.
वेडे वेडे विलक्षणचि या आज भावना काय ?
पुसूं कुणाला ? जिकडे तिकडे भरले माधवराय.
मंद वायुनों, शपथ तुम्हांला गुणगुणतां तें काय ?
मूढ मालती ! नाहीं नाहीं, बोलत माधवराय.
हृदय गडे धडधडे ! कशाच्या लहरी येती अंगीं ?
जागी का मी, काय बोललें, बसलें कोण्या जागीं ?
अमृतमयी स्वर्धारा त्यांतचि शशांक पोहत आहे;
निःश्वासांची उष्ण झरी का मद्हृदयांतुन वाहे.
पलिकडचें हें मेघाडंबर धांवत येइल बाई,
दिव्य चंद्रिके, विचार असले नकोत भलते कांहीं.
स्वर्ग स्वर्गीं तेजोमय, तूं वसुधा दीन बिचारी;
मूढ मालती तशी माधवा तुजसाठीं झुरणारी.
आर्द्र करावें विश्व अश्रुंनीं दूषविल्या श्वसितांहीं,
स्त्रीहृदया ! तुज मार्गच दुसरा जगीं नसे बा कांहीं.
जर वातांना भाव मनींचे प्रगट कराया येते,
तेच सांगते त्या बालेचें हृदय कसें होतें तें.
निश्वसितें तीं, तीं प्रेमाचीं मुकीं कोंवळीं गीतें,
फुलें अहा तीं प्रेमतरूंचीं लाजविती स्वर्गातें.
गर्द वनांतिल मुक्या झरीपरि तिची प्रेममय वृत्ती
स्वर्गंगेला लाजविणारी दिसती अवकाशीं ती.
प्रेमकल्पनामय प्रेमाचा सेतू अद्भुत कांहीं,
दिसला असता जो कोणीही कधीं पाहिला नाहीं.
कुमारिकेच्या मूक मनाच्या स्निग्ध सांवळ्या छाया
दिसल्या असत्या जर [1] का येते विचार अबलेचे या— अपूर्ण

१ जरी काय ते विचार अबलेचे या.

# हृदयाची गुंतागुंत

हृदयाची गुंतागुंत कशी उकलावी ?
ही तीव्र वेदना मनामनाची ठावी.
अंधार दाटला अपार भरला पूर,
परि पार तयाच्या कोण मला नेणार ?
हें ज्ञान मला तर अज्ञानापरि भासे,
मी सोडवितां तें उलटें बांधी फासे.
मन विटलें, विटली शब्दचिकित्सा सारी;
मी फिरतां गरगर बुद्धि तयामाझारीं.
सौंदर्य फुलांचें, गाणीं वनविहगांचीं,
ती गोड शांतता हिरव्या वृक्षलतांची,
शीतलता सुंदर चंचल निर्झरिणींची,
गंभीरपणाची मूर्ती गिरिरायाचीं,
मज रुचे न किमपी व्यापकता गगनाची;
[illegible] ंततेचीं किरणें ग्रहगोलांची.
ती अमर्यादता अचिंत्य गूढ दिशांची,
ही अगाधता कीं सर्वंकष कालाची !
हें दिसून सर्वहि मज न दिसेसें होई,
समजून मनाला कांहीं उमगत नाहीं.
हे धर्म सांगती भिन्न भिन्न पथ कांहीं,
मम वृत्ति सांगती भिन्न तुझा पथ पाहीं.
ही बुद्धि सांगतां मन ऐके ना तीतें,
हें चित्त वदे तें पटेच ना बुद्धीतें.
द्वैताची असली अक्षय झोंबी चाले,
सुखदुःखीं खातें चंचल चित्तहि झोले.
दुर्भाग्य दुबळा मनास दिसतें सारें,
परि चंचल चळतें चपळहि चित्त कसें रे !
मानवतो कवणां स्वार्थ, कुणां परमार्थ,
परि अर्थ दिसेना हाय मला उभयांत.

वैराग्य बरें कीं सुखद बरा अनुराग,
परि हाय प्रीतिचें उगाच माझें सोंग.
तें कर्म बरें कीं बरवा कर्मत्याग ?
दुर्दैव तसें, मज नव्हे त्याग ना भोग.
ती श्रद्धा बरवी अश्रद्धाहि बरी ती;
परि मानवते मज मधेंच भलती रीति.
व्यामोह भयंकर दुस्तर भरला भारी,
कीं जीव दडपतो मम निद्रेमाझारीं !
मज व्यर्थ नको तीं अमरपणाचीं गाणीं;
कुणि उठवा असल्या गहनांतुनि हलवोनी.
तूं तुझाच कर उद्धार बोल हे कळती,
परि सहायार्थ या वृत्ति मनीं तळमळती
हा हाक मारतों, उठवा मजला कोणी,
या भर निद्रेच्या दुस्तर गहनांतूनी.
दिन पक्षमास ऋतु वर्ष भरभर गेले
हें रक्त जसेंच्या तसेंच संकळलेलें—

अपूर्ण

# मेघांचा कापूस

फिकट निळीनें रंगविलेला कापुस मेघांचा,
वरुनि कुणी गुलजार फिरविला हात कुसुंब्याचा;
त्यांतहि हंसली मंदपणें ती चंद्रकला राणी;
कडेकडेच्या मेघांवर ये मोत्यांचें पाणी. १

इंद्रनिळाचा रंग बहरवी गिरिच्या अंगाला,
मधुन जळाची शुभ्र शोभते ती मोहनमाला;
चौंबाजूला थाट दाटला हा हिरवाळींचा,
सृष्टिसतीनें साज घेतला पाउसकाळींचा. २

यशस्विनी सौभाग्यदेवता माता जगताची;
घोर घनघटा भूलिंगाला प्रक्षाळुनि गेल्या—

अपूर्ण

---

# थडग्यांतील रमणी

होतें एक असें जुनाट थडगें, झाडें तयाभोंवतीं
काट्यांचीं किति वाढुनी विषम तो भूभाग आच्छादिती;
सर्वांच्याहि वरी उठे वट परी तो, तों करी त्यावरी
काळी गर्द भयाण, भीषणपणा स्थानावरी त्या वरी.
वाहे एक झरा असा जवळुनी, ती पैल झाडी असे;
सौंदर्यैकनिधान निश्चलपणा तीमाजिं सौख्यें वसे,
प्रेमें पाहत त्याकडे बसुनि मी निश्चिंत त्या आसनीं.
या ऐशा थडग्यांवरी बसुनि त्या ओह्याकडे पाहुनी
मी एथें किती काळही दवडिला नाना विचारांतरीं;
होती निर्भर पौर्णिमा, विमल तो शीतांशु विश्वावरी
प्रेमाची अपुल्या अनंत विमलच्छाया सुखाची करी.

ग्रीष्माच्या दिवसांत ती कितीतरी मातें सुखाची गमे,
मी ऐसा बसलों पहात, मनही माझें तयानें रमे;
गेला काळ असा किती मज नसे त्याची मुळीं कल्पना,
एकाकी परि वाटलें हदरली ही भूमि ऐसें मना.
मी पाहें वळुनी, अहो नवल कीं, हो भूमिचें कंपन.
तेणें तें थडगें दुभंगुनि पहा कोणीतरी त्यांतुन—

*           *           *           *

होती[1] ती रमणी विशुद्ध तरुणी सौंदर्यरंगांगिणी
ती राणी गुणशालिनी विजयिनी हो भूतकाळीं कुणी;
होतें शुभ्र जरी मुखावर तिच्या आपाद आच्छादन,
चंद्राच्या स्फटिकप्रभेंत दिसलें तद्रूपही त्यांतुन.
ती देवी यवनी असूनिहि पहा माझ्या मनाला किती
तद्गांभीर्य बघूनि जी उमटली श्रद्धा, न तीची मिती;
प्रेमें जोडुनि अंजली चकित मी पाहोनि तीचेकडे[2]
हे अर्धस्फुट बोल कंपित रवें मी बोललों विस्मित—
'भूमीच्या उदरीं अहा कितितरी रत्नें निमालीं, परी
त्यांतोनी न पुन्हां कुणीहि उठुनी आलें असें भूवरी.
या ऐशा थडग्यामधूनि अपुली दिव्यप्रभा घेउनी
हे देवी विजयस्विनी, फिरुनिया आलीस तूं का जनीं ?
नाना कीट वनस्पतींतहि तुझें हें रूप ऐशापरी
राहे केविं विशुद्ध हें नवल कीं वाटे मदीयांतरीं;
हा दृष्टिभ्रम काय ? रूप अपुलें जें हें तुवां दाविलें
तें नाहीं हविलें विशुद्ध उरलें कालप्रवाहानलें ?—

अपूर्ण

---

१ येई २ स्मित.

१९५ ... संग्रहालय ... अनुक्रम ... विभाग ... क्रमांक ... नों. दि. ... वाचनालय

# औदुंबर

ऐल तटावर पैल तटावर हिरवाळी घेउन
निळासांवळा झरा वाहतो बेटाबेटांतुन;
चार घरांचें गांव चिमुकलें पैल टेकडीकडे;
शेतमळ्यांची दाट लागली हिरवी गरदी पुढें.
पायवाट पांढरी तयांतुनि अडवीतिडवी पडे;
हिरव्या कुरणांमधुन चालली काळ्या डोहाकडे.
झांकळुनी जळ गोड काळिमा पसरी लाटांवर;
पाय टाकुनी जळांत बसला असला औदुंबर.

---

# रजनीस आवाहन

ये, ये, ये आई, ये बाई, रजनिमुखी लवलाही;
मजला पाहूं दे, स्वानंदें, कृष्ण तमीं नभ कोंदे.
वाहूं दे वारे, त्यांतून, दिव्य शांति घेऊन.
दुर्धर कर्कश गे, या बसली, कर्णसंपुटीं टाळी;
एकहि धड नाद, येईना, ऐकाया श्रवणांना.
नसता कैल्लोल, दिवसाचा,[१] अवघा स्वार्थ चराचा,
घालवुनी आतां, ये येथें, शांति स्थापित हातें.
हृदयाचे बोल, बहुमोल, खोल मनांतिल खोल,
ऐकूं दे वाणी, हृदयाची, माझी मज........[२]
माझ्या हृदयींचा, विश्वास, नाचवूं दे विश्वास;
माझ्या हृदयाचे, नाचच ते, परिसूं दे श्रवणांतें.
माझ्या नयनांच्या, किरणांनीं, मद्‌हृद्‌या पाजळुनी,
लावुनि निज हातीं, दे, दे ती, स्वयंप्रकाशा प्रीति.

---

१ जीवाचा २ "गे सजणी" हे शब्द मुळांत नाहींत, जागा रिकामी आहे
३ नाचत ते

दिवसांचें तेज, तेज तया, लाजे चित्त म्हणायस;
दिवसाचा घोर अंधार, बसवी झांपड पार !
दिपवी नयनांना, दाखवुनी, अनंत दुःखें नयनीं,
संशय काहूर करि हृदयीं, स्वास्थ्य क्षणभर नाहीं.
आत्मा होउनिया निभ्रांत, मूर्च्छित होय मनांत,
वारें उष्ण फिरे वणव्यांत[1], दग्ध मना जाळीत !
तेलच मग ओती, त्यावरतीं, रविप्रभा निज हातीं.
जळफळतें सारें, धगधगुनी, अशांतिच्या वणव्यांनीं.
ये, ये, ये देवी, दे हृदयीं, प्रेमा विकसन बाई !
अनंत दिव्य कणीं, पसरोनी, अनंतत्व दे गगनीं.
फुंकारें आधीं, दूर करी, रविप्रभा ही सारी.
मग 'ला, ला' गाणीं, गावोनी, बाह्य जगा निजवोनी,
कर अंधाराचा, पाऊस, पाडुनि शांत जगास.
ते सगळे नाद, निःपात, बुडवुनि सप्त तळांत !
राज्य करीं जगतीं, घेउन ती, शांतिपताका हातीं.
आतुर गे डोळे, बघण्याला, रूप तुझें अवलीळा
व्योमीं लाल फुटे, तोंच करी, हाकाटी तुजसाठीं.
तुजविण कोण बरें, चारील, बाह्य जडाचा खेळ ?
तुजवांचुन कोण, पेटविल, हृदयीं प्रेमविलोल ?
बाहुल्यपणाला,[2] तुझविणें, चित्तहि उल्हासानें ?
......लाल. पाहोनी, रक्तपताका गगनीं
फोडी हंबरडा, ही अवनी, दुःखित काकमुखांनीं[3]
जागा मी झालों, आईच्या, त्या प्रेमळ रजनीच्या—

अपूर्ण

---

१ वाऱ्यांत २ या बाहुल्यानें ३ गाय

# शून्य मनाचा घुमट

शून्य मनाच्या घुमटांत
कसलें तरि घुमतें गीत;
अर्थ कळेना कसलाही,
विश्रांती परि त्या नाहीं;
वारा वाही,
निर्झर गाई,
मर्मर होई,
परि त्याचें भीषण भूत
घोंघावत फिरतें येथ.
दिव्यरूपिणी सृष्टि जरी
भीषण रूपा एथ धरी;
जग सगळें भीषण होतें
नांदाया मग ये येथें;
न कळे असला,
घुमट बनविला,
कुणी कशाला ?—

अपूर्ण

---

# राष्ट्रसेवा

मना दैन्य दौर्बल्य हें पाहवेना,
मना हिंदभूची व्यथा साहवेना;
भरे घोर अज्ञान हें दुर्विकारी,
मना राष्ट्रशिक्षांजनें त्या निवारी. १

महामंगला पावना पुण्यभूमी
तिचे–राष्ट्रमाते, तुझे बाळ आम्ही.
तुझें नांव या सार्थ लोकीं करावें,
स्वयें उद्धरोनी जना उद्धरावें. २

बहू नेटका नीट संसार केला,
परी शेवटीं काळ घेऊन गेला;
अशा संसृतीची जनीं कोण गोडी,
धरी रे मना राष्ट्रसेवा न सोडी. ३
किती कोंवळे बाळ या हिंदभूचे—

अपूर्ण

---

# विश्वाचा प्रवास

अव्यक्तांतिल दूरदूरच्या शांत गुहेंतून
दिव्ययोगिनी रजनी झाली गगनीं अवतीर्ण.
जगद्व्यापिनी काव्यकल्पना कविहृदयामधुनी
जेंवि अवतरे शब्दसृष्टिच्या मधु वातावरणीं—
दिशादिशांतुनि तेविं प्रगटली छायारूपानें
गभीर मूर्ती निशादेविची, कोण न हें जाणे ?
अर्पुनिया हें सुवर्णरंगी सूर्यकमल पायीं
त्या भगवतिची करिते पूजा निसर्गदेवी ही.
लाक्षारस चर्चिला, गुलालहि भरला भांगांत,
रम्य तारकाफुलें उधळलीं स्तुतिगीतें गात.
सप्तलोक दशदिशा अप्सरा सुर वदती सारे
‘ उदोउदो ’, ब्रह्मांड दुमदुमे त्या जयजयकारें !

अपूर्ण

# राष्ट्रगायित्री

नमो श्रीराष्ट्रगायित्री । नमो चैतन्यरूपिणी
ध्वांतविध्वंसिनी देवी । ओजस्विनि नमोऽस्तुते
अहो हिंदभूच्या हरा अंधकारा;
करा दिव्य हा राष्ट्रसंसार सारा;

अपूर्ण

---

# आर्यांची अवनति

हमालांचें जरि राष्ट्र असे कोठें,
हिंदभूमी तो देश मला वाटे.
अहा ! पोटाची खांच भरायातें
कष्ट देवा पडतात किती त्यातें. १
आंग्लविद्येच्या अध्ययनामाजीं
अहा सुकते तारुण्यकळी ताजी;
तेज गेलें, सामर्थ्य नष्ट झालें,
दीन दुर्बल विज्ञान घरा आलें. २
लग्न झालें, संसार गळां आला,
देह केवळ राहिला विकायाला.
एक चिंता धन केविं पडे हातीं,
अन्नवसनाची केविं सरे भ्रांती. ३
क्षणीं विद्येची होय धूळधाण,
तयासंगें हो तीहि हमालीण,
पौरुषाचा मग सहज अंत झाला,
गोड मानी मन त्याच हमालीला. ४
स्वार्थ परमार्थासर्वें साधणारी,
दिव्य संजीवक पौरुषाधिकारी,
स्वोन्नतीचा सत्पंथ दाविणारी,
कुठें विद्या ती आत्मगर्वहारी ? ५

अपूर्ण

---

# नीति व अनीति

नीतिअनीती व्यर्थ कल्पना धर्माधर्मांच्या;
प्रेमावांचुनि कुणि न [1] सांखळ्या तोडिल जीवाच्या.
प्रेमधर्म हा धर्म विसरलों, भकलों सैराट;
म्हणुनिच पडलों गिळित भूमिवर दुःखाचे घोट.
लोकाचारें जीव जाहला लोकांचा दास,
जरा निराळा वागतांच मज वेडा म्हणतील.

अपूर्ण

---

# संशय

मृत्यू येइल जेधवां पसरुनी विक्राळ दाढा पुढें,
जेव्हां त्या बघुनी थरारुनि मनीं चैतन्य हो बापुडें,
जेव्हां बुद्धि (नुरे, [2]) धृतीहि विधरे, श्रद्धा बिचारी मरे,
जेव्हां झांपड येउनी जनिं मनीं अंधार सारा भरे-
तेव्हां कोण करील सोबत मला हा प्रश्न चित्तांतरीं
मी पाहे पुसुनी पुनःपुनरपी, अंधार सारा परी !
स्वर्गाचीं रमणीय आजवरि जीं स्वप्नें मनीं पाहिलीं,
प्रेमाचीं बरवीं हृदंगम अहा गाणीं कितीं गाइलीं !
अज्ञानें परि वाहिलें निजमनीं ज्या ईश्वरालागुनी,
साह्या त्या समयास तो तरि अहो येईल का धांवुनी ?
नाना प्रश्न असे उठून करिती जेव्हां मना व्याकुळ,
त्यांतें शांत करील अद्‌भुत असें आहे कुणा का बळ ?

---

१ आंतडीं २ मरे

# रजनीस (आवाहन)

ये, ये, ये, आई, ये बाई, ये रजनी लवलाही.
स्वप्नें भयदायी दिवसा ही सृष्टि बालिका पाही.
गेला गे, गेला विलयाला बंधुभगिनिचा मेळा.
नक्षत्रें तारा माहेरा कुठें न उरला थारा.
हुरहुरु अवलोकीं गगनांत उठे अग्निचा झोत.
आक्रंदे चित्तीं भगवंता, धांव धांवणें आतां.

अपूर्ण

---

# गाण्याची चढली कमान—

गाण्याची चढली कमान, नयनीं स्वर्मार्ग झाला खुला;
व्योमीं तारकमालिकांसह कवि प्रेमें हसूं लागला.
त्याला हास्य परंतु दिव्य असलें आलें तरी कोठुनी ?
त्याचा उद्गम नाहिं काय तुझिया दिव्यौष्ठगंधांतुनी ?
प्रेमावांचुनि कोणता कवि पिसा गाईल गाणें तरी ?
गाणें प्रेमच, तें स्फुरेल तरि का निष्प्रेम चित्तावरी ?
प्रेमानें रसरंग जो उधळिला त्याच्या तरंगांवर
होवोनी रसवंत लुब्ध हृदयें बेहोष त्यानंतर.
स्वच्छंदें मग वाहतात जिकडे त्या त्या प्रदेशांतरीं.
तारांच्या सुमवाटिका विलसती आकाशगंगेवरी
प्रीतीचा लडिवाळ बाळ चिमणा वक्षःस्थलीं वाहिला;
तो प्रेमातुर ओष्टचुंबनसुखा निःशंक नादावला.

अपूर्ण

---

# भारद्वाजास

भारद्वाजा; विहगा माझ्या, धन्य जगीं तूं मज गमसी;
फुलल्या बागा या तरुरांगा त्यावरतीं भरभर फिरसी.
सुंदर झाडी, पाणद मोठी, शीतल छाया तींत पडे;
वाढुनि वेली फुगडी झाली, त्यांतुनि ओढा वाहतसे.
भारद्वाजा, विहगा माझ्या, तूं वनराजा खरोखरी;
हिरवा मांडव सृष्टिदेवता तुजसाठीं हा रम्य करी.
हीं वेलींची सुंदर सदनें रत्नमण्यांनीं भूषविलीं;
सौभाग्यें हीं वनदेवींनीं तुझिया चरणीं अर्पियलीं.

अपूर्ण

---

# अश्रुमाळ

ही अश्रूंची अखंड माला । म्हणो कुणी ही तुला कशाला;
परंतु कळतें माझें मातें । अश्रुमाळ ही जें मज देते.
रडण्यावांचुनि । कुढण्यावांचुनि
त्या हास्याचा अक्षय पेला । जगीं कधीं या कुणा मिळाला ?
मिथ्यास्वप्नीं रमवुनि वृत्ति । जगीं हासते मानवजाति,
परंतु ज्यानें जागें व्हावें । त्यानें रडणें जवळ करावें.
उदासीन हें । रडणें नोहे,
या चढत्या अश्रूंची माला । दाखविते चढत्या आशेला.
निंदा कोणी या रडण्याला । हसो कुणी तें त्यांचें त्यांना;
परंतु अक्षय मी रडणार । स्वर्गाच्या माड्या चढणार.
मानवतेची । भूक आमुची ।
सवाल करिते या रडण्यांस......

अपूर्ण

---

# निःश्वास (?)

देहचिंतनीं जीव जाळुनी हा कुठवर घ्यावा,
घाल मोहिनी तूं फुंकुनी गोड गडे पांवा.
तव अधरींचें प्रेम-लाडके कवीश नमि यातें;
तव हृदयींचें श्वसन---अहा त्या प्रेरितसे गीतें.
तव हृदयींची सुखद ऊष्णता प्रेम भरी हृदयीं;
नवल न मग तद्गीत ऐकतां मन मोहुनि जाई. अपूर्ण

# संशय

शब्दज्ञान असें कधींच न दिसे तें आत्मयाचे मना,

.........................................

देवाच्या भजनांत सौख्य सगळें लोकांत या बोलती,
जो तो हो, मग दुःखि कां जन तसे अग्नीमधें पोळती ?
याचा शोध करावया भटकतों उद्विग्न चित्तांतरीं,
कांहीं पावुनि भास जात निघुनी माझ्यापुढें ते तरी;
तेथें जाऊनियां पुन्हाहि बघतां तेथेंहि कांहीं नसे;
आशा चाळवि, होय जीव दुबळा दुःखांत ऐशा मरे ! अपूर्ण

# जिज्ञासु

हे योगीशा, मोहमूढ मी नर दुर्बल दीन,
आनंदाच्या मागें वणवण दमलों भटकून १
अपूर्णतेनें पूर्ण निराशा हृदयाची होते;
अमृत मुखाशीं नेतां नेतां विषमय हो येथें. २
आनंदाच्या भारानेंही दुखवणारें चित्त,
दुःख बघुनि मग नवल न त्याचे तुकडे होतात. ३
खराखुरा आनंद असे, कीं सर्वच आभास ?
पडतें कोडें लागे वेडें चित्त रडायास ! ४
उदास जीवन कंठायातें मग कांहीं नाहीं
भूलभुलाई तत्त्वज्ञांची शोधुनिया पाहीं. ५

# दंवबिंदु

पाहुनी सखी सृष्टीला प्रेमळा उषा वेल्हाळा
ओढुनी तिला स्वच्छंदें आलिंगी परमानंदें.
प्रीतीची मुग्धा बोली तों धावुनि नयनीं आली.
सृष्टीच्या हृदयावरते-टपटपलीं मोत्यें मोत्यें.
मधुमधुर काव्यबिंदू ते-प्रीतीचें केंद्रच नुसतें;
स्वर्गींचीं फुलें फुललेलीं-भूसुमनावरतीं गळलीं.
कवि भावसुमांचा झेला-भुलला हो पाहुनि त्याला;
स्वमनींच वदे गुंगोनी-आले हे बिंदु कुठोनी ?

* * *

सृष्टीच्या हृदयांतून प्रीतीची सरिता वाहे,
तींतून उसळले वरतीं-दवबिंदु मनोरम का हे ?
कीं द्रवुनि तारका चित्तीं-स्वर्गींच्या विमल ज्योती
उतरून पातल्या खालीं-ही माळ तयांची झाली ?
सौंदर्यझरी ज्योत्स्ना ती-अवकाशीं झरली रातीं,
सौंदर्यसुधाबिंदू ते-कीं दिसती हे मज पुढते ?
स्वर्गाची तेजोवृत्ति-अवनीची मुग्धा प्रीति,
संमीलित होउनि कीं ही-दंवबिंदुमालिका होई ?

* * *

हें प्रेम दिव्य सुंदरता-मज दिसतें त्यांतच आतां,
एकेका बिंदूंतून किति होति स्वर्ग निर्माण
गाण्याचें सार अहा रे प्रगट होत तयांतच यांतच सारें;
गंधर्व काय का कोणी-आले हे स्वर्गांतोनी ?

अपूर्ण

# कवीचें स्वप्न

झोंप येते निद्रिस्त विश्व होतें,
झोप येतां कविचित्तही निजे तें;
किती स्वप्नें तरि व्यक्तिमात्र पाही,
तशीं स्वप्नें पडतात कवीलाही. १

त्रुटित माला या भंगुरा जगाची
व्यक्तिमात्रा स्वप्नांत दिसे साची;
परी ब्रह्मांडें करिल एक ठायीं
स्वप्न असलें कविराय दिव्य पाही. २

विश्वमोहीं दिव्यांश मूढ होतां
अविद्येची स्वप्नांत बघे गाथा;
दिव्य चैतन्यें धुंद दिशा दाही
स्वप्न कविचें प्रज्वलित तेथ होई. ३

ईश्वराचें सद्रूप लुप्त झालें,
कविस्फूर्तीनें मूर्त तया केलें;
जगा नाहीं सामर्थ्य पटायाचें,
म्हणुनि बोले ते स्वप्न हें कवीचें. ४

---

# प्रेमाचें अल्लडतेचें चित्र

चंद्रकला जलदांमधुनी—धांवतसे भरभर गगनीं;
स्वच्छ चांदणें क्षण येतें—क्षण सर्वहि अंधुक होतें;
क्षण उल्हासा हो भरती—उदासता तों ये वरती.
पाहुनियां चंचलतेतें—आठवलें हृदयीं मातें;
प्रेमाच्या अल्लडतेचे—ते दिन हसण्यारुसण्याचे
चित्तचंद्रिकाप्रीति खरी—धांवत होती हृदंतरीं
तारुण्याचें दृश्य तदा—हंसलें रुसलें कितीकदा

चंद्रकला गगनीं विलसे—जलदांमधुनी धांवतसे;
चित्तचंद्रिका हाय परी—न दिसे मजला हृदंतरीं.
म्हणूनि असा पडुनी येथें—शून्य मनानें गगनातें
अवलोकित मी गात असें—जड हृदयाचें गीत असें.

---

## वत्सलता

वत्सलतेनें चिमण्या बाळा तुज वेल्हाळा पालवितें;
हृदयीं येई प्रेम दाटुनी त्यापरि पालख[1] हालवितें.
निज निज बाळा-जीवभाव हा गहिंवरूनी येई भरती;
प्रेमानंदें ! तुज गातां जणुं लक्ष कवि मनीं अवतरती.
सांठविलें जे मनीं आजवरि तेज तुझ्या वदनीं बघुनी
नको बघाया जनांत कोणी म्हणुनि झांकितें पदरांनीं.
निज निज माझ्या प्रेमानंदा, मत्सुखकंदा, नीच गडे,
नातरि हृदयीं फिरुनि निजविण्या धडधड माझें चित्त उडे.
कसले कांहीं विचार बाई, मी तरि आहे शोभतसें;
माझिच तुजला दृष्ट लागली हाय मना भय वाटतसें.

---

## अतृप्ति

पांव्याच्या गोड सुरांत । बुडवून जगाला देऊं;
स्वानंद सुखद राज्यांत । संत्रस्त जिवाला नेऊं.
तारुण्य भ्रष्ट हो जेथें । प्रेमास अंधता येते,
सौख्यातिरेकही पाहीं । दुःखाला कारण होई.
संध्येच्या सुंदर छाया । निमिषांतच काजळताती;
करि घोर भयद अंधार । नैराश्यविषाची भरती.
या अपूर्ण जगतासंगें । मन तृप्ति कधींहि न पावे
मग मंजु गायनासंगें । बा, कां न उडुनि तें जावें ?

---

१ पालव

[ बालकवींच्या पुढील कविता प्रथमच प्रसिद्ध होत आहेत. त्या कवितांचा संग्रह सह्याद्रीचे विद्वान् संपादक श्री. दि. वि. काळे, एम्. ए., यांच्या मार्फत, भावे प्राथमिक शाळेंतील शिक्षक श्री. शं. रा. देवळे, साहित्यप्राज्ञ, यांजकडून आम्हांस प्रथम पाहाण्यास व नंतर छापण्यासाठीं मिळाला. श्री. देवळे यांना त्या कविता धुळें येथें त्यांचे एक विद्यार्थी रा. बुलाखीदास कोष्टी यांजकडून १९३७ च्या डिसेंबरांत मिळाल्या; तेव्हां या कविता प्रकाशांत आणण्याचें श्रेय श्री. काळे, श्री. कोष्टी व श्री. देवळे या तिघांकडेच जातें. या कवितांसंबंधीं प्रस्तावनेंत स्वतंत्र माहिती दिली आहे—संपादक ]

## प्रस्तावना

या सर्व कविता जुन्या आहेत. यांतील कित्येक तर ६–७ वर्षांपूर्वी म्हणजे मी माझ्या वयाच्या ११–१२ व्या वर्षी केलेल्या आहेत. आज या सर्वांना मला नवें स्वरूप देतां येणार नाहीं व या प्रसिद्ध व्हाव्या अशीही माझी इच्छा नाहीं. परंतु माझ्या कवितेची वाढ कसकशी होत गेली व हल्लीं ती कोणत्या पायरीवर आहे हें समजण्याला मला वाटतें या कविता पुष्कळ अंशीं कारणीभूत होतील व म्हणून त्या एकत्र लिहून ठेवाव्या असें माझें मनांत आलें. या कविता माझ्या हातून कधींच काढल्या गेल्या नसत्या. कारण लोकांना अपक्व पाक वाढण्यापेक्षां तो न वाढलेला बरा म्हणून मी माझ्या वाईट कविता ठेवीत नाहीं. जरी ठेविल्या तरी माझ्या हलगर्जीपणामुळें इतर पुष्कळ कविता हरवतात त्याप्रमाणें, या कविताही, हरवून गेल्या असत्या. पण माझे मित्र श्रीयुत नारायण गोविंद भालेराव यांनीं त्या आपल्यापाशीं मोठ्या काळजीनें बाळगून आज मला दिल्या त्याबद्दल त्यांचे मी आभार मानीन तितके थोडेच.

बालकवि

१–१०–१० त्र्यंबक बापूराव ठोंबरे,

रावेर, पूर्व खानदेश.

# आत्मविश्वास

कां मग खंती—जग सगळें माझ्या हातीं.
गिरीवरुनि हा जलौघ सुटला,
तो मग काय कुणाला भ्याला ?
कंपित जाई गिरिशिखराला
सुखवायाला—जगताला कारण झाला. १
दुःखसंकटांनीं या आतां,
भीति स्पर्शुं शकेना चित्ता,
जाइन मी मम शोधुनि पंथा,
ईश्वर त्राता—मग मला कशाची चिंता ? २
वाटाड्या भववनीं असे तो,
आप्तमित्र मम बांधवही तो,
तोच गुरू विज्ञाना देतो,
धनी जगताचा—प्रेमळ तो जनकच माझा. ३
जग होवो मजवर उफराटें,
पसरो मार्गी अविरल कांटे,
जाइन मी मम इच्छित वाटे,
जगा सुखवाया—बालवीन जन्म न वांया ४

---

# पंथ

मन्मना जगाचा पंथ तुझा नच कांहीं;
तव पंथ दुजा, हा सोड, वेगळा होई.
हें विश्व बुडे त्यासंगें कां बुडतोस ?
कां वळें जाउनी गांठावें वणव्यास ?
दे दुःखसुखाचें जाळें—फेंकुनी
मायेची दुर्धर बेडी—तोडुनी
या सर्व जगाच्या संकटास हो धीट;
मग शोध आपुल्याआपण पंथ ( तो ) नीट.

२

प्रेमाला जेथें बंध कशाचा नाहीं,
दिव्यता पसरली दिशा व्यापिल्या दाही;
आत्मानुभवाच्या रम्य वाटिका जेथें,
पुष्पांचा परिमल भरला सर्व दिशांतें;
शांतिची साउली जेथें-नांदली
निर्झरिणी आत्मसुखाची—ज्या स्थळीं
ये मंजुळ गाणें जिथें आत्मविश्वास
मम हृदया ! जाणें तुला त्याच पंथास.

---

## क्षय

हा शोक उगाच कशाला, क्षयरोग जरी मज झाला—माउली.
जन्माला, दिसे क्षय त्याला; क्षय जडला सर्व जगाला—माउली,
वर्षांत
वाहला येथ,
झरा जो शांत
क्षयी तो झाला—ग्रीष्मांत उडोनी गेला—माउली.
कीर्तीला क्षय काळाला—जरि अनंतही तो असला—माउली,
क्षय जें जें दिसतें त्याला—तेजाला, घोर तमाला—माउली,
चंद्रमा
भारितो नभा .
वितरुनी स्वभा,
परी क्षय त्याला—क्षय सुटला नाहीं रविला—माउली.
जीवित हें दों दिवसाचें, आज ना उद्यां सरणार, माउली,
परि धर्मीं नित्य रमावें, हें मात्र यांतलें सार—माउली,
परमेश—
—पदीं सहवास
सदाचा वास
शांतिसह व्हावा—कांहिं असा पंथ धरावा—माउली !

---

# निराशेचें गीत

द्या आशेचा एकचि तंतू मजला, ना तरि हा समजा मेला.
रवि तीक्ष्णकरें ये मज जाळायाला–हा चंद्र विषाकर झाला.
ही भूमि गमे थरथरली दुःखांहीं–सागरही क्षुब्ध अगाई !
कोसळले पर्वत माथां,
प्रलयाग्नी भडके आतां,
तम भेसुर वेष्टी पंथा,
करूं काय कुठें जाऊं ? बाहुं कुणाला ? तारील कोण दीनाला ? १
हें दुःख नव्हे, प्रळयींची चपला ही ! आली हो ! पडते भालीं.
ही आरडते, धांवुनि येते खालीं ग्रासाया मज जलदाली;
नभ कडकडतें, भूमि चालली खालीं–हीं भूतें धांवत आलीं.
काळाच्या भेसुर दाढा
करुं टपल्या हाय ! चुराडा;
काढा हो, यांतुनि काढा.
या दीनाच्या उत्तर द्या हांकेला; उठवा हो ! मेलेल्याला ! ! २

---

# काय असे संसारांत ?

आशा सरली, प्रीति निमाली,
नैराश्याची भयाण काळी
रजनी ही चहुंकडे पसरली,
मार्ग सांपडेना त्यांत.
माळ म्हणोनी धरी जिला तीं,
व्याळ होउनी डंखे चित्तीं.
सत्य म्हणा कीं कुलटा प्रीती
मज लोटी पाताळांत.
स्वार्थसुखाची झाली होळी,
परमार्थाची राखरांगुळी,
दुर्दैवाची पिकली पोळी,
काय राहिलें जगतांत.

हें चिंतेचें वादळ सुटलें,
सुखसरितेचें पाणि आटलें,
दुःखदवाग्नी क्रूर भडकले,
देह पोळला हा त्यांत.
भारभूत मज नको जिणें हें,
उदास विश्वच मजला आहे,
सोड दयाळा प्रभो ! प्रार्थना
हीच तुला आहे.
हें जग अवघें अवघें खोटें,
नित्य चाललें हें उफराटें,
पुरे बोचले याचे कांटे,
धांव दयासिंधो !
हा काळाचा उदार सागर
रमे तुझ्यासह प्रशांत निर्भर,
त्यांतुनि लहरी एक उंच कर
मज उदरीं घ्याया.
क्रूर जगीं या कसलें गाणें ?
कसलें हसणें, कुठें खेळणें ?
तुझ्या पदीं घे मग प्रेमानें
गाइन मी तेथें.

# हरिण आणि गायन

कुरण वायूशीं मंद डोलतें हें,
मधुनि ओढा हा हळूंहळूं वाहे;
वृक्षलतिकांची चोंहिकडे दाटी,
दिसत तेणें रमणीय भूमि मोठी. १

एक हरिणाचें बाल फिरे त्यांत,
वनश्रीचें उत्तान जणूं चित्त;
उड्या मारी क्षण चोंहिकडे पाहे,
मोद कीं हा भूवरी दुजा आहे. २

कुठुनि आली तों उंचशी लकेर
अहा गानाची संथ संथ फार ?
जणूं वायूवर उर्मि कोरित्तें तें;
हरिणबाळा त्या स्वैर मोहवितें. ३

सर्व गेलीं हरपोनि देहभानें,
बाळ रमलें त्या मधुर गायनानें.
चित्त सगळें कर्णांत सांठवोनी
गुंग झालें त्या पूर्णपणें गानीं ४

जवळ आलें तें गान, त्या लकेरी
रम्य नादें भारील दिशा चारी.
चढे धुंदी त्याचीच हरिणबाला;
हाय ! दुर्दैवी ! ! तोंचि घात केला

बाण आला तो हायरे कुठोनी
बसे मर्मी बाळास त्या रुपोनि.
क्षणीं आलें तें हरिण (बाळ) खालीं;
भिजुनि रक्तानें चिंब तनू झाली

मृत्यु नेत्रीं येवोनि उभा ठेला
शब्द उमटेना, कंठ शुष्क झाला
हाय ! काळानें ओढुनिया नेलें,
हरिणबालक तें भाबडें बिचारें !

फसो, फसलें चिमुकलें हरिणबाळ
सदा वनवासी अप्रबुद्ध लोल,
परी फसतों सज्ञान असे आम्ही
मोहजाळीं गुंतुनी क्रोधकामीं

# दुःखी भावाची बीज

मंदाक्रान्ता

आली भाउबिज म्हणुनिया हर्षती लोक सारे,
माझ्या चित्तीं परि उसळतें दुःखही हें कसें रे !
गेली ताई, किति तरि वरी काल लोटोनि गेला;
नाहीं दुःखा क्षय, नव गमे आठवीतां मनाला. १
दादा, दादा, किति मधुर हा शब्द होता तिचा तो,
शुद्ध प्रेमें सतत भरला मूर्त आनंद कीं तो.
होता, गेला, हरहर परी मृत्युदाढेंत गेला
ताईसंगें उडुनि गगनीं तो कुठें नष्ट झाला. २
गेली ताई, स्मृति परि तिची मानसा जाळिते ही
गेल्या बीजा मधुर, उरली आज ही कष्टदायी.
आतां स्वर्गीं पुढतिं मजला काळ नेईल जेव्हां,
ताईसंगें करिन अपुली बीज मी सत्य तेव्हां. ३

# माझें दिव्य

बाह्य जगांतुनि दिव्य रसाचा पूरच हा लोटला,
हर्षविल अंतःसृष्टी मला.
अमृतरसाचा पाट नभांतुनि धांवत हा पातला,
लोळवी परमानंदीं मला.
निर्झर कीं हा शांतिसुखाचा मम हृदयीं झरतसे.
पुढें कीं नंदन हें मज दिसे.
हा प्रणयविकासी उज्ज्वलतेची खनी,
तारकापुंज कीं भरला माझ्या मनीं,
स्वर्गदीप्तिसह सखि कविता ये मग हृदयीं धांवुनी
कर मज गुंग सदा गायनीं.

सृष्टि हांसवी मला फुलांनीं, तारांनीं नभ तसें,
सदाचें मंगल मज देतसे.
जिकडे तिकडे दिव्य सांठलें, रत झालें गायनीं;
पहा या जनीं मनीं कीं वनीं.
त्यासह जी क्रीडा प्रेमच माझें खरें,
ही क्रीडा म्हणजे जीवित माझें बरें,
या दिव्यासह सखि कवितेशीं जिणें वेंचिलें जरी
खरी मज माझी मुक्ती तरी.

## काय करूं ?

काय करूं विठ्ठला–कथी मज–काय करूं विठ्ठला !
हा स्वार्थाचा वणवा बघ रे, चोंहिकडे पेटला.
धूम तयाचा मत्सर–कपट–क्रोध जगीं लोटला;
दुर्विचारघूकांचा रव हा सर्व दूर दाटला,
तुज भुलला, अज्ञानतमीं हा जनसमूह चालला;
अंधश्रद्धा किति माजली, दंभ किती वाढला.
अभिमानाचें खड्ग उपसिलें भावभक्तिच्या छला;
जिकडे तिकडे असत्यता ही कुणी स्मरेना तुला.
अंतरंग सोडुनि बहिरंगीं हा जन वेडावला;
तुझीं लेंकरें समान सारीं कळेल तेंव्हां मला.
पहा माजली घोर यादवी, वैर किती वाढला;
धर्मदीप हा विझावयासी परमेशा लागला.
नीति दारची शुनी, पुसेना ढुंकुनि कोणी तिला;
समाजबंधन शिथिल जाहलें, कीड लागली मुळां.
कसा धरिल मग राष्ट्रतरू तो मधुर मनोहर फला ?
गतानुगतिकत्वाचा खोडा अडला पायीं पुरा.
जरि आरडतों, गमे परी तो पंथ एक चांगला;
उन्नतिची वाढ खुंटली शरणागतवत्सला !
किती पाहसी अंत अजुनिही दाखव पथ चांगला—

# दिव्य

रात्र काळी, आकाश कृष्णवर्ण । चंद्र काळया मेघांत हो विलीन.
हाय ! गेल्या तारका पुढें आतां । कृष्ण पसरे नभ घोर हें सभोंता. १
चित्त काळया दुःखांत बुडे पार । मना गेले सोडोनि सद्विचार
सर्व, काळें मज शून्य सर्व झालें । दिव्य माझें लोपलें, कुणीं नेलें ? २
विश्व काळाच्या सागरीं बुडालें । अवधिसीमेनें बद्ध सदा झालें;
निधी पाताळीं खोलखोल गेले । दिव्य माझें चोरोनि कुणी नेलें ? ३
कालसागर वेढील तया काय । कुणी सीमा घालील त्यास होय ?
कधीं नाहीं, उत्तान तें सदाचें । प्रेम शांतीचें न हो निराशेचें ४
इथें कोठें लाधे न दिव्य माझें । वृथा वाटे हा जीव जगीं ओझें.
कुणी कोठुनिही मला याच काळा । दिव्य माझें आणोनि अहो घाला. ५

---

# कवितेस

मत्काव्यदेवते येई दे भेट तुझ्या दासाला;
तळमळतों गे तुजसाठीं आत्मा हा व्याकुळ झाला.
तूं सरिता प्रेमळ माझी, कां त्यजिसी मज मीनाला ?
तुजविषयीं ध्यास जिवाचा,
त्वद्रूपीं रमली वाचा,
ये, पुरवी छंद मनाचा,
जग नको तुझ्याविण त्याला—( दे भेट तुझ्या दासाला ०)

२

धुंडिलें विश्वभर तूतें, लाधेना ठाव कुठेंही;
रानींवनिं भटकत फिरलों लाधलीस परि तूं नाहीं;
अश्रूसह हृदय गळालें, चिंतेनें चित्त मिळालें;
दुःखांनीं कावुनि गेलों, तुजसाठीं वेडा झालों;
कोठें न परी तूं कांहीं,
तगमगही थांबत नाहीं;
दुःखां मन मोजित नाहीं;
उद्युक्त तुला वधण्याला— ( दे भेट. )

३

परि आतां गिरिशिखरें हीं पसरलीं सभोंतीं घोर
हे उदधी उग्रकराल भिवविति मज वारंवार;
आडवें पथीं हें आलें तम माझ्या हाय अपार;
हे सर्प विषारी त्यांत मजवरी करिति फूत्कार;
अवघडलें आतां येणें,
आशांची झालीं स्वप्नें,
नैराश्य मानसीं बाणे,
सांगूं हें दुःख कुणाला— ( दे भेट. )

४

या उदास जगतीं साऱ्या तुजवांचुनि मजला कोण ?
'प्रेम तूं' उडोनी जातां मग काय इथें राहून ?
तूं सांग मला 'मी येथें आल्येंच पहा' धांवून;
हा काळ संपला जेथें,
क्षण वास न औदास्यातें,
प्रेमाविण पाश न जेथें,
तूं असशिल त्या स्थानाला— ( दे भेट )

# गाणाऱ्या पक्ष्यास

समय रात्रीचा कोण हा भयाण !
बळें गर्जे हें त्यांत घोर रान.
अशा समयीं छबुकड्या पांखरा तूं,
गात असती; बा काय तुझा हेतू ?
गिरी वरतीं हा उंच उंच गेला,
तमें केलें विक्राळ किती याला.
दरी गर्जे, फूत्कार पहा येती,
किती झंझानिल घोर वाहताती.
दीर्घ करिती हे घूक शब्द कांहीं;
क्रूर नादें त्या रान भरुनि जाई.
अशा समयीं हें गोड तुझें गाणें
रम्य पक्ष्या, होईल दीनवाणें.
तुझ्या गानाचें मोल नसे येथें,
कुणी नाहीं संतुष्ट ऐकण्यातें;
जगें अपुल्या कानास दिली टाळी.
वृथा मानाची हाव अशा वेळीं.
तुझें गाणें हें शान्त करी आतां,
पहा, गर्जे वन घोर हें सभोंता.
किर्र करिती हे तीक्ष्ण शब्द कीट,
असे त्यां ( चा ) या समयिं थाटमाट.
पुढें येइल उदयास अंशुमाली,
दिशा हंसतिल वन धरिल रम्य लाली.
हरिणबाळें फिरतील सभोंवार,
तदा येवों गाण्यास तुझ्या पूर.
तुझे आप्ते दिसतील एक ठायीं,
हरित कुंजीं ज्या हास्य पूर्ण कांहीं.
वदुनि त्याच्यासह रम्य गीत बा रे,
मधुर नादें वन भरुनि टाक सारें.

# लतिका

मुरडितसा नाकें आज पाहोनी या लतिकेला,
जाणा कीं निश्चय परि ही भूषवील उद्यानाला.
हे तीव्र विषाचे वारे, मधुपूरित हीच करील;
"शुष्क काष्ठ" म्हणतां तीच पसरेल दिगंतीं वेल.
शिशिराच्या शीतल भारी
लहरीवर येती लहरी,
ही झाली दीन बिचारी,
इष्ट काळ हा न तियेला—भूषवील उद्यानाला.

२

येईल वसंत सुखाचा, ही पुलकित होइल बाला,
नंदनवन आणिल खालीं, भूमीला भेटविण्याला,
सुरकिन्नर येतिल तेव्हां, मग हिजला आळविण्याला—
तोंवरि हो! घ्या हांसोनी,
भ्रुकुटींच्या विषमयबाणीं
कीं दुर्धर दुर्वचनांनीं—
घ्या ताडुनि या बालेला—भूषवील उद्यानाला.

अपूर्ण

# शीतल जग

शीतल हें जग झालें—उष्ण निमालें, ताप गळाले.
शीतल हा विधु शीतकरांनीं
तप्त जगाला प्रेमें न्हाणी.
शीतल कुंजीं शीतल रजनी
मंजुळ गाणें बोले ? "उष्ण निमालें, प्रेम उदेलें."
सरल्या तापद दुःखद चिंता,
मन्मन झालें शीतल आतां,
शीतल हें नभ, शीतल वसुधा,
शीतल विश्वच झालें—शांतीचें साम्राज्य उदेलें,
शांत तरू हे—शांतच कानन,
झुळझुळ त्यांतुनि निर्झरगायन,
भारित आहे प्रेमरसें मन,
हृदय कीं हें बोले—वनदेवीचें होऊनि ओलें.
रम्य धुकें या वातावरणीं
हंसतें केवळ चंद्रकरांनीं,
कीं नभ भरलें कर्पुरचूर्णीं,
हें दंव गे वनमाले—घे नव मोत्यें वेंचुनि बाळे.
चातक गातो मंजुळ गीतां
गा ! तूंही मत्प्रेमळ चित्ता !
परमानंदीं डोलत आतां
मानस, हर्ष करी रे ! शीतल हें जग सगळें झालें.

# प्रेमदेवता

मी रमल्यें बाई प्रेमदेवतेपायीं;
बघ उणें कशाचें जगांत मजला नाहीं.
बसविलें जगाचा पाट देउनी तीतें;
मज दिशांत साऱ्या प्रेमदेवता दिसते.
या वनमाला, हे दिवे नभांतिल–तारे,
हे अलंकार बघ त्या देवींचे सारे.
        मधु मृदुल वाहती वारे–तिजवरी
        सुरकिन्नर गाती तीतें–कितितरी
विश्वांत कोंदलें भरलें उरलें आहे;
हा मोहसुधेचा पाट त्यांतुनी वाहे.

........................

जग वाटिकेंतली धर्मस्वर्गसुमें ही
गुंफोनि, माळ मी देवतेस या वाहीं

........................

मग किती चढविलीं कथूं इच्यावर लेणीं.
हा समानतेचा तिलक लाविला भालीं,
नीतीचीं मंगलसूत्रें हिज वाहीलीं.
        नेसविली स्वानंदाची–पैठणी
        शांतिची रम्य कांचोळी–देउनी
पूजिली, अर्चिली, बाळगिली हृदयांत;
मी प्रेमदेवता माझी निर्मळ शांत.

# जग

तूं तर मित्र जगाचा–कां मग चिंता, खेद कशाचा ?
कल्पद्रुम हें जग होईल,
इच्छित सारें हें जग देइल,
मोक्षपथाला हें जग नेइल,
तूं धर कास तयाची–घे करुनी चिर संगत त्याची ?
स्वर्ग कुठें तो जगतीं आहे,
प्रणयझरी बघ येथुनि वाहे,
चिच्छांतीचे पाट पहा हे !
निर्झरिणी बघ येथें–साची सौख्य समाधानाची
अक्षय हें जग, अक्षय तूंही,
नित्य तयांतच मिसळुनि राही,
आनंदा मग वाणच नाहीं.
' मिथ्या भूल जगाची ' हीं सगळीं वचनें स्वार्थाचीं.
" घे जगताची समजुनि गोडी,"
यास्तव तुजला ईश्वर धाडी,
चल ये सोडव याचीं कोडीं,
हीं परमानंदाचीं—हीच कपाटें प्रेमरसाचीं.
तुजसाठीं हें सगळें कांहीं,
वाइट येथें अल्पहि नाहीं,
ज्ञानदृष्टी उघडुनि पाही,
यांतच जीवित वेचीं, घे निवडुनि हीं रत्नें याचीं.

## पक्ष्यांचें गाणें

प्रणयमंजुषा उषा उदेली,
दिव्यत्वानें वसुधा नटली,
कीं स्वर्गाची प्रभा फाकली ही वरतीं खालीं.
निर्विकार विश्वाचें अंतर
प्रशांत पसरे नभःपटावर
शांतिदायिनी भूमि मनोहर ही हंसते खालीं.
पटल धुक्याचें हळूंच सारुनि,
चंडोलाच्या चाटु वचांनीं,
रुष्ट भूमिला समजावोनी हा चुंबी तरणी.
उषःकालचीं मंगलगीतें
ही सरिता, हें कानन गातें,
हा विहगांचा ध्वनी मजेचा साथचि हो त्यातें.
प्रभातवायू मंद वाहती,
वनराजी आंदोलन घेती,
हळूंच लतिका फुलें आपुलीं–उधळुनिया देती.
माझ्या प्रिय विहगांनों, आतां
प्रसंग सुंदर असा कोणता ?
यापुढतीं हो उघडा अपुली–प्रेमाची गाथा.
पुरे कोटरीं आतां वसती,
रान मोकळें, पुष्पें हंसती;
उडा बागडा प्रशांत गगनीं जा, जा, जा वरतीं.
नभांत मारा उंच भरारी,
प्रेमपूर्ण कीं रमा भूवरी,
विविधा सृष्टी ही देवाची तुमची ही सारी.

---

# परिशिष्ट १

## बालकवींच्या कांहीं कवितांचें प्रसिद्धिस्थळ व काळ.

### काव्यरत्नावली

१९०९ जून : दुबळें तारूं.

१९१० मार्च : स्फुट श्लोक : झालो खिन्न निराश पंथ न दिसे.

,, ,, जून : बालसुभाषित : नाहीं सौख्य जगांत हाय.

,, ,, जुलै : "माझा लहानसा बाग."

,, ,, सप्टेंबर : माझें गाणें.

,, ,, ,, : मी.

१९११ जानेवारी : अनंत.

,, ,, फेब्रुवारी : तृणपुष्प.

,, ,, मार्च : ध्येय.

१९१३ एप्रिल : दिव्य आणि प्रीति.

,, ,, ,, : काळाचे लेख.

१९५४ जॅन्युआरी : वेली डोलति वृक्ष हस्त पसरी.

१९२१ जुलै : श्रावण महिन्याचें गाणें.

### मासिक मनोरंजन

१९०९ दिवाळी अंक : आनंदी-आनंद गडे.

१९१० खास दिवाळी अंक : ओंवाळणि घाली माई.

१९१० मार्च : प्रेमाचें गाणें.

१९११ जुलै : अरुण.

१९११ ऑगस्ट : संध्यारजनी,

,, ,, सप्टेंबर : फुलराणी.

१९१२ दिवाळी अंक : फूलपांखरूं फुलवेली.

१९१३ मे : निर्झरास.

,, ,, जुलै : संध्यातारक.

,, ,, सप्टेंबर : प्रेमलेख.

,, ,, नोव्हेंबर : काळ आणि जीवित.

१९५४ मार्च : धर्मवीर.

,, ,, एप्रिल (वसंत अंक) कवीची इच्छा.

१९१८ मे : आवाहन.

,, ,, मे : संतांचा अनुवाद.

### चित्रमय जगत्

१९११ जुलै : ज्योत.

,, ,, ,, : तारकांचें गाणें.

,, ,, ऑगस्ट : सृष्टीच्या गायकास.

,, ,, डिसेंबर : यमाचे दूत.

१९१३ ऑगस्ट : संध्यातारक.

### नवयुग

१९२० आक्टोबर : श्रावणमास.

### रत्नाकर

१९२६ : शून्य.

,, ,, : अश्रुफुलें.

**बालबोधमेवा**

१९०९ डिसेंबर : भिकारी.

१९१० जॅन्युआरी : आनंदी पक्षी.

„ „ मार्च : पाहत राहू । गोदिला ग माझा भाऊ.

„ „ मे : चिव् चिव्...चिमणूताई.

„ „ सप्टेंबर : गोफ.

**आनंद**

१९०७ डिसेंबर : निजलेल्या मुलास

१९०८ „ „ चांदोबा मजला देई.

१९०९ एप्रिल : वसंत.

„ „ सप्टेंबर : घोडा घोडा खेळुं चलारे.

१९१० मार्च : पाहत राहूं गोजिरा ग माझा भाऊ.

११९१ एप्रिल : रागोबा आला आला

**ज्योत्स्ना**

१९३६ मे : वनमाला.

**खेळगडी**

१९१८ मे : अप्सरांचें गाणें. छोट्या बालकास.

**ज्ञानोदय**

१९१५ जॅन्युआरी : अप्सरांचें गाणें.

**केसरी.**

**कवि**

**वि. ज्ञा. वि.**

१९१३ जानेवारी : सुकलेलीं फुलें.

**धर्मदीपिका**

१९१४ मार्च एप्रिल : दीपशिखा.

**बालोद्यान गीतें या पुस्तकांत**

(बालबोध मेव्यावरून)

चिमणीचा घरटा चोरीस गेला.

या बाई या बकुळीच्या झाडाखालीं फुलं वेचूं या.

**सह्याद्रि**

१९४१ मार्च : आत्मविश्वास.

# परिशिष्ट २

## बालकवि यांनीं उपयोजिलेलीं वृत्तें

[ नाशिक येथील सुप्रसिद्ध कवि व गायक श्री. सोपानदेव चौधरी यांनीं बालकवींच्या कांहीं कविता मला गाऊन दाखविल्या व त्या कवितांतील वृत्तामुळें होणाऱ्या रसपरिपोषाबद्दल चर्चा केली, त्या चर्चेचा निष्कर्ष त्यांनीं आपल्या पुढील पत्रांत सविस्तर दिला आहे.—संपादक. ]

बालकवींनीं आपल्या बहुतेक कविता ठराविक ६–७ वृत्तांत लिहिल्या असल्या तरी ते स्वतः सर्व ( १ ) आनंदी आनंद गडे ( जाति बालानन्द ) व ( २ ) हिरवे हिरवे गार गालिचे ( कटाव ) या दोन चालीवर गात असत. दोन्ही चाली अगदीं सारख्याच आहेत. बालकवींच्या सन्निध्यांत राहिलेले त्यांचे जीवलग स्नेही श्री. दे. ना. टिळक यांनीं स्वतः बालकवींच्या तोंडून वरील चालीच्या विविध कविता ऐकलेल्या आहेत. ही चाल बालकवींनीं इतकी आत्मसात् केली होती कीं, त्या योगानें त्यांच्या सर्व कवितांच्या शब्दाशब्दांवर जाति बालानन्द किंवा कटाव या चालींतील मृदु स्वरांची छाप सर्वत्र आढळते. आणि त्याला तसें शास्त्रीय कारणहि आहे.

'बालानन्द' या जातीला दोन मात्रा अधिक जोडल्या तर कटावाच्या मात्रा तयार होतात. बालानन्दाच्या १४ व कटावाच्या १६ मात्रा पडतात. या दोन्ही चाली एकाच तऱ्हेनें गातां येतात, हें वर सांगितलेंच आहे. जाति चंद्रकांत, साकी, भूपाळी, फटका या मात्रावृत्तांत बालकवींनीं बहुतेक कविता लिहिलेल्या आहेत. सदरहू वृत्तांची छाननी केल्यास या प्रत्येक वृत्ताचे पहिले यति १६ व्या मात्रेवर येतात. तेवढा भाग १३ मात्री कटावावर अगदीं तालबद्ध गातां येतो. पुढचे दुसरे यति कमजास्त मात्रा लांबवून पहिल्या चालीला जोडून घेतां येतात.

| | |
|---|---|
| **हिरवे हिरवे गार गालिचे** | ( कटाव ) |
| ⏑ ⏑ — ⏑ ⏑ — — ⏑ — ⏑ — | = १६ मात्रा |
| **पूर्वसमुद्रीं छटा पसरली** | ( चंद्रकान्त ) |
| — ⏑ ⏑ — — ⏑ — ⏑ ⏑ ⏑ — | = १६ मात्रा |

निजला होता क्षीरसागरीं (भूपाळी)

⏑ ⏑ — — — — ⏑ — ⏑ — = १६ मात्रा

या घुमल्या रात्रीचा वारा (फटका)

— ⏑ ⏑ — — — — — — — = १६ मात्रा

'उद्धवा शांतवन कर जाः' या उद्धव जातीच्या संपूर्ण अस्ताई बालवन्दाप्रमाणें १४ मात्रेंत बसतात. व त्याप्रमाणें गातां येतात.

आनंदी आनंद गडे (बालानन्द)

— — — — — ⏑ ⏑ — = १४ मात्रा

स्वर्गांच्या तेजोगर्भी

— — — — — — — उद्धव

बाळें तीं खेळत होतीं

— — — — ⏑ ⏑ — — = १४ मात्रा

बालकवींच्या या कटावाच्या चालींत एक प्रकारचें विशेष असें काव्यसौंदर्य भरलेलें आढळून येतें. वर्णनशैलीला ही चाल फार परिपोषक वाटते. सहज आठवलें म्हणून सांगावेसें वाटतें. तुलसीदास रामायणाइतकें मनोहारी सुंदर काव्य उभ्या हिंदी साहित्यांत नाहीं. सदरहू महाकाव्य बहुतेक 'चौपाई' या हिंदी वृत्तांत लिहिलेलें आहे. शेंकडा ८० चौपाई व शेंकडा २० दोहे, असें तें प्रमाण पडतें. वृत्त म्हणजेच आपलें कटावाचें वृत्त आहे.

बंदउ गुरुपद पदुम परागा (चौपाई)

— ⏑ ⏑ ⏑ ⏑ ⏑ ⏑ ⏑ ⏑ ⏑ ⏑ — — = १६

सुरुचि सुवास सरस अनुरागा

⏑ ⏑ ⏑ ⏑ — ⏑ ⏑ ⏑ ⏑ ⏑ ⏑ — — = १६

बालकवींची कविता नुसती वाचली तरी यांच्या कवितेंत कर्णापलीकडील असा एक संगीतनाद निघतो. त्या नादाच्या संवेदना हृदयाला होतात. शब्दमाधुर्याबरोबरच नादमाधुर्यानें वर्ण्य विषयाचें हुबेहुब चित्र बालकवि डोळ्यांसमोर उभे करतात. प्रा. भा. ल. पाटणकर यांनीं निर्झर या कवितांतील पहिल्या पांच दहा ओळी याचें उत्कृष्ट उदाहरण म्हणून मला वाचून दाखविल्या. वरील विधानाची

खरोखरच मला प्रचीति आली. याच ओळींकडे मीहि उत्कृष्ट उदाहरण म्हणून अंगुलीनिर्देश करतों.

शब्द आणि ध्वनि यांचा बालकवींच्या काव्यांत इतका मिलाफ झाला आहे कीं, त्यांच्या काव्यांतील प्रत्येक कडव्याला गोडवें असें म्हणावेसें वाटतें.

बालकवींची वृत्तरचना जितकी नादमाधुर्यानें भरलेली, तितकीच ती तालबद्धतेनें भारलेली आहे. कवितेच्या एका चरणावरून दुसऱ्या चरणावर सहज तालावर येतां येतें. कोठेंच ओढाताण होत नाहीं. संगीतशास्त्रांतील मात्रांच्या आवर्ताप्रमाणें कवितेंतील मधुर शब्दांचे आवर्त साधले आहेत. यामुळें बालकवींची कविता ऐकून श्रोता आपल्या तंद्रींतच आपण होऊन ताल धरायला लागतो.

सोपानदेव चौधरी

# परिशिष्ट ३

## बालकवींचीं कांहीं पत्रें

### १

[ या सात पत्रांपैकीं १–५ रा. दे. ना. टिळकांना लिहिलेलीं असून ६ वें टिळकांच्या भगिनींना–ताराबाईंना लिहिलेलें आहे; या पत्रांवरून बालकवींच्या मनोवृत्तीवर चांगलाच प्रकाश पडतो. पत्र ७ हें कोणाला लिहिलें होतें तें समजत नाहीं. तें तसें अपूर्णच आहे.—**संपादक** ]

क्षेम. श्री. अहमदनगर.
ता. २२–११–११.

दत्तोपंत,

तुम्हांला आज इतकीं पत्रं लिहिण्यांत आलीं आहेत कीं, त्या तेवढ्या पत्रांवर एखादं 'मनोरंजन' सारखें मासिक निदान बारा वर्षें तरी एकाही लेखकाच्या मदती- शिवाय चांगल्या रीतीनें चालेल, असा माझा तरी निदान अंदाज आहे. या सर्व पत्रांविषयींच जर लिहूं लागलों तर......जाऊं द्या; तीं पत्रें लिहितां लिहितांच मी मेटाकुटीला आलों आहें. आतां स्वतःचें पत्र कसेंतरी भरकटायचें आहे.

सगळ्यांचींच पत्रं! पत्रं! पत्रं! त्यांत एकादं तरी महाकाव्य–काव्य–लघुकाव्य अगर अल्पकाव्य पाहिजे होतें. आणि सध्यांचा समय या महाकाव्याला योग्य असाच होता. घरांत नवरसांची...श्रीखंड, लाडु, इत्यादि नवरस, एकसारखी गर्दी लागून राहिली होती. आणि तसल्या प्रसंगीं माझ्यासारखा नवरसात्मक महाकाव्य करण्यास तयार असा महाकवीही हजर होता. पण काय करूं? ते नवरस मला... माझ्यासारख्या योग्य महाकवीला अनुभवायला–यथेच्छ ताव मारायला मिळाले नाहींत. ते नवरस तुमच्याकडे येण्यास तयार झालेल्या पेटींत बंद झाले; त्याबरोबर आमचें काव्यही बंद झालें. आणि पेटीला कुलुप बसतांच आमच्या तोंडालाही कुलुप लागलें. असो. हरीच्छा! काय उपाय! मीं माझेकडून हवा तितका प्रयत्न केला व प्रसंगविशेषीं त्यांचा यथाशक्ति अनुभव घेतला. पण ते रस महाकाव्यांत उचंबळायला आधीं पोट साफ भरलें पाहिजे. येवढ्यातेवढ्यांनीं हीं महाकाव्यासारखीं महत्कार्यें होत नसतात, हें तुम्हांला सांगायला पाहिजे असें नाहीं.

महाकाव्याचा बेत अशा तऱ्हेनें रहित झाला. बहुत दुःख झालें, उपाय नाहीं. मग मींही आपल्या मनाशीं शहाणपणाचा विचार केला कीं, जाऊं द्या; पण बेटी मनाला ती एक रुखरूख लागून राहिली आहे. बरं दुसरी एक गोष्ट मनाला टोंचते आहे, ती म्हणजे श्रीमती लक्ष्मीबाईनीं केलेली तुमच्याकडे पाठविल्या जाणाऱ्या वस्तूंची जंत्री. अमक्यानें तमुक पाठविलें, तमक्या तमुक, यानें 'हें' पाठविलें, त्यानें 'तें' पाठविलें, अन् ठोमरेनें कांहीं पाठविलें नाहीं. दत्तोपंत या गोष्टीवर मुळींच विश्वास ठेवूं नका. प्रत्येक वस्तू पांठविली मीं. अहो मी सारखें आपल्या तोंडाला कुलूप घालून ठेविलें होतें, म्हणून असें बोलायचें काय ? खरोखर मला फार राग आला. प्रत्येक वस्तु, निदान गोड पदार्थ, मी...मी छातीला हात लावून सांगतों कीं, मीं...पाठविला आहे. आमच्या हातातोंडाच्या लढाईतून वांचल्यावर प्रत्येक वस्तु आपलेकडे येऊं शकली. म्हणजे प्रत्येक वस्तु आम्हीं—मला प्रांजलपणें कबूल करावें लागेल कीं मीं बेबीचें सहाय्य घेतलें असतें—आमच्या विशाल दरींत केव्हांच गडप केली असती. पण तुमच्यावर आमची कृपा म्हणून, तसं कांहीं न करता भयंकर आत्मसंयमन करून आम्हीं...मीं ती प्रत्येक वस्तु तुमच्याकडे पाठविलीं, अन् माझें नांव नाहीं, असा राग येतो किनाई, पण जाऊंद्या. तुम्ही सूज्ञ आहां, तुम्हांला सर्व समजून येईल; पुढील पत्रीं सदर गोड गोड खाऊ पाठविल्याबद्दल माझे व बेबीचे मनापासून उपकार मानण्यास विसरूं नका.

आपला आज्ञाधारक

**त्र्यंबक.**

---

## २

फर्ग्युसन् सोलापूरचे मिशनरी[1]
आक्टोबर १९०९.

प्रिय सूर्या[2] अर्जुनाच्या शंखोबा[3], ' तूं फार भागलास सांबा, तुला तर भाऊच म्हणते अंबा. पण असे तुझ्यांत कोणतें रे गुण बाबा ? '

बरं केलंस, पाठविलंस पत्र, फार हर्षित झालेत तुझे मित्र. कमी रागावली मात्र. गुरगुरतच होतें तें द्वाड कुत्रं, म्हणे " आमचे कां नाहीं गायलं स्तोत्र, " तथास्तु. *आपली आम्हांला किती वेळ तरी आठवण झाली; तें असो,* पण घरांत तरी आपण कोण धांदल उडवून दिली आहे. आपण लवकर यश घेऊन परत यावें म्हणून कुमारी ( निश्चयानें सांगतां येत नाहीं ) कमलाबाईनें मूषकस्वाहाकार फार जलदीनें चालविला आहे. आणि कुत्रोजी डोळे मिटून घेऊन ईश्वरचिंतनांत तासचे तास घालवितात. त्या शेजारच्या उल्लू मार्जारसुंदरी ते ( कुत्रोजी ) झोंप घेत पडतात असा कुत्सितपणाचा आरोप करतात. पण येवढ्या ईश्वरनिष्ठ, महानुभाव व्यक्तीवर असेल आरोप करणें देखील महापाप आहे, असें श्रीमती कु. कमलाबाईनीं आपलें निष्कपट व प्रांजलपणाचें मत दिलें आहे. दोघांनाही ( श्री. कमलाबाई, व रा. रा. ब्लाकोजीराव ) आपल्या विरहानें फार वाईट वाटत आहे, फार काय सांगावें, हृदयांतील विरहाग्नि कसातरी शमविण्याकरतां श्री. कमलाबाई दुधाचा सारखा फडशा उडवीत असतात, व पोटांत उद्भवलेल्या विरहाच्या उमाळ्यांना दडपून टाकण्याकरितां ब्लाकोजी भाकरीच्या भाकरी हृदयांत कोंबीत असतात. काय करतील बिचारे ! मला तर त्यांच्याकडे पाहून दिवसांतून कितीतरी वेळां खडबडून छे, छे, चुकलों भडभडून येतें. बरं येवढ्यावरच तरी कर्मकथा संपली असती तर बरें होतें, पण छे ! ती बेटी जाई, कांहीं केल्या ऐकत नाहीं. जरी मी तिला सांगतों ' बाई, तुझा भाऊ इथें नाहीं. खोलीच्या बाहेरच राही, ' तरी आपली आंतच येई. याला उपाय आहे कां कांहीं,

---

१ सोलापूरला ' गेट्स् ' नांवाचे मिशनरी होते तेव्हां फर्ग्युसन सोलापूरचे मिशनरी म्हणजे ' फर्ग्युसन गेट ' २ सूर्या=मित्र ३ अर्जुनाच्या शंखा=देवदत्ता. ४ खिडकींतून आंत शिरूं पाहणारा जाईचा वेल; तसेंच गुलाब, गुलछबू व शेवंती ह्या अंगणांतल्या फुलझाडांचा पुढें उल्लेख आहे.

मला तर कांहीं बुवा सुचतच नाहीं. गुलछबूला तर हसूंच येई, पण गुलाब त्याच्या-सारखा फुलीश नाहीं. अलीकडे पावसानें केली आहे घाई, तो कांहीं थांबत नाहीं, मधुन मधुन हसते जाई, पण तिला फारसा बहर नाहीं, खूब फुगल्या शेवंती ताई, पण फुल पहावं तर एकही नाहीं, मोगऱ्याला तरी एक येई, आणखी कळ्याही आहेत कांहीं, असो, कमजास्त कां ऽऽऽ हीं नाहीं.

पण हो ! आपल्या ताराबाई, त्यांच्या नाकांत सध्यां कांहीं फुल नाहीं, असलीं जरी थोडी कांहीं तरीही त्यांचें महत्त्व नाहीं, एखाद दुसरं खालीं येई, पण ती आपली खुडित राही, त्यामुळें रान माजत नाहीं.

कसला घोंटाळा, ' कांहीं नाहीं.'

आपला प्रिय मित्र,

**तीन डोळ्यांचा, नारळ.**

स्मशानवास,
हिमालयाचा सहवास,
पण राखच माझ्या अंगास.

३

श्री. अहमदनगर.

तुमचें चित्र—छे ! तें चित्र नव्हतेंच मुळीं ! खरोखर तें एक मूक काव्यच होतें—किंवा तें चित्रच होतें ! स्वर्गीय बालभावनांचें—सत्त्वपूर्ण सहानुभूतीचें—परमात्म्याच्या शुद्धतम विभूतीचें—प्रेमाचें—तें चित्र नव्हतें का ? प्रिय बंधु, आपण पुढें जातों कीं मागें कुणास ठाऊक ? आम्ही ज्ञानी झालों—बुद्धिमान झालों—कवी झालों—पण खरं कां हें ? बाळपणांत जें जग होतें तेंच हल्लींही आहे ना ! अरेरे !! किती बदल हा आमच्यांत. जगाच्या आरंभापासून एकाच तेजानें प्रकाशित होणाऱ्या तारा या बहुरूपी मनुष्याला काय बरें म्हणत असतील ? काय आमचे रंग हे असे बदललेच पाहिजेत ? काय ! मनुष्य पतनशील आहे ! काय, बाल्य आणि तारुण्य यांचें एकीकरण होणें शक्यच नाहीं ? छे ! असें मात्र म्हणूं नका; पत्र संपलें; हृदय भरलेलेंच आहे.

**त्र्यंबक**

---

१ तीन डोळ्यांचा त्र्यंबक म्हणजे शंकर तो आंगाला राख फांसून हिमालयांत व स्मशानांत राहतो म्हणून ' स्मशानवास......अंगास.'

## २

फर्ग्युसन् सोलापूरचे मिशनरी[1]
आक्टोबर १९०९.

प्रिय सूर्या[2] अर्जुनाच्या शंखोबा[3], ‘ तूं फार भागलास सांबा, तुला तर भाऊच म्हणते अंबा. पण असे तुझ्यांत कोणतें रे गुण बाबा ? ’

बरं केलंस, पाठविलेंस पत्र, फार हर्षित झालेत तुझे मित्र. कमी रागावली मात्र: गुरगुरतच होतें तें द्वाड कुत्रं, म्हणे “ आमचे कां नाहीं गायलं स्तोत्र, ” तथास्तु. आपली आम्हांला किती वेळ तरी आठवण झाली; तें असो, पण घरांत तरी आपण कोण धांदल उडवून दिली आहे. आपण लवकर यश घेऊन परत यावं म्हणून कुमारी ( निश्चयानें सांगतां येत नाहीं ) कमलाबाईनें मूषकस्वाहाकार फार जलदीनें चालविला आहे. आणि कुत्रोजी डोळे मिटून घेऊन ईश्वरचिंतनांत तासचे तास घालवितात. त्या शेजारच्या उल्लू मार्जारसुंदरी ते ( कुत्रोजी ) झोंप घेत पडतात असा कुत्सितपणाचा आरोप करतात. पण येवढ्या ईश्वरनिष्ठ, महानुभाव व्यक्तीवर असेल आरोप करणें देखील महापाप आहे, असें श्रीमती कु. कमलाबाईनीं आपलें निष्कपट व प्रांजलपणाचें मत दिलें आहे. दोघांनाही ( श्री. कमलाबाई, व रा. रा. ब्लाकोजीराव ) आपल्या विरहानें फार वाईट वाटत आहे, फार काय सांगावें, हृदयांतील विरहाग्नि कसातरी शमविण्याकरतां श्री. कमलाबाई दुधाचा सारखा फडशा उडवीत असतात, व पोटांत उद्भवलेल्या विरहाच्या उमाळ्यांना दडपून टाकण्याकारितां ब्लाकोजी भाकरीच्या भाकरी हृदयांत कोंबीत असतात. काय करतील बिचारे ! मला तर त्यांच्याकडे पाहून दिवसांतून कितीतरी वेळां खडबडून छे, छे, चुकलों भडभडून येतें. बरं येवढ्यावरच तरी कर्मकथा संपली असती तर बरें होतें, पण छे ! ती बेटी जाई, कांहीं केल्या ऐकत नाहीं. जरी मी तिला सांगतों ‘ बाई, तुझा भाऊ इथें नाहीं. खोलीच्या बाहेरच राही, ’ तरी आपली आंतच येई. याला उपाय आहे का कांहीं,

---

१ सोलापूरला ‘ गेट्स् ’ नांवाचे मिशनरी होते तेव्हां फर्ग्युसन सोलापूरचे मिशनरी म्हणजे ‘ फर्ग्युसन गेट ’ २ सूर्या=मित्र ३ अर्जुनाच्या शंखा=देवदत्त. ४ खिडकींतून आंत शिरूं पाहणारा जाईचा वेल; तसेंच गुलाब, गुलछबू व शेवंती ह्या अंगणांतल्या फुलझाडांचा पुढें उल्लेख आहे.

मला तर कांहीं बुवा सुचतच नाहीं. गुल्छबूला तर हसूंच येई, पण गुलाब त्याच्यासारखा फुलीश नाहीं. अलीकडे पावसानें केली आहे घाई, तो कांहीं थांबत नाहीं, मधुन मधुन हसते जाई, पण तिला फारसा बहर नाहीं, खूब फुगल्या शेवंती ताई, पण फुल पहावं तर एकही नाहीं, मोगऱ्याला तरी एक येई, आणखी कळ्याही आहेत कांहीं, असो, कमजास्त कां ऽऽऽ हीं नाहीं.

पण हो ! आपल्या ताराबाई, त्यांच्या नाकांत सध्यां कांहीं फुल नाहीं, असलीं जरी थोडी कांहीं तरीही त्यांचें महत्त्व नाहीं, एखाद दुसरं खालीं येई, पण ती आपली खुडित राही, त्यामुळें रान माजत नाहीं.

कसला घोंटाळा, ' कांहीं नाहीं.'

स्मशानवास, आपला प्रिय मित्र,

हिमालयाचा सहवास, **तीन डोळ्यांचा, नारळ.**

पण राखच माझ्या अंगास.

३

श्री. अहमदनगर.

तुमचें चित्र—छे ! तें चित्र नव्हतेंच मुळीं ! खरोखर तें एक मूक काव्यच होतें—किंवा तें चित्रच होतें ! स्वर्गीय बालभावनांचें—सत्त्वपूर्ण सहानुभूतीचें—परमात्म्याच्या शुद्धतम विभूतीचें—प्रेमाचें—तें चित्र नव्हतें का ? प्रिय बंधु, आपण पुढें जातों कीं मागें कुणास ठाऊक ? आम्ही ज्ञानी झालों—बुद्धिमान झालों—कवी झालों—पण खरं कां हें ? बाळपणांत जें जग होतें तेंच हल्लींही आहे ना ! अरेरे ! ! किती बदल हा आमच्यांत. जगाच्या आरंभापासून एकाच तेजानें प्रकाशित होणाऱ्या तारा या बहुरूपी मनुष्याला काय बरें म्हणत असतील ? काय आमचे रंग हे असे बदललेच पाहिजेत ? काय ! मनुष्य पतनशील आहे ! काय, बाल्य आणि तारुण्य यांचें एकीकरण होणें शक्यच नाहीं ? छे ! असें मात्र म्हणूं नका; पत्र संपलें; हृदय भरलेलेंच आहे.

**त्र्यंबक**

---

१ तीन डोळ्यांचा त्र्यंबक म्हणजे शंकर तो आंगाला राख फांसून हिमालयांत व स्मशानांत राहतो म्हणून ' स्मशानवास......अंगास. '

४

क्षेम.

मालकम पेठ, महाबळेश्वर

ता. १६–५–१९१५

प्रेमपूर्वक सा. न. वि. वि. तीन पत्रें लिहून ठेवलेलीं आहेत. चवथें पाठविण्याचा योग येत आहे. पहिलें आगगाडींत, दुसरें दाभणीची घळ व एकंदर गड बघावयास गेलों तेव्हां व तिसरें सरोदे आले तेव्हां. एकही पूर्ण लिहिलेलें नाहीं. मध्यंतरी आजारी होतों. ताराचा निरोप आला तेव्हां पुन्हां पत्र लिहिण्यास बसलों, व परमेश्वरी सूत्र असल्यास हें पत्र पूर्ण होऊन आपणांस मिळेल. कृष्णरावांना जवळजवळचीं बहुतेक ठिकाणें दाखविलीं. तारावर गारांचा मारा झाला; तिला पहिल्या प्रथम रस्ता चुकून आम्ही कोणत्या घाणेरड्या रस्तानें नेलें; सकाळच्या गाड्या व आपल्या जीवसृष्टींतील अद्‌भुत चमत्कारांच्या अपूर्ण शोधांचें रहस्य तिनें कसें फेंटाळून लावलें, तिनें ठरविलेल्या टाईमटेब्लबरहुकूम आपण कसें वागलों, वगैरे गोष्टी येथें आल्यापासून सारख्या आठवत असतात. मी व माझे मित्र बोरगांवकर ब्रह्मारण्याला गेलों. तेथें गारांच्या पावसांत यथेच्छ भिजलों, व तशा कपड्यांनीं रात्रीं साडेदहा वाजतां घरीं येऊन पोंहोचलों. संध्याकाळीं एल्फिन्स्टन पॉइंटवर पाऊस पडत असतां इंद्रधनुष्य पाहिलें. तसलें धनुष्य व तो देखावा जन्मभर विसरणार नाहीं. चोरांच्या घळींत सुमारें हजार लोकांस रहाण्यास जागा आहे, आंत पाणीही आहे. आपण केवळ एक उसासा बघूनच परत आलों. मात्र आंत चुडी पेटवून व भयंकर घाणींतून जावें लागतें, दाभणीची घळः—डोंगरास एक छिद्र पडलें आहे. त्यांतून आरशाचें प्रतिबिंब पाडून पाहतां आंत एक मोठी नदी वाहतांना दिसते. लव्हाळें, मासे वगैरे त्यांत आहेत. उगम व अंत नाहीं. पाणी वहात आहे. डबकें नाहीं. मकरंदगडाचा देखावा अपूर्व आहे. मागचीं सर्व स्थानें पाहून या वर्षीं विशेष पाहिलें तें पत्रीं लिहिलें आहे. पुष्कळ लिहावयाचें. पण कार्ड जवळ असल्यामुळें व लांबलचक पाकिटाची अपेक्षा केली तर कदाचित पत्र लांबणीवर पडेल असें वाटल्यावरून येथें विराम करावा लागत आहे. मी विन्स्लो यांना शिकवीत असतों. त्यांनीं मी शिकविलेल्या टिळकांच्या कवितांची सुंदर भाषांतरें केलीं आहेत. कवितांचीं कांहीं भाषांपरें पाठवीन.

५

श्री. अहमदनगर.

दत्तोपंत, सर्वांनीं तुम्हाला एक एक पत्र लिहिलें; आतां मी काय लिहावं, ?क्कळ डोकें खाजवलं, तोंडाचं गोल बोळकं करून डोळे फाडून सारखा कितीतरी ?चार करीत बसलों, पण काय, एक अक्षर सुचेल तर शपथ. डोकं थापटीत ?सलों; सगळं आंग खाजवलं पण आज कुठूनच कशी कांहीं शक्कल नक्कल निघत ?ाहीं. विचार ! विचार ! विचार !

तिकडे लोणी कढतें आहे, त्याचा गोड सूर निघतो, त्यांतच माझ्या डोक्याचे ?डवेतिडवे विचार सैरावैरा उधळताहेत व त्यांचाही कसलासा सूर निघून तो ? लोण्याच्या सुरांत विराम पावत आहे. एकही विचार नक्की होत नाहीं.

?बेबी वात्रटपणा करते आहे, कमी कांहीं तरी मिळावं या आशेनें मधून ?ानें म्यांव म्यांव करीत हिंडते आहे, आणि ब्लाकोजी गंभीर मुद्रेनें भाकरीची मार्गप्रतीक्षा करीत चिमली चाटीत बसले आहेत. स्टोव्हची एकसारखी घरघर चालू आहे.

गोपाजीं गोणपाटाचं वेखंड अखंड सुरू झालें असून कंपाउंडमध्यें ओरडणाऱ्या गाढवाच्या सुरावरही त्यांच्या सुराची तीन...सरसी होत आहे. बरं येवढ्यावरच आमचें दुर्दैव थांबावं कीं नाहीं, पण छे, हा पहा ससा आला, उड्या मारीत बेटा, आतां त्याला आंजारल्यागोंजारल्याशिवाय कसं चालणार. इतकी सारी व्यवधानं संभाळून मग पत्र लिहायचें, तरी पण हें पहा आणखी सांगितलं लक्ष्मीबाईनीं काम; काय करावं, चहाला साखर नाहीं, डब्यांतून आणायची, पण ही मूर्ख बेबी उठतच नाहीं, वात्रटच ती, हे इतके पत्रांत व्यत्यय.

आतां पत्र लिहिणार तरी कसं, लिहिणार तरी काय, साराच घोंटाळा. असो; पत्रच लिहीत नाहीं......जाऊं द्या कीं.

आपला,

**त्र्यंबक ठोमरे**

शेवटीं रागारागानें सांगतो कीं या मंजुळाबाईनें मला फार त्रास दिला-

६

[ सौ. हेमांगिनी जोशी म्हणजे पूर्वाश्रमीच्या ताराबाई टिळक यांनीं हुजूरपागेंत शिकत असतां ठोमरे यांना व घरच्या मंडळींना लांब पत्रें लिहा असें लिहिलें होतें. हुजूरपागेंतील मुलींची काल्र्यांला ट्रिप निघायची होती तेव्हां मी काल्र्याला जाऊं कां, असें ताराबाईंनीं आईवडिलांना पत्रानें विचारलें होतें. त्या पत्राचें उत्तर लक्ष्मीबाईंच्या तर्फे ठोमरे यांनी लिहिलें, व जुन्या पत्रिका असत त्याप्रमाणें तें कागदाला कागद जोडून १०–१२ फूट लांब केलें होतें. त्या पत्रानें ताराबाईंची लांब पत्राची हौस दुहेरी रीतीनें फिटली. ]

७

अहमदनगर, फर्ग्युसन गेट<br>
टिळकांची वाडी, मधलें घर.<br>
माठानजीक, जात्याशेजारीं<br>
लहानसें आंथरूण, त्यावर निज-<br>
लेल्या लक्ष्मीबाईंच्या उशा-<br>
नजीक, ता. ३–३–१९१४.

अनेकोत्तम आशीर्वाद विशेष. आटपाट नगर होतें, तेथें एक गृहस्थ होते. त्यांना एक मुलगी होती. तिचें म्हणणें मला एक पत्र पाठवा. लांबलचक पत्र, लिहूं नाहीं लिहिलें, कसें लिहावें; काय लिहावें, मार्च महिना, तिसरी तारीख, खिचडी करावी, साध्या पोळ्या, लोणकढें तूप, जेवण करावें; चाकराला भांडीं घांसायला द्यावी. कोठीच्या खोलीला कुलूप लावावें. फाटकेसें अंथरावें, तुटकेसें पांघरावें, एक वाजायला आला, जरा आडवें व्हावें. असें केल्यानें काय होतें, देह मन निश्चिंत होतें. लांबलचक पत्र लिहिलें जातें.

ऐका ऐका ताराबाई, तुमची कहाणी. पुणें शहर, हुजुरपागा, फिमेल हायस्कूल बोर्डिंगमध्यें, थोडीशी मंगोलियन, थोडीशी बर्मी, थोडीशी जपानी, थोडीशी चिनी इंडियांत आली, इंडियन झाली; अर्धी भाकर कांदा भिकारीणीला वाढला, ताराबाईंचा अवतार घडला.

अरबांचा मुल्ला, तुर्कांचा काजी, ग्रीसमधला शिपाई, रशियाचा रशियन, कोंकणांत गेला, भुरका झाला, अंगणांत आला खुडखुडत पडला. मोठ्यानें रडला, सगळ्यांनीं पाहिला, न्हाणलाधुणला, ऊठ बाबा मोठा हो, बाबा मोठा झाला. नागपूर शहर इस्लॉप कॉलेज, इंटर क्लासांत शिकायला गेला. असली बहीण असला भाऊ त्रिखंड शोधून गेला पाहूं. थकला भागला निराश झाला. घरचें खावें, लष्कराच्या भाकरी भाजाव्या, असलं काम कोण करी. काम नाहीं धाम नाहीं तोच असलं काम करी. इंजिनिअर खात्यांत मांजर व्याली, तिला तीन पिल्लें झालीं, एक कुत्र्यानें खाल्लें, एक मांजरानें खाल्लें, ऊठ, ऊठ भाऊ प्रधानांना सांग ताराराणीला मांजर पाहिजे, ताराराणीला मांजर पाहिजे, कसं पाहिजे, काय पाहिजे, रोगी रोष्टी, मिचमिच दृष्टी, रोडके पाय, तणतण करीत नाचत जाय, प्रधानानें दिला शिपायाहातीं, हाकारे नगारे पिटारे, नगारामध्यें ताराराणीचें मांजर आलें, ताराराणीचें मांजर आलें. आतां बाई ठेवूं कुठें, निजूं कोठें, राहूं कोठें, माझी मांजर, माझी मांजर, डोक्यावर घेऊं कां खांद्यावर घेऊं, पलंगावर निजायला जाऊं, दोन सासर दूध पिते, दोन बचक मांस खाते, दूध काढण्याचे वेळीं त्रास देते. दुधाच्या बादलींत जीव देते...पण उंदीर पाहून पळून जाते...गरीब झुरळांचा जीव घेते.

माझी मांजर, माझी मांजर, तजबीर फाडून कांच फोडते, वेताचे मेज मोडते, गुलाबाच्या फांद्या मोडते, लिलीचीं पानें फाढते, सुतळीच्या गुंड्या काढते. वरणाचे भांडें सांडते, कढत पाणी अंगावर पाडते. ज्याचें त्याचें आंग चाटते. माझी मांजर, माझी मांजर बन्याबाबाचा हात फोडते, चंपीवर दांत काढते, ब्लॅकीवर फुस करते. हाडहाड पाप्या चांडाळा, माझ्या मांजरीचें खाद्य तूं कोठें घेऊन चाललास? म्यांव म्यांव. बन्यानें दिलें बबीनें खाल्लें किती दिलं तरी पुरत नाहीं. दरिद्र कांही फिटत नाहीं. आंग कांहीं सुटत नाहीं. हांवरेपणा मिटत नाहीं.

आम्रच्या हातांची शिकार करते, लुगड्याधोतराचे सोगे धरते, सोंगट्या उडवून घरभर करते, आतां बाई सांगूं किती, लिहूं किती, गुण कांहीं संपत नाहीं. वर्णन केल्यावांचून राहवत नाहीं. आतांच पहा पत्र फाडलें नवं जोडलें तेव्हां पुढें लिहिणें घडलें, बेबीपुराण लिहूं नाहीं लिहिलं, कसं लिहावं काय लिहावं? फाल्गुन मास पहिला पक्ष पहिल्या मंगळवारीं लिहिणें लिहिलें. कहाणीचें एवढें फळ पत्राचें काय फळ. हें पत्र मला सांग गुडगुड गुपित, किल्ला कुपित, काय तुझ्या

मनांत सांग माझ्या कानांत, तुझ्या मनांतलें मीं जाणलें. लांबच लांब पत्र आणलें. पत्राच्या मिषें दौत भरली, लेखणी भेटली...लांब पत्र लिहिण्याची हौस फिटली.

बेबी, तुझा कान पुढें कर, हें बघ फाल्गुन महिना लागलाच आहे. वेड्यासारखी बाजा वाजविण्याची परवानगी कशाला मागायला पाहिजे; दररोज मनसोक्त बाजा वाजवीत जा. सर्व मंडळीची सदर परवानगी आहे.

## कालीपुराण.

शंख पुराणीं कथा पवित्र
कालियाची महती विचित्र
ती करुनी लांब दोन्ही श्रोत्र
श्रवण कीजे सादरें १

कलियुगींचा तीर्थराज
तोच वर्णीन सादर आज
श्रोते सज्जन महाराज
कथाभाग परिसा कीं २

साक्रेटिसाचा शिष्य परम
तखरीपखां तया नाम
तयें उपदेशून नेम
धोंडभडजीस सांगितला ३

कीं या कालियाची महती
तिन्ही त्रिकाळी मुली गाती
कलियुगीं विशुद्ध कीर्ती
तीर्थराज हा एक ४

होतां कालियाचें दर्शन
शहाणेपणाचा मळ धुवून
गाढवाचे अवतार पूर्ण
भाविक जन होती पैं. ५

मुलींचा हट्ट चालला
पैशियांचा खर्च मांडिला
किती पडती मिळवायाला
कष्ट तयांना न कळेची ६

म्हणती नरजन्माचा लाहो
त्यांतही स्वतंत्रपणाचा प्रभावो
चला चला जाऊन पाहों
कार्ले क्षेत्र सत्वरीं ७

लांगूल नसेल जयातें
सत्वरीं तें उपजे तेथें
भाविक वदती कितीकातें
शिंगें आलीं तया स्थलीं ८

कितीक जहाले चतुष्पाद
ऐसा कार्लियाचा प्रसाद
नाहीं नाहीं मिथ्या वाद
प्रचीत आली तियेला ९

आम्ही तरी दुबळे जन
आम्हां न घडे तीर्थदर्शन
आपण परी अवश्य जाऊन
तीर्थ पाहून येईजे १०

या तीर्थाचा महिमा प्रसिद्ध
साच न मानी याचें चित्त
तोच दुरात्मा मतिमंद
गाढवाचा अवतार ११

कार्लियास तरी जाइजे
श्रद्धालुपणें दर्शन घेइजे
रुपये येतील आतां सहजे
पोस्टमार्गेकरोनी १२

श्रोते म्हणती यास आधार
शंखपुराणीं असे सादर
फत्तरेश्वर अति पवित्र
ग्रंथ लिहिला तयांनीं

त्रिभुवनांत डंका गाजिला
फत्तरेश्वराची अगाध लीला
ग्रंथ सादर संपविला
एक तासामाझारीं

पहिलें तें तारापुराण
मग दत्तोपंत जन्मविदान
त्यापरी सुंदर गुण कथन
मार्जारीचें पै केलें

त्यावरी बाजा वाजवायाला
दिली परवानगी तुम्हांला
कार्लीपुराण ही सर्व लीला
संपविलें क्षणार्धीं

शंखपुराणग्रंथीं प्रचंड
लांब पत्र रचना उदंड
कर्ण लांबवोनी प्रचंड
अति आदरें परिसावी

........................

खुशाल बाजा वाजवा, फाल्गुन महिना आला आहे.

कार्ला येथें जाण्याची परवानगी आहे. पैसे उद्यां टिळक पाठवितील. मंडळी आनंदरूप आहेत.

७

प्रेमपूर्वक नमस्कार वि. वि. आपलें पत्र पावलें. त्याला उत्तर शांतपणें लिहावें असा विचार केल्यामुळें विलंब लागला. मध्यंतरीं लँग्वेज स्कूलच्या परीक्षा, शाळेची इन्स्पेक्शन व सर्वांत विशेष म्हणजे माझा आळस वगैरे गोष्टींचे अडथळे आले. असो. आज तरी लिहावयास बसलों हें नशीब. संपलें म्हणजे भाग्य...

गेल्या तीन वर्षांत आपली चांगलीशी मुलाखत झाली नाहीं; त्यामुळें परस्परांच्या स्वभावांत किती अंतर पडलें असेल कुणास ठाऊक ! जे तुम्ही तीन वर्षांपूर्वी-फुलपाखराप्रमाणें आनंदांत झुलत होतां, त्या तुम्हांला आतां तरुणपणा, मोठेपणा आला आहे असें तुमचें मन सांगूं लागलें, पण हा मोठेपणा म्हणजे जडपणा—म्हातारपणा वाटतो. तुम्हांला अगदीं उदास वाटतें, जग नकोसें वाटतें, याचा तरी अर्थ काय ? चैतन्यशक्ति जेव्हां शरीराच्या रोमारोमांत थैमान करूं लागते, तेव्हां खऱ्या मोठेपणाला प्रारंभ होतो. तथापि तुम्ही माझेच आहां; कारण जें माझें आहे तें माझ्यापासून नेण्याला प्रत्यक्ष तुम्ही किंवा कोणीही समर्थ नाहीं असा माझा पक्का विश्वास आहे. एकाद्या मित्राचें माझ्यावर प्रेम आहे, तो मला जीव कीं प्राण वाटतो, त्याचें स्मरण झालें म्हणजे माझ्या हृदयांतील आनंदाचा कोश विकसित होतो, अनेक पवित्र व उदात्त विचार जागृत होतात. पण पुढें मौज काय होते, तो आपल्याशीं बरोबर वागत नाहीं अशी आपली समजूत होते. खरोखरच त्याचें मन आपल्याबद्दल शुद्ध राहिलें नाहीं ही आपली समजूत यथार्थ असते आणि तसें झालें म्हणजे आपण काय करितों ? त्याच्याबद्दलचे पवित्र विचार रागाच्या ज्वालांत जाळून टाकितों. आणि त्याबरोबर आपल्या मनांत असलेल्या त्या मित्रशरीराची हळु हळु रक्षा होऊन जाते. मग पुढें मागें त्या भागावरून आपलें लक्ष गेलें तर स्मशानांतून जातांना चितेवर पाय पडला असतां जसें भेसूर वाटतें तसेंच वाटूं लागतें. अशा कितीतरी चिता आपण आपल्या हातानें पेटवून घेत असतों; थोडीशी तितिक्षा पाहिजे, तेवढी नसली म्हणजे अशा चिताच भडकणार. कारण तें तसेंच आहे.

पण गड्या, थोडा वेळ दम धरला असतां, चिता पेटविली नसती तर तुझ्या दृष्टीनें वाईट दिसणारे जे पदार्थ होते त्यांतूनच कल्पवृक्षाचे अंकुर बाहेर आले असते; व त्यांनीं जगाचें नंदनवन करून सोडलें असतें.

दुसऱ्यानें आपल्या अंतःकरणांतील सुविचारांची सौभाग्यलेणीं फेंकून दिलीं म्हणजे आम्हीही तीं फेंकून देतों. दुसऱ्यांनीं आपल्या मनोमंदिराला आग लावून दिली कीं, आम्हीही लावतों. असंतोष म्हणजेच ही आग. ही पुष्कळ कारणांनीं व पुष्कळ प्रकारांनीं लागत असते, किती हें वेडेपण ! ही एकदां लागली, तिचा धूर चोहोंकडे भरला, म्हणजे मनुष्याची दिशाभूल झालीच पाहिजे, आणि दिशाभूल झालेला मनुष्य कोणीकडे जाईल त्याचा नियम नाहीं. खरें म्हटलें तर माझें प्रेम हें जर जगाच्या आरशांत पडलेलें प्रतिबिंब आहे तर मी प्रेमस्वरूप आहे कां ? जगानें प्रेमस्वरूप आपल्या पुढून काढून घेतलें कीं गेलें प्रेमस्वरूप. हें खरें प्रेम नाहीं. या प्रेमाच्या चेष्टा आहेत.

अरे वाण्यांनो, गिऱ्हाइकांनीं तुमच्यावर प्रेम करावें असा तुमचा काय अधिकार आहे ? दात्याची स्तुति करावयाला जग तयार आहे. परमेश्वराला कधींही कुणीही पाहिलें नाहीं, परन्तु त्यानें हें सर्व आम्हाला दिलें अशी नुसती भावना झाल्यामुळें सगळें जग आज त्याची स्तुति करीत आहे. दाता दान करतो तो संतोषाखातर करतो व भिकारी हात पसरतो तो असंतुष्ट असतो म्हणून पसरतो. दात्याला दान करितांना संतोष वाटत नाहीं, कां तर त्या भिकाऱ्याजवळ हा धनिक भिकारी स्तुतीची, मानाची, कशाची तरी याचना करीत असतो व ती मिळाली नाहीं म्हणजे असंतुष्ट, निराश होऊन बसतो. दान करितांना, प्रेम करितांना, दया क्षमा दाखवितांना किंबहुना कोणतीही गोष्ट करतांना लक्षांत ठेवा कीं, असंतोष म्हणजे भिक्षावृत्ती. भिक्षावृत्ती नसली तरी वणिग्वृत्ति तरी आहे, पण ही वणिग्वृत्ति तरी कसली ? प्रेमासारखीं अमोल रत्नें देऊन आम्ही त्यांच्यापासून अपेक्षा कसली करतों ? एका मिनिटांत वाऱ्यावर वाहून जाणाऱ्या चार गोड शब्दांची, देवाच्या निवडलेल्या लोकांनों, विदेश्यांप्रमाणें प्रतिफळाची अपेक्षा करूं नका.

सद्हेतूनें कर्म करा. परिणाम काय होणार याकडे ढुंकून सुद्धां पाहूं नका. तुमच्या रागाच्या एका शब्दानें तुमच्या मित्राच्या हृदयांत चार मिनिटांत केवढें अरण्य माजून जातें याची तरी तुम्हांला कल्पना झाली असेल ? ज्या शेतांत गांजा चांगला पिकतो त्यांत गहूंही चांगलाच पिकतो, असें शेतकरी म्हणतात. एक बारिकसें बीं पडलें म्हणजे त्यापासून वडासारखा एक प्रचंड वृक्ष तयार होतो म्हणून आश्चर्यचकित होणाऱ्या लोकांनीं ही मनःसृष्टी अजून पाहिली नाहीं. एका शब्दाला अनंत शब्द फुटतात व त्यांतूनही पुन्हा अनंत विचार उत्पन्न होऊन ही अनंताची

परंपरा अनंत काळापासून चालू असून सृष्टीबरोबर पुढें ही अनंत काळापर्यंत चालू रहाणार आहे.

एक लहानसें पान घेतलें तर त्याच्यावर वाऱ्याच्या लहरी, सूर्याचे अनंत किरण, बाष्पाच्या अनंत कणिका, बीजानें त्याच्या अंगी दिलेला बाह्य पदार्थ-संग्रहणाची शक्ति, वृक्षावर झालेले परिणाम, फांदीला लागलेले आघात इत्यादि इत्यादि अनंत संस्कार झालेले आहेत. हाच किंवा यापेक्षांही गहन विचार केला तर आपणांस मनुष्यत्व—व्यक्तित्वाची कल्पना होणार आहे. यावरून पाहतां प्रत्येक व्यक्ति म्हणजे अनंताच्या अनंतावधि कर्मांचा परिणाम असून तिच्यावर प्रत्येक सेकंदांत जग अनंतावधि परिणाम करीत असून तीही आपल्या पूर्व संस्कारांत हे नवीन संस्कार मिश्रित करून अनंतावधि नवीन संस्कार उत्पन्न करीत असते. हा संस्कारसंकर व त्यांचीं कार्यें याला आपण मनुष्याचा स्वभाव व त्याचें वर्तन असें म्हणत असतों. याप्रमाणें पाहतां प्रत्येक व्यक्तीचा स्वभाव कितीतरी कालापासून बदलत बदलत आला असून पुढेंहि बदलत रहाणार. जेव्हां आपण एखाद्यावर प्रेम वगैरे करतों तेव्हां हे विचार जर आपल्या अंतःकरणांत जागृत असले तर आपणांस निराश होण्याचें कारण उरत नाहीं; कारण आपणांला पूर्ण कळून चुकलें कीं, या क्षेत्रांत नुसता उसासा सोडला, वांकड्या डोळ्यांनीं पाहिलें तर तें सुद्धां उगवून त्याचे मोठमोठाले वृक्ष बनतील. तर आतां मी तर त्याच्यावर शुद्ध अंतःकरणानें प्रेम करीत आहें तें उगवलेंच नसेल काय ? येथें उगवत नाहीं अशी जागा अटलांटिक महासागराच्या शेवटल्या बर्फमय सीमेवर देखील सांपडणें शक्य नाहीं. झाड उगवलें आहे, कदाचित् दिसत नसेल, कारण तेथें नुसतें एकटें झाड नाहीं; अनेक चिंतांचीं, संशयांचीं, कर्तव्यांचीं विकल्पाचीं अनेकावधि झाडें आहेत त्यांत तुमचें आहेच. दिसो किंवा न दिसो. जेव्हां तुम्ही जन्मालाच आलां नव्हतां तेव्हां तुमच्यावर कुणाचें प्रेम नव्हतें, राग नव्हता. तेव्हां तुम्हांबद्दल जें प्रेम, राग किंवा दुसरें कांहीं जगांत उत्पन्न झालें असेल तर तें तुमच्या द्वारेंच उगवलें, किंवा परंपरेनें तुम्हीच उत्पन्न केलें असें म्हणावें लागतें. कळो किंवा न कळो कर्मांचा नाश होणें कधीं शक्य नाहीं हें कळल्यामुळेंच कोणत्याही महात्म्याला आपल्या वर्तनाचा जगावर परिणाम झाला नाहीं असें स्पष्ट दिसून आलें तरी खेद होत नाहीं. पूर्वकर्म, संस्कार, पूर्वसंचित यांचे परिणाम अनुभवलेच पाहिजेत, त्याबद्दल खेद करूं नये आणि पुढें या कर्मभूमीचा, नख पेरलें तर नख उगवेल, डोळा

पेरला तर डोळा उगवेल हा न्याय्य लक्षांत ठेवून शुद्ध सात्त्विक हेतूनें कोणतीही गोष्ट करावी आणि मग, कर्म करा आणि धीर धरा, हा गीतेचा उपदेश लक्षांत ठेवून नेहमीं वागावें म्हणजे असंतोषाला जागा रहात नाहीं, नैराश्याचा अंधार होत नाहीं व संशयाचें काहूर भरत नाहीं. आत्मविश्वास उत्पन्न होतो व आत्मविश्वासानें काम करण्याची नवी उमेद येते. अशा रीतीनें मंगलाचा मंगल सांठा वाढवून आपणांस आपली व जगाचीही तृप्ति करतां येते. जगांत न्याय आहे, हें तत्त्व तुम्हांला पटलें, वास्तविक अर्थानें पटलें तरीही तुम्हांला किती आनंद होणार आहे, किती शांती मिळणार आहे याची नीटशी कल्पनाच जगाला होत नाहीं. याला कोण काय करणार ? जर न्याय आहे, प्रेम आहे, सत्य आहे, आनंद आहे किंवा यापैकीं एक तरी आहे असा तुमचा विश्वास बसला तर तुम्हांला देव सांपडला असेंच मी समजेन; पण शब्दज्ञानाचे शब्द सुद्धां अर्थहीन होऊन जातात, आणि म्हणूनच ज्ञानामृत प्राशन करूं म्हणणाऱ्या तुम्हां विद्यार्थ्यांचीं तोंडें मला कशीं पाण्यावांचून कोमेजलेलीं, सुकलेलीं अशीं दिसतात.

अपूर्ण.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. क्र. ........

# परिशिष्ट ४

## अनंत

अनंताच्या अनंत, अगाध, आरपार अमर्याद आणि गहन अशा सृष्टिविस्तारांत मन गढून गेलें होतें, कल्पनातीताला क्षुद्र कल्पनांचें आवरण घालूं पहाणाऱ्या वेड्या विचारांची, धांदल उडून गेली होती. गर्द अरण्याच्या गुंफामध्यें संध्याकाळच्या वेळीं वाट चुकलेल्या वाटसराप्रमाणें बुद्धी जागच्या जागीं थबकून सभोंवार डोळे फाडून भिरभिर पहात राहिली होती. विचारांचें हळूं हळूं विकारांत परिवर्तन होऊं लागलें. कांहीं भीति, कांहीं आश्चर्यचकितपणा, यांनीं मन गोंधळून गेलें. ही अज्ञेयाची खोल दरी आहे. हिच्यांत धुकें भरलें आहे. माझ्याशिवाय मला कांहीं दिसत नाहीं. दिसल्यासारखें वाटतें, पण कदाचित् ती माझीच सांवली असेल. पदोपदीं मन साशंक होतें, थबकतें, ओरडतें, पुन्हा डोळे वासून पाहूं लागतें, गोंधळलेल्या थतींतच भीतिनें भेदरून चार पावलें पुढें किंवा मागें टाकतें, पुन्हा विचार पटतो, व पहिल्याप्रमाणें गोंधळ उडतो, व पहिल्याप्रमाणेंच पुन्हा होऊं लागतें.

पुष्कळ लोक येथून गेले आहेत, जाणार आहेत, कोणी हंसत, कोणी रडत, कोणी गातनाचत तर कोणी दीर्घ आक्रोश करीत चाललेले आहेत. ते कां रडतात हें मला ठाऊक आहे. ते कां हंसतात हेंही मला ठाऊक नाहीं असें नाहीं. तरीपण तें हंसणें किंवा रडणें ज्याचें त्यालाच आहे. कारण प्रत्येकाच्या मनाची इतकी गुंतागुंत झाली आहे कीं, कांहीं गोष्टीशिवाय, मला त्यांच्या हंसण्यारडण्याचा थांग लागत नाहीं असें म्हटल्यास चालेल. उलट ते माझ्या मनाला अधिकाधिक गोंधळांत घालतात असें वाटतें. कोणाला हंसतांना पाहून त्याच्या मागें चार पावलें जातों तोंच मला त्याच्या उलट अनुभव येऊं लागतो. त्यामुळें माझा विश्वास उडाला व निराशा बलवत्तर झाली. चालण्याशिवाय गत्यंतर नाहीं हेंही मला येथें कळून आलें. रखडत किंवा उड्या मारीत, रडत किंवा हंसत, पुढें अथवा मागें, प्रत्येकाला गेलेंच पाहिजे.

# गति

गति ! ही गति कोणाला चुकवितां येणार नाहीं. तिला हवें तें नांव द्या. कमी करा कीं जास्त करा. पण विरति हा शब्दच उच्चारतां येत नाहीं. अक्षय्य गति, अविरत, अखंड गति, या गतीला अंत आहे कीं नाहीं हें मला सांगतां येत नाहीं. पण विरति हा मात्र केवळ भास आहे. किंवा तीहि असल्यास सापेक्ष आहे यांत शंका नाहीं. गतिविरहित स्थिति, विरतीची कल्पनासुद्धां होत नाहीं. कारण माझी स्थिति म्हणजेच गति आणि गति म्हणजेच स्थिति, असा हा एथला नियम दिसतो. गतिविरहित स्थिति व स्थितिविरहीत गति यांची सुद्धां कल्पना करवत नाहीं. स्थिति व गति यांच्या संमिश्रणापासून दिक्कालाची कल्पना माझ्या मनांत आली आणि अस्पष्ट द्वैतभावनेच्या रूपरेषा ठळक होऊं लागल्या. प्रथम येथील स्थिति, गति एकच प्रकारची आहे असें मला वाटत होतें; तें आतां एकांत अनेकत्व दिसूं लागलें व अनेकांत एकत्वाचा भास होऊं लागला. आकाशांत फिरणाऱ्या ग्रहगोलांना एक प्रकारची गति आहे. पृथ्वी, तीजवरील पर्वत, समुद्र, अरण्य, नद, नद्या यांनाहि एक प्रकारची गति आहे. गतिविरहित स्थितीची कल्पनासुद्धां होत नाहीं हें वर सांगितलेंच आहे; पण वरील प्रकारच्या गतींत व माझ्या गतींत एक प्रकारचें अंतर आहे. यांच्या गति निसर्गनिर्मित आहेत, माझ्या गतीचा चक्रचालक मी आहे.

REFBK-0008342
REFBK-0008342
अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.